म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. 32222

डॉ. एस्. एस्. भोसले

# नागरी परंपरेचे लोकाविष्कार

REFBK-0025402
REFBK-0025402

निबंध [सामाजिक]
३२२२
२५४७२
२५।०।८५

३२२२
निबंध २५४७२
२५।०।८५

डॉ० एस्० एस्०
भोसले

# नांगरी परंपरेचे लोकाविष्कार

REFBK-0025402

सुरेश एजन्सी
पुणे

निबंध ३२२२ २४७८२ २५।८।८६

## प्रास्ताविक

'नांगरी परंपरेचे लोकाविष्कार' या लेखसंग्रहामध्ये मी वेळोवेळी लिहिलेले काही लेख संग्रहित केले आहेत.

हे लेख जसे मी माझ्या नावाने लिहिले तसेच ते, तत्सदृश टोपण नावांनीही लिहिले. निरनिराळ्या वृत्तपत्रांशी माझा संबंध, महाविद्यालयीन विद्यार्थिदशेपासून १९५५ सालापासून आला : वृत्तवार्ताहर, प्रतिनिधी, सहसंपादक आणि 'रविवार पुरवणी' संपादक असा विविध नात्यांचा हा संबंध राहिला. आजही तो कायम आहे.

साहजिकच कधी गरज–निकड म्हणून, कधी ऐन मोक्याच्या परिस्थितीला तोंड द्यायचे म्हणून, कधी प्रसंग साजरा करणे प्राप्त म्हणून, तर कधी पुनः पुनः तेच ते नाव वाचकांच्या डोळ्यांसमोर येत राहिल्याने मजकुरातील ताजेपणाची टवटवी मंदावण्याची शक्यता राहते म्हणून अशी अनेक कारणे 'टोपण' नावाच्या स्वीकारामागे आहेत. ती मूलभूत आहेत.

'टोपण' नावाचा अंगीकार वदवून काढण्याचा एक सोपा व सोयिस्कर मार्ग; एक परिसस्पर्श या दृष्टीने करण्याचा रूढ पायंडा आहे. पण मला त्याची एवढीही कधी गरज वाटली नाही. आजही नाही.

या लेखसंग्रहातील क्रमाने शेवटचा लेख 'कूट प्रश्नांची गणिते' 'नवभारत'-मध्ये, १९६४–६५ च्या दरम्यान पहिल्यांदा लिहिला. 'म. फुले ते भाऊराव पाटील : काही विचार' असा त्याचा मथळा होता. प्रसिद्धीपूर्व जवळ जवळ आठ-नऊ महिने मी तो लिहून ठेवला होता. 'नवभारत'कडे पाठविल्यानंतरच्या काळात संपादकांकडे तो किमान तीन-चार महिने तरी पडून होता. म्हणजे नाही म्हटले तरी मध्ये वर्ष-सव्वावर्ष गेले होते. लेख यथावकाश त्या महिन्यातल्या 'नवभारता'त अग्रक्रमाने प्रसिद्ध झाला. अर्थात् क्रम हा योगायोग होता की त्या काळच्या 'नवभारता'च्या प्रवृत्तीचा निदर्शक होता, हे सांगणे कठीण आहे. पण त्यातूनही माझ्याबाबतीत गौरवनिंदा उपजली हे कमी महत्त्वाचे नाही.

'नवभारता'त लेख प्रकाशित झाला आणि क्रमाने प्रथम अंक व त्या पाठोपाठ काही दिवसांच्या अंतराने 'ऑफ प्रिंट्स' हाती पडल्या. लेख हस्त-

लिखितात असताना जे वाटले नाही ते तो छापील रूपात पाहिल्यावर उगीचच जाणवले. लेखातले प्रतिपादन काहीसे 'क्रूर' बनले आणि काही परिणामांच्या आशंकेने मन झाकोळून गेले. नेमक्या याच वेळी वयोवृद्ध स्वातंत्र्यसैनिक श्री. गोविंदराव उपळेकर, आचार्य स. ज. भागवत यांचा निरोप घेऊन आले. त्यांच्या खर्जातल्या आवाजात सांगताना श्री. गोविंदराव म्हणाले, "पोरा विद्वाना, चल. म्हातारा तुला बघायचंय म्हणतोय." मी पार गोंधळलो. आचार्यांना त्यापूर्वी मी पाहिले होते. त्यांना दोन-तीनदा ऐकले होते. पण आचार्यांकडे जायला मी मुळीच तयार नव्हतो. मुळात निर्भीड, परिणामांची क्षिती न बाळगता झेप घेण्याची वृत्ती वगैरे सारे माझे म्हणून माझ्याकडे असले तरी आचर्यांकडे जाण्याची माझी काही छाती होत नव्हती. आचार्यांचे लक्षणीय बुद्धिवैभव, क्रांतदर्शी दृष्टी आणि त्यातील पितृतुल्य करडेपण मला सुखविणारे होते पण भिवबीतही कमी नव्हते. पण गोविंदरावांनी जाम बकोटीला धरले आणि सरळ आचार्य भगवतांसमोर उभे केले.

कोल्हापुरातल्या कोरगावकर ट्रस्टच्या माडीवरल्या अगदी दर्शनी खोलीत एका सायंकाळी आचार्यांच्या समोर गोविंदरावांनी मला उभे केले. बसायचे की नाही, बसायचे तर कुठे आणि कसे या संभ्रमात मी असतानाच गोविंदरावांनी आचार्यांच्या समोरच्या बैठकीवर आपल्यासाठी जागाही करून घेतली होती. दरम्यान उपरणेवजा धोतराचा सोगा किंचित वर उचलून, या खांद्यावरून त्या खांद्यावर फेकीत, नितळ स्वच्छ चष्म्याच्या वरील कडाआतून त्रिलंदर डोळयांनी मिस्किलपणे आचार्यांनी मला एकदा आपादमस्तक न्याहाळून घेतले. पाठोपाठ करड्या किंचित् घोगरेपणाची मृदू कडा असलेल्या आवाजात 'बैस' म्हटले. 'तुला सोयीचं वाटेल तिथं आणि तसा बैस' म्हणूनही सांगितले. स्वतः बसलेल्या बैठकीच्या बाजूलाच एक थाप टाकून 'इथंच ये' असे म्हणाले. आणि माझ्या बसण्या न बसण्याची वाट न पाहता प्रारंभालाच सलामी दिली. आचार्य भागवत कुतूहलमिश्रित डोळयांनी, खोलवर आवाजात म्हणाले, "अरे तू तर जवान बांड पोरगा आहेस. माझी समजूत एस्. एस्. भोसले हा कुणी झालं गेला, म्हातारपणाकडं झुकलेला माणूस असेल. म्हाताऱ्याचा अंदाज चुकला खरा." म्हणता म्हणताच जवळ जवळ दीडेक तास माझ्यावर स्तुतीचा अखंड वर्षाव आणि क्रमाने काही प्रश्नांची सरबत्ती :

हा लेख लिहिताना तुला भीती वाटली का?

हा लेख तूच लिहिला आहेस की कुणाचं साहाय्य घेतलं आहेस?

हे लिहायचं सामर्थ्य तुला कसं मिळालं? कुठून मिळालं? तुझ्या घरी कोण कोण शिकलेलं आहे?

ज्या संस्थेत तू काम करतोस तिथं तुला ह्या लेखामुळं त्रास होणार नाही का? काय करशील मग तू?

क्रमवार असे प्रश्न बरेच होते. माझी टेमेठोक उत्तरेही होती. भीड चेपत चालली होती. गांगरटपणाला सावधानतेचा सूर मिळत होता. समोर बसलेले गोविंदराव शास्त्रीय संगीताच्या मैफलीतल्या जाणत्याप्रमाणे खुणावून बरोबर-चूक स्पष्ट करीत होते. आचार्य बारीक नजरेने हे न्याहाळीत होते; पण हेतुपुरस्सर दुर्लक्षही करीत होते. माझ्या 'ट्रेनिंग कोर्स' ला अडथळा नको अशी त्यांची धारणा असावी! मात्र आचार्यांच्या चौफेर निरीक्षणात त्यांचे वाग्बाण सुरूच होते.

"...पन्नास वर्षांपूर्वी ब्राह्मण समाजात 'ब्राह्मण आगरकर' झाले. आज बहुजनसमाजासाठी 'मराठा आगरकरां'ची आवश्यकता आहे. एकशेसोळा वर्षांपूर्वी लोकहितवादींनी घणाघाती 'शतपत्रे' लिहिली. बहुजन समाजासाठी अशाच 'शतपत्रां'ची आज गरज आहे. मात्र ब्राह्मण आगरकर किंवा ब्राह्मण लोकहितवादी यांच्याकडून हे होणार नाही. तसे त्यांच्या मनात असले तरी होणार नाही; ते करणार नाहीत. आगरकर किंवा फुले यांच्यातील असामान्य धैर्याचा गुण, लोकशाही असूनही उरलेला नाही."

लेखातील या विधानांनी त्यातील प्रतिपादनाने आचार्य अत्यंत प्रभावित झाले होते. या विधानांचा, त्यांच्या गौरवकांडात पुनः पुन्हा उच्चार होत होता. आपल्या दमदार आवाजात शेवटी आचार्य म्हणाले होते, "आम्ही जे रुजावं म्हणून आयुष्यभर खपलो ते उगवत असलेलं पाहून आनंद वाटतोय. सुखानं मरायला आम्ही मोकळे आहोत त्याची ही नांदी आहे."

त्यानंतर आचार्य भागवतांच्याकडला माझा राबता वाढला. आचार्यांचे 'फकिराचे घर' पुस्तकादी गोष्टींसाठी मला मुक्तद्वार झाले. त्याचा फायदा घेऊन पुढे अनेक प्रसंगी, कधी विवेकाने तर कधी चावरटपणे आचार्यांशी कित्येक विषयांवर मी आडवेतिडवे मनसोक्त वाद घातले. पहिल्यांदा गांगरलेला मी, पुढे पुढे 'मला तुमचं हे मत पटत नाही' असे स्पष्टपणे सांगून मोकळा होऊ लागलो. असे काही प्रसंग उद्भवले की, शेजारचा दंडा उगीचच हातात घेऊन थोडा उंचावून आचार्यांनी म्हणावे, "पटेल, थोडा अधिक विचार कर म्हणजे पटेल." आचार्य तसे कोपिष्ट; पण माझ्यावर कधी रागावल्याचे आठवत नाही.

पुढे २।३ वर्षांनी, कोल्हापूरच्या श्री. श्रद्धानंद हॉलमधील माझ्या मंगल विवाहास आशीर्वाद देण्यासाठी आचार्य भागवत आले. अक्षता पडल्यावर पुढच्या

रांगेतून संथपणे उठले, आम्हा उभयतांजवळ आले. मला म्हणाले, ' उजवा हात पुढे कर. ' मी तसा तो केल्यावर आपली झाकली मूठ माझ्या हातावर मापेमाप टेकीत म्हणाले, 'उत्तम गृहस्थी जीवन जग.' दरम्यान मी मूठ उघडण्याचा प्रयत्न केल्याचे ओझरते दिसताच लग्नमंडपातच माझ्यावर रागावले; हे रागावणे तेवढे आठवते. पण वादविवादाच्या वेळी कधी रागावले—खेकसले असे झाले नाही. माझ्या संस्कारशील वाढत्या वयाची आश्वासक मशागत माझ्या आजोबांबरोबरच आचार्य भागवतांनी पुढे सतत केली. ' विचार म्हणजे काय ? ' आणि ' त्याचे सामर्थ्य कोणते असते ? ' हे आचार्यांनी मला शिकविले. तो कसा करायचा —हे माझा मीच शिकत गेलो.

पुढे लाभलेल्या अत्यंत अल्प काळात आचार्य भागवतांच्या मार्गदर्शनाखाली ' बहुजनबहुहिताय शिक्षणप्रसार ' हा संशोधन—प्रकल्प मी पुरा केला. ' महाराष्ट्राचे शिक्षण : प्रयोग आणि परंपरा ' या ग्रंथात ' बहुजनबहुहिताय शिक्षणप्रसार : काही वर्मे, काही मर्मे ' या मथळ्याखाली तो अंतर्भूत करण्यात आला आहे. एवंच, माझ्या वैचारिक घडणीत आचार्य भागवतांच्या विज्ञाननिष्ठ विचारदृष्टीचा मोठा वाटा आहे.

या लेखाने कडूगोड अनुभव खूपच दिले. भागवतांचा सांगितला हा किस्सा तसा त्रोटकच आहे. सविस्तर केव्हा तरी लिहायचे आहे.

त्यानंतर, अभ्यासातून दिशा उजळतील तशा वाटा धुंडाळत मी विचार करीत व केलेला विचार पक्का होताच मांडीत गेलो. प्रामुख्याने उपेक्षितांची विचारदृष्टी, त्यांच्या व्यक्तित्वाचे व कर्तृत्वाचे दर्शन देणाऱ्या काही महत्त्वाच्या अंगांचा परामर्श मुख्यतः घेत राहिलो. विवेचन आणि भाष्य असे लेखांचे सर्वसाधारण स्वरूप होत गेले. लेखांचा सहजभाव मुद्दामहून बदलण्याचा किंवा वळविण्याचा प्रयत्न केला नाही.

एक अभ्यासू विद्यार्थी या नात्याने, सप्रमाण व साधार अभ्यासावरच्या माझ्या काही प्रतिक्रिया नोंदून ठेवणे ही अशा स्वरूपाच्या लेखनामागील महत्त्वाची दृष्टी आहे. मी ती मोलाची मानली आहे.

' महाराष्ट्रातील बहुजनसमाजाच्या चळवळीमधील प्रमुख प्रवाहांचा चिकित्सक अभ्यास ' या माझ्या व्यापक संशोधन—प्रकल्पाची 'नागरी परंपरेचे लोकाविष्कार' हा लेखसंग्रह ही ' रंगीत तालीम ' आहे. नांदीची घंटा झाली असली तरी भैरवीचा घंटानाद अद्याप व्हायचा आहे. अडचणी अनेक असल्या तरी यथाकाळ तो ऐकू येईल, चुकणार नाही.

महात्मा फुले, वि. रा. शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. आंबेडकर या समाजधुरीणांवर पुणे—सांगली आकाशवाणी केंद्रावरून मी अधूनमधून दिलेल्या

भाषणांचा भाग लेखरूपात या लेखसंग्रहातील संबंधित लेखांमध्ये समाविष्ट केला आहे.

'स्त्री-मुक्तीचा ध्यास' हा महर्षी अण्णासाहेब कर्वे यांच्यावरील लेख नागरी परंपरेतील आहे, नांगरी परंपरेतील नाही. हे माहीत असूनही लेखसंग्रह बांधण्याच्या दृष्टीने त्याचे महत्त्व असल्याने तो त्यामध्ये आवर्जून अंतर्भूत केला आहे.

एतद्विषयक अद्याप बरेच लिहायचे आहे. शंकरराव मोरे, दिनकरराव जवळकर, भालेकर, केशवराव जेधे, डॉ. पंजाबराव देशमुख, भाऊसाहेब हिरे, पद्मश्री विखे पाटील, मुकुंदराव पाटील, अण्णासाहेब लठ्ठे अशा एका दीर्घ परंपरेचा शोध संकल्पित आहे. या नांगरी परंपरेबरोबर नागरी परंपरेचाही मागोवा घ्यायचा आहे. त्या त्या चळवळीचा काळ, व्यक्ती, विचार आणि कार्य यातून उभी चळवळ कशी बांधली गेली त्याचा शोध ही यामधली सर्वथैव अग्रक्रमाची गोष्ट आहे. अधूनमधून आलेली नावे वानगीदाखल मानायला हरकत काहीच नाही.

माझी भाची चि. सुवर्णलता व पत्नी सौ. उज्ज्वला ह्यांनी लेखांच्या मुद्रणप्रती काळजीपूर्वक केल्या. या बाबतीतली त्यांची हौस माझ्या नेहमीच पथ्यावर पडत आली.

या पुस्तकाचे प्रकाशक श्री. बाळासाहेब कारले, मुद्रक श्री. अण्णासाहेब लाटकर व प्राचार्य वसंतराव देसाई यांचा मी अत्यंत आभारी आहे.

रीडर, मराठी विभाग
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

एस्. एस्. भोसले

# अनुक्रम


| | |
|---|---|
| लोकशिक्षण आणि समाज | १ |
| सृजनशील निबंधकार | १४ |
| अक्रोडाचे झाड | २६ |
| स्त्री-मुक्तीचा ध्यास | ५५ |
| सार्वत्रिक शिक्षणाचा समाजवादी प्रयोग | ७० |
| बहुजनहिताय कार्य | ९५ |
| श्रमिकांच्या राज्याचे स्वप्न | १२३ |
| जागृती आणि रचना | १३८ |
| समाजवादाचे धर्मचक्र | १५६ |
| कूट प्रश्नांची गणिते | १६५ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३२२२

१

# लोकशिक्षण आणि समाज

शिक्षण आणि समाज यांमधील अनुबंध गृहीत धरून चालण्याचे प्रयोजन नाही. कारण माणूस आणि माणसाची नाळ यांचा संबंध जितका सनातन, अतूट आणि परस्परबद्ध तितकेच शिक्षण आणि समाज यांमधील नातेगोतेही निकट आहे. हे जसे पक्के आणि दृढ तसेच शिक्षणामधील समाजपरिवर्तनाचे गोत्रही सज्जड आहे.

**सोयरसंबंधाची प्राचीन नाळ**

त्यामुळेच शिक्षण आणि परिवर्तन यांमधील सोयरसंबंध प्राचीन आहे.

हा अनुबंध पक्का असल्यानेच 'शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे,' 'शिक्षणाने माणसाला मनुष्यत्व प्राप्त होते' वगैरे वचने पुन:पुन्हा सांगितली गेली नसतील असे नव्हे. जे आहे किंवा नाही ते पुन:पुन्हा सांगितले गेले की मनावर ठसते किंवा नसले तरी खरे वाटू लागते. मानसशास्त्रदृष्ट्या पुनरुक्ती, रूढ भाषेतली उजळणी केव्हाही फलदायीच ठरते. कदाचित त्यामुळे नाहीच असे नव्हे, सुभाषितवजा वचनांचे उच्चारण वारंवारही घडत असेल! या वचनांच्या उच्चारणात शिक्षण आणि समाज यांच्या परस्पराश्रयी वर्धिष्णुतेची पक्की गाठ आहे आणि शिक्षणाद्वारा साधल्या जाणाऱ्या परिवर्तनाची किमयाही आहे. म्हणजे जे जे कुणी हे उच्चारण करीत आले त्या प्रत्येकास ह्या दोहोंचे उचित भान असते. त्यात सगळे येतात : सुशिक्षित–अशिक्षित, अक्षर ओळख असलेलेही आणि पार पाल्याड असलेलेही. सगळेच त्यात सामावतात.

उच्चारणाची ही प्रक्रिया नेहमीच तेजीत असते असे मात्र नाही. ती थंडावत

असतानाही दिसते. ‘ ज्ञान हा माणसाचा तिसरा डोळा आहे ’ असे म्हणता म्हणता असेही वारंवार म्हटल्याचे कानी पडते की, ‘ या शिक्षणाचा काय उपयोग आहे ? आजचे शिक्षण कुचकामी आहे. ’ ‘ शिक्षणाने माणसाला मनुष्यत्व प्राप्त होते ’ असे सांगता सांगता एकदम थांबणे घडते; ‘ अबाऊट टर्न ’ करून म्हणायला सुरुवात होते, ‘ काय हो ? अडाण्याहून ही शिकलेली माणसं अडाणी बनू लागली आहेत. जनावरंही अशी वागत नाहीत कधी कधी ! ’ तर तिसऱ्या डोळ्यापासून जनावराच्या औलादीपर्यंत वचनांचा जो प्रवास होतो तो का होतो ? न सांगताही कळण्याइतके कारण स्पष्ट असते आणि ते हे असते की, शिक्षण, समाज आणि परिवर्तन यांचा सांधाच निखळलेला राहतो. शिक्षण आणि समाज यांचा अनुबंध सुतराम राहिलेला नसतो आणि त्याच्या अभावी परिवर्तनाचा पतंगच मुळी भरकटत चाललेला असतो. म्हणजेच कशाचाच काही उपयोग किंवा सहकार्य संभवनीयतेच्या टप्प्यात उरलेले नसते. वचनांच्या उलट्या प्रवासाला त्यातूनच सुरुवात होते.

**नैसर्गिक बंधांचे जोपासन**

नुसत्या वचनांच्या केवळ सुलट–उलट प्रवासावरूनही हे जाणता येते की, शिक्षण, समाज आणि परिवर्तन यांचा अतूट संबंध अटळ आहे. तो टाळता येत नाही. टाळून पुढे जाण्याला अर्थही नाही. म्हणून या तिन्हींमधील नैसर्गिक बंध आणि उपजत उमलणे हे लक्षात वागवावेच लागते. ते विसरले किंवा विसरायला झाले की माणूस, त्यासाठीचे शिक्षण, माणूस आणि शिक्षण यातून आकाराला येणारा समाज, त्याला अपेक्षित रूप लाभण्यासाठी त्याचे व्हावयाचे परिवर्तन ही सारी दीर्घसूत्री प्रक्रियाच उन्मळून पडते. आणि एकदा उन्मळलेले उभे करायला फार अवधी लागतो. कारण उभे करताना, काही सजविताना खूप पद्धतशीर विचार करावा लागतो, डोके शिणवावे लागते. मोडण्याची क्रिया याविनाच घडू शकते. किंबहुना मोडण्याच्या प्रक्रियेत असले विचाराचे अंशभाग संभवतच नसतात. म्हणून उपजत उमलण्यातून विकसित होणारे नैसर्गिक बंध जोपासावे लागतात.

म्हणूनच शिक्षण, समाज आणि परिवर्तन हे एकमेकाला धरून असतात तोपर्यंत त्याने ‘ घर ’ सजले – धजलेले राहते. त्यामधल्या फटी रुंदावत जातात

तसा त्याला कसला धरबंदच उरत नाही; इथे दोनतीन गोष्टी नजरेस पडतात : पहिली ही की, समाजाचा अंशमात्र घटक माणूस असतो, त्याच्यासाठी शिक्षणाचे दान टाकायचे असते आणि त्या उभयतांला वेढून उरणारे परिवर्तन राहते. त्यामधील प्रमुख व्यक्ती → माणूस → समाज या घटकांच्या मनात या शिक्षणाच्या प्रक्रियेसंबंधातली विश्वासार्हताच मुळी संपुष्टात आलेली असते. दुसरी बाब अशी की, उपयुक्ततेचे सूत्र सांदीकोपऱ्यात पडून, (ते मग संस्कारांच्या बाजूने असो किंवा पिंड–बांधणीच्या अंगाने असो) व्यवहाराच्या संदर्भात त्याचे मूल्य शून्य बनते. अशा वेळी निरर्थक काही स्वीकारण्याची लाभवादी समाजाची मुळी तयारीच नसते, पैकी तिसरे असे की, ज्यांचा जो स्वभावधर्म किंवा ज्यांचे जे नियतकार्य तेच घरंगळून पार वाहून गेले असेल तर त्याच्या जपण्याचे प्रयोजनच काय ? प्रयोजनशून्यता हा व्यावहारिक जगाला मोठा शाप वाटतो. म्हणून जे शिक्षण विश्वासार्हता गमावते, व्यावहारिक उपयुक्ततेचे मूल्य घालवून त्या संदर्भातील प्रयोजनशून्यतेला कवटाळून राहते तेव्हा त्या उभ्या प्रक्रियेची पार रयाच जाते. समाजमनाची स्पंदने जे टिपू शकत नाही, ठिणग्या फुलवू शकत नाही, अंगार प्रज्वलित करू पाहात नाही; ते असून–नसून सारखेच असते. म्हणजे असे की, फुंकर घालून जे चेतविता–पेटविता येत नसेल तर ते नष्ट होणे केव्हाही इष्टच ठरते. समाजहिताच्या दृष्टीने ही क्रिया अव्वल दर्जाची असते.

### अन्तिम ' चरणा 'मधील शुभारंभ

याचा अर्थ असा की, शिक्षण-प्रक्रियेची काही कर्तव्ये आहेत आणि समाजाचे काही हक्क आहेत. ही कर्तव्ये पार पाडणे आणि हक्क बजावून घेणे ही उभय-पक्षांना लावून दिलेली कामगिरी आहे. परिवर्तन हे त्याचे मापन आहे. आणि समाजातल्या जाणत्यांनी ते तोलून-मापून घ्यायचे आहे. त्यांची ती जबाबदारी आहे. त्यासाठी लागणारी साधने, तंत्र, पद्धती आणि मंत्र वगैरे जी काही आयुधे आवश्यक ठरतील किंवा ठरू शकतात ती शोधण्याचे, निर्माण करण्याचे आणि त्यांचा यथायोग्य वापर करण्याचे वगैरे सारे उत्तरदायित्व हे या जाणत्यांचेच असते. शिक्षणाद्वारा समाजात परिवर्तन न होता परावर्तन होत असेल, सुरूप चेहरे विद्रूप बनण्याची क्रिया कार्यरत असेल तर बहुमोल आयुष्यातले क्षण,

शिक्षण वाया घालवीत आहे, असे ठरेल. इतिहासही ते नमूद करील. म्हणून शिक्षणातून काय साधते आहे आणि जे काही साधते आहे त्यातून समाजाला कोणते रूप मिळते आहे हे महत्त्वाचे आहे. शाळा, शिक्षण, त्यासाठीच्या सोयीसवलती, चालक, त्यांचे दृष्टिकोण, अभ्यासक्रम, शिक्षक, त्यांचा दर्जा, अवतीभोवतीचे वातावरण, शिक्षणेच्छू छात्रवर्गाचा सामाजिक थर, शासन, त्याद्वारा राबविले जाणारे उपक्रम इत्यादी अनेक घटकांमध्ये या गोष्टीला अग्रक्रम आहे. शिक्षणाच्या प्रक्रियेचा हा अन्तिम चरण असला तरी खऱ्या अर्थाने तो शुभारंभ आहे; कारण शेवटच्या या क्षणापासूनच बांधणीच्या रूपाची सुरुवात असते. म्हणून अग्रक्रमात त्याचा क्रम पहिला. तो चुकत नाही की चुकविता येत नाही. तो कळत न कळत आगेमागे झाला किंवा केला गेला, की शिक्षणाची उभी प्रक्रियाच उलट्या दिशेने; वाऱ्याच्या उलट्या अंगाने वाहू लागते आणि अन्ती विफल होणे एवढेच मग तिच्या हाती उरते.

म्हणून शिक्षणासंबंधी विचार करताना शिक्षणाशी संबंधित समाज, त्यामधील परिवर्तनाचे सामर्थ्य, त्यातून समाजाला मिळणारा रूपाकार वगैरे गोष्टींशी जोडलेले अंत:प्रवाह नीट पारखून घेतले पाहिजेत. हे बंधन नीट जुळवून सांधून नेमकेपणाने वाचले गेले नाहीत तर शिक्षणाच्या कार्यासंबंधी नुसती व्याख्यानबाजी होते. ‘ शिक्षणाने हे केलं पाहिजे. शिक्षण समाजाला काहीच देत नसेल तर ते शिक्षण व्यर्थ समजलं पाहिजे ’ अशी धो धो पाऊस पडल्यासारखी लांबलचक व्याख्यानबाजी कोसळते. त्यामधील प्रतिपादन अयोग्य नसते. पण हे अयोग्यपण दुरुस्त करण्याचे, सुधारण्याचे, काम शेवटी व्याख्यानबाज जाणते असतील तर त्यांच्याच हाती असते. कारण शिक्षणाने समाजात भलेपण रुजावे, वाढावे ही अपेक्षा चुकीची नव्हे; पण अपेक्षापूर्तीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करून देण्याची जिम्मेदारी कुणीतरी अंगाखांद्यांवर घ्यावी ही लागतेच. प्रश्न, त्यामुळे समोर ठाकलेले वास्तव अंगाबाहेर टाकल्याने अडचणी सुटत नाहीतच, पण सुटायला मदतही होत नाही. प्राय: ते जिरतात आणि जिरून उरलेले प्रश्न केव्हाही उगवण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणजे पुन्हा समोर प्रश्न राहतातच. खरे तर, तसे प्रश्न सुटतच नसतात; त्यांचे स्वरूप सारखे बदलत असते. सतत वाटचाल करीत राहणाऱ्या प्रश्नांचे बदलते स्वरूप हेच त्या संदर्भातील त्या प्रश्नांचे सुटणे असते. हा बदल शिक्षणाच्या प्रक्रियेतून होतो. हे

शिक्षण शाळा–महाविद्यालये–विद्यापीठे यांतूनच प्रामुख्याने दिले जाणारे असे असले तरी त्यावेगळीही शिक्षणाची अनेक क्षेत्रे आणि थर अस्तित्वात आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. म्हणून समाजपरिवर्तनाच्या वाटचालीत, प्रबोधनाच्या मार्गात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हे महत्त्व शिक्षणविषयक कृती-मध्ये सामावलेले आहे; तद्‌विषयक केवळ शब्दांच्या वावटळी फुलोऱ्यामध्ये नाही; हे समजून घेण्याचा अग्रक्रम टाळून चालत नाही.

## भले काय ? बुरे काय ?

स्वाभाविकपणेच शिक्षणातून समाजाचे प्रबोधन झाले पाहिजे, समाजाचे परिवर्तन साधले पाहिजे ही समाजातल्या माणसाची रास्त अपेक्षा असते. फार मोठे बाकीचे काय असेल ते राहू दे, शिक्षणातून व्हावयाच्या संस्कारांची आणि त्याद्वारा घडावयाच्या पिंडाची बाब ही तशी लांबची सफर; म्हणून ती थोडी बाजूला राखली तरी चालेल; पण किमानपक्षी शिक्षणाने माणसाच्या ठायी भलेबुरे जाणण्याची, अवतीभोवती जे काही चालले आहे त्यामध्ये काय चांगले आणि काय वाईट हे जोखण्याची ताकद तरी निश्चितपणे आली पाहिजे; एवढी आणि एवढीच किमान अपेक्षा समाज उराशी ठेवू पाहतो. ही मागणी लई नाही. पण लई नाही म्हणून कदाचित सोपीही नाही. समाजजीवनाच्या अंगोपांगांशी, शिक्षणाची सगळी प्रक्रियाच निगडित आहे. शिक्षण व समाज ही परस्परविरुद्ध सुटंगळ अंगे नसून ते एकमेकांत घुसून जिरलेले अद्वैत आहे. त्यामध्ये इतिहासाला नवीन वळण लावण्याचे सामर्थ्य असून परिवर्तनशीलतेचा हा धनाचा ठेवा आहे : ह्या धनाचा वाटेकरी समाज आहे आणि प्रबोधन हे त्याचे श्रेय आहे.

## शिक्षणाचे किमया–क्षेत्र

हे सगळे खरे असले तरी त्या संदर्भाने हे मुळीच खरे नाही की, शिक्षण व समाज यांची सांगड अतूट आहे म्हणून परिवर्तनही होणार हे पक्के समजून चालावयाचे. हे संभवनीय नाही. त्याबरोबर हेही खोटेच असते की, शिक्षण आणि समाज यांच्या अनिवार्य परस्परसंबंधाचे गोडवे गायिले, तद्‌विषयक गोड ( की भव्य ? ) तत्त्वज्ञान पुन:पुन्हा सांगत राहिले की प्रबोधन होते, परिवर्तन

साधते. नुसत्या तत्त्वज्ञानाच्या संकीर्तनाने, केवळ उच्चस्वराच्या बोलण्याने मने डोलतात, क्वचित रोमांचही उठतात पण विचार जागे होत नाहीत. शिक्षणाकडून समाज जागा होणे ही अनिवार्य अट आहे; आणि ते विचारांच्या जागेपणावर उभे असते. ते फार अवघड असते, सोपे नसते. माणसाला भावनेने चटकन जागृत करता येते, त्याचे विकार झटकन चाळवता येतात पण विचार रुजविणे-पचविणे आणि आचारात आणणे ही बाभळीच्या गाठीसारखी कठीण गोष्ट असते आणि कुठलाही शाश्वत बदल, हा विचार किती रुजला, कसा रुजला आणि कुठे कुठे पाझरत गेला ह्यावरच अवलंबून असतो. शब्द आणि अश्रूंनी जग बदलता येते पण असे बदलले जाणारे जग हे कायम स्वरूपाचे, टिकाऊ नसते. मात्र कृतीतून आकार घेणारे बदलते जग तसे असते. कारण त्यामागे विचारांचे अधिष्ठान असते. म्हणून शिक्षणाचे तत्त्वज्ञान चांगले असले तर ठीकच आहे. पण शब्दांच्या फुलोऱ्याने ते सजत नाही. शिक्षणसंस्थांनी, हजारो-लाखो रुपये खर्च करून सुरेख इमारती बांधून परिसर शोभिवंत केला आहे; छानच आहे. पण त्या इमारतींच्या बुडाशी ध्येयवादाचे पाणी नसेल तर सारे शोभिवंतपण कागदी फुलाहून वेगळे ठरत नाही. संबंधित अमुकतमुकपाशी अमाप ध्येयवाद आहे, त्यांना समाज-परिवर्तनाच्या कामी तो वापरावयाचा आहे. बेशक हा दुग्धशर्करा योग आहे पण हा ध्येयवाद आणि हे परिवर्तन जात, पात, धर्म, गट, समूह, कुटुंब यापुरतेच आकुंचित होऊन थिजले तर ते निरर्थक ठरावे हे अस्वाभाविक नव्हे! म्हणजे सगळे काही असूनही काहीच नसण्यासारखे हे आहे. शेवटी कुठल्याही गोष्टीचा अंतिम निकष, आज किंवा उद्या; केव्हा का असेना आता अगदी तातडीने किंवा नंतर थोड्या उशिराने का होईना पण केव्हा ना केव्हा तरी जे मांडले, केले त्यामधून काहीतरी हाती लागणे जरूर आहे; हा आहे. उशिरा काही हाती लागले म्हणून बिघडत नाही. प्रक्रिया तशी लांब पल्ल्याची असली तर ते अपरिहार्यच मानले पाहिजे. पण जे म्हणून काही लहान-मोठे हाती पडण्याची शक्यता आहे त्याचा प्रारंभी थोडा फार इसार मिळणे केव्हाही अनिवार्यच म्हटले पाहिजे. त्यासाठी काम करणारी माणसे, प्रेरणा देणारे विचार आणि त्यांनुसार भारून जाऊन वाटचाल करणारा माणसांचा संघ, इमारतींचा, अवघ्या परिसराचा संच यांचे मिळून एकलग सामंजस्य ही निकड ठरते. नुसती माणसेच प्रेरणादायी ठरू शकतात असे नाही

तर विचार व कल्पना दोन्हीही स्फूर्ती देतात. पण असे चैतन्य क्षणकाल टिकणारे असते आणि महत्त्वाचे हे की, लाखात एक एवढेच त्याचे प्रमाण असते. म्हणजे एकाला चेतना मिळते; आणि बाकीचे ९९,९९९ तसेच सुके-रुखे राहतात. म्हणून कुणाला तरी पाहून–विचारून चैतन्य घेण्याचा, स्फूर्ती मिळविण्याचा भाग हा सार्वत्रिक नसतो. सार्वत्रिक चैतन्याचे क्षेत्र हे समाजाच्या अंगाने शिक्षणात असते. शिक्षणाला जागवायचे असते ते समाजात जे लाख असतात किंवा लाखो न् लाख असतात त्यांपैकी एकाला नव्हे तर लाखांपैकी लाखांना. ते अशक्य वाटत असले तरी त्या लाखांवर डोळा ठेवून त्यांमधील बहुसंख्य समुदायासाठी शिक्षणाचे ते किमया-क्षेत्र असते.

**ध्येयापासून मनापर्यंतची सफर**

म्हणून शिक्षणाची प्रक्रिया सोपी नसते, गुंता करून पिळणारी असते; त्याचे कारणच मुळी हे आहे. तिला अशा समुदायाशी भिडावे लागते. समुदाय ( Majority of the society ) हा कधीच सरळ रेषेत वाढणारा नसतो. त्यामधील अंत:प्रवाह हे एकमेकाला शह–काटशह देऊन, परस्परांवर शह–त्याचे अंतर्भेद, मातशह करून स्वत:च स्वत:ला बांधत असतात. ही बांधणी स्वयंभू आणि स्वसंवेद्य असते. त्यातील गुंते, त्यामधल्या गुंतवळी न्याहाळत, सोडवीत, पुढे सरकण्यासाठी थोडी थोडी जागा करून घेत राहणे ही बऱ्याच वेळा अंग खरचटून घेण्याची बाब असते. कधी कधी खिंडीत ढासळण्याची तर कधी बेचक्यात अडकून पडण्याची गोष्ट असते. व्यापार करीत नाहीत, ध्येयवाद जोपासतात त्यांच्या दृष्टीने ही गोष्ट वेदना देणारीच असते. ध्येयवादाचा घोष करून व्यापाराचे तांडेच्या तांडे ज्यांनी मुलुखगिरीला सोडले आहेत, त्यांच्या दृष्टीने दु:खाचे काहीच नसते. कारण फायद्याचे सगळेच गणित सुटून गेलेले असते. आणि आणखीही असे असते की, सत्तेच्या जोरावरही–सत्ता मग छोटी-मोठी कोणत्याही स्वरूपाची असो–काही लादणे तसे बिकट मुळीच नसते; पण लादले जाणारे मनातून पटणे आणि मनापासून त्याचा स्वीकार होणे हे अवघड असते. म्हणून ध्येयवादी, विवेकनिष्ठ, लोकशाहीवादी कार्यकर्त्यांचे काम केव्हाही अवघड कड्यावरच्या कसरतीसारखेच असते. कशाचाच काही विधिनिषेध नसलेल्यांना कशाचे काही सोयरसुतकही नसते, अशांचा विचार करण्याचेही कारण

नाही. पण शिक्षणाच्या द्वारा ज्यांना समाजाचे परिवर्तन करावयाचे असते, अशा ध्येयवाद्यांना लोकसमूहाच्या मनापर्यंत पोचावे लागते. हे पोचणे, विचार, कल्पना, भावना या साऱ्या आयुधांनिशीचे असते. जे स्वत:च्या मनापर्यंतच कसेबसे पोचले आहेत त्यांनी इतरांच्या मनापर्यंतच्या पोचण्याच्या फंदात पडण्याचे कारण नसते. आणि शिक्षणाचे उद्दिष्ट-आपल्यास अभिप्रेत शिक्षणातला विचार आम्ही समाजाच्या मनापर्यंत कितपत नेऊन पोचविला आहे, त्यांच्या ठायी तो कितपत रुजला गेला आहे—नेमके इथे उभे राहते. आपण कुणासाठी उभे आहोत, काय करीत आहोत हे कळण्यामध्ये आपली धाव कुठवर जाणार आहे किंवा आपले थांबणे वाटेतच घडणार आहे की काय हे यावरून समजते. म्हणून ध्येयापासून मनापर्यंतची ही सफर निरर्गल व्यापारी पद्धतीने नव्हे तर विवेकनिष्ठेने करण्याचे नित्य स्मरण राखावे लागते. कारण शिक्षण हा शहाणपणाच मसुदा आणि कर्तबगारीची सनद आहे. शिक्षणाचे काम समाजाची मन:प्रवृत्ती आणि परिस्थिती बदलणे हे आहे. शिक्षणाची उभी प्रक्रियाच मुळी ' समाजक्रांतीचे रसायन ' आहे असे महाराष्ट्राचे नेते श्री. यशवंतराव चव्हाण यांनी म्हटले आहे. ते सर्वस्वी रास्त, उचित आणि सत्य आहे. शिक्षणाने समाजाला विस्मृत ठेवून चालत नाही, तशा निभ्रान्त अव्यवहारी कल्पनाही शिक्षणाने कटिखांद्यावर घेऊन, मिरवून काही उपयोग होत नाही.

**ज्ञानाच्या क्षेत्रात पराक्रम**

समाजजीवनाच्या बदलाचे शिक्षण एकमेवाद्वितीय अंग नसले तरी प्रमुख, महत्त्वाचे आणि अग्रक्रमाचे अंग आहे, हे आता सर्वसिद्ध व सर्वमान्य झाले आहे. वादासारखे त्यात काहीच नाही. मात्र ह्या बदलाच्या अंगाकडे समाज पाहतो तो उपयुक्ततेच्या दृष्टीने. ही शिक्षणाकडे पाहण्याची सर्वस्पर्शी दृष्टी नव्हे; पण ती दृष्टी आहे ही वस्तुस्थिती म्हणून मान्य करण्याखेरीज गत्यंतर नाही. एक काळ असा होता की, बी. ए. ला बसले की मामलेदाराची नोकरी दारात उभी होती. ही सार्वत्रिक स्थिती असे मुळीसुद्धा नव्हे पण त्याचा अर्थ नोकऱ्या एवढ्या मुबलक होत्या, सहज हाताला गावणाऱ्या होत्या व त्या प्रमाणात तशी माणसे होती. त्याचा एवढाच निश्चित अर्थ होता. ही मर्यादित का होईना जी परिस्थिती होती, तिचे म्हणून समाजाच्या मनावर काही ठसे आहेत. त्या ' अँगल 'ने

पाहणे हे परंपरागत मनाचे ठरून गेलेले पाहणे आहे; जसे पाहणे तसे मग हिशेबही असतात; गणित जुळविणेही त्याच रीतीचे असते. आजची स्थिती अशी आहे की, बी. ए. च काय; एम. ए., पीएच. डी. असो अगर आणखी काही असो; तहशिलदाराच्या पायऱ्या नजरेस पडणे तर सोडाच पण क्लेरिकल ग्रेडमधल्या नोकऱ्यांसाठी खेटे घालणे हे रोजचे दुखणे बनले आहे. हातात सर्टिफिकेट्सच्या कागदांची भेंडोळी, दीनवाण्या चेहऱ्यावरील शामळू भाव आणि ज्याच्या हातात सत्ता त्याच्या मग्रुरीचे उग्रट आवाज; त्यातून 'कुचकामी' शिक्षणाला लाखोली अशी दृश्ये तिठ्यातिठ्यावर रांगा लावून उभी आहेत : जीवनावश्यक वस्तूसाठी रांगा नसतील एवढ्या प्रचंड रांगा जीवनावश्यक चाकरी/ नोकरीसाठी सांप्रत दिसत आहेत. स्वाभाविकच ते तात्कालिक उपयोगाचे आणि जीवनधारणेचे नाही, ते कामाचे काय? असा खडा सवालही लोकमन विचारीत आहे. पण परिस्थितीने निर्माण केलेले असे प्रश्नच त्या त्या स्थितीचे अंगभूत घटक असे मानण्यामुळे वस्तुस्थितीचे निदान चुकण्याची दाट शक्यता असते, आहे. ती सर्वस्पर्शी दृष्टी नव्हे; तिचा एक भाग आहे; म्हणून या अंशभागा-पलीकडे जाण्यातच शिक्षण आहे. समाजाने शिक्षणाचा अर्थ केवळ नोकरी असा करणे किंवा उपजीविकेचे एक साधन म्हणून त्याकडे पाहणे हे त्याचे अगदीच प्राथमिक स्वरूप झाले. याहून वेगळा शिक्षणाचा व्यापक अर्थ आहे : तो हा की, शिक्षणाने गुणसंपदेचा शोध घेतला पाहिजे, सर्वांना सोयीसवलती-सकट समान संधी उपलब्ध करून देऊन गुणप्रभेची वाढ केली पाहिजे आणि समाजाच्या सर्व थरांतील माणसांना ज्ञानाच्या विविध क्षेत्रांत पराक्रम करण्याची सुविधा मिळाली पाहिजे. हा सर्वस्पर्शी दृष्टिकोण मतभेद ठेवत नाही. उपजीवि-केचे एक साधन शिक्षण ही दृष्टी हे व्यापक वर्तुळातील बारीकसे वर्तुळ आहे; ते सामावणारे आहे; किंबहुना तसे ते सामावून घेऊन त्या दिशेने विचार करायला प्रवृत्त करण्यातच शिक्षणाचे 'ज्ञानीपण' आणि 'शहाणपण' आहे. शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाचे हे अर्थातच सिद्धान्तन झाले. त्याला व्यावहारिक संदर्भ मिळण्यासाठी तशी अनुकूल परिस्थिती, वातावरण आणि अवतीभोवतीच्या स्थिति-गतीचा तसा अभिप्राय मिळणे ही गरज आहे. ती मिळवून देणे ही समाज-नियन्त्याची जिम्मेदारी आहे. कारण हा सर्वंकष विचार कुणा एका व्यक्तीचा, कुणा एका समूहाचा किंवा कुणा एका गटाचा विचार करीत नाही किंवा सामर्थ्य

वाढवीत नाही तर अखेरपक्षी ते देशाचे सामर्थ्य वृद्धिंगत करणारे काम आहे. म्हणून शिक्षणाने काम उपलब्ध तर करून दिले पाहिजे पण ही दृष्टीही दिली पाहिजे. त्याअभावी शिक्षणाचे होणारे काम गुणपूर्ण आहे असे समजता येणार नाही; त्यासाठी समाजातल्या विविध थरांवर बारीक लक्ष ठेवून, जारीने शोधकार्य करून गुणांचे प्रज्वलन, उद्दीपन, विकसन आणि संस्करण करणारे काम सतत करावे लागते. कालप्रवाहात शिक्षणाचे स्वरूप बदलत जाणे अटळ आहे, पण तसे ते कितीही बदलले तरी त्याचे उद्दिष्टाच्या गाभ्याशी असलेले अनुसंधान सुटता कामा नये. स्वरूप पालटले की अपेक्षा पालटतात, बदलतात पण मूळ वृत्तीच रुजणे वेगळा मार्ग पत्करू शकत नाही. सहजभाव स्वभाव असा बदलत नसतो, अट्टाहासाने बदलण्याचा प्रयत्न सफल होत नाही.

### सपूर्ण सांस्कृतिक जीवनाची जिम्मेदारी

समाज शिक्षणाकडे कोणत्या दृष्टीने पाहतो, त्याचे ते पाहणे अ-नैसर्गिक कसे नसते, आणि शिक्षणाच्या मूळ गाभ्याचे लक्ष्य कोणते असते यासंबंधीच्या चर्चेचा सूत्ररूपात अर्थ मांडता येईल तो असा की, माणसाची नुसती वये वाढून चालत नाही तर संस्कृतीही वाढावी लागते. समाजासाठी शिक्षण हे काम करते. शिक्षणाचे ते अंगीकृत कार्य आहे. समाजाच्या संपूर्ण सांस्कृतिक जीवनाचीच ती जिम्मेदारी आहे.

कुठलेही शिक्षण ही केवळ पदवीची किंवा नोकरीची प्रक्रिया नव्हे. अवतीभोवतीच्या परिस्थितीमुळे समाज नेमके याउलट आवर्जून मानत असला तरी तेच ते पुन:पुन्हा सांगण्याची गरज पडू नये. शिक्षण आणि समाज यांची फारकत ही वैचारिक विपर्यासाकडे नेणारी गोष्ट असल्याने सावधपणे नेतृत्व केले पाहिजे. शिक्षण ही व्यक्तिविकास आणि समाजोन्नती याची गंगोत्री आहे. विकास उन्नतीच्या मार्गातील अडथळे निपटून काढायचे तर शिक्षण हवे, आणि ते समाजासाठी हवे, समाजातील हवे आणि समाजाचे हवे. माणूस जागा करण्याचे शिक्षण हे सूत्र आहे, आणि त्याचे जागरण हे त्याने आपल्या व आपल्या देशाच्या उद्धारासाठी आचरावयाच्या साधनांपैकी एक माध्यम आहे. माणसे या ना त्या शिक्षणप्रक्रियेतून जागी झाली तर अन्याय, अत्याचार धुडकावून देऊ शकतात, त्याचा प्रतिकार करतात. जागरणाशिवाय समाजाला

सामाजिक ऋणाची प्रेरणा कशी आणि कुठून मिळणार? मुळात माणसे असतात, त्यांचे जगणेही चालू असते. पण त्यांना काही हक्क आहे आणि त्यांची म्हणून काही प्रतिष्ठा आहे, हे समजायला ते समजावून देणारे काहीतरी हवे. आत्मावलोकन, आत्मबळ, आत्मप्रतीती त्याखेरीज कशी लाभणार? शिक्षण हे त्याचे रसायन आहे. आणि समाज ही त्याची सामग्री आहे. म्हणून सामान्य माणसाच्या कवाडांपर्यंत शिक्षणाची गंगा पोचविणे जरूर ठरते. शिक्षण म्हणजे काय हे माहीत नसलेल्या, सर्वसाधारण समाजाच्या मनामध्ये शिक्षणासंबंधी आस्था रुजविणे, त्यासंबंधी अभिरुची निर्माण करणे आणि शिक्षण ही अवघ्या परिवर्तनाची गंगोत्री आहे याचे भान मिळणे हे महत्त्वाचे आहे. केवळ शिक्षण देणे आणि शिकलेल्या माणसांना 'आम्ही उच्चभ्रू', 'आम्ही सुशिक्षित' म्हणून म्हणवून घ्यायला संधी मिळवून देणे एवढाच काही शिक्षणाचा, तद्-विषयक प्रयोगांचा, मोहिमांचा किंवा चळवळींचा उद्देश नसतो तर त्यापलीकडे पोचून माणसाच्या मुक्तीची ती चळवळ असते, आहे. किमानपक्षी तशी ती बनावी अशी अपेक्षा असते. भारतासारख्या अविकसित–बहुतेक मागासलेल्या रांगांतील–देशांमध्ये तर ह्या अपेक्षेला विलक्षण सघन आशय मिळालेला असतो. कारण अशा देशांत समाजातील एकूण एक व्यक्तीला त्याची जात, पात, पंथ, धर्म, भेद लक्षात न घेता शिक्षण द्यावे लागते. स्वतःचे जीवनमान उंचावण्यास त्यास उद्युक्त करावे लागते. समाजातील अंधश्रद्धा, अज्ञान, विषमता, दारिद्र्य आणि असमता यांना मूठमाती द्यावी लागते. समाजाला विलक्षण कृत्रिमता आणून देणाऱ्या परिस्थितीत मुरून बसलेली असमानतेची कारणेच समूळ निपटून काढावी लागतात. म्हणजेच शेकडो वर्षे समाजाला घेऊन राहिलेली अगतिकता दूर करून समाजाची जुनी व कालबाह्य झालेली घडीच संपूर्णतया बदलण्याचे काम करावे लागते.

## तमसो मा ज्योतिर्गमय

याचा अर्थ, सर्व तऱ्हेच्या मागासलेपणाविरुद्धच्या सर्वंकष युद्धातील शिक्षण, समाज शिक्षण यातील परस्परसंबंध हे एक प्रबळ, प्रभावी व प्रखर हत्यार ठरते. समाजाला नुसतेच 'शहाणे' नव्हे तर 'ज्ञानी' करण्यासाठी समाजाच्या अंगाने शिक्षणाचे हे हत्यार सतत परजत ठेवावे लागते. त्यासाठी नोकरीचाकरीच्या

प्राप्तीपेक्षा शिक्षणाने समाजाच्या अंगोपांगात मानसिक व बौद्धिक सामर्थ्य निर्माण झाले पाहिजे. एवढेच नव्हे तर या मानसिक व बौद्धिक सामर्थ्याच्या जोरावर, स्वत: व्यक्तीला आपल्या स्वत:च्या जीवनाचा मार्ग दिसला पाहिजे, शोधता आला पाहिजेच पण ज्या समाजात राहून व्यक्ती हे ईप्सित साधते त्या समाजाचे थोडेफार ऋण फेडण्याची शक्ती व भावनाही, दिल्या आणि घेतल्या जाणाऱ्या शिक्षणाने माणसाच्या मनात उपजली पाहिजे. समाजाचे संपूर्ण ऋण व्यक्ती कधी फेडूच शकत नाही. म्हणून समाजाचे थोडेफार ऋण असे म्हटले. अर्थात तेवढेही फेडण्याकडे आजकाल कल नाही. ' हे तर माझं कर्तृत्व, समाजाने माझ्यासाठी काय केले ? ' असे धुत्कारून लावण्याची एक उग्रट प्रवृत्ती आजकाल दिसते आहे. पण समाज ही, सदोदित मदतीचे कुंभ हातात घेऊन चव्हाट्यावर उभी असलेली तगाई वाटपाची संघटना नव्हे. ती एक व्यापक रचना आहे; आणि कुठल्याही परिस्थितीत चालणारी ती शाश्वत घटना आहे. व्यक्ती मरते, समाज मरत नाही, अमर असतो. म्हणून समाजाचा अधिक्षेप व्यक्तीला हानिकारक ठरतो. पण व्यक्तीने केलेला समाजाचा गौरव, समाजाची प्रतिष्ठा आणि व्यक्तीचे मोल वाढवितो ! समाजाने व्यक्तीला आधार देणे आणि व्यक्तीने समाजाच्या प्रतिष्ठेचा गुणाकार करणे ही निकडच असते. हेही शिक्षणाचेच काम आहे. पण शिक्षण जनतेच्या जीवनापासून, दूर सरकत असेल किंवा समाज आणि शिक्षण यामधले अनुसंधान सुटून फारकत वाढतच असेल तर शिक्षणाच्या मूळ उद्दिष्टात विक्षेप निर्माण होत आहे, असे समजून विफलतेच्या दिशेने धावू पाहणाऱ्या शिक्षणाला मार्गी लावणे इष्ट ठरते. ज्ञानाच्या क्षेत्रात वावरणाऱ्या असंख्य कर्त्या माणसांपुढील हे तर सततचे काम असते. एकट्या शासनाचे, कुणा पुढाऱ्याचे किंवा चारदोन संस्थांचे ते काम नव्हे. समाजातील शिक्षण हे सत्याकडे नेणारे, प्रकाशाकडे खेचणारे आणि अमृताकडे रेटणारे असते, असावे. उपनिषदातील त्या प्रार्थनेत म्हटले आहे :

असतो मा सद्गमय
तमसो मा ज्योतिर्गमय
मृत्योर्मा अमृतं गमय

हा वारसा आहे. लोकजीवनाची गंगा त्याने दुथडी भरून वाहिली पाहिजे, समृद्ध बनली पाहिजे. मानवी जीवनाचा म्हणजे एकूणात समाजाचा दर्जा

उंचावण्याचे काम मुख्यत्वेकरून शिक्षणाचे आहे. पण हे साध्य हस्तगत करावयाचे ते समाजाच्या अंगाने शिक्षणाद्वारेच होय. शिक्षण, समाज आणि परिवर्तन यामधला अनुबंध हा मानवी जीवनाचा खास स्वाधीन हक्क आहे, ती जीवनवृत्ती आहे; ती गमावली तर समाजाच्या एकतेचे तत्त्व हरवून बसावे लागेल आणि मानवी प्रवृत्तीचे समाधान करणारी सुसंगत जीवनसरणी बांधून जगणे अशक्य होईल. म्हणून अनुबंध अधिकच जखडबंद करणे अनिवार्य आहे.

**संदर्भ**

१. ‘ युगान्तर ’ : यशवंतराव चव्हाण : ‘ समाज क्रान्तीचे रसायन ’ : पृ. १५८.

# २

# सृजनशील निबंधकार

अलीकडल्या काही वर्षांत म. जोतीबा फुले यांना बरे दिवस आले आहेत. बरे दिवस अशा अर्थाने की, म. फुले नावाचे एक क्रांतिकारक समाजसुधारक होऊन गेले आणि आधुनिक महाराष्ट्राच्या घडणीत त्यांच्या विचारधनाचा काहीएक वाटा आहे वगैरे गोष्टींची जाणीव होऊ लागली आहे. अशी जाणीव, जन्मशताब्दी महोत्सवांच्या वगैरे निमित्ताने तीव्रतेने व्हावी; ही समाजाच्या मनाची बधिरता अद्याप निपटून जावी तेवढी गेलेली नाही, याचे द्योतक आहे; पण त्या दिशेने कोंडी झालेल्या वस्तुस्थितीत लक्षणीय फरक आहे हेही खोटे नाही. मात्र नाही म्हटले तरी, फुले, विठ्ठल रामजी ऊर्फ अण्णासाहेब शिंदे, दिवाण-बहादूर अण्णासाहेब लठ्ठे, ना. भास्करराव जाधव, दिनकरराव जवळकर, भालेकर, केशवराव जेधे, शंकरराव मोरे या किंवा यांसारख्या उपेक्षित जाति-जमातींमधल्या नेत्या/कार्यकर्त्यांसंबंधीचे संशोधन प्रामुख्याने प्रसंगोपात्त स्वरूपाचेच राहिले आहे. प्रसंग आला की, मग तो बारशाचा असो की बाराव्याचा असो, त्या निमित्ताने शोधाशोध करावी, हाताशी गावणारी कागदपत्रे चिवडावीत व आपल्यास हवा तो कोन आणि दृष्टी यातून मांडणी करावी असे चालू असल्याचे आढळते. साधारणपणे जन्मशताब्दी महोत्सव साजरे होतात, त्यानिमित्ताने ‘ सखोल ’ संशोधनाला जो पूर येतो आणि लंबीचवडी व्याख्याने झोडली जातात, त्यामध्ये एकरंगी, एकस्तरीय विचारांचे प्रतिपादनच फार आढळते. कुणाचा हा दृष्टिकोण राजकीय (आणि तो मोठ्या प्रमाणात असतो !) तर कुणाचा सामाजिक, कुणाचा अस्पृश्योद्धाराचा तर कुणाचा शैक्षणिक. म्हणजे राजकीय, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक एवढ्या चौ-खांबांतच त्या त्या क्रांतिकारक नेत्याला उभे केले जाते. आर्थिक किंवा साहित्यिक दृष्टिकोण

फार अभावाने हाताळले जातात. दृष्टिकोण महत्त्वाचे असतात पण त्यात समतोल राखला गेला, की ते अधिक महत्त्वाचे बनतात. आम्हाला बहुश: याचा विसर पडतो आणि मग तेच तेच मुद्दे आणि तीच ती विधाने पुन: पुन्हा पुढे येतात; त्यावरून सामान्य माणसाची धारणा होते ती ही की, याव्यतिरिक्त या बंडखोर सुधारकांजवळ दुसरे काहीच नव्हते की काय? कुठलाही माणूस–बंडखोर समाजसुधारक–सर्वांगांनी जाणून घेण्याच्या दृष्टीने अशी धारणा गलत असते. त्यासाठी वर्षानुवर्षे संशोधनात मग्न असणारी, पायपीट करून रद्दीचे भारे माथ्यावरून वाहून नेणारी इतिहासाचार्य राजवाड्यांच्या प्रकृतीची पिढीच्या पिढी निर्माण होणे गरजेचे असते; तशी पिढी जोपासणे हे प्रामुख्याने आस्था असणाऱ्यांचे कर्तव्य असते.

**विदारक अनास्थेचे जाळे**

अलीकडच्या काही वर्षांत फुल्यांना बरे दिवस आले आहेत ते या अर्थाने नव्हे, तर त्यांची हळूहळू ओळख पटते या अर्थाने ! मात्र ही ओळख स्वयंप्रेरणेने संशोधनाचे कार्य करणाऱ्या जुन्या–नव्या पिढीतल्या, ( विशेषत: नव्या पिढीतल्या विद्वज्जनांचा त्यामधील सहभाग विशेष स्वरूपाचा आहे. ) आस्थेवाईकपणे जुना इतिहास जपू पाहणाऱ्या अभ्यासकांनीच मुख्यत: करून दिली आहे. याबाबतीत समाज अनभ्यस्त आणि गोष्टी डोळ्यांआड करून चालणारा, शासनाच्या प्रयत्नांना मूलत:च असलेल्या मर्यादा, त्यातूनही काही करायचे म्हणून ठरविले तरी तत्संबंधी, संबंधितांच्या आस्थाहीन पोकळ वल्गनांचा डामडौली देखावा आणि काम झगझगाटी प्रकाशात अशा कित्येक कारणांमुळे जे थोडेफार प्रयत्न झाले किंवा होत आहेत त्यांमध्ये फार संथपणे ( हे संथपण मनात सारखे सलत राहावे इतके थंड आहे. ) प्रगती होत आहे. स्वातंत्र्यानंतरच्या, गेल्या बत्तीस वर्षांच्या दीर्घ काळात उपेक्षितांच्या–बहुजनांच्या–हातांत सत्तेचे ( आणि त्यामुळे इतर गोष्टींचेही ) सिंहासन असूनही धड बहुजन-समाजाचा सलग इतिहासही लिहून झालेला नाही. इतकेच नव्हे तर त्याच्या साधनांची प्राथमिक जुळवाजवळ करणेही जमलेले नाही. ज्यांनी देशाच्या, प्रांताच्या घडणीला आधुनिकता मिळवून दिली, विदीर्ण समाजव्यवस्थेत सुव्यवस्था पेरली; आणि अव्याहत :चाललेल्या आपल्या फाटकेपणाचे रंगरूप

बदलविण्यास मदत केली; त्यांच्याबद्दलचे अनास्थेचे हे जौळ कशाचे द्योतक ठरते, हे सांगण्याची गरज नाही.

**म. फुल्यांचे विपुल वाङ्मय**

म. फुले वगैरेंच्या बाबतीत हे जौळ हळूहळू विरत चालले आहे, ही उत्साहजनक समाधानाची बाब आहे. पण फुल्यांचा विचार, त्यांचे राजकीय विचार, त्यांची सामाजिक दृष्टी, त्यांची शैक्षणिक विचारप्रणाली, त्यांची धर्मविषयक चिकित्सा, त्यांचे अस्पृश्योद्धाराच्या प्रश्नाविषयीचे मूल्यमापन, त्यांची ब्रिटिशांची राजवट आणि नोकरशाही याविषयीची मत-मतान्तरे, त्यांची शेतकऱ्यांची दु:स्थिती व स्त्रीजीवन याविषयीची मते अशा विविध काना-कोपऱ्यांतून तो झाला आहे. पण फुल्यांच्या साहित्य-संपदेविषयी, त्यामधील लेखनरीतीसंबंधी फार कमी विचार झाल्याचे दिसते. भाषाशैलीचा थोडाफार विचार झाला आहे; पण तोही तेवढा ठळक नाही. त्याची काही कारणे संभवतात : आमच्याकडील अभ्यासक एखाद्या विषयाचा अभ्यास व्यासंगपूर्णतेने करतात. पण ही अभ्यास-पूर्णता, एकरंगीपणाच्या बाजूने कललेली असते; म्हणजेच सामग्र्याने समतोल नसते. त्यामुळे आणि अनास्थेमुळे, दोन्हींमुळेही; जो एक कोणता तरी दृष्टिकोण हाताळायचा त्याचे महत्त्व अधिक वाटते. त्या मानाने इतर मुद्यांना गौणत्व मिळते. केव्हा असेही घडते की, एक बाजू न्याहाळताना त्याला दुसरीही बाजू किंवा बाजवा आहेत हे ध्यानात येत नाही. तोल ढासळतो. काहीसे म. फुल्यांच्या वाङ्मय-संपदेसंबंधीही असे घडले आहे.

प्रत्यक्ष कार्यात स्वत:ला गुंतवून घेतलेल्या नेत्यांना—कार्यकर्त्यांना—ग्रंथलेखन शक्य होत नाही. प्रत्यक्ष कामाचा रेटाच इतका जबर असतो की, करतो ते सांगणे किंवा करण्यामागील तत्त्वज्ञानाचा परामर्श घेणे अशक्य बनते. एका बाजूने कार्य-कर्तृत्व फुलविणे आणि दुसऱ्या बाजूने त्या फुलविण्यामागील आशय विशद करून सांगणे, ही दोन्ही कार्ये जमणारी किंवा जमविणारी माणसे दुर्मिळ असतात. हे कर्तृत्व तसे साधे नसते; विशेष मोलाचेच असते. म. फुले हे एक असे नेते होते, म्हणून त्यांची मातब्बरीही विशेष आहे.

**गाभा : मूल्याधिष्ठित विवेक विचार**

म. फुले यांनी विपुल लेखन केले आहे. काळाच्या उदरात गडप झालेले

किंवा काळाच्या ठायी अज्ञात असलेले वाङ्मय वगळूनही फुल्यांचे उपलब्ध लेखन विपुल आहे. समाजातल्या अत्यंत अवघड अवघड सुधारणांना निर्भयपणे हात घालणाऱ्या, त्यांची तड लावून घेऊ पाहणाऱ्या, त्यामुळे अहोरात्र कामाच्या मातीत मन असलेल्या फुल्यांसारख्या क्रांतदर्शी सुधारकाने लिहिलेल्या ह्या वाङ्मयाचा हेतू समाजप्रबोधन हा असावा आणि गाभा वैचारिकता राहावा हे न सांगताही समजले पाहिजे, म्हणजे वैचारिकतेने मंडित समाजप्रबोधनाचे उद्दिष्ट स्वीकारलेले फुल्यांचे साहित्य म्हणून ( कथा, कविता, कादंबरी वगैरे ) लिहिलेले नाही हे उघडच आहे. फुल्यांनीही तसा कुठे दावा केलेला नाही, केल्याचे आढळतच नाही. पण फुल्यांचे वाङ्मय ललित साहित्य नसले, मूलत: ते वैचारिक वाङ्मय असले तरी ते स्वभावत:च रंजक आणि प्रेरक आहे हे ध्यानात घेतले पाहिजे. इथे दिसते ते हे की, एका बाजूने फुल्यांच्यामधील 'रचनाकार' वैचारिक वाङ्मय घडवीत होता तर त्याच वेळी, त्याबरोबरीनेच त्यांच्यामधील ' रसिक निर्मिक ' त्यावर लालित्याचा साज अलगत चढवीत होता. फुल्यांमधील ' रचयिता ' आणि ' निर्मिक ' या उभय रसिक विचारवंतांनी त्यांच्या वाङ्मयात हृदयभेट घडवून दिली आहे. त्यातून त्यांच्या उभ्या वाङ्मयात ' विवेकनिष्ठांची मांदियाळी ' पसरून राहिली आहे, तशाच लावण्यलेण्यांच्या बखरीही सजल्या आहेत. भंगलेल्या समाजात जन्म घेतलेल्या फुल्यांसारख्या ' अभंग ' लोक-नेत्यालाच हे जमू शकते. या प्रतिपादनाचा मनस्वी आविष्कार फुल्यांच्या ' शेतकऱ्याचा आसूड ' मध्ये आढळतो. म. फुले यांनी जे विपुल वाङ्मय लिहिले त्यामध्ये ' छ. शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा ', ' ब्राह्मणांचे कसब ', ' गुलामगिरी ', ' शेतकऱ्याचा आसूड ', ' इशारा ', ' सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक ', ' अखंडादि काव्यरचना ' इत्यादी ग्रंथगत साहित्याबरोबरच ' सत्य-शोधक समाजाची तिसऱ्या वार्षिक समारंभाची हकिगत ', ' दुष्काळविषयक विनंतिपत्रक ', ' हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन ', ' ग्राम-जोश्यासंबंधी जाहीर खबर ', ' मराठी ग्रंथकार सभेस पत्र ', ' सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकांसह सर्व पूजाविधी ' अशा काही ' पत्रकवजा ' कागद-पत्रांचाही समावेश आहे. ' सत्सार ' : अंक १ व २ हा नियतकालिकाच्या स्वरूपातील भागही महत्त्वाचा आहे. यांपैकी ग्रंथनिविष्ट वाङ्मयाचे मूल्य वादातीत आहे पण अन्य शब्दाची वाण म्हणून ' पत्रकवजा ' किंवा ' नियत-

कालिक स्वरूपातील' म्हणून ज्याचा निर्देश करावा लागतो ते फुल्यांचे वाङ्मयही मूलभूत दृष्टिकोण प्रकट करणारे आहे. ते प्रासंगिक असले तरी त्यामधील प्रबोधनाच्या पाऊलवाटा आणि परिवर्तनाच्या दिशा ह्या ग्रंथनिविष्ट दृष्टि-सृष्टीशी अत्यंत संवादी आहेत. या सर्वांतून फुल्यांचे प्रखर असे विचार-वैभव आकार घेते; म्हणून वृत्तपत्रीय स्वरूपाचे हे प्रासंगिक लेखन टाकाऊ नाही, मूल्याधिष्ठित आहे. म. फुले यांच्या उभ्या जीवनकार्यालाच एक मूल्य-विवेक आहे; आणि संपन्न पण सत्त्वस्थ समाजपरिवर्तनाच्या दिशेने धावणारी त्यांची कृतिनिष्ठ विचारदृष्टी लोकहितदक्षतेने बांधलेली आहे. म. फुल्यांच्या या खऱ्या वाङ्मयातून कृतिवीर सर्वंकष सुधारकाचे एक लढाऊ चित्र उभे राहते. मानवी जीवनातील कृमि-कीटकांचे रान भाजून काढणारे विचारांचे पेटते पलिते त्यांच्या वाङ्मयातून सतत धडाडताना आढळतात. ही रचना—निर्मिती—वाङ्मया-साठी वाङ्मय किंवा वाङ्मय लिहून वाङ्मयात भर टाकावी म्हणून नव्हती, तर सामाजिक व्यवस्थेमधील आकुंचित प्रदेश सुपीक करण्यासाठी होती, आहे. म्हणजेच फुल्यांच्या वाङ्मयाचा मोहरा परिवर्तनशीलतेचा आहे. वाङ्मयीन कलानंदाचा नव्हे! या उपलब्ध वाङ्मयाबरोबरच 'तृतीय रत्न नाटक', 'अस्पृश्यांची कैफियत', 'मद्यपानगृहांच्या वाढीस विरोध दर्शविणारे पत्र' असे काही अनुपलब्ध साहित्यही आहे. पूर्ण स्वरूपात हे साहित्य उपलब्ध नसले तरी भारतीय कीर्तीचे चरित्रकार श्री. धनंजय कीर यांनी आपल्या 'महात्मा जोतिराव फुले' या ग्रंथात ह्यामधील जे थोडेफार उतारे उद्धृत केले आहेत, त्यावरून पाहिल्यास त्यामध्येही मूलग्राही समाजचिंतन आणि आमूलाग्र परिवर्तनाची दिशाच सूचित होते. 'अस्पृश्यांची कैफियत'मध्ये फुल्यांनी अस्पृश्यांच्या दारुण हालअपेष्टांवर प्रकाश टाकताना, एक महार आणि मांग हे, भारताच्या दौऱ्यावर असलेल्या महाराणी व्हिक्टोरियाला आपल्या वस्तीत येण्याचा आग्रह करतात, महाराणी व्हिक्टोरिया त्यांच्याबरोबर वस्तीतून फेरफटका मारते; आणि तिथे अस्पृश्यांच्या हलाखीचे, त्यांस देण्यात येणाऱ्या निर्दय वागणुकीचे, बळेबळेच वेठीस धरण्याच्या पद्धतीचे दुस्सह आयुष्य तिला पाहायला मिळते, त्याचे विदारक चित्रण करण्याचा प्रयत्न आहे. मात्र म. फुले हे काहीही लिहीत असले तरी मूलतत्त्वांशी कसे संवादी राहात होते आणि थंड परिस्थिती-मध्ये स्फोटक बीजे पेरून समाजव्यवस्थेला आकार कसा देऊ पाहात होते

त्याचा हा एक अव्वल नमुनाच आहे. फुल्यांची सर्वत्र पसरलेली ही दृष्टी आहे. तिला बाध यावा अशी एकही ओळ फुल्यांच्या लेखनात कुठेही आढळत नाही. आपल्या व्यक्तिमत्त्वाशी इतकी एकसंध एकात्मता, ललित वाङ्मयात साधणे अवघड असले तरी शक्य असते. पण वास्तवाच्या नॉयलॉन धाग्यांनी करकचून बांधल्या गेलेल्या वैचारिकतेच्या ठायी, अनेक उलटसुलट दबाव एकमेकाला तोडून खाण्याच्या तयारीत असताना साधणे ही अत्यंत अवघड बाब असते. फुल्यांच्या वाङ्मयातील हा दणकट अंत:स्रोत तत्कालीन आणि भविष्यकालीन समाजव्यवस्थेच्या समग्रतेचे दर्शन देतो. म. फुल्यांच्यामध्ये मूलत: निबंधकार आहे. तो आणि त्या अंगाने ललित लेखकाचा वावर त्यांच्या वाङ्मयात एकाच वेळी आढळतो. त्यांच्या अखंड वाङ्मयामध्ये हे ठळक रीतीने दिसते.

**क्रांतिप्रवण नि:शस्त्र युद्ध**

म. फुल्यांनी सगळे वाङ्मय लिहिले आहे ते शूद्रादी अतिशूद्रांच्या, त्यांना ज्ञान देऊन शहाणेसुर्ते करण्याच्या मनुजवैरी समाजव्यवस्थेला चूड लावण्याच्या भूमिकेतून. त्यांच्या वाङ्मयाचा सारा प्रपंच त्यासाठी उभा आहे. अवघ्या दरिद्री समाजाच्या बाजूने आणि त्याविरोधी सनातनी कर्मठ आणि प्रतिगामी पुरोहित-शाहीच्या विरोधाने या वाङ्मयाची उभारणी झालेली आहे. सरळठोक व्यवहाराचे खुल्लम खुल्ला नेटदार प्रदर्शन हा या वाङ्मयाचा गाभा आहे. त्यामधील पल्लेदार विचारांची गरुडझेप, काळ भेदून पलीकडे उतरण्याची पद्धती, लोकहितदक्ष मूल्यांच्या भक्षणाच्या विरोधी स्वीकारलेली सततची दक्ष स्थिती इत्यादी कित्येक गोष्टींचा प्रत्यय ' छ. शिवाजी राजे भोसले यांचा पवाडा ' ( १८६९ ) या वीर-काव्यापासूनच येतो. ' शेतकऱ्याचा असूड 'मध्ये फुल्यांनी शेतकऱ्यांच्या दु:स्थितीचे केलेले वर्णन काल लागू होते, आजही आहे आणि दूरवरच्या खेड्यापाड्यांत ते उद्याही लागू असणार नाही असे सांगणे कठीण आहे. ' ब्राह्मणांचे कसब 'मध्ये ( १८६९ ) फुल्यांनी सनातनी पुरोहितशाहीच्या लोभी वृत्तीमुळे समाजात घर करीत असलेल्या नि:सत्त्व, पराक्रमशून्य परिस्थितीवर कोरडे ओढले आहेत. पुरोहितशाहीचे कसब हे कसाबाहून कसे क्रूर होते त्याचे दृश्यरूप ' ब्राह्मणांचे कसब 'मध्ये तर ' गुलामगिरी 'मध्ये ( १८७३ ) माणसांशी वैर मांडून असलेली जुनी समाजव्यवस्था, समाजाला मृताची कळा आणणारी

अवतार-कल्पना आणि मूल्यनिष्ठा यावर स्फोटक हल्ले चढविले आहेत. गुलामगिरीची रचना वास्तवाधिष्ठित खरी पण हतप्रभ माणसाला तिने आत्मावलोकन, आत्मबळ आणि आत्मप्रतीती शिकविली यात शंका नाही. सनातनी जगाविरुद्ध म. फुले यांनी कृतिप्रवण निःशस्त्र युद्ध आरंभिले होते. या युद्धात त्यांनी हार घेतली नाही, अंगाअंगाला व्रण पाडणारे, घायाळ करणारे टीकेचे प्रहार शरीरावर पडले, आणि ते पचविता पचविता फुले अधिक प्रखर बनले; टणक, कडक झाले. तिखट भाषेच्या प्रकर्षाचे हे एक कारण आहे. समाजव्यवस्था, पार्श्वभूमी, परिस्थिती आणि पूरक कारणेच अशी की, फुल्यांचे वाङ्मय चांगल्या अर्थाने 'विषारी' म्हणजे परिवर्तनाला आवाहन करणारे व्हावे! 'इशारा' किंवा 'सत्सार' अंक : १ व २ मध्ये फुल्यांनी बाजीरावाच्या कारकीर्दीत होत असलेल्या शेतकऱ्यांच्या, शेतमजुरांच्या हालाची हृदयाला पीळ पडणारी कहाणी सांगितली, ती न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या 'गेल्या तीसएक वर्षांपेक्षा शेतकऱ्यांची स्थिती सुधारत आहे.' अशा आशयाच्या, त्यांच्या विधानाची चीड येऊन! चीड, प्रक्षोभ, आवेग, दाह, परिस्थितीमधील भयप्रदता हा फुल्यांच्या वाङ्मयाच्या निर्मितीमागील स्थायिभाव आहे. 'हंटर शिक्षण आयोगापुढील' (१८८२) 'पाझर सिद्धान्त', विरोधी लखलखते प्रतिपादन असो, 'सार्वजनिक सत्यधर्म'मधील अखिल भूखंडावरील अवघ्या लोकांची एकी पाहण्याचे त्यांचे स्वप्न असो, अर्थपूर्ण मंगलाष्टकांचे लेखन असो, पूजाविधींचे निर्धारण असो, की खऱ्या धर्मापासून वंचित करणाऱ्या भेदांचा समाचार घेणाऱ्या 'अखंडा'ची रचना असो सर्वत्र हा स्थायिभाव आढळतो. म्हणून अंगाचा प्रक्षोभ झाला आणि मनात दाह उसळला, की मूलतः ललित लेखकाची प्रकृती नसताही ललित लेखक कसा अवतीर्ण होतो आणि ललित लेखकाच्या हवेतल्या बोलण्याला विवेकवंत कसा तोलून धरतो, त्याचे म. फुल्यांचे वाङ्मय हे उत्तम उदाहरण आहे. त्याला दाद कुणी दिली, कुणी नाही हा प्रश्न महत्त्वाचा असला तरी त्यावर काथ्याकूट करीत बसण्यात अर्थ नाही.

म. फुले यांच्या समग्र वाङ्मयातील सुटेसुटे प्रसंग असोत किंवा 'तृतीय रत्न नाटक'मधील मूर्तिपूजेपेक्षा ज्ञान हे श्रेष्ठ होय, ही संकल्पना असो, किंबहुना एकूणच साहित्यरचनेमागील (लौकिकार्थाने रचना, प्रातिभिक दृष्टीने निर्मिती)

साऱ्या कल्पना आणि संकल्पना हे फुल्यांच्या संदर्भात क्रमाने लक्षात घेतले गेले की, त्यांच्यामधील निर्मितिक्षमतेचा धोसरा ध्यानात येऊन अवाक् व्हायला होते.

'शेतकऱ्याचा आसूड' आणि 'गुलामगिरी' यांमधील अनुक्रमे वास्तवाचे प्रखर दर्शन आणि वास्तवाधिष्ठित कल्पनानुरंजन सहज नजरेखालून घालायचे ठरविले तरी फुल्यांची झुंज जशी तीव्र होती तशी झेपही किती उंच होती; याचा पडताळा मिळतो. 'शेतकऱ्याचा आसूड'मध्ये शेतकऱ्याच्या दारिद्र्याचे, हलाखीचे आणि एकूणच दयनीय अवस्थेचे केलेले प्रत्ययकारी वर्णन वास्तवातला कण न् कण टिपणारे आहे. 'शेतकऱ्यांच्या हल्लीच्या स्थितीविषयी थोडेसे वर्णन' करताना शेतकऱ्याव्यतिरिक्त मंडळींना पहिल्यासूट 'बांधवहो', अशी हाक घालून, ते जागे असल्याची खात्री करून घेऊन फुले सांगतात :

"बांधवहो, तुम्ही नेहमी स्वतः शोध करून पाहिल्यास तुमची सहज खात्री होईल की, एकंदर सर्व लहानमोठ्या खेड्यापाड्यांसहित वाड्यांनी शेतकऱ्यांची घरे, दोन तीन अथवा चार खणांची कवलारू अथवा छपरी असावयाची. प्रत्येक घरात चुलीच्या कोपऱ्यात लोखंडी उलथणे अथवा खुरपे, लाकडी काथवट व फुंकणी, भाणुशीवर तवा, दुधाचे मडके व खाली आळ्यात रांधणाच्या खापरी तवल्या, शेजारी कोपऱ्यात एखादा तांब्याचा हंडा, परात, काशाचा थाळा, पितळी, चरवी अथवा वाटी, नसल्यास जुन्या गळक्या तांब्याशेजारी मातीचा मोरवा, परळ व जोगत्या असावयाच्या. त्यालगत चार-पाच डेऱ्या मडक्यांच्या उतरंडी ज्यांत थोडे थोडे साठप्याला खपले, हुलगे, मटकी, तुरीचा कणुरा, शेवया, भुईमुगाच्या शेंगा, भाजलेला हुळा, गव्हाच्या ओंब्या, सांडगे, बिवड्या, मीठ, हळकुंडे, धने, मिरी, जिरे, बोजवार, हिरव्या मिरच्या, कांदे, चिंचेचा गोळा, लसूण, कोथिंबीर असावयाची. त्याचेलगत खाली जमिनीवर काल संध्याकाळी गोडबोल्या भट पेनशनर सावकाराकडून, वाढीदिडीने जुने जोंधळे आणलेले, तुराट्यांच्या पाट्या भरून त्या भिंतीशी लावून एकावर एक रचून ठेवलेल्या असावयाच्या. एके बाजूला वळणीवर गोधड्या, घोंगड्यांची पटकुरे व जुन्यापान्या लुगड्यांचे धड तुकडे, आडवे-उभे दंड घालून नेसण्याकरिता तयार

केलेले धडपे, भिंतीवर एक लाकडाची मेख ठोकून तिजवर टांगलेल्या चिंध्याचांध्यांच्या बोचक्यावर भुसकट व गोवऱ्या वहावयाची जाळी, दिव्याच्या कोनाड्यात तेलाच्या गाडग्याशेजारी फणी व कुंकवाचा करंडा, वरती माळ्यावर गोवऱ्या व तीनधारी निवडुंगाचे सरपणाशेजारी वैरण नीट रचून ठेविली असावयाची. खाली जमिनीवर कोन्याकोपऱ्यांनी कुदळ, खुरपे, कुळवाची फास, कोळप्याच्या गोरह्या, जाते, उखळ व केरसुणीशेजारी थुंकावयाचे गाडगे असावयाचे. दरवाज्याबाहेर डावे बाजूला खापरा रांजणाच्या पाणईवर पाणी वहावयाचा डेरा व घागर असून पलीकडे गडगळ दगडाची उघडी न्हाणी असावयाची. उजवे बाजूला बैल वगैरे जनावरे बांधण्याकरिता आढेमेढी टाकून छपरी गोठा केलेला असावयाचा. घरातील सर्व कामकाजाचा चेंधा उपसून पुरुषांच्या पायावर पाय देऊन दिवसभर शेतीकाम उरकू लागणाऱ्या बायकोच्या अंगावर सुताडी धोटा बांड व चोळी, हातात रुप्याचे पोकळ गोठ व ते न मिळाल्यास कथलाचे गोठ नि गळ्यात मासा सवा मासा सोन्याचे मंगळसूत्र, पायाच्या बोटांत चटचट वाजणारी काशांची जोडवी, तोंडभर दातवण, डोळेभर काजळ आणि कपाळभर कुंकू, याशिवाय दुसऱ्या शृंगाराचे नावाने आवळ्याएवढे पूज्य. उघडीनागडी असून अनवाणी सर्व दिवसभर गुराढोरांच्या वळत्या करीत फिरणाऱ्या मुलांच्या एका हातात रुप्याची कडी करून घालण्याची ऐपत नसल्यामुळे त्यांच्या-ऐवजी दोन्ही हातात कथलाची कडी व उजव्या कानात पितळेच्या तारेत खरड्यांच्या बाळ्या. याशिवाय दुसऱ्या अलंकाराचे नावाने शिमगा. हिवावाऱ्यात व उन्हातान्हात रात्रंदिवस शेतीत खपणाऱ्या शेतकऱ्याचे कंबरेला लुगड्यांचे दशांचा करगोटा, खादीची लंगोटी, टोपीवर फाटकेसे पागोटे, अंगावर साधे पंचे न मिळाल्यास घोंगडी व पायात ठिगळे दिलेल्या अथवा दोरीने आवळलेल्या जोड्यांशिवाय बाकी सर्व अंग सळसळीत उघडेबंब असल्यामुळे, त्याच्याने अतिशय थंडीपावसाळ्यात हंगामशीर शेती मेहनत करवत नाही—"

वगैरे जे 'चक्षुर्वैसत्यं' यथार्थ वर्णन आहे, त्यात आजही काही उणे भेटेल अशी सुतराम शक्यता नाही. बडे बागायतदार सोडले तर मध्यम, भूमिहीन,

शेतमजूर वगैरे शेतकऱ्यांची दुःखे, यापूर्वा होती आणि आज नाहीत असे थोडेच आहे ? दुःखे तीच आहेत, उलट ती वाढलीच आहेत. कमी फार थोड्या प्रमाणात झाली आहेत. महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांत–अगदी ' हायवे ' जवळच्या खेड्यापाड्यांत गेले तरी चालण्यासारखे आहे–पोचले तरी लाखांच्या पोशिंद्या अन्नदात्याची कोण दुर्दशा आहे त्याची हृदय विंधून टाकणारी चित्रविचित्रे, नजर बाजूला वळवावी इतक्या भेदकपणे पुढे येतात. फुल्यांच्या वर्णनातले असे ' प्रत्ययकारित्व ', ' वास्तवदर्शन ' आणि ' क्रांतदर्शित्व ' त्यांच्या अखंड साहित्यात विखरून राहिले आहे.

## जागृत दैवतासारखी निर्मिती

म. फुल्यांच्या ठायी असलेला सर्जन व सृजनशील विवेकनिष्ठ निबंधकार त्यांच्या वाङ्मयरचनेमधून सतत डोकावताना दिसतो. फुले यांनी लेखणीचा वापर मुख्यतः केला तो ठोस विचार व्यक्त करण्यासाठी आणि ते सारे, त्यांचे विचार सर्वार्थाने प्रकट करण्यात सक्षमतेने सार्थ ठरल्याचाच पडताळा मिळतो. त्यामुळे त्यातून ' वाङ्मयानंद ' किंवा ' कलानंद ' मिळाला तरी तो त्याचा प्रमुख हेतू नव्हे; हे उघडच आहे. विवेचनाच्या ओघात ते नमूदही झाले आहे. साहजिकच फुले समग्र वाङ्मय अभ्यासल्यावर डोळ्यांसमोर कोणते ठळक चित्र उभे राहते ? समाजातल्या उपेक्षित, पीडित, दुर्लक्षित, छलित, खचलेल्या–पिचलेल्या समाजसमूहांच्या दयनीय दुर्दशेचे हे चित्र असते. फुल्यांच्या शब्दप्रयोगांचा वापर करायचा तर ' शूद्रादी अतिशूद्रांच्या परिस्थितीचे मोजमाप ' या साहित्या-मधून मिळते. अर्थात ह्या ठळक चित्रात अनेक रंग आहेत, विविध छटा आहेत. पण तो तपशिलाचा भाग आहे. समाजातल्या काही विशिष्ट वर्गाविरुद्ध तोफेचे तोंड लावून असलेले फुल्यांचे वाङ्मय हे काहीसे ' एकांगी ', ' एकारलेले ' असे वाटले ( माननीय टीकाकारांच्या टीकेचा तो एक मुद्दा राहिला आहे. ) तरी त्या एकारलेल्या वाग्बाणातून समाजाचे प्रकट झालेले अंतर्भेद, अंतःप्रवाह आणि अंतःसूत्रे डोळ्यांवरील झापडे उडविणारी, झाकून घेतलेले डोळे खाडकन् उघडविणारी आहेत : हे व्हायचे ( आणि नेमके तेच करायचे अशी फुल्यांची भूमिका होती. ) तर मारा नेमक्या जागी असणे हे युद्धशास्त्र आहे. आग सोडून पाण्याचा मारा निरर्थक ठरला असता. ठरतो.

म. फुल्यांनी स्वीकारलेले व्रत हे एक ‘ धर्मकार्य ’ होते : ‘ जन्मजात श्रेष्ठ ’ मंडळींनी या देशात प्राणपणेकरून अंगीकारलेल्या धर्मकार्यातून ‘ कसाबा’हूनही क्रूर करणी घडत होती; त्याचे शवविच्छेदन—म्हणजे दुसऱ्या बाजूने भल्या गोष्टी-साठी समाजाचेच विच्छेदन—हे फुल्यांच्यापुढील इतिहासदत्त कार्य होते. सटवीचे ते लिखित होते. सर्वतऱ्हेच्या गुलामगिरीचा नाश व्हावा, मानवी जीवनाशी सदैव जळणारे अत्यंत वैर मृत व्हावे ही फुल्यांची दूरवर पोचणारी दृष्टी होती. म्हणून तर अपार पोटतिडिक, असीम कळकळ आणि विचक्षण दृष्टी यांतून ‘ शेतकऱ्याचा आसूड ’सारखी सदैव मार्गदर्शक अशी ‘ शेतकऱ्यांची गाथा ’ लिहिली गेली. शूद्रातिशूद्रांसाठीच सर्व प्रकारचे छळ सोसणारे फुले त्यांच्या ‘ अखंड ’मधील शब्दाशब्दांमधून जाणवतात. निःसंकोच, फटकळ, सडेतोड फुले त्यांच्या हृदयस्पर्शी निवेदनातून हुबेहूब सामोरे येतात. शब्द, आशय, रूप आणि अभिव्यक्ती यांची हृदयभेट सुशिक्षित उच्चभ्रू कलावाद्यांना अपरिचित असली तरी इतरांच्या ती हृदयाला जाऊन भिडते हे फुल्यांचे सामर्थ्य आहे.

नुसत्या ‘ शेतकऱ्याचा आसूड ’ भोगला आणि त्यातल्या शब्दसंपत्तीची जाता जाता गणती केली तरी साहित्यनिर्मितीचे फुल्यांचे दैवत कसे आणि किती जागृत होते ते पटते. अर्थात ही निर्मिती स्वयंभू देवतेसारखी ओबडधोबड आहे; पण हे दैवत जागृत होते. वाक्-प्रचार, म्हणी, स्वरप्रक्रिया, वचन, विभक्ती वगैरे संदर्भात फुले करीत असलेली सढळ काढघाल आणि मुक्त वापर ही त्यांची भाषाशैलीवरील पकड स्पष्टपणे पुढे मांडते. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी फुल्यांच्या अशुद्धलेखनासंबंधी मोठ्याने हाकाटी पिटली असली तरी हे पुढे होणे मागे सरत नाही. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणी-घडणीतील फुल्यांच्या वाट्याला त्यामुळे बाधा पोचत नाही. ( अशा काही फालतू गोष्टींमुळे बाद करण्याची स्पर्धा लावायची ठरले तर कित्येक विचारवंतांचा विद्वत्तेचा वसा हिसकावून घ्यावा लागेल; आणि तरीही ते बाद ठरतील की नाही हा प्रश्न शिल्लक उरेलच !) जय-पराजय कुणाचा ह्याचा हिशेब ज्याचा त्याने मोजून घ्यायला कुणाची हरकत असू नये.

## फुले : सृजनशील निबंधकार

मराठी निबंधकारांमध्ये अग्रक्रमाचे एक निबंधकार म्हणून फुल्यांची नोंद घेणे इतिहासाला टाळता येणारे नाही. म. फुले हे राष्ट्ररचना करणारे निबंधकार आहेत. समग्र परिवर्तनाच्या दिशा दाखविणारे समाजकार आहेत. ललित लेखनामध्ये सर्जनशील कल्पनाशक्तीला पुरेपूर वाव असतो. त्यामुळे त्याचे स्वास्थ्य अबाधित असते. वाचकांचे कुतूहल दीर्घकाळ टिकणारे असते. वैचारिक लेखनाला हे अबाधितत्व लाभत नाही. पण फुल्यांच्या निबंध–प्रबंधात्मक वाङ्मयाने हे अबाधित्व टिकवून ठेविले आहे त्याचे कारण फुल्यांच्या ठायी असलेल्या सर्जन आणि सृजनशील विवेकनिष्ठ निबंधकारांमध्ये आहे. वैचारिकता, प्रेरकतेत असलेली रंजकता, वास्तवनिष्ठ परिवर्तनशीलता, बुद्धिनिष्ठ मांडणीमधील सौंदर्यसंपन्नता आणि खडबडीत भाषाशैलीतील मर्दानी लावण्यपूर्णता इत्यादी गुणांनी फुल्यांचे वाङ्मय लगडून राहिले आहे. म. फुले विचारांचे पक्के होते, सडेतोडपणात सच्चे होते, टीकेला खंबीर होते, गुळमुळीत काहीच नव्हते. फुले समाजसुधारकच केवळ नव्हते तर क्रांतिकारक होते. क्रांतिकारक कल्पना कृतिशील करून लोकमनास त्यांना बदलायचे होते. अशा वेळी आदबशीर दरबारी लेखन करता येत नाही; करून उपयोग होत नसतो. ज्याला लोकांना जागे करायचे असते त्याला ' अमर्षशून्येन जनस्य जंतुना न जातहार्देन न विद्विषादरः ' हाच न्याय स्वीकारावा लागतो. रोख, व्यक्ती किंवा समाज यावर नव्हे तर वृत्तीवर ठेवावा लागतो. व्यक्ती वा समाज यांचे पक्षपाती न बनता तत्त्वाच्या बाजूने वजन टाकावे लागते. समाजाच्या बदलाचे कार्य करायचे तर कुठल्याही रीतीचा दंभ उपयोगाचा नसतो, हे समजून घेतले पाहिजे. आजपावेतो, मराठी निबंध वाङ्मयात निबंधकार न मानलेल्या ( त्यामुळे उल्लेख वगैरे करण्याचा प्रश्नच नव्हता. ) म. फुल्यांचे उभे वाङ्मय मल्हार ढवार करून कडाडत कोसळणाऱ्या विजेरी चाबकासारखे आहे तर त्यामधील शब्दकळा दह्याच्या दाट कवड्यासारखी रसबाळी आहे, हे दुर्लक्षून चालणारे नाही. तसेच कशाचे तरी बंदिवान होऊन योग्य दिशेचा प्रवास टाळणेही इष्ट नाही, उपयोगही नाही. कारण उकरून काढण्याची इतिहासाला चांगली खोड असते. त्यामुळे टाळणे वगैरे काहीच शक्य नसते.

# ३

## अक्रोडाचे झाड

राजर्षी शाहूमहाराज हे शिक्षणाच्या संदर्भात, महात्मा जोतीबा फुले यांच्या वाटेने जाणारे आहेत. महात्मा फुले यांनी सांगितले आहे :

‘ विद्येविना मती गेली । मतीविना गती गेली
गतीविना वित्त गेले । वित्ताविना शूद्र खचले
इतके सारे अनर्थ । एका अविद्येमुळे झाले । ’

तर ‘ दस्यूचा पोवाडा ’ मध्ये

‘ विद्येचा अव्हेर कराल,
देशोधडीला जाल,
डाग वंशात ॥

असे महात्मा फुल्यांनी बजाविले आहे. ’ हीच भूमिका त्यांनी, इंग्रजी सरकारने १८८२ साली शिक्षणविषयक प्रश्नांसंबंधी विचार करण्यासाठी नेमलेल्या हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेल्या निवेदनात अधिक नेमकेपणाने मांडलेली आहे. महात्मा फुले सांगतात :

‘ One of the most glaring tendencies of Government System of high class education has been the virtual monopoly of all the higher offices under them by Brahmins. If the welfare of the Ryot is at heart, if it is the duty of Government to check a host of abuses, it behoves them to narrow this monopoly day by day so as to allow a sprinkling of the other castes to get into the public services. Perhaps some might

be inclined to say that it is not feasible in the present state of education. Our only reply is that if Government looks a little less after higher education which is able to take care of itself and more towards the education of the masses, there would be no difficulty in training of a body of men every way qualified and perhaps far better in morals and manners. – '

म्हणून फुल्यांचा आग्रह हा होता की, अशा रीतीची उच्चवर्णीय शिक्षण-पद्धती ही शासनाच्या हिताच्या दृष्टीने उपद्रवी आणि अपायकारक असल्याने ती बदलणे जरूर आहे. सर्पाच्या वेटोळ्याप्रमाणे, पुरोहितवर्गाने शूद्र बांधवांच्या गळ्याभोवती घट्ट आवळलेले पाश उखडून काढले पाहिजेत, हा मुख्य मुद्दा असला तरी फुल्यांच्या दृष्टीतून तेवढेच महत्त्वाचे नाही; तर त्यापुढे जाऊन त्यांनी सांगितले आहे :

' – It is no less the duty of each of my shudra brethren as have received education, to place before Government the true state of their fellowmen and endeavour to the best of their power to emancipate themselves from Brahmin thraldom. – '[२]

महात्मा फुल्यांची ही प्रेरणा आणि प्रवृत्ती राजर्षी शाहूंच्या शिक्षणाच्या कार्यामागे उभी आहे.

राजर्षींनी १८९४ ते १९२२ अखेर, अठ्ठावीस वर्षे राज्याधिकार सांभाळले. शिक्षणविषयक वधघटीच्या दृष्टीने या अठ्ठावीस वर्षांचे १८९४ ते १९०४ व १९०५ ते १९२२ असे अनुक्रमे दहा व अठरा वर्षांचे कालखंड पाडता येतात. पैकी पहिल्या कालखंडात शिक्षणावर कमी खर्च झाला असून दुसऱ्यामध्ये तो क्रमाने वाढत गेल्याचे दृष्टोत्पत्तीस येते.

यामधून आणखीही एक बाब दिसते ती ही की, राजर्षींनी शिक्षणविषयक कोणत्या टप्प्यावर अधिक जोर घातला आहे, त्याचा मागोवा मिळतो. राजर्षींनी शिक्षणविषयक उपक्रमांपैकी अधिक भर कशावर दिला किंवा कोणत्या थरावरील

शिक्षणाच्या उपक्रमास अग्रहक्क देण्याची दृष्टी स्वीकारली, अशा प्रश्नांतून लक्षात येते ते हे की, राजर्षींनी प्राथमिक, माध्यमिक आणि महाविद्यालयीन या शिक्षण-स्तरांपैकी प्राथमिक आणि माध्यमिक स्तरांकडे विशेषेकरून लक्ष पुरविले. महाविद्यालयीन स्तर हा पुढचा टप्पा होता. मागच्यांच्या सुदृढतेवर तो उभा होता. साहजिकच मागचे दोन स्तर अस्तित्वात नसताना एकदम पुढच्याकडे सरकण्यात हशील नव्हते, अर्थही नव्हता. प्राथमिक तयारीखेरीज वर इमारत बांधण्याचा डौल फुकाचा होता. म्हणून राजर्षींनी गरज काय ते हेरले, नेमके काय करणे जरूर ते टिपले आणि पायापासून बांधणीला प्रारंभ केला. या बांधणीत कुठे सुरुवात करावयाची याचे जसे भान होते तसेच पुढे कुठे पोचायचे याची निश्चितीही होती.

## मानवी भवितव्यासाठी गुंतवणूक

राजर्षींच्या चाणाक्ष नजरेने हे पक्के हेरले होते की, प्राथमिक शिक्षणापासून तांत्रिक शिक्षणापर्यंत जी धडपड करावयाची ती मानवी भवितव्याच्या दृष्टीने गुंतणूवक आहे. ‘ आज ’च्या दृष्टीने ही गुंतवणूक अनुत्पादक असली तरी ‘ उद्या ’साठी ती करणे इष्ट आहे. कारण ‘ उद्या ’च्या पोटात सृजनशील उत्पादकता आहे. ताबडतोबीचे फायदे नाहीत. पेरून ठेवून उगवण्याची वाट पाहात राहण्यात लाभ तो काय; ही एक दृष्टी आहे. पण तो तात्कालिक लाभ-हानीचा विचार करणारी अल्पसूत्री दृष्टी झाली. राजर्षींना ती मंजूर नव्हती. आपल्या पिढीसकट भावी पिढ्यांसाठी काही उत्तम पिकावे म्हणून, मुरमाड भूमी नांगरून सुपीक करू पाहणाऱ्या राजर्षींना, ती नाकबूल असल्यास नवल नाही. त्या दृष्टीने शिक्षणविषयक गुंतवणूक हा, फळेफुले येण्याच्या संदर्भात कालावधीचा प्रश्न असला तरी अखेरतः ती मानवी गुंतवणूक होती. आजोबाने लावलेल्या आंब्याच्या झाडाचा उपभोग नातवाने घेतला, अशी अनुभवाची कथा प्रचलित आहे. पण ही अधिकतर तीन पिढ्यांमधील कथा आहे. राजर्षी तर शिक्षणविषयक अक्रोडाचे झाड लावीत होते, जे पाच एक पिढ्यांनंतर फुलणार, बहरणार होते. म्हणजे भारतीय माणसाच्या सर्वसाधारण आयुर्माना-इतक्या वर्षांनी अक्रोडाच्या झाडाचा फलपुष्पगंधित सुवास दरवळणार होता; त्याला प्रारंभ होणार होता. याचा अर्थ हा की, वाटचाल बिकट होती,

नागमोडी होती. सरळ नव्हती. साहजिकच मन वेधून घेईल अशी मुळीच नव्हती. हे सारे ध्यानात राखून, राजर्षींनी कालावधीची ही वाटचाल आरंभिली. राजर्षींना ' उद्या 'सकट ' आज–'चा, विचार अभिप्रेत होता. ' उद्याचं उद्या, आजचं आज पाहू. ' एवढा संकुचित विचार त्यांच्या मनाशी नव्हता. जन-सामान्यांचे भवितव्य घडवू पाहणाऱ्याला असा विचार करता येत नसतो. राजर्षींना व्यापक विचाराखेरीज अन्य कशाचा स्पर्शच झाला नाही.

यासंबंधातील राजर्षींची धारणा आणि दृष्टी स्वच्छ होती. सर्वसाधारण समाजात शिक्षण नाही; म्हणून मागासलेपण अमाप आहे. तेव्हा ते नाहीसे करावयाचे तर शिक्षणाची गंगा सामान्य माणसाच्या कवाडापर्यंत नेली पाहिजे. पण केवळ शिक्षण दिले की झाले, काम संपले. आपल्या पिढीला ते मिळाले, की पुढे बघायचे कारण नाही, असे मात्र नव्हे. तेवढ्याने काम भागत नसते. तर शिक्षण म्हणजे काय हे माहीत नसलेल्या सर्वसाधारण समाजाच्या मनामध्ये शिक्षणासंबंधी आस्था रुजविणे, शिक्षणासंबंधी अभिरुची निर्माण करणे आणि शिक्षण ही अवघ्या परिवर्तनाची गंगोत्री आहे याचे भान मिळणे हे महत्त्वाचे आहे. राजर्षींना ते अभिप्रेत होते. केवळ शिक्षण देणे आणि शिकलेल्या माणसांना ' आम्ही सुशिक्षित ' म्हणून, म्हणवून घ्यायला संधी मिळवून देणे एवढाच काही राजर्षींच्या शिक्षणविषयक चळवळीचा भाग नव्हता; तर अज्ञान, अंधश्रद्धा व दारिद्र्य यांनी ग्रस्त झालेल्या सर्वसाधारण माणसाच्या मनामध्ये अधूनमधून जाग्या होणाऱ्या ' मुक्ती कोन पथे ? ' या आर्त प्रश्नाला राजर्षींची शिक्षण-विषयक चळवळ हे उत्तर होते.

### राजर्षींच्या शिक्षणविषयक चळवळीचे तीन पाय

राजर्षींची ही, शिक्षणविषयक चळवळ तीन पायांवर उभी होती :

१. शिक्षणविषयक सोयीसवलती, शिक्षणसंस्थांची निर्मिती, शिक्षणसंस्थांना मदत, शिक्षणविषयक निरनिराळ्या उपक्रमांचे संयोजन इत्यादी उपलब्ध करून देणे;

२. विविध जातिजमातींसाठी विद्यार्थी वसतिगृहांची सोय करून शिक्षणाच्या प्राप्तीचे मार्ग सुकर करणे; वसतिगृहयुक्त शिक्षणाला उत्तेजन देऊन जातिभेदांसारखी कोळिष्टके काढणे; आणि

३. सामान्य माणसाच्या मनामध्ये शिक्षणाविषयी अभूतपूर्व लालसा निर्माण करून, त्याच्या अनेकविध मागासलेपणाला सुरुंग लावणे.

याद्वारे राजर्षींनी शिक्षणविषयक सर्वंकष क्रांती उभारली. यासाठी राजर्षींनी सर्वसाधारण काही सूत्रे ठरविली : 'व्यापक समाजशिक्षण' हे प्रमुख सूत्र. त्यात मग छोटीछोटी सूत्रे गोवण्यात आली, किंवा आपापत: गोवली गेली असे म्हणता येईल. मुले व मुली यांच्यासाठी प्राथमिक व माध्यमिक शाळांची स्थापना, रात्र-शाळा, प्रशिक्षण प्रशाला, क्षत्रिय वैदिक स्कूल, पाटील शाळा, अरेबिक प्रशाला, इन्फंट्री स्कूल किंवा सत्यशोधक शाळा इत्यादी. हे सर्वस्पर्शित्व, व्यापक समाज-शिक्षणाचे ( mass education ) प्रमुख सूत्र म्हणून पुढे ठेवले.

ह्या सूत्राचे स्वरूप असे : शिक्षण ही व्यक्तिविकास आणि समाजोन्नती यांची गंगोत्री आहे. ते नाही म्हणजे या विकास-उन्नतीच्या मार्गात अडथळे येणार हे ठरलेले. सामाजिक ऋणाची प्रेरणा मग कशी आणि कोठून मिळणार? माणसे जागी होऊन आपल्यावरचा अन्याय–अत्याचार–धुडकावून द्यायला प्रवृत्त कशी होणार? त्यासाठी ज्ञानाचे अमृताचे कुंभ लाभले पाहिजेत. मुळात माणसे आहेत, त्यांना काही हक्क आहेत आणि त्यांची म्हणून काही प्रतिष्ठा आहे, हे समजायला ते समजावून देणारे काही हवे. आत्मावलोकन, आत्मबळ आणि आत्मप्रतीती त्याखेरीज कशी लाभणार? शिक्षण हे त्याचे रसायन होय. म्हणून राजर्षींनी सार्वत्रिक शिक्षणाची मोहीम उघडली. ज्ञानाच्या पाणपोया घातल्या. 'शहाणे करून सोडावे सकळ जन' यासाठी अट्टाहास मांडला.

पण राजर्षींना लोकांना नुसतेच 'शहाणे' करायचे नव्हते तर लोकांना 'ज्ञानी' करावयाचे होते. ज्ञानी असणे आणि शहाणे असणे यात फरक आहे. ज्ञानीपणात, जीवनाच्या मूलसूत्रांचा वेध घेण्याची ताकद आहे. शहाणपणात ज्ञानीपणाचा बाह्याचार आहे. राजर्षींना हा बाह्याचार नाकबूल होता. ते स्वाभाविक आणि रीतसरही होते.

या ज्ञानी करणाऱ्या, व्यापक समाजशिक्षणामागील भूमिका राजर्षींनी अशी विशद केली. ते सांगतात : 'हल्लीच्या स्थितीत आमचे ध्येय साध्य करण्यासाठी जे कर्तव्य आम्हास करावयाचे, ते आमचा समाज सुशिक्षित करणे व त्यांची मने तयार करणे हे होय. म्हणूनच प्रत्येक समाजाने, आपल्या समाजातील

प्रत्येक व्यक्तीच्या कल्याणाकरिता झटणे अगत्याचे आहे. निरनिराळ्या समाजांतील लोकांना शिक्षण देण्याची पद्धत मी काळजीपूर्वक अनुसरीत आहे आणि माझ्य आयुष्याच्या पुढील काळात तीच पद्धत सुरू ठेवण्याची माझी इच्छा आहे.' या इच्छेत 'आमचा समाज सुशिक्षित करणे आणि त्यांची मने तयार करणे' असे दोन हेतू अंतर्भूत आहेत. अर्थात हे, समाजातल्या काहींच्यासाठी करून उपयोग नव्हता. त्यामुळे शिक्षणातून जे साधावयाचे ते साधले जाणार नव्हते. अनेक मने आणि असंख्य वृत्ती अंधारात ठेचाळत असता काही वृत्ती आणि मने प्रकाशाच्या वाटेवर उभी असली म्हणून विशेषसा फरक पडतो असे नाही. उलट हानिकारक ठरण्याचा संभव जास्त असतो. साहजिकच ज्योतीने ज्योत पेटविण्याचा प्रकार हा दूर पल्ल्याचा असतो. म्हणूनच सामूहिक चेतना महत्त्वाची आहे. राजर्षींना ही सामूहिक चेतना महत्त्वाची वाटली; जनजागरण महत्त्वाचे वाटले.

हेही लक्षात हवे की, हे जनजागरण केवळ शहाणे होण्यासाठी नाही, तर अंतिमत: स्वातंत्र्याच्या-सर्वंकष मुक्ततेच्या-प्राप्तीचाही त्यात उद्देश आहे. 'आधी सामाजिक की आधी राजकीय?–' हा वाद महाराष्ट्रात रंगून गेला; त्याचे बरेवाईट परिणामही महाराष्ट्रावर झाले. पण राजकीय स्वातंत्र्याचा काय किंवा समतेचा लढा काय, हे एकाकी लढता येत नाहीत. त्यांचा परस्परांशी असलेला अनुबंध ध्यानात घ्यावा लागतो. राजर्षींची ती श्रद्धा होती. श्री उदाजी मराठा विद्यार्थी वसतिगृह इमारतीच्या कोनशिला समारंभाचे मुख्य पाहुणे या नात्याने केलेल्या भाषणात राजर्षींनी त्याचे सूतोवाच केले आहे. राजर्षी सांगतात :

> 'रयतेमधील थोडासा भाग पूर्ण सुशिक्षित होण्यापेक्षा सर्व रयतेला प्राथमिक शिक्षणाचा थोडा तरी अंश मिळाला पाहिजे, असे माझे मत आहे. रयतेतील मोठा भाग अडाणी राहिला व थोडेसे लोक विचारसंपन्न झाले व प्रजेस अधिकार दिले तर ते थोड्या लोकांच्या हाती पडणार व एक 'स्वदेशी ब्युरोक्रसी' तयार होणार! या सुशिक्षित ब्युरोक्रसीचा कारभार आमच्या ओळखीचा आहे. फार लांब कशाला, मराठ्यांचा इतिहास पाहा. शाहूमहाराजांची भूल होऊन पेशव्यास अधिकाधिक सत्ता बळकावण्यास संधी मिळाली. याचा परिणाम वाढला व अस्पृश्यास

तर गळ्यात गाडगे व कंबरेस फेसा बांधून फिरावे लागे. हा प्रसंग कोठेही पुन्हा येणे चांगले नाही. याकरिता अधिकारदान करण्यापूर्वी सर्व लोकांत विद्याप्रसार करण्याकडे अगोदर लक्ष देणे जरूर आहे.–' ४

म्हणजे हा प्रश्न अधिकारदानाचा नाही तर 'अधिकारदान करायचे पण कुणाला?' हा खरा प्रश्न आहे. 'आपल्या' लोकांना अधिकारदान करायला विरोध नाही, पण देण्यात येणारे अधिकार शेवटी मोजक्या म्होरक्यांच्याच हाती पडणार असतील तर उपयोग काय? अधिकार बळजोरीने राखू म्हटल्यास राखता येत नाहीत, ठेवू म्हटल्यास ठेवता येत नाहीत. अधिकार वाहते असतात. त्यांचे देणे-घेणे करावेच लागते; आणि एकूण दुनियेचा होरा पाहता, अधिकार-दानाचा क्षण फार दूर आहे असे नाही. राजर्षींनी बदलते वारे हेरले. पण 'सर्व लोकांत विद्याप्रसार' होत असताना अधिकारांचे दान करण्यात औचित्य आहे. कारण राजर्षींच्या उभ्या प्रयत्नांचे ते फलित होते. खुल्या, विमुक्त आणि थेट स्वातंत्र्याकडे जाण्याचा मार्ग त्यातून मोकळा व्हायचा होता. त्यासाठी राजर्षींची अतोनात धडपड होती. अथवा 'सकळ जनांना ज्ञानी करून सोडण्या'च्या राजर्षींच्या प्रयत्नाला दुसरा संदर्भ नव्हता, वेगळा अर्थ नव्हता.

त्यामुळेच दक्षिणी संस्थान हितवर्धक सभेचे चिटणीस ए. व्ही. पटवर्धन यांनी ८ डिसेंबर १९२१ च्या 'सर्व्हंट्‌ ऑफ इंडिया' पत्रामध्ये प्रकट केलेला

"His Highness spends on his own household more than twenty times what he spends on the education of his subjects."

अशा रीतीचा, गैरमाहितीचा अभिप्राय फिजूल ठरतो. त्यात शास्त्रोक्त चिकित्सेपेक्षा अशास्त्रीय पद्धतीवर फुललेला विखारच अधिक दिसतो. अशा विरोधामुळे शिक्षणविषयक, आपल्या प्रयत्नात राजर्षींनी तिळमात्र खंड पडू दिला नाही. गतिरोधाला वाव दिलेला नाही.

राजर्षींनी, प्राथमिक शिक्षणाच्या पायाभरणीपासून आपल्या शैक्षणिक कार्यास प्रारंभ केला त्यामागे विशिष्ट विचारसूत्र आहे. राजर्षी सांगतात :

'–प्राथमिक शिक्षणावर माझा भर आहे. तरी दुय्यम व उच्च शिक्षणाकडे माझे लक्ष कमी नाही. माझ्या रयतेमध्ये प्राथमिक व उच्च शिक्षणाचा प्रसार करण्याची माझी इतकी जोराने खटपट चालली आहे; यावरून शक्य तितक्या: लवकर रयतेस स्वराज्य देण्याचे माझे धोरण आहे हे आपल्या ध्यानी येईलच. माझी सर्व प्रजा मराठी तिसरी इयत्ता जरी शिकून तयार झाली असती तर त्यांना राज्यकारभाराचे हक्क मी आनंदाने देऊन स्वत: आजच विश्रांती घेतली असती ... आज राज्यकारभाराचे काम मलाच करावे लागत आहे. प्रजेवर फक्त कर देण्याची जबाबदारी आहे. पुढे कर देणे व योग्य खर्च करणे ही जबाबदारी रयतेवर पडेल. पण माझी प्रजा ही जबाबदारी घेण्यास अगोदर पूर्णपणे पात्र नसली तरी अंशत: तरी प्राप्त झाली पाहिजे. म्हणजे रयतेतील थोडासा भाग पूर्ण सुशिक्षित होण्यापेक्षा सर्व रयतेला प्राथमिक शिक्षणाचा थोडा तरी अंश मिळाला पाहिजे ... त्याकरिता अधिकारदान करण्यापूर्वी सर्व लोकांत विद्याप्रसार करण्याकडे अगोदर लक्ष देणे जरूर आहे.'[५]

**शिक्षणाच्या बांधणीचे सूत्र**

राजर्षींनी प्राथमिक शिक्षणावर घातलेल्या या जोरातून, प्राथमिकपासून पाया-भरणी करीत उच्च शिक्षणापर्यंत जाण्याच्या वाटचालीतील त्यांचा हेतू स्पष्ट होतो.

त्या दृष्टीने राजर्षींनी, आपले बंधू कागल जहागिरीचे अधिपती पिराजीराव घाटगे यांच्या प्रमुखत्वाखाली भास्करराव जाधव, रावबहाद्दूर म. ग. डोंगरे, अ. बा. लठ्ठे, वाय. के. दिलावर, डॉ. एच. एन. घाटगे या सदस्यांची समिती नियुक्त करून तिच्यामार्फत ' प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत ' या योजनेसंबंधी शिफारशी मागवून घेतल्या. पुढे सन १९१८–१९ मध्ये, खऱ्याखुऱ्या अर्थाने या शिक्षण योजनेचा व्यापक विस्तार झाला.

त्यापूर्वी, शिक्षणाच्या दृष्टिकोणातून राजर्षींनी अन्य काही गोष्टींची कार्यवाही केली. प्रत्येक गावात निदान एक तरी शाळा असावी आणि ती शाळा

त्या गावातील बहुसंख्य लोकांची जी जात असेल त्या जातीच्या इसमाने चालवावी :अशी एक योजना १९१३ मध्ये अमलात आणली. त्यानुसार त्या त्या गावातील शिक्षकांची गावकामगारात गणना करून दिली. त्यांना वतनाने भाडेमुक्त जमिनी देण्याचे ठरविले. अशा जमिनींची उपलब्धता, त्याबाबतीतील आदेश वगैरेसंबंधातील अधिकार पिराजीराव घाटगे यांच्याकडे सोपविण्यात आले. पुढे ते रावबहाद्दूर महादेव गणेश डोंगरे यांच्याकडे देण्यात आले. या योजने-मागचा हेतू हा होता की, शिक्षण आणि त्याचे वितरण यासंबंधी शिक्षकांच्या मनात आस्था जागी व्हावी, नेमून दिलेल्या कामासंबंधी त्यांना कळकळ वाटावी आणि शिक्षणविषयक चळवळीला गती यावी. पण ते घडले नाही. कुलकर्ण्यां-प्रमाणे वतनदार मात्र निर्माण झाला. राजर्षींना हे घडावे असे वाटत नव्हते. पुढील काळामध्ये राजर्षींनी कोल्हापूर संस्थानामध्ये असलेली अलुतेबलुते, महार व कुलकर्णी वतने व्यापक समाजहिताच्या दृष्टीने नष्ट केली. त्याप्रमाणे शिक्षण, शाळा आणि शिक्षक जाग्यावर राखून शिक्षक वतन पद्धतीही रद्द करण्यात आली. सक्तीची पद्धत सुरू केली.

या योजनेनुसार, २८ मे १९१३ च्या आदेशाने खेड्यापाड्यांत शाळांसाठी जिथे म्हणून मोकळ्या जागा मिळतील, मग देवळे, चावडी, धर्मशाळा अशा त्या कोणत्याही असोत, तिथे शाळा सुरू करण्यात आल्या. या शाळांत सुरुवातीला लेखन वाचन व गणित हे विषय शिकविले जात. किंबहुना त्यांवर अधिक भर दिला जाई. यासंबंधीचा राजर्षींचा दूरदर्शी आदेश पाहिला की, माणसाला कार्यप्रवृत्त करण्याच्या, त्यांना कामाला लावण्याच्या त्यांच्या दृष्टीचे प्रत्यंतर मिळते. या देशात माणसांची वाण नाही. पण वाण नसलेल्या माणसांच्या देशाला, माणसांच्याच हितासाठी कामाला कसे लावायचे हा मोठा प्रश्न दूरदृष्टीने राजर्षींनी सोडविला. लोकांच्यासाठी चाललेल्या 'आपल्या' कार्यात लोकांना सामावून घेऊन राजर्षींनी कामाची गती वाढविली. एतद्विषयक आदेशात राजर्षी म्हणतात :

> 'गावची चावडी व शाळा या इमारती बांधण्याचा प्रसंग येईल त्या वेळी होता होईल तो त्या एकत्र बांधून घ्याव्या व त्याचे एस्टिमेट करून ती रक्कम गावकामगार, मुलकी पाटील यांच्या स्वाधीन करावी. त्याने गावाची मदत घेऊन मंजूर झालेल्या

रकमेत इमारतीचे काम पुरे करावे. पोलिस पाटील व कुलकर्णी यांनी त्यांना मदत करावी; मामलेदार किंवा महालकरी यांनी त्या कामावर नजर ठेवावी. '[६]

पुढे ७ एप्रिल १९१७ रोजी काढलेल्या एका हुकुमान्वये,

' शाळांच्या इमारतींची झाडलोट व सारवणसुरवण चावडीच्या इमारतीप्रमाणेच गावकामगाराकडून व्हावे. शाळांचा उपयोग गावालाच होतो. याकरिता शाळेच्या दुरुस्तीवर व झाडलोटीवर गावकऱ्यांचे लक्ष असणे जरूर आहे. '[७]

आपल्या कार्यात जनतेला सामावून घेण्याचा राजर्षींचा हा पवित्रा त्यांच्या कार्याच्या यशाचा महत्त्वाचा घटक आहे.

राजर्षींनी, ' प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीच्या योजने 'चा कायदा केल्यावर त्यासंबंधात त्यांनी काढलेली फर्माने विशेष स्वरूपाची आहेत. पालकांनी आपली मुले शाळेत पाठविण्यासंबंधीच्या फर्मानात राजर्षी सांगतात :

' शिक्षणास योग्य वयाच्या मुलांची यादी प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांच्या आत मुलांच्या आईबापांनी आपापली मुले शाळेत पाठवावीत. अशा यादीविरुद्ध कोणास अपील करावयाचे असल्यास त्याने तीस दिवसांच्या आत ते करावे. शाळेत येण्याच्या ठरलेल्या तारखेपासून सात दिवसांच्या आत ती मुले शाळेत आली नाहीत, तर अशा मुलांची नावे व त्यांच्या पालकांची नावे त्या शाळेच्या हेडमास्तरने मामलेदार यांना कळवावीत. मामलेदाराने पालकांना अशा मुलांचे समन्स काढावे. त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे. म्हणणे सयुक्तिक न दिसल्यास प्रत्येक मुलाबद्दल एक रुपया दंड करावा. हा दंड मुले येईपर्यंत प्रत्येक महिन्यास करावा. आई-बापांच्या निकडीच्या कामासाठी—शेती वगैरे कामासाठी मुलांच्या मदतीची जरुरी असल्यास पंधरा दिवस मुलाला घरी ठेवून घेता येईल. मात्र त्याची सकारण दखलगिरी शाळामास्तरला दिली पाहिजे. मुले हजर राहण्याबाबतीत हेळसांड करू लागल्यास व अशा वेळी आईबापांचा दोष असेल तर पहिल्या प्रसंगी दोन आणे दंड करावा, पुढील प्रत्येक प्रसंगी एक रुपयापर्यंत दंड

करावा. '[८]

म्हणजे प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असले तरी त्यात राजर्षींच्या मनाचा ऋजुभाव दडलेला आहे. ' त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे ', ' आईबापांच्या निकडीच्या कामासाठी शेती वगैरे कामासाठी-मुलांच्या मदतीची जरुरी असल्यास पंधरा दिवस मुलास घरी ठेवून घेता येईल ' किंवा ' पहिल्या प्रसंगी दोन आणे दंड करावा, पुढील प्रत्येक प्रसंगी एक रुपयापर्यंत दंड करावा ' यासारख्या सूचनांमधून, शासक या नात्याने राजर्षींच्या लोकहिततत्पर ' दक्ष ' मनाचे घडणारे दर्शन लोभसवाणे आहे. लोककल्याणकारी शासकाजवळ ते असावे लागते. राजर्षी त्याला अपवाद नाहीत.

## प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे

राजर्षींनी २४ जुलै १९१७ रोजी काढलेल्या हुकुमात ' प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीच्या योजने 'चा, ' येत्या गणेशचतुर्थीपासून करवीर इलाख्यातील सर्व शाळांत मोफत व सक्तीचे शिक्षण अमलात आणण्याचा उपक्रम होण्याचा आहे. '[९] असे म्हटले आहे. याकरिता त्यांनी, सर्व मामलेदार व महालकारी यांना काही सूचना देऊन त्यांच्याकडून दिनांक १५ ऑगस्टपर्यंत पोचेल अशा बेताने माहिती मागविली आहे. त्या त्या हद्दीत, किती वस्तीच्या कोणत्या गावी शाळा आहेत; एक हजार वस्तीवरील कोणती गावे शाळेविना आहेत, पाचशे वस्तीवरील शाळा नसणारी अशी गावे कोणती आहेत; अशा गावांचा समूह करून मध्यवर्ती अशा ठिकाणी शाळ काढणे कितपत शक्य आहे, अशा स्वरूपाची ही माहिती आहे. या हुकुमान्वये पाचशे व हजार वस्तीवरील गावांत ताबडतोब शाळा सुरू करण्याचा आदेश दिला आहे. त्यासाठी शक्य तर सोयीस्कर इमारती पाहाव्यात. नसल्यास चावडी, देवळे, धर्मशाळा यांचा वापर करावा आणि ज्या गावी देऊळ बांधूनच शाळेची सोय करणे जरूर असेल तेथे तुळजाभवानीचे देऊळ बांधून सोय व्हावी; त्यात तुळजाभवानीची मूर्ती ठेवण्यात यावी, असा आदेश होता. या संबंधातील देवस्थानासंबंधीच्या जाहीरनाम्यात नमूद केले आहे की, ' देवालय बांधताना गावात असलेले अगोदर बांधण्याचा विचार होईल. होता होईतो देवळाचे उजवे अंगास शाळेकरिता सोपा व डावे अंगास चावडीकरिता सोपा बांधणेत यावा. देवस्थानासाठी उभारलेल्या निधीतून

नित्यनैमित्तिक खर्च वजा जाता शाळांस मदत व गावोपयोगी कामे म्हणजे पाण्याची सोय, धर्मशाळा बांधणे वगैरे कामांकडे खर्च करता येईल ',[१०] अशी सोय लावून देण्यात आली. याचबरोबर काढण्यात आलेल्या हुकुमाने, मुलकी ठराव नं. २०२–२५ जुलै १९१७ लागू झाल्या दिवसापासून, सर्व प्राथमिक शाळांतून फी माफी करण्यात आली. त्याचबरोबर एकूण योजनेच्या संदर्भात अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यासंबंधी हुकूमही काढण्यात आला.[११] त्याप्रमाणे प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीच्या योजना समितीने तयार केलेल्या नियमांस राजर्षींनी ११ सप्टेंबर १९१७ रोजी मान्यता दिली. २१ सप्टेंबर १९१७ च्या जाहीरनाम्याने ते प्रसिद्ध करण्यात आले.[१२] या संबंधात एकूण राज्ययंत्रणा ज्या शीघ्रतेने कार्यरत झाल्याचे दिसले, त्यावरून राजर्षींच्या राज्यकारभारातील शिस्त आणि गती यांची कल्पना येऊन जाते. संस्थानी कारभारासंबंधीच्या रूढ कल्पना नष्ट होतात. राजर्षींच्या यशाचे हे आणखी एक गमक होय.

'–प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीच्या योजने'त शाळांची निर्मिती, बांधबंदिस्ती, देखभाल, उत्पन्न-खर्च इत्यादीसंबंधातील व्यवस्थेबाबत स्पष्ट नियम घालून देण्यात आले. याचा अर्थ असा की, केवळ योजना काढून राजर्षी थांबत नव्हते किंवा त्याची थोडीफार कार्यवाही झाली की संपले असेही मानत नव्हते. राजर्षी एवढ्यावर संतुष्ट नव्हते तर आपल्याला जी गोष्ट करावयाची आहे तिचा मागलापुढला सर्वंकष विचार करीत होते. प्रारंभीच तिच्यासंबंधी साधकबाधक नियम घालून देऊन शिस्तबद्ध रीतीने कामाला प्रारंभ व्हावा अशा प्रयत्नात होते. यासाठी अर्थातच निश्चित दृष्टी असावी लागते. आपल्याला नेमके काय साधावयाचे आहे; कोणते ईप्सित गाठावयाचे आहे, याची स्पष्ट कल्पना मनाशी असावी लागते. त्याखेरीज योजनेत चिरेबंदीपणा संभवत नाही. त्या दृष्टीने शिकारी राजर्षींचे लक्ष्याकडे नेमके लक्ष होते.

या चिरेबंदीपणाचा एक छोटासा नमुना नमूद करण्यासारखा आहे : '–प्राथमिक मोफत व सक्तीच्या शिक्षणा'चा कायदा झाला. त्यानुसार शाळा आणि शिक्षक वाढणार. शाळेची इमारत थोडी अशीतशी असली तर चालेल. पण ज्यांनी उत्तम नागरिक निर्माण करावयाचे, तो शिक्षक अर्धकच्चा असून कसा चालेल ? शाळेच्या इमारतीसारखी ती काही निर्जीव गोष्ट नव्हे. ती तशीच पक्की हवी. यासाठी काही कसोट्यांनुसार शिक्षकांची निवड करणे उचित ठरेल. त्याची

पद्धती राजर्षींचे खाजगी कारभारी गोविंदराव देसाई यांनी आपल्या सहीने दिलेल्या हुकुमात आहे. कारभारी देसाई लिहितात :

> ' इलाखे मजकुरी मोफत व सक्तीचे शिक्षण सुरू करण्याकरिता केलेल्या तजविजीमुळे शाळा बऱ्याच निघणार असून त्याकरिता शिक्षकही पुष्कळ ठेवावे लागतील. हल्लीच्या स्थितीत शिक्षक लोक यांस इंग्रजी थोडेबहुत तरी येणे अवश्य असल्याने या नवीन शाळांवर मिळतील तितके इंग्रजी जाणणारे लोक शिक्षक नेमण्याकरिता हुजूरचा इरादा आहे. हे शिक्षक, एक नवीन परीक्षा घेऊन त्यातील वरील वर्गात येणारे नेमावयाचे आहेत. त्यांस आरंभीचा पगारही हल्ली मराठी शाळा खात्याच्या सुरुवातीच्या पगारापेक्षा अधिक मिळण्याची सवड ठेवली आहे. याप्रमाणे ही परीक्षा येत्या जून १९१८ मध्ये होईल. परीक्षेचे विषय हल्ली हायस्कुलातील पाचवी इयत्ता पुरे होण्यास जितके लागतात तितके किंवा पूर्वीच्या फर्स्ट ग्रेड पब्लिक सर्व्हिस परीक्षेस लागत तितक्या मानाने नेमण्याचे आहेत...या परीक्षेस वाटेल त्यास ( अर्थात चांगल्या वर्तनाचा दाखला हजर करणाऱ्यास व वयाची मर्यादा पंचवीसच्यापुढे नसेल अशा इसमास ) बसण्याची परवानगी आहे. परीक्षेत पास होऊन वर येणाऱ्यास अनुक्रमाने जशा जागा भरावयाच्या असतील तशा मिळतील. '

अशा रीतीची हुजुरांची आज्ञा १० मार्च १९१८ ला झाली.[१३] यामध्ये शिक्षकास आवश्यक असणारा चांगल्या वर्तणुकीचा दाखला, पंचवीसच्या आतील वयाची अट व ' परीक्षेत पास होऊन वर येणाऱ्यास अनुक्रमाने जागा ' भरण्यासंबंधीची पद्धत ही निखळ गुणवत्तेची द्योतक आहे. ' आपला म्हणून भरा आणि नोंदून घ्या ', असा कुठलाही भाग त्यात नाही. राजर्षींची, त्यातून निखळ, विशुद्ध व विवेकी शैक्षणिक दृष्टी तर दिसतेच, खेरीज कुठे आपले-पणाचा भाग राखावा, बाळगावा याची उत्तम जाणही आढळते. लोकहितदक्ष राज्यकर्त्याजवळ ही जाण आणि हा विवेक असावा लागतो. राजर्षींची विचार-धारा आणि कृतिप्रवणता यांच्या बुडाशी हा विवेक होता.

राजर्षींच्या ठायी सर्वस्पर्शी सहानुभूती आणि सहस्रनेत्र विवेक होता.

वर्षानुवर्षे शिक्षण नसलेल्या, शिक्षणाने प्राप्त होणाऱ्या संस्काराचे अधिष्ठान नसलेल्या सर्वसाधारण समाजाला शिक्षण द्यावयाचे आणि तेही स्वराज्याचे हक्क मनसोक्त भोगता यावेत या हेतूने द्यावयाचे हे ठीक. त्यासाठी योजनांची आखणी हे योग्यच; पण योजनांसाठी पैसा हवा होता. केवळ योजना आखण्यात किंवा '–प्राथमिक मोफत व सक्तीच्या शिक्षणा 'चा कायदा केल्याने हवे ते घडणार नव्हते. लोकांना बरोबर घेऊन जाणाऱ्याला हुकूम उपयोगी ठरत नाहीत. त्यासाठी लोकांचे दर्द जाणावे लागते. दिल द्यावे लागते. असे हे दर्द आणि दिल मिळाले की, कायदा असो–नसो, लोक आपल्यावर पडणारा भार सुसह्य मानतात. राजर्षींनी ही नस अचूक पकडली. १६ ऑगस्ट १९१८ रोजी, शिक्षणविषयक कराचा कायदा केला. त्यानुसार करवीर संस्थानातील शंभर रुपयांहून अधिक उत्पन्न असणाऱ्या मंडळींवर – डॉक्टर, वकील, सावकार, अंमलदार, इनामदार वगैरेंवर ' शिक्षण कर ' बसविण्यात आला. त्याखेरीज नगर-पालिका असलेल्या आणि नसलेल्या गावी, या योजनेच्या पूर्तीसाठी अनुक्रमे वार्षिक घरटी आठ आणे व एक रुपया असा ' शिक्षण कर 'आकारण्याचा हुकूमही काढला.

या हुकुमाचे वैशिष्ट्य हे की, यामध्ये सर्वसाधारण माणसावर कर-आकारणी नाही, दुर्बलांसाठी सबलांनी दिले पाहिजे, सोसले पाहिजे ही त्यामागील दृष्टी आहे. उत्कट माणुसकीच्या भावनेने, अर्थशास्त्र न वाचता राजर्षींनी केलेले अर्थशास्त्राचे हे प्रयोग आहेत. त्यात त्यांची दूर पल्ल्याची दृष्टी आहे.

राजर्षी सर्वसाधारण माणसाच्या हितासाठी, प्राथमिक शिक्षणाच्या द्वारे व्यापक बैठक तयार करण्याचे कार्य करीत होते. त्या दृष्टीने त्यांनी अनेक शिक्षणसंस्था, व्यक्ती वगैरेंना शिक्षणविषयक कार्यासाठी साहाय्य केले. अशा काही संस्था रजिस्टर्ड करून घ्याव्यात, त्याखेरीज त्यांना अनुदान मिळणार नाही, असे राजर्षींनी फर्मावले आहे. म्हणजे काढली संस्था, द्या मदत; घ्या मदत; असा गलबला नाही, तर शिस्तशीर कार्यबांधणीकडे लक्ष आहे. हरेक कार्यातील राजर्षींची ही गरुडदृष्टी लक्षणीय होती.

राजर्षींनी सर्वंकष शिक्षणप्रसाराची जी चळवळ उभारली होती ती सर्वच काळात सारख्याच गतीने विस्तारली असे नाही. तिच्यात कमी-अधिक होत राहिले आहे. राजर्षींनी राज्याधिकार स्वीकारले त्या वर्षी म्हणजे १८९४ मध्ये

प्राथमिक : माध्यमिक शाळांची संख्या २०२१ होती. पण पुढील सहा वर्षांत–१९०० मध्ये–हीच संख्या रोडावली आणि मुळातल्यापेक्षा ३० ने कमी म्हणजे १९९१ एवढी झाली. नियमित येणारा प्लेग आणि सातत्याने पडणारा दुष्काळ ही त्याची कारणे होती. पण त्यानंतर या काळात मात्र रोधलेली वाढ मुक्त झाली. पुढे वाढीची गती क्रमशः विस्तार पावताना दिसते.

**प्राथमिक : माध्यमिक शाळांची वाढ**

| वर्ष | शाळा |
|---|---|
| १९०३–०४ | २४५ |
| १९१५–१६ | १६५ |
| १९२१–२२ | ५५५ |

हीच स्थिती विद्यार्थ्यांच्या संख्येबाबतीतही आढळते.

'–प्राथमिक मोफत व सक्तीच्या शिक्षण योजने'चा शुभारंभ· ४ मार्च १९१८ रोजी करवीर पेट्यातील चिखली या गावी शाळा स्थापन करण्याने झाला. स्वतः राजर्षींनी ह्या शाळेचे उद्घाटन केले.

राजर्षींचे अस्पृश्य वर्गातील मुलांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष होते. करवीर इलाख्यात जहागिरी वगळता अस्पृश्यांच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा होत्या. राजर्षींनी त्या १९१९ पासून बंद केल्या. त्या संदर्भातल्या जाहीरनाम्याने, 'अस्पृश्यांच्या मुलास सरकारी शाळांतून इतर लोकांच्या मुलांप्रमाणेच दाखल करून घेत जावे. सरकारी शाळांतून शिवाशीव पाळण्याची नसल्याने सर्व जातींच्या व धर्मांच्या मुलांस एकत्र बसविण्यात येत जावे', असा आदेश दिला.

त्यानंतरच्या काळात ह्या योजनेची वाढ पुढीलप्रमाणे झाल्याचे दिसते.

**प्राथमिक मोफत व सक्तीच्या शिक्षणयोजनेचा विकास**

| वर्ष | शाळा | विद्यार्थी |
|---|---|---|
| १९१७–१८ | २७ | १,२९६ |
| १९१८–१९ | ९५ | ४,६३१ |
| १९१९–२० | १७० | ६,३६२ |
| १९२०–२१ | ३७६ | १७,२१८ |
| १९२१–२२ | ४२० | २२,००७ |

सन १९०० ते १९१९ अखेर मागास वर्गांसाठी पुढीलप्रमाणे शाळा होत्या :

**मागास वर्गांसाठीच्या शाळा : १९००–१९१९**

| वर्ष | शाळा |
|---|---|
| १९००–०१ | ६ |
| १९१२–१३ | २७ |
| १९१७–१८ | २२ |
| १९१८–१९ | १९ |

त्यामध्ये विद्यार्थ्यांची संख्या अनुक्रमे १९६, ६३६, ४०१ व ४७८ अशी होती. दरम्यान मुलींच्या प्राथमिक शाळांमध्ये १,४०९ विद्यार्थिनी होत्या. मुस्लिम विद्यार्थ्यांच्या चार उर्दू–मराठी शाळांमध्ये ९६२ विद्यार्थी शिकत होते.[१४]

या '–प्राथमिक व मोफत शिक्षण सक्तीच्या योजने 'वर, योजना काळात सुमारे पाऊण लाख रुपये खर्च झाले असून ४,६३१ मुले शाळेत दाखल झाली १९२२ साली हाच खर्च तीन लाखांच्या घरात गेला. त्याला अन्य काही कारणांबरोबर मुलकी परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्याला शाळा मास्तर,

कारकून किंवा तलाठ्याची नोकरी दिली जाईल असे राजर्षींचे आश्वासन होते, ते पाळण्यात आले. शिक्षण योजनेवर झालेला हा अमाप खर्च राजर्षींच्या प्रखर ध्येयवादाची साक्ष पटवतो.

## शैक्षणिक सर्वस्पर्शित्वाची प्रचिती

राजर्षींनी शिक्षणविषयक सर्वगामी दृष्टिकोण अंगीकारला होता. केवळ शिक्षण देणे, त्यासाठी सोयीसवलती उपलब्ध करून देणे आणि त्याद्वारे केवळ शिक्षणविस्तार करणे एवढाच राजर्षींचा शिक्षणाबाबतचा मर्यादित दृष्टिकोण नव्हता; तर सामान्यांच्या मनात शिक्षणासंबंधीची अभूतपूर्व लालसा रुजविण्याचा त्यांचा प्रयत्न होता. राजर्षींनी ठरविलेले धोरण, अंगीकारलेली दृष्टी आणि केलेले प्रयत्न यावरून त्यांच्या शैक्षणिक सर्वस्पर्शित्वाची प्रचिती येते. अन्य अनेक गोष्टींबरोबर, राजर्षींनी शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या, पारितोषिके, नादाऱ्या अशा सर्वसाधारण मार्गांचा सर्रास वापर चालू ठेवला. नादारीसंबंधी, २०–५–१९११ च्या जाहीरनाम्याने शंभर मुलांस १५ मुले या प्रमाणाने नादारी द्यावयाची असून या नादाऱ्या देताना प्रथमतः शेतकी आणि मोलमजुरी करणाऱ्या जातींच्या मुलांना प्रथम त्या द्याव्यात, नंतर राहतील त्या व्यापार करणाऱ्या आणि ब्राह्मण वगैरे पुढारलेल्या जातींच्या मुलांस द्याव्यात, असा आदेश देण्यात आला. सर्वसाधारण शिक्षणाच्या बाबतीत ह्या सोयीसवलतींचा लाभ होताच, खेरीज 'तलाठी स्कूल'मधील शिक्षणासाठीही तशी सोय होती. राजर्षींनी २५ जून, १९१९ च्या आदेशाने सांगितले आहे की, 'तलाठी क्लासात येणाऱ्या अस्पृश्य जातींच्या विद्यार्थ्यांकरिता १० स्कॉलरशिपा दरमहा ८ रुपये पगाराच्या तीन महिने मुदतीने मंजूर केल्या आहेत.'[१५] सर्व थरांतील मागासलेल्या माणसाला पत, प्रतिष्ठा आणि दर्जा देण्याचा राजर्षींनी प्रयत्न केला हा याचा अर्थ आहे.

शिक्षणसमृद्धीच्या कार्यातील ग्रंथालय संपन्नतेचे महत्त्वही राजर्षींनी जाणले. त्या दृष्टीने १९१०–११ मध्ये त्यांनी फेरिस मेडिकल ग्रंथालयाला रुपये २५० तर १९१३–१४ मध्ये लॉ लायब्ररीला रुपये ३६६ दिल्याचे उल्लेख मिळतात. सर्वसाधारण गरीब विद्यार्थ्यांसाठी, उभ्या केलेल्या ग्रंथालय निधीच्या व्याजातून, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ग्रंथ पुरविण्याची एक 'पुस्तक पेढी

योजना ' होती.

## सर्जनशील समाजाच्या निर्मितीची गरुडझेप

अशा विविध रीतींनी राजर्षींनी, कर्णाच्या दातृत्वाने शिक्षणविषयक जी मानवी गुंतवणूक केली ती, लोकांच्या सामर्थ्याचे जीवनस्रोत हरेक मार्गांनी जोपासून, वाढवून संपन्न समाज निर्माण करण्यासाठी होय. असा समाज सर्जनशील असतो; सर्जनशील समाज नवे राष्ट्र निर्माण करतो. राजर्षींची त्यासाठी धडपड होती. त्यांना सर्वसाधारण माणसाच्या मनात शैक्षणिक अक्रोडाचे झाड लावायचे होते. चांगल्या रीतीने रुजवायचे होते. ' ज्ञानमेवामृतम् 'ची ही भूमिका होती. म्हणून तर त्यांनी कोल्हापूर इलाख्याच्या ९,१०,००० लोकसंख्येवर एकूण उत्पन्नापैकी रुपये १,४५,७२० इतका शिक्षणावर खर्च केला. लष्करी शिक्षण देण्याच्या हेतूने एक ' इन्फंट्री स्कूल ' चालू केले. शिक्षक हा सर्वज्ञ नसल्याने, त्यालाही प्रशिक्षण देण्याच्या हेतूने त्यांच्यासाठी राजर्षींनी ' शिक्षक प्रशिक्षण केंद्र ' काढले. सहा महिन्यांचे हे प्रशिक्षण होते. दरसाल वीस शिक्षकांना प्रशिक्षित करण्याची ही योजना होती. वर्गात अंकगणित, मराठी भाषा, शाळेची देखभाल व व्यवस्था, अध्यापनपद्धती, बाळबोध व मोडी लेखन आणि प्रत्यक्ष अध्यापन असे विषय शिकविले जात. शेवटी परीक्षा असे. राजर्षी रूढ अर्थाने परीक्षा न घेताही परीक्षा दिल्या-घेतल्याखेरीज काही करीत नसत. यासारखेच ' पाटील स्कूल 'ही होते. त्यात गावकामगार, पोलिस पाटील वगैरे मंडळींना सर्वसाधारण जमाखर्च, कायदेकानू इत्यादींचे शिक्षण दिले जाई. म्हणजे दिसला की दिली सनद, केला वकील, झाला पाटील, बनवला मास्तर, असा जो प्रवाद आहे तो किती ठिसूळ समजुतीवर आधारलेला आहे हे स्पष्ट होते. राजर्षींनी स्थापन केलेल्या ' जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिटयूट 'मध्ये विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण देण्याची व्यवस्था होती. इन्स्टिटयूटमध्ये विद्यार्थ्यांना सुतारकाम, लोहारकाम, ड्रॉईंग वगैरे शिकविण्याची सोय होती. यासंबंधीच्या जाहीरनाम्यात म्हटले आहे : ' मराठी चौथी इयत्ता पास झाल्याबद्दल शाळामास्तराच्या सर्टिफिकेटसह अर्ज करावेत. गरीब विद्यार्थ्यांना ३ रुपये शिष्यवृत्ती देण्यात येईल. '[१६]

श्रीमत् शंकराचार्य स्वामी जगद्गुरू, मठ करवीर यांच्या इच्छेनुसार मौजे

उचगावच्या बाजूला संकल्पित 'छत्रपती संस्कृत महाविद्यालय' स्थापन करण्यासाठी राजर्षींनी जागाही उपलब्ध करून दिली.[१७] त्याचबरोबर त्यांनी परदेशात उच्च शिक्षणाची दारे अनेक होतकरू विद्यार्थ्यांना खुली करून दिली. आर्थिक अगर अन्य प्रकारच्या साहाय्याचा ओघ सतत सुरू होता.

राजर्षींनी राजाराम महाविद्यालयाची केलेली पूर्ण वाढ हा त्यापैकी एक प्रयत्न होता. १८५१ मध्ये कोल्हापुरात सुरू झालेल्या एका इंग्रजी शाळेचे पुढे १८८० मध्ये राजाराम महाविद्यालयात रूपांतर झाले. प्रारंभी महाविद्यालयाचा खर्च जहागिरदार–सरदार यांजकडून मिळणाऱ्या वर्षासनातून चाले. मुलेही प्रामुख्याने त्यांचीच शिकत. पुढे ही वर्षासने बंद झाली. कोल्हापूर दरबारच्या खर्चातून प्रतिवर्षी रुपये २०,००० देण्याचे ठरले. दरम्यान राजर्षींनी 'अमेरिकन प्रेसबिटेरियन मिशन', शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी व डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांजकडे महाविद्यालय चालविण्यास घेण्यासंबंधी विचारणा केली. या सर्वांनी नकार दिल्यानंतर शेवटी उत्तर प्रदेशातील आर्यसमाजाकडे त्याची व्यवस्था सोपविण्यात आली. त्यामागे 'या सभेचे सभासद सामाजिक सुधारणेस अनुकूल असून त्यांच्या हाती कॉलेज भरभराटीस येईल असे वाटते',[१८] अशी राजर्षींची धारणा होती. पुढे हे महाविद्यालय पदवी शिक्षणाअखेरचे झाले.

राजाराम महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना राजर्षींनी फी–माफी दिली होती.

राजर्षींची एकूण स्त्रीशिक्षणविषयक दृष्टीही अत्यंत सहानुभूतीची होती. स्त्री-पुरुषांचा जाहीर झगडा निर्माण होण्यापूर्वी स्त्रियांचे शिक्षण सुरू व्हावे, असे राजर्षींना वाटे. त्या दृष्टीने त्यांचा अखंड प्रयत्न होता.

राजर्षींनी आपल्या सूनबाई इंदुमती राणीसाहेब यांना, त्यांना वैधव्य प्राप्त झाल्यानंतर अनेक खडतर विरोध-निषेधांना झुगारून देऊन शिक्षण देण्याचा जो प्रयोग केला, तो या स्त्रीशिक्षणविषयक आस्थेचाच एक अविच्छिन्न भाग होता. त्यांना शिक्षण देऊन कोल्हापूरचे शिक्षण खाते इंदुमती राणीसाहेबांच्या हाती देण्याचा राजर्षींचा विचार होता. पण राजर्षींच्या अकाली मृत्यूमुळे ते घडले नाही. त्यापूर्वी, १८९५ साली राजर्षींना मुखत्यारी मिळाल्यानंतर त्या वेळच्या करवीर संस्थानच्या शिक्षणाधिकारी मिस लिटल यांनी राजीनामा दिल्यानंतर त्या जागी श्रीमती रखमाबाई केळवकर यांची नेमणूक करण्यात आली. या योजने-

मागची रचना, राजर्षींची स्त्रीविषयक दृष्टी आणि भावना प्रकट करते. त्याचबरोबर एका भारतीय स्त्रीला अधिकारपदावर नेमण्याची घटनाही अपूर्व होती.

राजर्षींची स्त्रीशिक्षणाच्या विकासाची धडपड सतत चालू राहिली. श्रीमंत आक्कासाहेब महाराजांच्या विवाहाप्रीत्यर्थ राजर्षींनी 'श्रीराधाबाई आक्काबाई-महाराज स्कॉलरशिप' व 'श्रीनंदकुवर महाराणी भावनगर स्कॉलरशिप' अशा दोन शिष्यवृत्त्या सुरू केल्या. यासंबंधीच्या ठरावात म्हटले आहे की,

> "कोल्हापूर शहर व बावडा इन्फंट्री यांतील शाळांतील मुलींच्या मराठी चौथ्या इयत्तेची वार्षिक परीक्षा घेतल्या वेळी-तीत सर्वांत वर येणाऱ्या दोन मुलींना पहिल्या नावाच्या दोन स्कॉलरशिपा प्रत्येकी रु. ४० ... शहर सोडून इलाख्याच्या मुलींच्या वार्षिक परीक्षांत ज्या तीन मुली सर्वांत अधिक योग्य आढळतील त्यांस दुसऱ्या नावाच्या तीन स्कॉलरशिपा देण्यात येतील. प्रत्येकी रुपये ४० ची. उत्तम वर्तनाबद्दल ४० रुपयांचे बक्षीस..."[१९]

राजर्षी उदारमतवादी शिक्षणापासून तांत्रिक शिक्षणापर्यंत आणि अस्पृश्यांच्या शिक्षणापासून ते मुलींच्या शिक्षणापर्यंत लक्ष देऊन होते. परिणामी करवीर संस्थानची साक्षरता वाढली. शिक्षणाची लालसा आणि तंत्रशिक्षणासंबंधी ओढ निर्माण झाली. जातिभेदाचा काटा थोडाफार ढिला झाला.

**वसतिगृहे : शिक्षणविषयक मोहिमेचा महत्त्वपूर्ण भाग**

या कामी विद्यार्थी वसतिगृहांची चळवळ खूपच साहाय्यभूत ठरली. राजर्षींच्या शिक्षणविषयक मोहिमेचा हा एक भागच होता.

केवळ शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देण्याने किंवा सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याचे कायदे करण्याने कार्यभाग साधणार नव्हता, तर परगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जेवण्या-राहण्याची काही तरी व्यवस्था होणे जरूर होते. त्याअभावी शहरासारख्या दूरवर ठिकाणी येऊन केवळ शिक्षण घेणे, हे आर्थिक दृष्ट्या कमकुवत समाजाला शक्य नव्हते. हे अशक्य म्हणजे शिक्षणाच्या अन्य सोयी किंवा कायदे विफल ठरणार, हे राजर्षींनी ताडले आणि आपल्या कारकीर्दीच्या सुरुवातीपासूनच विद्यार्थी वसतिगृहांची मोहीम उघडली.

त्यापूर्वी राजर्षींनी शिक्षणेच्छू विद्यार्थ्यांची सोय वाड्यावर केली होती. पण

मोठ्या प्रमाणावर ते शक्य नव्हते आणि असले तरी त्यातून होणारा एक तोटा दुर्लक्षून चालणारे नव्हते. तोटा तो हा की, राजवाड्यातील ऐषारामी जीवनाने विद्यार्थ्यांच्या शिक्षणात हवी तेवढी गती येणे कठीण झाले. राजर्षींच्या ते लक्षात आले. त्यांनी राजवाड्यावरील सुखवस्तू प्रयोग बंद केला.

राजर्षींनी सन १८९७ साली, राजाराम महाविद्यालयाला जोडून एक वसतिगृह उघडले. सर्व जातिजमातींच्या विद्यार्थ्यांसाठी ते खुले होते. पण १९०० पर्यंतच्या तीन वर्षांत त्यात एकाही ब्राह्मणेतर विद्यार्थ्यास प्रवेश मिळाला नाही. राजर्षींनी ताडायचे ते ताडले. त्यातून जातवार वसतिगृहांची स्वतंत्र चळवळ पुढे आली. राजर्षींनी वसतिगृहांमागून वसतिगृहे उघडली. त्यांना निधी आणि जमिनी लावून दिल्या. खेरीज वसतिगृहमुक्त शैक्षणिक शाळांना प्रोत्साहनही दिले.

ही विद्यार्थी वसतिगृहे कोल्हापूर शहराच्या निरनिराळ्या भागांत, गटागटाने स्थापन करण्यात आली. हेतू हा की, परस्परांतील संघटन आणि सौहार्द कायम राहावे; सवते सुभे निर्माण होऊन डबकी बनू नयेत. त्यात आणखीही एक दृष्टी होती ती ही की, निरनिराळ्या जातिपातींची वसतिगृहे एकमेकांशेजारी असल्याने परस्परांचा उत्कर्ष परस्परांना चेतना द्यायला कारण ठरावा.

या विद्यार्थी वसतिगृहांच्या चळवळीने महाराष्ट्राच्या सामाजिक–राजकीय जीवनावर संस्मरणीय ठसा उमटविला व जातीनिहाय वसतिगृह व्यवस्था म्हणजे अराष्ट्रीयतेला, फुटीरपणाला प्रोत्साहन हा हितसंबंधियांचा पुकारा पूर्णपणे निरर्थक ठरला, ‘ अराष्ट्रीय ’ बनला.

या साऱ्याचा परिणाम, समग्र क्रांतीचा पाया घालण्यात झाला. १८९४ साली कोल्हापूर संस्थानात ८,८०८ विद्यार्थी शिक्षण घेत होते. राजर्षींच्या मृत्यूच्या वेळी १९२२ साली तीच संख्या २१,०२५ पर्यंत वाढली. १८९४ साली राजाराम महाविद्यालयामध्ये ८५ विद्यार्थी होते. ते १९२२ मध्ये ३६५ झाले. त्यांची ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर अशी वर्गवारी अनुक्रमे ७९ : ६ व २६५ : १०० अशी पडते. समग्र क्रांतीचा पाया या दृष्टीने शिक्षणाची ही गती महाराष्ट्राचे उभे जीवन घडविणारी ठरली. राजर्षींचे चरित्रकार प्रा. अ. बा. लठ्ठे यांनी शाहूछत्रपतींच्या या सगळ्या शिक्षणप्रसारामागील धोरणाचे नेमके सूत्र सांगताना म्हटले आहे :

"Speaking of it for Deccan, national education thus came to mean the non–Brahminising of it that was what His Highness and the backward communities were trying to do."[२०]

राजर्षींच्या या परिवर्तनशील शिक्षणविषयक धोरणाला अनेकांकडून विरोध झाला. हितसंबंधियांचा त्यामधील सहभाग स्पष्टच होता, पण तसे नसणारे किंबहुना राजर्षी काय करताहेत हेच न समजणारे असे विरोधकही खूप होते. आणि ज्यांना कळत होते त्यांना पाठिंबा कसा द्यायचा हे माहीत असणारेही कमीच होते. एकूण विरोधाचे प्रमाण मोठे होते. त्यात शिक्षणविस्ताराकडे नंतर पाहता येईल, तूर्त आहे त्या शिक्षणासाठी सुखसोयींची वाढ हवी; असे म्हणणारेही काही होते. म्हणजे मिळतात त्यांना फायदे मिळावेत, इतरांचे पाहता येईल, असे हे म्हणणे होते. तर काहींचे म्हणणे राजर्षींचे शिक्षणविषयक धोरणच दोषपूर्ण असल्याने ते अमलात आणायचे म्हणजे अनेक गुंतागुंतींना आमंत्रण देण्यासारखे होते. एवंच गुंतागुंतीच्या बागुलबुवाला घाबरून राजर्षींनी त्या फंदातच पडू नये, असा हा सावधानतेचा इशारा होता. 'सर्व्हंट् ऑफ इंडिया' साप्ताहिकाने ४ एप्रिल, १९१८ च्या अंकात लिहिले आहे :

"...the scheme of compulsory education, as outlined by the Darbar, is very defective in conception and execution may take several long years, if at all it materialises."

अर्थ असा की, राजर्षींनी असल्या उपद्व्यापाच्या नादी लागू नये. पण राजर्षींनी, अशा विरोधाकडे साफ दुर्लक्ष केले आणि हत्तीच्या बळाने चिकटून बसलेले, साधारण समाजातील अज्ञान निपटून काढण्याचा प्रयत्न केला. खेरीज स्वतःच्या खाजगीवर, शिक्षणापेक्षा वीस टक्क्यांहून अधिक खर्च करण्याचा नि त्याबरोबरच ब्रिटिश हद्दीत शिक्षणावर खर्च होत असलेल्या पावणेसात टक्के दाखल्याचा; अशा कित्येक आक्षेपांचा राजर्षींनी, आपल्या गतिशील प्रयत्नांनी निरास केला. राजर्षींनी, शिक्षणविषयक चळवळीच्या द्वारे भावनिक ऐक्याच्या आड येणारे अडथळे उचकटून टाकण्याचा प्रयत्न केला. समान संधी आणि

समान न्याय यांना विरोध करणाऱ्या विरोधकांशी दोन हात केले. दुसऱ्या अर्थाने, राष्ट्रहिताला अडथळा आणणाऱ्यांना काय खरे, काय खोटे याचे उचित प्रात्यक्षिक दाखविले. राजर्षींची ही सारी धडपड म्हणजे केवळ पुरोहितशाहीचे वर्चस्व संपविण्याचा प्रयत्न नव्हता. हिंदू धर्माच्या परंपरेचा अभिमान असणाऱ्या राजर्षींना पुरोहितशाहीचे वर्चस्व संपले म्हणजे सारे प्राप्त झाले, सारे मिळाले असे वाटत नव्हते. तेवढा त्यांचा संकुचित दृष्टिकोण नव्हता. त्या मार्गातील तो एक महत्त्वाचा टप्पा होता. समाजहितबुद्धीने उद्योगकलादी क्षेत्रांत संचार केल्याने 'बहुजन बहुहितवाद' साधता येतो, अशी राजर्षींची श्रद्धा होती. त्यातून एकतेने भारलेला एकसंध समाज निर्माण होतो. समाजमनातून हे सूत्र निसटलेले होते. राजर्षींना ते प्रस्थापित करावयाचे होते. त्या दृष्टीने शिक्षण, उद्योग, सहकार, अस्पृश्यादी मागास वर्गीयांना प्रोत्साहन, आंतरजातीय विवाह वगैरे बाबी एकतेने भारलेल्या एकसंध समाजनिर्मितीच्या मार्गातील शस्त्रे होती; आहेत. त्याची दुसरी बाजू ही की, अविकसित देशांमध्ये विकासासाठी कोणत्या दिशेने काम केले पाहिजे, हे राजर्षींनी ताडले. शास्त्र न सांगता, त्याचे उपयोजन केले आणि सोबतीने शासन हे शुष्क न राहता सेवेचे साधन बनवून ते 'मानवी' कसे करता येते याचा वस्तुपाठ दिला.

या संबंधातील राजर्षींनी काढलेले काही जाहीरनामेच त्याची प्रचिती आणून देतात. त्याच्या काही नोंदी अशा आहेत :

> 'रायबाग शाळेत कोरवी, वड्डर वगैरे जातींची मुले येऊ इच्छितात. पण फी देण्याचे सामर्थ्य त्यांस नसल्यामुळे मोफत घेण्याचे बाबतीत चालले कामी डिप्रेस्ड् क्लासेसच्या सर्व मुलांना इलाखे मजकुरी मोफत शिक्षण देण्यात यावे.'[२१]

एका कज्जात आरोपीबरोबर सात वर्षांचे मूल तुरुंगात आल्यावरून त्या मुलाचे पोषण करणारे दुसरे कोणी नसल्यामुळे पोटगी–खर्च घ्यावा की कसे, या संबंधाने काम चाढून हुजरून असा ठराव झाला आहे, 'झालेला खर्च मंजूर करण्यात आला आहे व पुढेही असा प्रसंग आल्यास खर्च करीत जावा.'

> कोल्हापूरनजीक मौजे उचगावचे हद्दीत महारोगी लोकांसाठी 'लेपर असायलम' स्थापन केले असून तेथे त्यांची राहण्याची, पोटापाण्याची व कपड्यालत्त्याची व्यवस्था सरकारातून ठेवण्यात

आलेली होती. पुढे हे असायलम अणुस्कुरा येथील धर्मशाळेत हलविण्यात आले आहे.[२२]

**सामाजिक शिक्षणाची, राजर्षींची दृष्टी अपूर्व होती**

राजर्षींचे लोकशिक्षणाचे कार्य अनन्यसाधारण होते, अलौकिक होते. ते केवळ कोल्हापूर संस्थानपुरतेच मर्यादित नव्हते. तसे ते करण्याचा राजर्षींचा हेतूही नव्हता. त्यामुळेच कोल्हापूरबाहेरसुद्धा त्यांनी भरीव कार्य केले. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे राजर्षी पदसिद्ध अध्यक्ष होते. बनारस हिंदू विश्वविद्यालयाच्या निर्मितीच्या वेळी पं. मदनमोहन मालवीयांनी राजर्षींना आर्थिक साहाय्य करण्याची विनंती केली. त्यानुसार राजर्षींनी भरीव देणगी दिली. डेक्कन एज्युकेशन सोसायटीलाही भरपूर आर्थिक साहाय्य केले. मद्रासचे ब्राह्मणेतर पुढारी डॉ. टी. एम. नायर व राजर्षी यांचा परिचय होता. डॉ. नायर, ब्राह्मणेतरांना मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांमध्ये प्रतिनिधित्व मिळावे म्हणून प्रयत्न करीत होते. हे त्यांचे प्रयत्न चालू असतानाच डॉ. नायर यांचे अकाली निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ मद्रासमध्ये ' डॉ. टी. एम. नायर मेमोरियल स्कॉलरशिप ' देण्यासाठी राजर्षींनी सर रामस्वामी मुदलियार यांच्याकडे रुपये ५,००० देणगी देऊन त्या व्याजातून विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप देण्याची योजना सुरू केली. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या विलिंग्डन महाविद्यालयाच्या वसतिगृहाच्या उभारणीसाठी २०,००० रुपयांची व बनारस हिंदू युनिव्हर्सिटीला एक लाख रुपयांची देणगी देऊन पुढे हीच परंपरा राजाराम महाराजांनी चालू ठेवली. ' शाहू बोर्डिंग ' असे या वसतिगृहाचे नामकरणही त्या वेळी करण्यात आले होते. नाशिकचे श्री. उदाजी मराठा बोर्डिंग, वंजारी समाजाचे बोर्डिंग व सोमवंशीय समाजाचे बोर्डिंग आणि नागपूरचे चोखामेळा बोर्डिंग वगैरे संस्थांना राजर्षींनी सढळ हाताने मदत केली होती. खुद्द पुणे शहरात श्रीशिवाजी मराठा सोसायटी, ताराबाई मराठा बोर्डिंग या संस्थांनाही राजर्षींनी साहाय्य पोचविले. त्याचप्रमाणे महाराष्ट्रामध्ये शिवछत्रपतींच्या नावाने एखादी लष्करी शाळा असावी हा हेतू मनाशी धरून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या स्मारकाच्या निमित्ताने, इंग्लंडच्या युवराजाला पुण्यात आणून त्यांच्या हस्ते पुतळ्याची कोनशिला बसविली. त्याचे दृश्यरूप पुण्याचे ' श्रीशिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल ' हे होय.

## महाराष्ट्राच्या कायापालटाचा महायज्ञ

यानंतर त्या दृष्टीने महाराष्ट्रात उभ्या झालेल्या कार्याकडे वळले की, राजर्षींची प्रेरणा किती प्रभावी होती याचे प्रत्यंतर मिळते. कर्मवीर भाऊराव पाटील तर राजर्षींच्या समग्र क्रांतीच्या विचाराने संपूर्णपणे भारलेले कार्यकर्ते होते. त्यांनी राजर्षींचा शैक्षणिक दृष्टिकोण मनीमानसी बाणविला आणि सातार्‍याच्या धनिणीच्या बागेत राजर्षींचे स्मारक म्हणून पहिल्यांदा शाहू बोर्डिंगची स्थापन करून आपल्या शैक्षणिक कार्याचा श्रीगणेशा केला. याच लहानशा रोपट्याचा रयत शिक्षण संस्थेच्या रूपाने पुढे प्रचंड वटवृक्ष झाला. उभ्या महाराष्ट्रभर तो फोफावला, डवरला. भाऊसाहेब हिरे नाशिकच्या श्रीउदाजी मराठा बोर्डिंगचे विद्यार्थी होते. त्या ठिकाणी राजर्षींच्या शिकवणीचे त्यांच्यावर जे संस्कार झाले त्याचे पर्यवसान नाशिक जिल्ह्यामध्ये प्राथमिक व दुय्यम शाळांचे जाळे विणण्यात आले. पुढे त्यास महाविद्यालयीन शिक्षणाची जोड मिळाली. त्याचप्रमाणे विदर्भाच्या आठ जिल्ह्यांमध्ये डॉ. पंजाबराव देशमुख यांनी श्रीशिवाजी एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून प्राथमिक, माध्यमिक व विद्यापीठीय शिक्षण देण्याचे प्रयत्न केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या निर्मितीमागील प्रेरणाही राजर्षींच्या कार्यातूनच बाबासाहेबांनी घेतल्याचे दिसते. अशाच रीतीने राजर्षींकडून प्रेरणा घेऊन पुढे अनेक मंडळींनी शैक्षणिक क्षेत्रात प्रयत्न केलेले आहेत. त्यामध्ये रयत शिक्षण संस्था, महात्मा गांधी विद्यामंदिर शिक्षण संस्था, श्रीशिवाजी एज्युकेशन सोसायटी, ताराराणी विद्यापीठ, विवेकानंद शिक्षणसंस्था, मराठा विद्याप्रसारक समाज इत्यादी संस्था जशा अग्रभागी आहेत, त्याचबरोबर ध्येयवादाने काम करणारी त्या संस्थांमागील कर्मवीर भाऊराव पाटील, भाऊसाहेब हिरे, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर मामासाहेब जगदाळे, कर्मवीर डॉ. घोगरे, बाबुरावजी जगताप, रावसाहेब व्ही. टी. पाटील, बापूजी साळुंखे, बॅ. बाळासाहेब खर्डेकर, प्राचार्य एम्. आर. देसाई इत्यादी मातब्बर मंडळीही महत्त्वाची आहेत. या संस्था–व्यक्तींनी महाराष्ट्राच्या आत्म्यात शिरून त्याचा कायापालट करण्याचा जो महायज्ञ नंतरच्या काळात आरंभिला त्यामागची प्रेरणा आणि स्फूर्ती राजर्षींची होती, हे आवर्जून नमूद करण्याची मुळीसुद्धा गरज नाही. या शिक्षण संस्थांनी केलेल्या अव्याहत प्रयत्नांमुळे महाराष्ट्राचा इतिहास शंभर वर्षांनी पुढे गेला, नेला. राजर्षींच्या कार्यातून प्रेरणा घेऊन अशा

संस्था आणि व्यक्ती कार्यरत झाल्या नसत्या तर महाराष्ट्राचा इतिहास मागे राहिला असता. हे श्रेय राजर्षींची प्रेरणा आणि लोककल्याणाची भावना याकडे जाते, द्यावे लागते.

राजर्षींनी मृत्यूपूर्वी दोन वर्षे अगोदर केलेल्या एका भाषणात म्हटले आहे :

> ' समाजातील एकूण एक व्यक्तीला त्याची जात, पात, पंथ, भेद लक्षात न घेता शिक्षण द्यावे. स्वत:चे जीवनमान उंचावण्यास त्यास उद्युक्त करावे, समाजातील श्रद्धेला मूठमाती द्यावी आणि जिच्यामुळे समाजात एक विलक्षण कृत्रिमता आलेली आहे, त्या विषमतेची कारणेच समूळ निपटून काढावीत; याच हेतूने आम्ही इतकी वर्षे अतिशय चिकाटीने प्रयत्न करीत आलो. तथापि हे काम साधे, सोपे नाही. शेकडो वर्षांची अगतिकता दूर करावी लागणार आहे. समाजाची जुनी व कालबाह्य झालेली घडी संपूर्णतया बदलावी लागणार. '

म्हणजे शिक्षणाची वाटचाल ही दीर्घकाळाची असून ती सोपी नाही; त्या पक्क्या दृष्टीने राजर्षींनी वाटचाल केली. साहजिकच शिक्षण घ्यावयाचे ते केवळ शिक्षणासाठी म्हणून नव्हे तर सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय विषमतेच्या, दारिद्र्याच्या व सर्वंकष युद्धातील ते एक प्रबळ, प्रभावी आणि प्रखर हत्यार म्हणून होय, ही राजर्षींची दृष्टी आहे. महात्मा फुल्यांच्या परंपरेतून उपजलेली ही दृष्टी राजर्षींनी चेतवली, संवर्धिली आणि जनमानसात खोलवर रुजविली. त्यांनी शिक्षणाकडे पाहण्याचा तात्कालिक उपयुक्ततेचा दृष्टिकोण थोडा बाजूला राखून शिक्षणाचा ' गाभा ' आणि त्यामधील ' सार ' झळझळीतपणे समाजापुढे ठेवले. त्यामुळे शिकारी राजर्षींपुढे एक लक्ष्य आहे. ते हे की, लोक शहाणे झाले की, चौफेर पाहतात; शेती, उद्योग, कला, व्यापार इत्यादी नवीनवी कार्यक्षेत्रे धुंडाळतात, स्पर्धेला प्रवृत्त होतात; आणि स्वत:सकट अवघ्या समाजजीवनाचे उत्थान साधतात. राष्ट्राची उभारणी, राष्ट्राची घटना त्यामुळे चिरेबंदी होते. सर्वांना लाभणाऱ्या उत्तम शिक्षणाने निर्माण होणारा उत्तम नागरिक हा त्यामधील प्रमुख घटक होय. जीवनाच्या सर्व बाजूंनी विचार करणाऱ्या राजर्षींच्या मनासमोर हे स्वप्न फुलते आहे. महात्मा फुल्यांच्या परंपरेचा तो दीप्तिसंपन्न वारसा आहे.

निबंध ३२२२ २५०८८२

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या जीवनावर झालेल्या परिणामांच्या अनुषंगाने महाराष्ट्राच्या पुनर्घटनेचा विचार करता कोणते चित्र समोर येते, ते पाहणे उचित आहे.

राजर्षींच्या ध्येयधोरणानुसार कोल्हापुरमध्ये स्थापन झालेल्या अठरापगड जातींच्या विद्यार्थी वसतिगृहांमुळे त्या वेळच्या महाराष्ट्र, विदर्भ इत्यादी विभागांतून गोरगरीब विद्यार्थी मोठ्या संख्येने येऊन शिक्षण घेत होते. त्या वेळी कोल्हापूर हे सत्यशोधक समाजाच्या सामाजिक समतेच्या आणि क्रांतीच्या पुरोगामी विचारांचे एक शक्तिशाली केंद्र होते. त्यामधून धगधगीत विचार घेऊन बाहेरून आलेली विद्यार्थी मंडळी परत आपापल्या गावी गेली. त्यांनी त्या रीतीच्या शैक्षणिक संस्था स्थापून बहुजनसमाजाच्या चळवळीला मोठी चालना दिली. पुढे १९१८ साली मॉंटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणा जाहीर झाल्यानंतर मुंबई प्रांतामध्ये ब्राह्मणेतर पक्षाची रीतसर स्थापना झाली; व मॉंटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणा राबविण्याच्या दृष्टीने ब्राह्मणेतर पक्ष राजकीय आखाड्यात उतरला. त्यातूनच पुढे भास्करराव जाधव ह्यांना दोन वेळेला मुंबई प्रांताचे मंत्रिपद लाभले. मध्यवर्ती कौन्सिलमध्येही ते निवडले गेले.

दरम्यान सत्यशोधक समाज व ब्राह्मणेतर चळवळ यांनी सामाजिक क्रांतीचा जो हिरीरीने पुरस्कार चालविला होता, त्याचा स्वीकार १९२० सालानंतर भारतीय राजकारणात महात्मा गांधींचा प्रवेश झाल्यामुळे कॉंग्रेसने केला. साहजिकच ब्राह्मणेतरांमधील नवी पिढी १९३० सालच्या सुमारास कॉंग्रेसमध्ये समाविष्ट झाली. तरीसुद्धा, कॉंग्रेसअंतर्गत कॉंग्रेसमध्ये गेलेली ब्राह्मणेतर मंडळी आणि तत्कलीन सत्ताधारी मंडळी, यांच्या मते प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे एक प्रकारचा झगडा चालूच होता. या झगड्याचे पर्यवसान शेवटी १९४८ साली, शेतकरी कामकरी पक्षाची निर्मिती होण्यात झाले. महात्मा फुले व शाहू महाराज यांच्या विचारांची कास धरून चालणाऱ्या मंडळांवर महात्मा गांधी व मार्क्सवादी विचारांचीही छाप पडत गेली; त्यातून शाहू महाराजांचा वारसा सांगणारी ही मंडळी कॉंग्रेस, शेतकरी कामकरी पक्ष, लाल निशाण गट व कम्युनिस्ट पार्टी यांच्यामध्येच प्रामुख्याने विभागली गेली, हे विशेषत्वाने नजरेत भरते. १९५० नंतर महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये विशेष बदल झाले. कॉंग्रेससारख्या सत्ताधारी पक्षामध्ये, राजर्षी शाहूंच्या राजधानीत शिक्षण झालेल्या नामदार यशवंतराव

चव्हाण यांच्यासारख्या धुरंधर नेत्याचा हळूहळू उदय होत गेला. राजर्षींच्या खोलवर विचारांच्या परिणत अवस्थेचे हे दृश्य फळ होते.

गेल्या २५–३० वर्षांत, महाराष्ट्रातील बहुजन समाजातील शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रांत झालेली जागृती आणि सहकारी व शेती यामध्ये झालेली प्रगती याचे श्रेय १९०० सालापासून राजर्षींनी, सर्व क्षेत्रांमध्ये जाणीवपूर्वक केलेल्या अनेकविध प्रयोगांमध्ये आढळते.

राजर्षी शाहू महाराजांनी उभ्या केलेल्या शैक्षणिक चळवळीचे सूत्र मक्तेदारीकडून सार्वजनिकतेकडे जाणारे आहे. खाजगत हितसंबंधाकडून सामाजिक कल्याणाकडे ते नेणारे आहे. विषमतेने किडलेल्या आणि जातिभेद पंथांनी नासलेल्या समाजजीवनाला समानतेच्या पातळीवर आणणारे आहे. मात्र शिक्षणाचे अमृताचे कुंभ हस्तगत करण्यासाठी एखाद्या खविसाप्रमाणे सर्वसाधारण समाजाच्या मानगुटीवर बसलेल्या अविद्या व अंधश्रद्धा यांच्याविरुद्ध चाललेले सर्वंकष युद्ध ओसरलेले असले तरी लढाई संपलेली नाही. समग्र क्रांतीच्या उभारणीसाठी वाटचालीची गरज आहे, ' समाजाची जुनी व कालबाह्य झालेली घडी ' संपूर्णतया बदलण्यासाठी, त्याची नितांत निकड आहे; असे राजर्षींनी आवर्जून सांगितले आहे.

### संदर्भ


१. म. फुले समग्र वाङ्मय : संपा. धनंजय कीर–स. गं. मालशे : पृ. ४८८.
२. Education Commission, Bombay, Vol. II ,Calcutta : 1884, PP. 140–154.
३. क्रांतिसूक्ते : राजर्षी शाहू छत्रपती : संपा. डॉ. एस. एस. भोसले : पृ. ५८.
४. कित्ता : पृ. ९८.
५. कित्ता : पृ. ५७.
६. करवीर गॅझेट : जून १९१२, भाग १ : पृ. १३४.
७. कित्ता : पृ. ८.
८. कित्ता : पृ. ८.
९. कित्ता : हुजूर ठराव नं. २०२ : २५–७–१९१७, १–९–१९१७ : भाग १ : पृ. ८९.
१०. करवीर गॅझेट : जाहीरनामा, ७–८–१९१७ : भाग १ : पृ ६७.

११. कित्ता : १-९-१९१७ : पृ. ८९-९०.

१२. कित्ता : ३०-११-१९१८ : पृ. १७५.

१३. करवीर गॅझेट : मुलकी ठराव नं. ७५२ : १५-३-१९१८ : पृ. ९८.

१४. करवीर गॅझेट : जाहीरनामा : ८-१०-१९१९, हुजूर मुलकी ठराव नं. ३४० : ११-१०-१९१९ : भाग १ : पृ. १६०.

१५. करवीर गॅझेट : जाहीरनामा : मुलकी ठराव नं. ६२१ : १२-७-१९१९ : भाग १ : पृ. १००.

१६. करवीर गॅझेट : जाहीरनामा : १८-५-१९१२ : भाग २ : पृ. १८.

१७. कित्ता : १४-७-१९१७ : हुजूर मुलकी ठराव नं. १५४, भाग १ : पृ. ५७.

१८ श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र : अ. बा. लठ्ठे : प्रक. २१ : पृ. ४०१.

१९. करवीर गॅझेट : ५-४-१९१३ : भाग १ : पृ. ७९.

२०. Memories of His Highness Shri Shahu Chhatrapati Maharaja of Kolhapur : A. B. Latthe : P. 492.

२१. करवीर गॅझेट : १६-१२-१९११ : भाग १ : पृ. ३३२.

२२. कित्ता : जाहीरनामा : १२-११-१९१० : भाग १ : पृ. २५७.

# ४

# स्त्री-मुक्तीचा ध्यास

हिंदुस्थानच्या पारतंत्र्याला चूड लावणारे पहिले बंड १८५७ साली झडले. १० मे १८५७ ही त्याची इतिहासातली नोंद. त्यानंतर बरोबर एक वर्षाच्या कालावधीनंतर, स्त्री-समाजाच्या मुक्तीची चळवळ हाती घेऊन वाटचाल करणारे एक नम्रवृत्तीचे कार्यकर्ते—महर्षी धोंडो केशव उर्फ अण्णासाहेब कर्वे—यांनी भारतभूमीत जन्म घेतला. १८ एप्रिल, १८५८ ही महर्षी कर्व्यांची जन्मतारीख. मात्र त्याहून त्यांनी, इतिहासामध्ये करून ठेवलेली कर्तृत्वाची नोंद ही न पुसता येणारी आहे. कर्तृत्वशून्यांच्या जन्ममृत्यूच्या नोंदींना कसले महत्त्व नसते की रूपही नसते. जगणारे जे अनेक असतात त्यांपैकीच तेही असल्याने आकड्यांची ठाकठीक मांडणी एवढाच त्याचा फारतर अर्थ असू शकतो. पण कुठल्यातरी प्रश्नाची, समस्येची, अडीअडचणीच्या निवारणाची जिम्मेदारी छोट्य-मोठ्या खांद्यावर घेऊन कर्तबगारीचे स्तंभ उभे करतात, स्वत:ची उमेद व ताकद या जोरावर पुरे किंवा अर्धे कोणत्याही स्वरूपाचे का असेनात—पण कीर्तिस्तंभ बांधू शकतात, त्या त्या वेळी त्यांच्या निखालस नगण्य असलेल्या जन्ममृत्यूच्या आकड्यांनाही शिल्पाचे रूप मिळते. कारण हे महामना विकट समाजस्थितीच्या कठीणतम काळ्याकरंद कातळात मानवी जीवनाचे आदर्श रूप खोदत असतात. हे रूप पूर्ण असतेच असे नाही, नसण्याचीच शक्यता अधिक असते; पण जे काही असते ते आदर्शाच्या जवळपास सरकणारे असते.

म्हणूनच फार कमी तारखांना दाखल करून घेण्याचे सौभाग्य इतिहासाला लाभते. मानवाच्या प्रगती—परागतीचा इतिहास जपणाऱ्या अशा तारखा फार फार कमी—जवळजवळ दुर्मिळच—असाव्यात हे इतिहासाच्या प्रकृतीला—जन्ममृत्यूच्या नोंदवहीच्या धारणेला नव्हे !—धरूनच नव्हे काय ?

१८१८ मध्ये ब्रिटिश साम्राज्याचा ‘ स्फोट ’ हिंदुस्थानात झाला आणि त्याबरोबरच मराठी राज्याचा पार ‘ इस्कोट ’ घडला. पण त्यानंतरच्या कर्तृत्ववान पुरुषांच्या जन्माच्या स्फोटांनी हिंदुस्थानचे भारून टाकलेले आसमंत हा, हिंदुस्थानच्या सर्वांगीण भावी स्वातंत्र्याचा दिशादर्शनाचा मनोहर सोहळा होता. केवळ पाहणे हेही प्रेरक होते तर त्याचा प्रत्यक्ष भोग किती चेतना देणारा असेल याची कल्पना करून पाहता येणे शक्य असल्यास जरूर पाहायला हरकत नाही. हे कवीचे स्वप्नरंजन मुळीच नव्हे, तर खरेखुरे प्रतिभादर्शनच ठरेल.

या दर्शनाचा भाग महर्षी कर्वे आदी समाजसुधारकांच्या कार्यातून, त्यांची जितीजागती स्मारके, त्यांच्या संस्था यांमधूनही घेता येतो. महाजनांच्या जन्माचे सोहळे, त्यांचे सर्वस्पर्शी परिवर्तनाचे प्रयोग आणि प्रत्यक्ष उभ्या झालेल्या कार्याच्या परिणामाचे ठसे यामधून अन्वयार्थ शोधून बांधता येतो. तसा तो लागतोही !

॥ १ ॥

हिंदुस्थानात अस्पृश्य व स्त्री ही दोन उपेक्षित अंगे आहेत. यात अधिक दुर्लक्षित कोण आणि त्यांचा क्रम कसा लावायचा हा संशोधनाचाच विषय ठरेल. काय ठरेल ते संशोधनानंतरचे फलित राहील. पण अस्पृश्य समाजाच्या तुलनेने स्त्री-समाजाकडे समाजाने म्हणजेच त्यातल्या नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी, राजकारण-धुरंधरांनी जेवढे लक्ष द्यायला हवे तेवढे दिलेले नाही की स्त्री-जीवनाच्या सुधारणे-साठी सातत्याने काही विशेष प्रयत्न केले आहेत असेही झालेले नाही. निदान इतिहास तसे बोलत नाही. जे दिसते ते ह्या विधानाचा प्रतिवाद करणारे खासच नाही. अलीकडे—म्हणजे हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर—अस्पृश्य आणि स्त्रिया या समाजघटकांना स्वातंत्र्याची फळे थोडी थोडी चाखावयास मिळू लागली आहेत; त्या दृष्टीने त्यामध्ये काही हालचाल आहे. फार मोठे उत्तेजक असे हे चित्र नसले तरी जे काही डोळ्यांसमोर आहे ते फार निराशाजनक आहे असेही नाही. मात्र तुलनेने स्त्री-समाजाची स्थिती आणि गती ही, वस्तुस्थितीच्या आधारावर घासून पाहता खासच स्पृहणीय नाही. पण मागे घडले त्या आधारावर पुढेही हळूहळू चांगले होईल, निराकाराला सगुण साकार रूप येईल अशी श्रद्धा जोपासायला हरकत असू नये. समाज मोठा होतो तो शेवटी काही

श्रद्धांवर, काही मूल्यांवरच होतो हे मनात पक्के रुजले असेल तर ह्या जोपासण्याआड काही यावे असे काहीच नाही.

॥ २ ॥

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यानंतर स्त्री-मुक्तीच्या चळवळींना गती आली. तशी ती येणे स्वाभाविकही आहे. कदाचित तशी गती मिळालीच नसती तर पदरात पडलेले स्वातंत्र्य संकुचित बनले असते. पण ह्या गतीचा आधार स्वातंत्र्यपूर्व काळातील अनेक कर्त्या कार्यकर्त्यांच्या अविरत प्रयत्नात आहे. हे प्रयत्न फार मोठ्या गतीचे नसले ( तसे ते असणेही शक्य नव्हते; कारण राजकीय स्वातंत्र्याकडे साऱ्या प्रयत्नांचा ओघ लागून राहिल्यावर त्या तुलनेने मुळातच कमी ओढीच्या मानल्या गेलेल्या सामाजिक प्रश्नाकडे दुर्लक्ष झाल्यास, अक्षम्य असूनही ते क्षम्य मानले पाहिजे. ) तरी आपापल्या रीतिपद्धतीने ते सतत होतच होते. काही होत नव्हते आणि स्वातंत्र्यानंतर त्याला एकदम जोर चढला असे अर्थातच घडलेले नाही. कारणे रुजत जातात. परिस्थिती पिकत जाते आणि त्याचा आविष्कार केव्हा ना केव्हा तरी लक्ष वेधून घ्यावा असा होतो. काही घडण्याची ही प्रक्रियाच आहे. स्त्रीच्या जीवन-जाणिवेचा पक्षी मुक्त करण्याच्या दृष्टीनेही असे घडत गेले आहे. अखंड बंगालमध्ये राजा राममोहन रॉय यांनी, स्त्रीमुक्तीची पहिली ज्योत प्रज्वलित केली. ही फक्त बंगालमधीलच पहिली बाब नव्हती तर त्या काळच्या भेगाळून गेलेल्या उभ्या हिंदुस्थानातीलच पहिली ठिणगी होती.

राजा राममोहन रॉय ( १७७२–१८३३ ) हे ब्राह्मो समाजाचे संस्थापक म्हणून ओळखले जात असले तरी त्याहून ते विद्वत्तेने मोठे होते; आणि 'माझ्या देशबांधवांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे. इंग्रज लोकांना जे हक्क त्यांच्या देशात आहेत ते हक्क हिंदी लोकांना हिंदुस्थानात असलेच पाहिजेत', अशी देशप्रीतीची प्रखर भावनाही तितकी मोठी होती. विद्वत्ता, देशप्रीती आणि रचनात्मक कार्य यांचा अपूर्व संयोग राजा राममोहन रॉय यांच्या ठायी एकवटलेला होता. राजकीय स्वातंत्र्याच्या हासिलीबरोबरच धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्यासाठी म्हणूनच त्यांचा अविरत प्रयत्न होता. सर्वसामान्य लोकांच्या भोळ्या समजुती दूर व्हाव्यात म्हणून जसे त्यांनी प्रयत्न केले; त्याचबरोबरीने हिंदुस्थानातल्या

क्रूर, निर्दयी, रानटी आणि भ्रष्ट सतीच्या चालींचेही कायद्यानेच उच्चाटन केले. इकडे महाराष्ट्रात गोपाळराव हरि देशमुख ऊर्फ लोकहितवादी यांनी भाऊ महाजनांच्या 'प्रभाकर' पत्रातून जी १०८ 'शतपत्रे' लिहिली; त्यांमधून बालविवाह, विधवाविवाह, जरठकुमारी विवाह, सतीची चाल वगैरे समाजाचे आरोग्ये जीवन शोषून घेणाऱ्या चालीरीतींविरुद्ध वैचारिक जागृतीचे डोंब पेटविले. या प्रयत्नात कृती कुठेच नव्हती. पण निरनिराळ्या कराल जाचातून स्त्री मुक्त होण्यासाठी आधारभूमी आवश्यक होती ती मिळवून देण्याचे काम लोकहितवादींनी महाराष्ट्रात केले यात तिळमात्र शंका नाही. त्यामुळे स्त्रीशिक्षणाला चालना मिळाली; आणि समाजमनातील जळमटांना चूड लागण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ झाला. 'मराठी कादंबरींचे आद्य जनक' हरि नारायण आपटे यांच्या कथा-कादंबऱ्यांनी—विशेषत: स्त्रीजीवनाच्या विविध अंगोपांगांवर भाष्य करणाऱ्या 'पण लक्षात कोण घेतो?' या युगप्रवर्तन करणाऱ्या कादंबरीने—या दृष्टीने केलेले कार्य विशेष स्वरूपाचे मानायला हवे. साहित्याचा आत्मा सामाजिक आणि शरीर कलात्मक ठेवून समाजाला हळूहळू पण निश्चितपणे कशी जाग आणता येते त्याचे हरिभाऊ आपटे यांचे कादंबरी वाङ्मय हे प्रात्यक्षिकच आहे. भारतातल्या इतर प्रांतांपेक्षा महाराष्ट्र हा जनजागरण, सुधारणा आणि विधायक कामांसाठी बंडे याबाबत नेहमीच अग्रेसर आहे. स्त्री-शिक्षण आणि स्त्री-जीवनसुधारणा याचे सूत्र म. जोतीबा फुले यांच्या ठोस कृतिशीलतेमधून पुढे चालू राहिले आहे. पंडिता रमाबाई यांची त्या दिशेची देणगीही महत्त्वाची आहे. समाजातल्या अतिशूद्र-शूद्रांचे कैवारी 'हिंदुस्थानातील पहिले बंडखोर' म. फुले ह्यांनी समाजातल्या सर्व अवघड अवघड सुधारणांना निर्भयपणे हात घातला. अस्पृश्य, शेतकरी, कामगार, स्त्रिया अशा विविध समाजघटकांमध्ये फुल्यांनी समाजसेवा रुजू केली. पत्नी सावित्रीबाई यांना शिकवून स्त्री-शिक्षणाच्या 'श्रीगणेशा'चा धडा घरातच गिरवला आणि पुरोगामी व सनातनी यांच्या 'फिफ्टी फिफ्टी' टक्के पुण्यासारख्या भर गड्डयामध्ये मुलींची पहिली शाळा त्यांनीच काढली. ठोस कृतीचा पायंडा हिंदुस्थानात घालण्याचे सर्वप्रथम काम हिंदुस्थानात कुणी केले असेल तर ते म. फुले यांनी. याव्यतिरिक्त दुसरीकडे अंगुलिनिर्देश करता येत नाही. म. फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीत स्त्री-शिक्षणाचा विचार प्राधान्याने केला गेला आणि तद्विषयक उपक्रमाला

अग्रक्रमही राहिला ह्याची नोंद घेतली पाहिजे. घ्यावी तेवढी ती घेतली जात नाही.

म. फुले, यांच्या पत्नी सावित्रीबाई आणि पंडिता रमाबाई यांच्या कार्याचे चीज करण्याच्या मनःस्थितीत समाज त्या काळी नव्हता. समाजमन पूर्वग्रहदूषित असल्याने त्यांच्या मनाला ती पोच आली नव्हती. पण त्या काळच्या शिक्षण-खात्याने या तिघांच्या स्त्रीशिक्षणविषयक कार्याचा निःसंदिग्ध शब्दांत गौरव केला. पुढे ' सुधारकाग्रणी ' गोपाळ गणेश आगरकर यांनी आपल्या ' सुधारक ' पत्रातून, ' इष्ट असेल ते बोलणार आणि शक्य असेल ते करणार ' या प्रतिज्ञेने प्रेरित होऊन समाजाच्या स्त्रीविषयक पारंपरिक मतप्रणालीवर जे कठोर प्रहार केले त्याचा परिणाम म्हणून ' याचि देही याचि डोळा ' त्यांनी स्वतःची प्रेतयात्रा तर पाहिलीच, खेरीज ' सुधारणावादी अस्पृश्यांचे प्रेत ' परंपरावादी सनातनी पैशाविना तसेच कुजूदेखील देतील म्हणून, स्वतःच्या बिछान्याखाली अखेरच्या अंत्यविधीसाठी २१ रुपये ५ आण्याची तरतूदही त्यांना करावी लागली; आणि सोबत निरवानिरवीची मित्राला एक चिठ्ठी ! ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ' हे मनु-वचन प्रमाण मानून शिरोमाथ्यावर मिरविणाऱ्या ' अडाणी ' समाजघटकांना जागे करण्यासाठी, त्यांना ताळ्यावर आणण्यासाठी, त्यांच्या कचाट्यातून इतरांना मुक्त करण्यासाठी असे धडक मोर्चे वारंवार निघाले आहेत; निघावे लागतात. लोकहितवादी-आगरकर यांचे मोर्चे वैचारिक जागृतीचे, समाजप्रबोधकाच्या प्रवृत्तीचे म्हणजेच बहुतांशी तत्त्वचिंतनात्मक होते, तर राजा राममोहन रॉय, म. फुले, पंडिता रमाबाई किंवा महर्षी कर्वे इत्यादींची दिशा तत्त्वचिंतनापेक्षा कर्त्या सुधारकाची अधिक होती. हे कष्ट समाज हलण्यासाठी वारंवार घ्यावे लागतात. लोकांना जागविणे आणि त्यांना पुढे नेणे ही तशी परस्परसंबद्ध अशीच कामे आहेत : कुणी एक ही दोन्हीही कामे करू शकतात; तर कुणाकडून ती एकेकशः होतात. दोन्ही कामाचा उरक करणाऱ्यांचे महत्त्व तुलनेने केव्हाही मोठे; पण म्हणून कुणाचे महत्त्व कुणाहून कमी असे मात्र नव्हे. ' कसलेही लहानमोठे विधायक काम हे समाजाच्या भरणपोषणासाठी आवश्यकच असते. त्यात उणेदुणेपणा काहीच नाही. निदान काढला जाणे इष्ट नाही समाजासाठी ते पोषक नाही.

## ॥ ४ ॥

भारतीय समाजाची एकूणच स्त्रीजीवनाकडे पाहण्याची वृत्ती फारशी उदार नव्हती : इतर प्राणिमात्रांप्रमाणे स्त्री हीसुद्धा एक प्राणिमात्र आहे; आपण जे अधिकार गाजवितो ते तिलाही आहेत; आपल्याला असलेल्या अधिकारांपासून ती कुठल्याही रीतीने वंचित नाही. म्हणजेच स्त्रीलादेखील भावना, विकार, कल्पना आणि विचार आहेत ही कल्पनाच मुळी भारतीय समाजाच्या गावी नसावी, असे स्त्री-समाजाच्या बाबतीतले त्याचे उभे वर्तन पाहता दिसून येते. ' चूल आणि मूल ' हे स्त्रीचे कार्यक्षेत्र आणि ' रांधा, वाढा, उष्टी काढा आणि बाळूती धुवा ' हे तिचे आखखे वर्णन ! त्यामुळे स्त्रीच्या उन्नतीचा काही विचार करू पाहणारे, सामर्थ्य पणाला लावून तो अंमलात आणणारे आणि त्याला साथ देणारे सगळे–मग ते लहानथोर कुणीही असोत–' प्रतिगामी ', ' धर्म-बुडवे ' ( धर्म म्हणजे देश असे समीकरण असल्याने ' देशद्रोही ' हे ओघाने आलेच ! ) आणि ' सनातनी ' अशा लाखोलीचे धनी ( प्रसंगी जीवावरच्या प्रसंगाचेही बळी ! ) अशी स्थिती होती. साहजिकच घरात कोंडून घेण्यात सौभाग्याच्या टिळेमाळागळा साठलेल्या; तिथे उंबऱ्याबाहेर पडून हातात पाटी-पेन्सिल घेऊन रस्त्याने शाळेला जाणे, पुढे स्वतंत्र विचार करू लागणे आणि सभासंमेलनांत उपस्थित राहणे म्हणजे कोण अब्रह्मण्यम गोष्ट ! गोष्ट अब्रह्मण्यम मानणाऱ्यांनी जरूर मानली. ती तशीच टिकावी म्हणून जीवाचा आटापिटाही केला. पण ज्यांनी ज्यांनी हे अब्रह्मण्यम निपटून काढण्याचा अटोकाट प्रयत्न केला, त्याच्या मानगुटीवर अब्रह्मण्यत्वाचे भूत बसल्याचे इतिहासात काही उदाहरण दिसत नाही. उलट समाजधारणेसाठी पोषक असे ब्रह्मण्यत्व समाजकार्यकर्त्यांच्या प्रयत्नाप्रयत्नांतून जागे झाल्याचे दिसले : दिवसेन्‌दिवस सतेज होत जाणे हा समाजक्रांतीचा क्रमच असतो.

इतर प्राणिमात्रांप्रमाणे स्त्रीही एक प्राणिमात्र आहे. इतरांना जसे हक्क आणि कर्तव्ये आहेत तसे ते तिलाही लाभले पाहिजेत असे समजणे एवढीच काही स्त्रीमुक्तीची भूमिका नव्हे ! किंवा स्त्रीकडे कायम उपभोग्य वस्तू म्हणून पाहिल्याने उभ्या समाजाचीच वेडी घट्ट होते. एवढाच काही त्या-मागचा दृष्टिकोण नाही. त्यामागे एक उदार, व्यापक आणि मानवतावादी दृष्टी

आहे : ती ही की, स्त्री व पुरुष ही दोन स्वतंत्र जगे नव्हेत. ती परस्परांशी संलग्न असून त्यात द्वैत मुळीसुद्धा नाही. खेरीज अद्वैत हे एक सामाजिक वास्तव आहे. स्त्री-पुरुषांच्या संमिश्र, परस्परावलंबी आणि पूरक समाजरचनेत या वास्तवाला अनन्यसाधारण महत्त्व असते. म्हणून कुठलेही अंग विकलांग बनून किंवा बनवून चालत नाही. एक पुरुष शिकतो तो प्राय: स्वत:पुरतेच शिकतो. इतरांसाठी तो शिकतोच असे नाही. तो अनेकांना आपल्यासंगे घेऊ शकतो. पण खस्ता खाऊन त्या सर्वांना सांभाळू शकेल अशी काही त्याची खात्री देता येत नाही. मूलत: त्याविरोधीच त्याची प्रवृत्ती असते. स्त्रीचे नेमके याउलट असते. स्वत: शिकत असतानाच इतर कित्येकांना शिकविण्याची तिची दृष्टी असते. स्त्रीबरोबर तिचे कुटुंबही शिकते. पुरुष लाखाचा पोशिंदा तर स्त्री हजारो–लोखोंची शिक्षिका असते. साहजिकच समाजपुरुषाची प्रकृती-अर्धांग-लुळी असून चालणार नाही. म्हणून स्त्रीच्या शारीरिक व मानसिक विकासाला अनन्यसाधारण महत्त्व आहे : कुटुंब हा भारतीय समाजव्यवस्थेचा कणा आहे. आणि कुटुंबाला तोलून धरण्याचे, सावरण्याचे काम कुटुंबातील व्यक्ती-स्त्री-करीत असते. त्या अर्थाने स्त्री स्वत:साठी नसतेच. म्हणून स्त्री-पुरुषांच्या संयुक्त पण एकाग्र कुटुंबाने आकाराला आलेली स्त्री आणि पुरुष यांची स्वतंत्र पण एकात्म जगे तुटलेली असता कामा नयेत. ती जास्तीत जास्त एकमेकांशी चिकटून असली पाहिजेत. तुटेलपण दुभंगून टाकते; चिपकलेपण अभंग राखते. त्यासाठी वातावरण निर्भर, मोकळेढाकळे आणि निर्विघ्न असणे ही अत्यंत निकडीची बाब आहे. कुणा एकाचीही सामाजिक, आर्थिक, मानसिक, धार्मिक किंवा भावनिक कोंडी झाली तरी प्रगतीचा प्रवाह अखंडितपणे वाहता राहणे शक्य नाही.

सर्व थरावर कोंडी हे स्त्रीच्या बाबतीत भारतीय समाजव्यवस्थेचे आचरण होते. जवळजवळ गुलामीचे असे त्यास रंगरूप होते. सामाजिक अव्यवस्था निर्माण होईल या भीतीपोटी लहान वयात लग्ने, विधवाविवाहाला बंदी, प्रीति-विवाहाचा उच्चारसुद्धा गैर, कोवळ्या वयातील लग्नामुळे शरीरावरचे अनिष्ट परिणाम, समाजाची भीती आणि लोभी बापांचा स्वार्थ या दुकलीने जरठकुमारी विवाहाचा उडवून दिलेला हलकल्लोळ, बाई ऐन भरात येत असताना बापय केरात जाण्याच्या दुर्दैवामुळे केशवपनाची वगैरे ओढवणारी संकटे–अशा

कितीतरी गोष्टी समाजनियन्त्यांकडून राजरोस घडत होत्या. स्त्रियांच्या दृष्टीने उभा काळच नासलेला होता. गुलामगिरीची रंगरंगोटी फासलेला होता. उद्धाराचा प्रयत्न म्हणजे एकामागोमाग एक संकटांना आमंत्रणेच होती.

पण अशी संकटे कुणी ना कुणी तरी ओढवून घ्यावी लागतात, कुणी ना कुणी घेतही असतात. त्याखेरीज समाज पुढे जात नसतो. मेलेल्या मनांना जाग येत नसते.

॥ ५ ॥

या बाबतीतले आव्हान, रत्नागिरी जिल्ह्यात १८५८ साली जन्म घेतलेल्या धोंडो केशव कर्वे यांनी स्वीकारले. सतत दीर्घोद्योग आणि अतूट सहनशीलता या गुणप्रभेने मंडित झालेल्या धोंडो केशव यांच्यामधील समाजशिक्षकाने पुढे हयातभर स्त्री-उद्धाराचेच कार्य केले. तसे ते करताना महर्षी कर्वे यांनी पूर्व-सूरींचा आदर केला; पण त्यांनी घालून दिलेलीच पठडी स्वीकारली नाही. मान्यता मिळविलेल्या तत्त्वज्ञानाचा मान त्यांनी जरूर केला; पण ते पुरेपूर अंगीकारले नाही; किंवा त्यांनी जे मार्ग धुंडाळले तेच पुढे पूर्णतः चालविले नाहीत. धोंडो केशवांना हे सगळे अस्वीकृत वाटत होते असे नाही. तसे कुणाला किंवा कुणाचे काही धुडकावून लावावे अशी कर्व्यांची मुळी प्रवृत्ती नव्हती. पण मागीलांनी घालून दिलेले धडे जसेच्या तसे गिरवावेत अशीही त्यांची वृत्ती नव्हती. त्या त्या व्यक्तीसंबंधी, तिच्या तत्त्वज्ञानासंबंधी आणि त्यानुसार तिने आचरलेल्या मार्गवृत्तीसंबंधी पूर्णतः आदर करायचा पण जे घ्यायचे ते आपल्या प्रवृत्तीनुसार, कुवतीनुसार अशी धोंडो केशवांची मनोमन रीत होती. त्याचा एक अर्थ असा की, परिस्थिती काहीही असली आणि अवती-भोवती पूर्वसुरींचे कितीही उंच मिनार उभे राहून स्वतःकडे पाहात असले तरी सगळ्या प्रश्नाचा आपल्या पद्धतीनेच एक वेगळा विचार करायचा, त्या दृष्टीने पक्का निर्णय घ्यायचा आणि तो अंमलात आणायचा ही धोंडो केशवांची वर्तन-रीती होती. कर्व्यांनी अत्यंत प्रतिकूल अशा परिस्थितीत स्त्री-शिक्षणाच्या प्रश्नाला व्यापकपणे हात घातला, समाजातल्या दुर्दैवी विधवांच्या उद्धाराचा चंग बांधला तो या ठोस दृष्टीतून विचारपूर्वक निर्णय करून! अशा प्रक्रियेतून एकदा निर्णय झाला की, परिस्थिती कितीही प्रतिकूल राहो त्याची राबवणूक

करायची ही धोंडो केशवांची भूमिका होती.

धोंडो केशवांची आणखीही एक भूमिका होती : काम स्वीकारायचे, विचार-पूर्वक हाती घ्यायचे पण कुठलेही काम अंगाच्या बाहेरचे—अवाच्या सवा—असता कामा नये ही ती भूमिका. उगीच अवाच्या सवा, काम अंगावर ओढवून घ्यायचे, भव्यतेचा—दिव्यतेचा आभास निर्माण करायचा आणि त्याखाली कोसळून पडायचे—गांडीव धनुष्याखाली दशमुखी रावण जसा ढासळला तसा ! हे धोंडो केशवांना अमान्य होते. काम, एका विशिष्ट मर्यादेतले असावे, ते पुरे झाले की समाधान मानून पुढील हाती घ्यावे. यासाठी धडपड करताना महर्षी कर्वे बारीकसारीक गोष्टींची मर्यादा कधीच ओलांडत नसत. मर्यादाभंग होण्यातून हातात घेतलेल्या कामाला हानी पोचत असेल तर मर्यादातिक्रम टाळायचाच, अगदी कटाक्षाने सांभाळायचा ही धोंडो केशवांच्या ऋजू वृत्तीची मुळी स्वभाव-मर्यादाच होती. या मर्यादेत त्यांच्या कार्यउभारणीच्या दृष्टीचे सामर्थ्यही होते. यातून गैरसमजही होत; पण धोंडो केशवांना ते अमान्य होते. एक सुप्रसिद्ध उदाहरण समोर ठेवतो. महर्षी शिंदे यांनी ते सांगितले आहे.

" ह्या सुमारास प्रो. अण्णासाहेब कर्वे यांनी हिंगणे येथे अनाथ बालिका-श्रमाची स्थापना नुकतीच केली होती. त्यांच्याकडे मी माझ्या बहिणीसाठी भेटावयास गेलो होतो. शेणमातीने सारवलेल्या कुडाच्या भिंतीच्या एका खोपटात प्रो. अण्णासाहेब जमिनीवर बसले होते. त्यांचे आश्रमात ब्राह्मण जातीच्याच १०–१५ विधवा मुली होत्या. माझे बहिणीला आपल्या आश्रमात घेता काय ह्या माझ्या प्रश्नाला, ' ब्राह्मणेतरांच्या मुलींना घेण्याचा हा काळ नाही ' असे प्रोफेसर अण्णासाहेबांनी सांगितले व माझ्या बहिणीला आश्रमात घेण्याचे साफ नाकारले. त्यामुळे माझी फार निराशा झाली. तत्कालीन महाराष्ट्रात एक सुधारणा करताना दुसऱ्या सुधारणेला कसा अडथळा येई ह्याचे हे उदाहरणच आहे "[१]

वरील दोन महर्षींमधील या घटनेतील उदात्तपणा वेगळा समजावून सांगण्याची जरूर नाही. धोंडो केशवांनी नकार देताना जो ऋजुभाव सांभाळला आहे, तेच ऋजू मृदुत्व याचे निवेदन करताना विठ्ठल रामजींनी जोपासले आहे. ताल-तोल कुठेही बिघडलेला नाही. हेतूचे चिकटविणे नाही की आरोपांचे प्रति-पादन नाही. सामान्यांचे वेगळे असले तरी थोरांचे हे असेच असते. समाज, परिस्थिती आणि स्वतःभोवती स्थितिगतीचे दारकोंड या साऱ्यांच्या मर्यादेत

कामाची आखणी आणि पूर्तता हा धोंडो केशवांचा स्वभाव होता. त्यांनी तो आजन्म जोपासला. कर्तेपणाच्या मशाली पेटवीत अबोलपणे त्यांनी हे केले.

॥ ६ ॥

त्यातूनच अण्णासाहेब कर्व्यांच्या शैक्षणिक-सामाजिक कार्याची मुहूर्तमेढ उभी झाली : हिंदू-समाजात, अमानुष छळ होणाऱ्या विधवांच्या दुःखाच्या निवरणासाठी कर्व्यांनी ३१ डिसेंबर १८९३ रोजी 'विधवा विवाहोत्तेजक मंडळी' स्थापन केली. त्यात प्रारंभी चौदा संस्थापक सदस्य होते. जातिभेद व पूर्वापार चालीरीती यांना धक्का न लावता विधवांच्या पुनर्विवाहासाठी, प्रत्यक्ष विधवांना व समाजाला प्रवृत्त करणे हे या मंडळाचे प्रमुख उद्दिष्ट होते. या उद्दिष्टातही अण्णासाहेब कर्व्यांच्या स्वभावाची मर्यादा सांभाळण्याच्या वृत्तीचे प्रतिबिंब दिसते. पुढे याच मंडळीचे 'विधवा विवाह प्रतिबंध निवारक मंडळी' असे नामकरण झाले आणि नंतर त्याचीच परिणती 'अनाथ बालिकाश्रम'ची स्थापना होण्यात झाली. पुढे या छोट्या कार्याचा वटवृक्ष म्हणजे स्वतंत्र 'महिला विद्यापीठाची' स्थापना होय. धोंडो केशवांच्या कार्याचा प्रारंभ हा भारतीय स्त्री-जीवनाच्या परिवर्तनाचा इसार होता तर स्वतंत्र महिला विश्व-विद्यालयाची निर्मिती हे स्त्री-समाजाच्या जीवनाला लाभलेले अनुभवसिद्ध आश्वासन होते.

धोंडो केशवप्रणीत महिला विश्वविद्यालयाच्या स्थापनेचा स्रोत १८९३ च्या 'विधवा विवाहोत्तेजक मंडळी'च्या स्थापनेत होता. पण या स्थापनेचा खरा प्रारंभ 'अनाथ बालिकाश्रमा'च्या स्थापनेपासून झाला असे मानावे लागते. १ जानेवारी, १८९९ रोजी पुण्याच्या सदाशिव पेठेतील गोरे यांच्या वाड्यात या 'अनाथ बालिकाश्रमा'ची रीतसर नोंद झाली. पहिल्या दिवशी या आश्रमात किती विद्यार्थिनींची नोंद झाली असेल? हाताची नऊ बोटे रिकामी, एक उचललेले अशी याबाबत स्थिती होती. फक्त एक विद्यार्थिनी नोंदली गेलेली होती. म्हणजे किती, कुणा कुणाच्या बंदिवासात स्त्री होती याचे जसे हे चित्र आहे तसेच या तुरुंगातल्या अवघ्या स्त्रियांचे प्रतिनिधित्व नोंद झालेली केवळ एक स्त्रीच धीटपणे करीत होती, याचेही ते प्रमाण होते. आणि प्रारंभ काळातला एका स्त्रीचा प्रश्न हा स्त्रियांच्या बंदिवासाचा खडखडीत दरवाजा

कधी ना कधी उघडला जाणार याचे ते आश्वासन होते. त्यानुसार कर्व्यांचे काम वाढत राहिले. जून १९०० मध्ये 'अनाथ बालिकाश्रम' हिंगणे येथे नेण्यात आला. १९०२ मध्ये महिलाश्रमाची इमारत पूर्ण करण्यात आली. विरोध सुरूच होता : सनातनी, प्रतिगामी आणि परंपरांचे अड्डे उबवीत असलेले दुढ्ढाचार्य तसे काही गप्प बसलेले नव्हते. ते कार्यशील होतेच. त्याचा त्रास, मानसिक छळ धोंडोपंत कर्व्यांनी अमाप सोसला. पण हे करता करता त्यांनी आपली एकांडी शिलेदारी हळूहळू कमी केली, आणि पुरुषांच्या अहंभावी दास्यात कुजत पडलेल्या स्त्रीचा उद्धार पुरुषवर्गाने अहमहमिकेने पुढे येऊन केला पाहिजे हे खरे असले तरी त्यातला खरा सहभाग स्त्रियांचाच प्रामुख्याने असणे उचित हे धोंडो केशवांनी पुरेपूर ओळखले आणि स्त्री-कार्यकर्त्यांची फळीच्या फळी त्यांनी उभी केली. स्त्रियाच स्त्रियांसाठी काम करतात हे चित्र, आत्मबळ गमावलेल्या स्त्री-समाजात चैतन्य निर्माण करणारे होते, विश्वास ओतणारे होते. अशा प्रारंभीच्या कार्यकर्त्यांपैकी श्रीमती पार्वतीबाई आठवले, काशीताई देवधर, कृष्णाबाई फाळके, वेणूताई नामजोशी या नामांकित स्त्रिया होत. अण्णासाहेबांसह कार्यकर्त्यांच्या अशा संचाने धोंडो केशवांच्या स्वप्नाला आकार दिला.

मात्र स्त्रियांना केवळ शिक्षण दिले, विधवाविवाह जारी ठेवले की काम झाले असे धोंडो केशव कर्व्यांचे मत नव्हते. नुसते शिक्षण तसे कुचकामीच असते. त्याने बदल होत नाहीत असे नाही; पण होणारे बदल इच्छित दिशेने होतातच असे नाही. म्हणून अण्णासाहेबांनी स्त्रियांच्या नैसर्गिक विकासाला कोणते शिक्षण उपयोगी पडेल याचा मनाशी पडताळा घेतला; त्यातून पाश्चिमात्य शिक्षणपद्धतीपेक्षा जपानमधील शिक्षणपद्धती त्यांना अधिक योग्य वाटली. पाश्चात्त्य शिक्षणपद्धतीने स्त्री 'पोशाखी' बनते, सामाजिक वगैरे जबाबदाऱ्या उचलण्याची भाषा करते, पण व्यवहारामध्ये ती आपले घर, मुलेबाळे यांपासून दूर सरकते. धोंडो केशवांना हे नको होते. कितीही शिक्षण झाले तरी समाजापासून ती तुटून निघता कामा नये ही अण्णासाहेबांची मूलभूत दृष्टी होती. त्या दृष्टीने त्यांनी एकूणच स्त्रीशिक्षणाच्या प्रश्नाचा विचार केला. त्याची सूत्ररूपाने मांडणी पुढीलप्रमाणे करता येईल :

१. पुरुषवर्गासारखेच शिक्षण स्त्रीवर्गाला उपयुक्त नाही; म्हणून उभयतां-

साठी असलेल्या किंवा आखण्यात येणाऱ्या समान अभ्यासक्रमामध्ये बदल करणे इष्ट आहे. भारतीय कुटुंबव्यवस्थेतील स्त्रीचे पुरुषाहून वेगळे स्थान, या नवरचित अभ्यासक्रमात प्रतिबिंबित झाले पाहिजे.

२. स्त्रियांचे विश्व मूलत: भावनिक स्वरूपाचे आहे. त्यांची जीवन-पद्धतीही स्वतंत्र व स्वयंवेद्य आहे, त्या दृष्टीने स्त्रियांच्या शिक्षण-विषयक अभ्यासक्रमाची रचना करणे सर्वस्वी उचित ठरते. पुरुष आणि स्त्री ह्यामध्ये कर्तृत्वाच्या दृष्टीने अभेद असला तरी जीवनाच्या हरेक कार्यक्षेत्रात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने कार्य करता आले पाहिजे असा अट्टाहास बाळगणे अनिष्ट आहे. प्रत्येकाच्या मर्यादा आणि सामर्थ्य ओळखूनच कोणत्याही कार्यक्रमाची आखणी झाली पाहिजे.

३. या अभ्यासक्रमाचे अंतिम उद्दिष्ट, स्त्रीच्या जीवनपद्धतीनुसार तिला भावनिक व वैचारिक दृष्ट्या अत्यंत सशक्त बनविणे हे असणे केव्हाही उचित आहे. भावनांचा कडेलोट आणि विचारांचा पाणलोट यात वाहून न जाता, स्वत:बरोबर इतरांच्या अंगाखांद्यावर बुरबुसल्या गतीने फिरणाऱ्या दुष्ट चालीरीती, रूढी, कर्म आणि निर्दय अंधश्रद्धा यास चूड लावणे हे या सशक्तपणाचे केंद्रस्थान आहे. म्हणून मनोवृत्तीत बदल घडवून आणणे हेच महत्त्वाचे सार आहे.

त्यासाठी पुनर्रचित अभ्यासक्रमात स्त्रियांच्या अंत:करणात वसत असलेली समर्पणशील त्यागवृत्ती आणि लोभनिरपेक्ष वैराग्य या सुसंस्कारित गुणांचा उपयोग करून घेण्याची दृष्टी हवी. समाजाला दृष्टी देणारी सुमाता आणि सुगृहिणी ह्यांची घडण हे ह्या अभ्यासक्रमाचे अंतिम उद्दिष्ट, हे सूत्र हवे.

हे घडले तर ' चूल आणि मूल ' या आकुंचित क्षेत्रातून स्त्री ' चूल, मूल आणि जग ' या व्यापक परिसरात येईल. एकूणच मानवजातीच्या उन्नतीच्या संदर्भात ती मोलाची कामगिरी करू शकेल. या उन्नतीच्या अनुसंधानात ती सुटंगळ राहू शकणार नाही. आर्थिक–मानसिक–सामाजिक सगळ्याच दृष्टींनी ती स्वत:च्या पायावर उभी राहू शकेल. हळूहळू जातिभेद मंदावेल आणि पुढे विरेल. विधवाविवाहाने, समाजातल्या गुंतागुंतीच्या अवघड प्रश्नांची मुळे सैल पडतील. त्यासाठी समाजाशी, विरोध करणाऱ्या मंडळांशी सतत दोन हातच

केले पाहिजेत असे समजण्याची गरज नाही. त्याची निकड असतेच पण ती सदैव नसते. सतत युद्ध हे कार्याची हानी करणारे कृत्य ठरते. म्हणून ' अत्यंत नम्रतेने आणि निष्ठेने ' कार्य करीत राहून असमंजस समाजाला ' समजदार ' करणे हे कितीतरी लाभदायक ठरते. वैयक्तिक जीवनात ' कडकलक्ष्मी ' असलेल्या धोंडो केशवांची शैक्षणिक–सामाजिक सगळ्याच प्रश्नांबाबत, ही नम्र भूमिका होती.

त्यानुसार महर्षी अण्णासाहेब कर्वे यांनी कार्य केले. एतद्विषयक महिला विद्यालय व महिला विश्वविद्यालय यांची उद्दिष्टेही त्या दृष्टीनेच निश्चित करण्यात आली. ती मिश्र स्वरूपात पुढीलप्रमाणे मांडून दाखविता येतील :

१. स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा विकास होईल, समाजविषयक कर्तव्याची जाणीव होऊन ती वाढीस लागतील व स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण होईल असे शिक्षण देणे.
२. स्त्रीचे कुटुंबातील मध्यवर्ती स्थान लक्षात घेऊन, तिला वयाच्या वीस वर्षांपर्यंत आवश्यक ते शिक्षण देऊन गृहिणीपदाची जबाबदारी घेण्याविषयी मार्गदर्शन करणे.
३. मात्र ज्या स्त्रियांना गृहिणीपदाची जबाबदारी स्वीकारावीशी वाटत नाही, त्यांना त्यांनी आखलेल्या ध्येयधोरणानुसार पण त्यांच्या कुवतीनुसार उपयोगी शिक्षण देण्याचा प्रयत्न करणे.
४. स्त्रियांना उदारमतवादी हिंदुधर्माच्या मूलतत्त्वांची ओळख करून देऊन सेवाभावी, निष्ठावंत व चारित्र्यसंपन्न कार्यकर्त्यांची पिढी निर्माण करणे आणि त्याबरोबरच राष्ट्रीयत्वाची भावना जोपासणे.

या उद्दिष्टांत सहशिक्षणाला वाव नव्हता, पण इंग्रजीचे महत्त्व मान्य होते. उच्च शिक्षणात एस्. एस्. सी. अगर तत्सम परीक्षेत ' इंग्रजी ' सक्तीचे हाही एक महत्त्वाच्या नियमाचा भाग होताच. पण अण्णासाहेबांचा आग्रहही तेवढाच मोलाचा होता. मात्र स्त्रियांना दिले जाणारे शिक्षण हे त्यांच्या प्रादेशिक भाषांतूनच मिळाले पाहिजे, असा त्यांचा चिवट आग्रह लक्षणीय ठरतो. स्त्री-शिक्षणाचा पाया भक्कम करायचा तर त्यांना देण्यात येणारे शिक्षण त्यांच्या मातृभाषांतून देण्याशी सांगड घालणे जरूर असले पाहिजे अशी धोंडो केशवांची दृढ धारणा होती. त्याचा आचार त्यांनी केला.

अत्यंत अवघड परिस्थितीत धोंडो केशवांनी स्त्री-शिक्षणाच्या प्रसाराचे काम हाती घेतले. अनाथ, विधवा स्त्रीला शिक्षण देऊन तिला प्रतिष्ठित करावे या प्रयत्नातून ' श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी इंडियन विमेन्स युनिव्हर्सिटी ' या भारतातल्या पहिल्या महिला विद्यापीठाची निर्मिती झाली. काम मोठे होते; प्रयत्न अविरत होते; मात्र अण्णासाहेबांचे स्त्री-जीवनविषयक बहुतांशी विचार म्हणावे तेवढे गतिशील नव्हते. ते स्थितिवादी होते. स्त्रीला उत्तम गृहिणी म्हणून कसे विराजमान करता येईल ही त्यांची दृष्टी होती आणि समाजाशी कसलाही संघर्ष न करता काम करावयाचे ही भूमिका होती. त्यामुळे धोंडो केशवांच्या कार्याला स्वाभाविकच मर्यादा पडल्या. त्यात एक मर्यादा; ज्यांच्यावर अण्णासाहेबांनी हे केंद्रीकरण केले तो वर्ग प्रामुख्याने उच्चभ्रू पांढरपेशा ब्राह्मण समाजातील स्त्रियांचा होता कार्यक्षेत्र विशिष्ट थराशी निगडित, त्याहून व्यापक अशा स्तरात कितीतरी स्त्री-जीवन जळत होते, हे खरेच; पण हा प्रश्न शेवटी समाजसुधारकाच्या अनुभवदृष्टीचा आणि तत्कालीन काळाला असलेल्या अंगभूत मर्यादांचाही असतो. त्यामुळे तो टीकेचा विषय होणे गैर मानले पाहिजे.

नाही म्हटले तरी धोंडो केशवांनी, समाजरूढींनी मृतावस्थेला आणून ठेवलेल्या स्त्रीच्या मनामध्ये जगण्याविषयीचा अंगार फुलविला, अग्नी चेतविला. अण्णासाहेबांच्या समन्वयवादी दृष्टीने बड्या बंडवाल्याची भूमिका बजावली नाही पण शिक्षणातून व्यक्तिवैशिष्ट्य जपण्याची प्रक्रिया जोपासली, मात्र सर्वांचा थर समान हे सूत्र नाकारले. फायदे-तोटे दोन्हींचे आहेत, असतात; तसे ते इथेही झाले. पण स्त्री-उद्धाराचे क्रांतदर्शी स्वप्न धोंडो केशवांनी पाहिले आणि त्याच्या रूपसिद्धतेस स्वतःच्या सोईच्या अशा शहरातील प्रश्नांपासून सुरुवात केली.

त्याचे चढतेवा ते फळ दक्षिण महाराष्ट्रात रावसाहेब व्ही. टी. पाटील यांनी, शहरी–ग्रामीण भागात केलेल्या स्त्री-शिक्षणाच्या कार्याने अंकित केले आहे. ' एस. एन. डी. टी. ' ह्यासारखाच ' ताराराणी विद्यापीठ ' हा, स्त्री-शिक्षण आणि स्त्री-मुक्ती आंदोलनामधील एक लक्षणीय थांबा आहे : जो थांबा ओलांडून पुढे जाता येत नाही. थांबावेच लागते, आणि मागं वळून अवलोकन

करून वाट चालावी लागते. त्याखेरीज इतिहासाला पूर्णत्व मिळत नाही. रावसाहेब पाटील यांच्या मनात तरळणाऱ्या ' ताराराणी विश्वविद्यालया 'च्या निर्मितीचा क्षण अद्याप दृष्टिपथात नाही; पण तो साकार होईल तेव्हा स्त्री-शिक्षणविषयक त्यांच्या कार्याचे मोलही समाजासमोर ठळकपणे येईल. असे प्रयत्न महाराष्ट्रात तुरळकच आहेत.

स्त्री-मुक्तीच्या चळवळींची व्याप्ती आज खेड्यापाड्यांपर्यंत पोचली आहे. अजूनही खूप भाग अस्पर्श्य आहे. कितीतरी मोठा स्त्री-समाज आहे; अहिल्येच्या शिळेसारखा तसाच पडून आहे : मुक्तीची वाट पाहात! मात्र आज-काल स्त्री आणि पुरुष खांद्याला खांदा लावून काम करतात, संमिश्र समाज-व्यवस्थेत एकमेकांचे स्थान जाणून समंजसपणे कामाचा गाडा हाकतात. स्त्रिया आपल्या हक्कांसाठी, आपल्या स्थानासाठी; आपली दु:खे निवारण करून घेण्यासाठी समाजाशी दोन हात करू पाहतात हे दृश्य धोंडो केशवांच्या अखंड प्रयत्नांचे, वाढत्या यशाचे मर्यादित फळ आहे. पण ते प्रेरक व मार्गदर्शक आहे.

**संदर्भ :**

१. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : ' माझ्या आठवणी व अनुभव ' : पृ. १०४–१०५.

# ५

# सार्वत्रिक शिक्षणाचा समाजवादी प्रयोग

ज्ञानोबा ते विनोबा व जोतीराव फुले ते भाऊराव पाटील अशा दोन विचार-परंपरा महाराष्ट्रात दिसतात. बहुमोल विचारधन देऊन या दोन्ही परंपरांनी सौहार्दाच्या भावनेने महाराष्ट्राचे धोरण आणि पोषण केले आहे. या दोन्ही परंपरांत द्वैत उभे राहिले नाही, मतभेदाचे मोहोळ उफाळले नाही, मतामतांचा गलबला माजून विद्वेषाचे पहाड उभे राहिले नाहीत, असे नाही. त्याही गोष्टी झाल्या; पण 'झाल्या' गोष्टी इतिहासजमा आहेत. अखंड महाराष्ट्राच्या घडणीच्या संदर्भात त्यांना फारसे मोल नाही. या दोन्ही परंपरांतील थोर माणसे कुणा एकट्याची नव्हती, नाहीत. ती सर्वांची होती, सर्वांसाठी होती, आहेत.

त्यांपैकीच कर्मवीर भाऊराव पाटील एक होते. धगधगत्या जीवनाच्या खडतर आदर्शात उभ्या राहिलेल्या कर्मवीरांनी जीवनशिक्षणाचे 'बी' पेरले. रेताड, खडकाळ, भगभगत्या, ओसाड माळावर हे 'बी' टाकले आणि त्यातून पीक घेण्याचा हव्यास बाळगला. वृक्ष फोफावण्याची दृष्टी ठेवली. कर्मवीरां-सारखी 'बडी' असामी पाठीशी खडा पहारा करीत असल्याने त्याने लावल्या-ठायीच कोमेजून खाली माना टाकल्या नाहीत, ते वाचले. जिव्हाळ्याने केलेल्या जीवनाच्या चिंतनातून निर्माण झालेल्या विचारानुसार प्रारंभी आखणीची निश्चित कल्पना नसताही शिक्षणाचे एक मनोहर उद्यान उभे राहिले. या उद्यानाने—रयत शिक्षण संस्थेने—समाजातील सर्वसाधारण माणसाच्या जीवनातील मरगळ दूर केली. महाराष्ट्राच्या थोर शिक्षणपरंपरेच्या इतिहासाचा प्रवाह शंभर वर्षांनी पुढे नेला. थोर उदात्त शिक्षणपरंपरा सांभाळून असलेल्या, पुण्याच्या आदरणीय डे. ए. सोसायटीपासून चालत आलेल्या महाराष्ट्राच्या आल्हाददायक शिक्षण-परंपरेतील कर्मवीरांचे हे मोठे कार्य होय.

या कार्याचे बीज कर्मवीरांच्या मनात रुजले ते कशामुळे? यामागच्या प्रेरणा कोणत्या होत्या? त्यासाठी इतिहासाची काही पाने उलटणे जरूर आहे.

ब्रिटिश या देशात स्थिरपद झाल्यानंतरच्या काळात बहुजनांच्या शिक्षणाची स्थिती काय होती? प्रजेच्या नैतिक आणि भौतिक प्रगतीची जबाबदारी सर्वस्वी सरकारवर आहे अशा तऱ्हेच्या उच्च व आकर्षक तत्त्वांना त्या वेळच्या सरकारी ठरावांतून जरी साळसूदपणे मान्यता दिलेली होती, तरी देखील तत्कालीन अधिकाऱ्यांनी बहुजनसमाजाच्या शिक्षणाकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले होते. समाजातील बुद्धिवान व वजनदार वर्गास सरकारी नोकरीच्या रुपेरी बेडीने जखडून टाकून त्यांच्या मदतीने या देशात आपले आसन स्थिर करण्याचा त्यांचा मनसुबा होता आणि याच दृष्टीने त्यांनी आपल्या शिक्षणकार्याची रूपरेषा आखली होती. ('महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी' : प्रा. गं. बा. सरदार : पृ. ११३) सर्वसामान्यांच्या शिक्षणविषयक अशा कोंडमाऱ्याचे प्रतिबिंब तत्कालीन शिक्षण समितीच्या दरसालच्या अहवालांतून स्पष्टपणे दिसते.

सामाजिक क्रांतीच्या अत्युच्च ध्येयाने प्रेरित होऊन ही कोंडी फोडण्याचे काम म. फुले यांनी प्रथम केले. शिक्षणावर फुल्यांची मोठीच भिस्त होती. शिक्षणाने बहुजन जागा होईल, त्याची दृष्टी फाकेल, ती व्यापक होईल, त्याची संकुचित वृत्ती नाहीशी होईल, तो चिकित्सक बनेल, नंतर आपल्या आचारातील वैगुण्ये तोच हुडकून काढील, हवा तो बदल पाहील, घडवून आणील, पण त्याला शिक्षण हवे. शिक्षणाच्या अनिवार लालसेने झपाटलेल्या फुल्यांची ही दृष्टी होती.

त्यामुळेच आपल्या काही ब्राह्मण सुहृदांच्या सक्रिय साहाय्याने १८५१ मध्ये पुण्यात फुल्यांनी पहिल्यांदा मुलींची शाळा काढली. १० सप्टेंबर, १८५३ रोजी महारमांग इत्यादी लोकांस विद्या शिकविण्याकरिता मंडळे स्थापन करून 'सर्वभूतहिते रताः' ही भूमिका सार्थ केली. 'आपल्या देशात शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात यावे' अशी हंटर कमिशनपुढे (१८८२) आग्रहाने मागणी केली व ब्रिटिशांच्या 'फिल्टर डाऊन सिद्धान्ता'ला कडाडून विरोध केला. उच्च वर्गाला सरकारने इंग्रजीतून शिक्षण द्यायचे आणि त्यांनी मातृभाषेतून खाली पोचवावे अशी सदिच्छा बाळगावी, असे हे 'फिल्टर डाऊन' होते. फुल्यांना हे मान्य नव्हते. उत्थान व्हायचे ते मुळापासूनच झाले पाहिजे

हा सिद्धान्त ' झेड्. पी. ' फुल्यांनी दणकावून आणि ठणकावून सांगितला.

'फिल्टर डाऊन सिद्धान्ता 'चे वाभाडे काढणारे म. फुले हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेल्या निवेदनात स्वच्छपणे सांगतात :

" One of the most glaring tendencies of Government system of high class education has been the virtual monopoly of all the higher offices under them by Brahmins. If the welfare of the Ryot is at heart, if it is the duty of Government to check a host of abuses, it behaves them to narrow this monopoly day by day so as to allow a sprinkling of the other castes to get into the public services. Perhaps some might to inclined to say that it is not feasible in the present state of education. Our only reply is that if Government look a little less after higher education which is able to take care of itself and more towards the education of the masses there would be no difficulty in training up a body of men every way qualified and perhaps far better in morals and matters. "

पुढे ब्रिटिश शासन आणि शिकलेली पिढी यांच्याकडून अपेक्षा व्यक्त करताना म. फुले लिहितात :

" I sincerely hope that Government will here long see the error of their ways, trust less to writers or men who look through high class spectacles, and take the glory into their own hands of emancipating my Shudra brethren from the trammets of bondage which the Brahmins have woven around them like the coils of a serpent. It is no less the duty of each of my Shudra brethren as has have received any education, to place before Government

the true state of their fellowmen and endeavour to the best of their power to emancipate themselves from Brahmin thraldom."[1]

त्या वेळी हे घडले नाही. पुढे १९२३ ला घडले. केवळ शिक्षणाच्या दृष्टीने कणखर फुले सातत्याने कार्यशील राहिले.

'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' या वृत्तीने काम करणाऱ्या महर्षी वि. रा. ऊर्फ अण्णासाहेब शिंदे यांनी बहुजनांच्या, त्याहून अधिक जोमाने अस्पृश्योद्धाराच्या बाबतीत ही कार्यशीलता पुढे रेटली. अस्पृश्योद्धाराचे कार्य हा महर्षींच्या कार्यकर्तृत्वाचा हिमालय होय. हे काम त्यांनी भारतभर पसरविले. पुढे अनेकांकडून घडलेल्या यासंबंधीच्या कार्याची पार्श्वभूमी शिंद्यांनी यापूर्वीच करून ठेवली होती असे म्हणता येईल. त्यासाठी त्यांनी 'भारतीय निराश्रित साहाय्यकारी मंडळी' (दि डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया) स्थापन केली. बहुजनांच्या उद्धाराच्या सगळ्या चळवळी शिंदे यांनी राष्ट्रीय प्रवाहात नेऊन सोडल्या.

विठ्ठल रामजी, सयाजीराव महाराज व शाहू महाराज यांचे तत्त्वज्ञान–विशेषतः शेवटच्या दोघांचे–बरेच 'पॅरेलल' आहे असे दाखविता येते.

सयाजीराव महाराजांनी पूर्णतः अजातीय दृष्टिकोण स्वीकारून 'लोकांचा राजा' नव्हे, 'पालनकर्ता' या नात्याने समाज सुधारणांची–शिक्षणाची–पाणपोई घातली. पुरोगामी प्रवृत्तीचा सक्रिय पुरस्कार केला. शाहू महाराजांनीही हीच दृष्टी स्वीकारली. शाहू महाराजांच्यामध्ये अनेक दोष असतील, (आपण ते मोकळ्या मनाने मान्य करावेत.) पण जातिभेदाचे आणि विषमतेचे विषवृक्ष समूळ नाहीसे करण्याकरिता अंध, रूढिप्रिय आणि प्रवाहपतित अशा अनेक सामाजिक मनोवृत्तींशी त्यांना विलक्षण झगडा करावा लागला... "महाराजांच्या ठिकाणी वीरत्व आणि व्यावहारिकत्व यांचे मोठे विलक्षण मिश्रण झाले होते. त्यांची सर्व जीवनमूल्ये या मिश्रणातूनच निर्माण झाली आहेत. भूतदयेचा ओलावा, समतेची चाड आणि अन्यायाची चीड यांची महाराजांच्या वीरमनाला जी जोड मिळाली होती त्यामुळे ते स्वभावतः सुधारक बनले. सामाजिक कल्पनांचे हसतमुखाने स्वागत करू शकले."[२]

मनात विलक्षण ऐस बाळगून प्रखर विरोधाशी दोन हात करणाऱ्या शाहू महाराजांच्या चरणी बसून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सामाजिक सुधारणेचे धडे घेतले. शाहू महाराजांचे सान्निध्य, फुल्यांच्यापासून चालत आलेली ' उत्तिष्ठित जाग्रत 'ची परंपरा, सत्यशोधक चळवळीच्या निमित्ताने महाराष्ट्रात केलेली भ्रमंती यातून कर्मवीरांचे सगळे तत्त्वज्ञान त्यांच्या जीवनातून टप्प्याटप्प्याने विकसित होत गेलेले दिसते.

**दोन आघाड्यांवर युद्ध**

विद्यार्थिदशेत कर्मवीर ढ्ड होते. सदा ' वर घातला ' हा शेरा राहिला. पास म्हणून कधी झाले नाहीत. कर्मवीरांनी सत्यशोधकाची ढोलकी घेतली. महाराष्ट्रभर घुसले. सामान्य जनतेचे अज्ञान, दैन्य आणि दारिद्र्य पाहिले, समाजसुधारणेच्या दृष्टीने सत्यान्वेषण केले, कारखान्यातून नोकर झाले, कारखानदारीतून होणारा फायदा नोकरांच्या मुलांच्या शिक्षणासाठी खर्च व्हावा, असे बोलले. बिनसले. या सगळ्या धगीतून बाहेर पडताना शालिवाहनाच्या शक्तीने कर्मवीरांनी एक प्रतिज्ञा केली : " दाढीत जितके केस नाहीत तितकी पोरं शिकवीन. " यातून कर्मवीरांचे सारे शैक्षणिक तत्त्वज्ञान फुलून आले.

आपले लोक अडाणी आहेत. त्यांच्यासाठी कुणी काही करीत नाही. काही तरी केले पाहिजे. अडाणीपणा म्हणजे शाप, तो दूर करायला हवा...सत्यशोधक चळवळीच्या निमित्ताने केलेल्या भ्रमंतीतून कर्मवीरांनी हे जाणले. जे करायला हवे ते करण्यासाठी कुणीतरी हवे, पण पुढे कुणी येत नाही; मग स्वत: कर्मवीरच उभे राहिले. कृतिशील कर्मवीरांच्या बाबतीत बोलणे फोल झाले, बोलणे वाया गेले, असे घडले नाही. शिक्षण नाही म्हणजे जागृती नाही, म्हणजे नवसमाज-निर्मिती नाही अशी कर्मवीरांची खात्री झाली होती.

या कल्पनेतूनच कर्मवीरांनी सर्व जातींच्या गरीब होतकरू विद्यार्थ्यांसाठी शिक्षणदानाचे पवित्र कार्य करण्यासाठी १९०९ साली दूधगाव, १९१९ मध्ये काले व १९२२ साली नेर्ले या ठिकाणी वसतिगृहे स्थापन केली. एक हरिजन विद्यार्थी घेऊन साताऱ्यास श्रीछत्रपती शाहू बोर्डिंग काढले. या वसतिगृहात कोणत्याही प्रकारची जात, पंथ, भेद न मानता विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाई. १९१९ साली संस्थेस ' रयत शिक्षण संस्था ' असे नाव देऊन १९२४ मध्ये

सातारा हे तिचे कार्यक्षेत्र बनविले.

त्या दृष्टीने कार्याचा डोंगर उभा करताना ‘ शेती हा देशाचा मुख्य व्यवसाय आहे ’ हे कर्मवीरांनी कधीही नजरेआड केलेले दिसत नाही. शेतीत निघणारे उत्पन्न हे शेतकऱ्यास प्राय: त्या कामापुरतेच निघत असल्याने उच्च शिक्षणास लागणारा पैसा नाही, अंग मोडून कष्ट करावेत आणि शिक्षण घ्यावे, अशी कुठे सोय नाही. अगोदरच शिक्षणाची दृष्टी कमी, त्यामुळे नव्या सुधारणेची जाणीव अपुरी; त्यात हे आर्थिक दुरवस्थेचे तिरपगडे; शिक्षणाला खीळ हा त्याचा अपरिहार्य परिणाम होता.

कर्मवीरांनी यातून मार्ग शोधला. ‘ स्वावलंबी शिक्षण योजना ’ पुरस्कारिली. बुकर टी. वॉशिंग्टनसारखा स्वावलंबी शिक्षणाचा अशा प्रकारचा प्रयोग उभ्या भारतात पहिल्यांदा कर्मवीरांनी केला. नुसताच केला असे नव्हे तर यशस्वी करून दाखविला. यामध्ये कर्मवीरांचा एक विचार आहे. कर्मवीरांचा बहुतांशी हरेक कृत्यामागे एक सुसंगत विचार आणि एक सूत्रबद्ध कार्यप्रणाली दिसते. मनगटाच्या सामर्थ्याचे दर्शन हा यामागील हेतू होय.

‘ स्वावलंबी शिक्षण योजने ’मागेही असा सुसंबद्ध विचार आहे. बुकर टी वॉशिंग्टनने अमेरिकेमधील काळ्या, विरूप आणि भग्न निग्रो समाजामध्ये केलेल्या स्वावलंबी शिक्षण प्रयोगासंबंधी ‘ Up from Slavery ’ या आपल्या आत्मचरित्रामध्ये लिहिले आहे; त्यामधील सारभूत सूत्र कर्मवीरांच्या विचारदृष्टीशी संधान बांधणारे आहे. बुकर टी. वॉशिंग्टन सांगतो :

“ We must do something besides teach them mere books. We wanted to ceach the students how to bathe; how to care for their teeth and clothing. We wanted to teach them what to eat and how to eat it properly Besides from this, we wanted to g ve them such a practical knowledge of some one industry, together with the spirit of industry, thrift and economy, that they would be sure of knowledge how to make a living after they had left us. We wanted to teach them study actual things instead of mere books alone. We wanted to lift up through the

medium of the students whom we should educate and send out as leaders. The main ambition among a large proportion of these Negro students was to get an education so that they would not have to work any longer with their hands."

वाशिंग्टनने आपण काय उभारू इच्छितो हे सांगताना म्हटले आहे :

"I have determined to have the students do not only the agriculture, domestic work but to have them erect their own buildings ... ... ... to see not only utility in labour, but beauty and dignity, in the teaching of civilization, self-help and self-reliance. The erection of the buildings by the students themselves would more than compensate for any lack of comfort or fine finish. The older I grow, the more I am convinced that there is no education which one can get from books and costly apparatus that is equal to that which can be gotten from contact men and women ... ... to study men and things ...... I would be helping in a more substantial way by assisting in the laying of the foundation of the race through a generous education of the hand, head and heart ....... ... The task before me seemed such like making bricks without straw." ( Up from Slavery : P. 78, 105 ).

व्यवहारवादी ध्येयनिष्ठ कर्मवीरांनी 'स्वावलंबी शिक्षण योजने' द्वारे श्रम आणि शिक्षण यांचा तुटलेला सांधा जुळवून दिला आहे. प्रेरणा बुकर टी. वॉशिंग्टनची, अन्य कुणाची की स्वतःची हा प्रश्न महत्त्वाचा नाही. तर देश-कालरीतीनुसार प्रेरणेची कार्यवाही कशी झाली हे महत्त्वाचे आहे. महत्त्व प्रेरणेचे आणि तिच्या अंमलबजावणीचे आहे. कर्मवीरांच्या कार्याची महानता कृतिशीलतेत आहे; पोकळ पांडित्यात किंवा नसणारे पांडित्य दाखविण्यात नाही.

शेतीप्रधान समाजपद्धतीत, बेतासबात डोके चालवून, हात बांधून ठेवण्याकडेच सुशिक्षित लोकांचा विशेषेकरून कल असतो. कुठलेही काम श्रेष्ठ प्रतीचेच असते, ते केल्याने मूल्य कमी होत नाही, असे सुशिक्षित मानत नाहीत. मानवी श्रमाचे मोल वाढविण्याची सुशिक्षिताला किंमत वाटत नाही. पांढरपेशींनी गढुळलेली त्याची दृष्टी त्याला ते करू देत नाही. ' पुण्योगंध: पृथिव्यां च ' असे गीतेत म्हटले आहे, पण माती अंगाला लागणे काही तरी अपवित्र आहे, घाणेरडे आहे असे मानले जाते. कमीत कमी श्रम, तेही परीटघडीचे श्रम, आणि जास्तीत जास्त मौजमजा यात जीवनातील कसलीच गंमत नसते, पण इतिकर्तव्यता झाली असे मानले जाते. शिक्षणाने साधल्या जाणाऱ्या मनोवृद्धीचा आणि परिश्रमाने होणाऱ्या शरीरसंपन्नतेचा निकटचा संबंध असतो, याचे भान असते असे नाही. ते असते पण ते टाळून जगण्याकडे प्रवृत्ती असते. कर्मवीरांनी ह्या प्रवृत्तींचा निचरा करण्याचा प्रयत्न केला आहे.

**श्रमाच्या प्रतिष्ठेचे मोल**

कर्मवीरांच्या ' स्वावलंबी शिक्षण योजने 'चा हेतू मर्यादित नाही. तसा तो असता तर योजना स्वयंभू मोठेपणा हरवून बसली असती. खेड्यापाड्यांतील गरीब, होतकरू व गरजू विद्यार्थ्यांची सोय करावी एवढाच ' स्वावलंबी शिक्षण योजने 'चा हेतू नव्हता तर उच्च शिक्षण मोफत देता आले पाहिजे, हा प्रयत्न होता. त्यामध्ये, भारतीय जीवनात शारीरिक श्रमाच्या बाबतीत रूढ होऊन बद्धमूल होऊ घातलेल्या दोषांचा निरास करण्याचा ध्यास आहे. नवीन श्रमनिष्ठ परंपरा रुजविण्याचा प्रयास आहे. स्वकष्टाने मिळविलेल्या खऱ्या पैशाचा लाभ कसा घ्यायचा, विनियोग कसा करायचा व श्रमजीवींनी श्रम करीत बुद्धीचाही विकास कसा साधायचा अशा काही गोष्टींचे सकस बीजही या योजनेत अंतर्भूत आहे : " श्रमाची जोड असल्याशिवाय—तेही शारीरिक—श्रमबुद्धीचा विकास होणार नाही व त्यास तजेला चढणार नाही ", ही जीवनाच्या अनुभवातून अंकुरित झालेली श्रद्धा आहे. कर्मवीरांच्या स्वावलंबी शिक्षण योजनेचे सूत्ररूपाने मूलभूत उद्देश पुढीलप्रमाणे दिसतात :

१. गरिबी शिक्षणाच्या आड येता उपयोगी नाही. त्या दृष्टीने गरीब, होतकरू व कष्टाळू विद्यार्थ्यांना श्रमाच्या मोबदल्यात शिक्षणाच्या सर्व

सोयीसवलती उपलब्ध करून देणे.

२. विद्यार्थ्यांमध्ये 'श्रमाची प्रतिष्ठा' (Dignity of Labour) कशी दृढमूल होईल हे पाहणे.

३. शिक्षण घेत असताना श्रमाबद्दल नितांत आदर व कर्तृत्वाबद्दल आत्मविश्वास निर्माण झाल्यामुळे समाजाला भारभूत नव्हे तर उपयोगी ठरू या भावनेचे जोपासन करणे. त्यातून सामाजिक कार्य आपुलकीने आणि निष्ठेने करतील असे नागरिक समाजामध्ये निर्माण करणे.

४. श्रमाच्या प्रतिष्ठेबरोबरच समानता प्रस्थापित करणे. जीवन, श्रम आणि शिक्षण यांचा अन्योन्यसंबंध स्थापित करणे.

५. म. गांधीजींच्या मूलोद्योगी शिक्षणातील 'स्वावलंबी' कल्पनेला रूप प्राप्त करून देताना ग्रामीण शिक्षणपद्धतीची वाटचाल न्याहाळणे.

– शिक्षणाची साधना हा पुस्तकांशी चाललेला खेळ नाही. घाम गाळल्याखेरीज आणि त्या घामात आपल्या रक्ताचे बिंदू एकवटल्याखेरीज शिक्षणाची ज्वलन्त साधना होत नाही. शिक्षणाचे संस्कार दृढ बनत नाहीत. शिक्षणाने, वयाप्रमाणे माणसाचे मनही वाढावे अशी अपेक्षा असते. आणि धनुष्याची प्रत्यंचा ओढणे जसे सोपे नसते तसे मन वाढणेही सहजशक्य असते असे नाही. वयासारखा मनाचा तो अंगगत स्वभाव नसतो. म्हणून संस्कृतीला फार सावकाश धुमारे फुटत असतात.

याच ध्येयदृष्टीने कर्मवीरांनी हा प्रयोग सातान्यात केला काळा फत्तर फोडला. मुरमाड भाग उसकटून फेकला आणि नारळी व केळीचा बाग फुलविला. शिक्षणाने सगळा समाज व्यापून टाकायचा ही कर्मवीरांची कल्पना होती.

" There should not be a village without a school, and school without a trained teacher " असे कर्मवीर म्हणत. तसा त्यांचा प्रयत्न होता. त्यांनी झपाट्याने अनेक व्हॉलंटरी शाळा काढल्या, पण नुसत्या शाळा काढून आणि त्यात शिक्षक नेमून भागण्याजोगे नव्हते. त्यासाठी ट्रेंड शिक्षकांची अत्यंत गरज होती. १९३५ साली स्थापन झालेल्या 'म. फुले अध्यापक विद्यालया'ची निर्मिती या गरजेत आहे.

कर्मवीर फार शिकले नाहीत. पण जीवनाच्या अनुभवातून त्यांनी जे घेतले

ते चांगदेवाच्या कोऱ्या फलकाप्रमाणे नव्हते, ज्ञानाच्या माहात्म्याच्या अनुषंगाने जीवनाचा एक विशाल अनुभव त्यात केंद्रित झाला होता. नोकदार प्रतिभेची माणसे, तुटेन पण पळणार नाही या कडक जिद्दीची माणसे कर्मवीरांना निर्माण करावयाची होती. शिक्षणाविना ग्रामीण जीवनात पिढ्यान्‌पिढ्या खितपत पडलेल्या लोळ्यागोळ्यातील माणूस कर्मवीरांना जागा करावयाचा होता. नव्या जिद्दीचा, नव्या कल्पनाशक्तीचा, नव्या उमेदीचा, थोडक्यात नव्या जगाला शोभणारा नवा माणूस निर्मिणे हे कर्मवीरांचे ध्येय होते. त्यानुसार

१. श्रमांची प्रतिष्ठा, त्यातून निर्माण होणारे स्वावलंबी जीवन

२. जातिभेदातीत समाजरचना आणि

३. ज्ञानलालसेची तीव्र आवड निर्माण करणे

ही आपल्या कार्याची त्यांनी वैशिष्ट्ये ठरविली.

या वैशिष्ट्यांच्या आधारावर कर्मवीरांनी फुल्यांच्यापासून वाढत आलेली समाजाच्या शेवटच्या तळापर्यंत पोचण्याची आणि उत्थापन करण्याची परंपरा सांभाळली. कर्मवीर समाजात वाढले, त्यांचे अज्ञान त्यांनी पाहिले, पेटून उठले. काही तरी करायला हवे असे वाटले. भोवती निरखून पाहिले. कोणी काही करीत नसल्याचे दिसले. कर्मवीरांनी मग कुणाची वाट पाहिली नाही. स्वतःच उठले, आपला नांगर एकाकी चालवीत राहिले. मोठे काम केले. करताना द्वेष पसरविला नाही, रुजू दिला नाही. श्रम आणि ज्ञान यांनी युक्त असा विज्ञाननिष्ठ माणूस बनविण्याचा प्रयत्न केला. सहजीवन, सहभोजन आणि सहशिक्षण यांचा एक प्रयोग केला. कर्मवीरांच्याजवळ सर्वस्पर्शी सहानुभूती, विलक्षण कार्यशक्ती, अमाप ध्येयासक्ती आणि सहस्रनेत्र प्रज्ञा होती. सर्वांशी एकजीवपणाची दर्शक व समरसतेची नाती त्यांनी जोडली ती यामुळेच !

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात, आधुनिक भारताच्या उत्थानाच्या दृष्टीने झालेल्या चळवळींच्या वाटचालीचे ठसे स्पष्टपणे रेखांकित झाले आहेत. एका बाजूला पारतंत्र्याचे जोखड झुगारून देण्याचा अनिवार त्वेष आणि दुसऱ्या अंगास राष्ट्राच्या नव्या उभारणीची तळमळ; वाटा कुठल्याही घेतल्या तरी अवघडच होत्या, पण राष्ट्राच्या नव्या उभारणीची वाट अधिकतर खडतर होती. कर्मवीर भाऊराव पाटील अशा वाटेचे एक यात्रेकरू होते.

## जनता शिक्षणाचे विद्यापीठ

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सामाजिक शिक्षणामधील न्याय अचूक ओळखला आणि असंख्यांना तो मिळवून दिला. जीवनापासून दूर न नेता, जीवनाच्या संघर्षात उभे करून जीवनाचा अर्थच प्रथम समजून घेण्याचा, त्यामधील तीव्रता, त्यातील खंत, झळ इत्यादींपासून पलायन न करता त्याचे मोल आणि तोल जोखणाऱ्या शिक्षणपद्धतीचे–' जीवन पद्धतीचे '–कर्मवीर भाऊराव पाटील हे प्रेरक होत. संस्कृतीने संपन्न असे जीवन तेच जीवन होय. शिक्षण हा त्याचा एक अविभाज्य भाग. जीवनातील सुंदरतेसाठी, समृद्धतेसाठी, समर्थतेसाठी, शिक्षण घ्यायचे. त्यावेगळा शिक्षणाला अर्थच नसतो. त्या दृष्टीने कर्मवीरांनी ' जनता शिक्षण ' ( mass education ) केले असले तरी हा शिक्षणप्रसार केवळ साक्षरता-प्रसार नव्हता. वर्षानुवर्षे टिकून राहणारे शिक्षण केवळ साक्षरता-प्रसाराच्या पातळीवरचे असत नाही. शुष्क साक्षरता-प्रसार गौरवात संपत असतो. इथे तसे घडलेले नाही. कर्मवीर उत्तम अभिनय वठवू इच्छित नव्हते, तर खेड्यापाड्यांतील दीन-दुबळ्या जनतेच्या शिक्षणासाठी अवाढव्य बंड करून उठले होते. एवढे व्यापक बंड, शिक्षणाच्या क्षेत्रात, महाराष्ट्र देशात प्रथमच होत होते. असे काही पहिल्यादांच घडत होते म्हणून नवलाईचे होते असे नव्हे, तर या पहिलेपणात नैसर्गिक नेतृत्व तडफेने उभे होते हे नवल होते. नाना गतींनी अनेकांना ते धरायची धडपड करीत होते हे नवल होते.

' वर्कर्स युनिव्हर्सिटी 'च्या प्रणेत्याची ही महत्ता ध्यानात वागविली पाहिजे. ते आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील ज्ञानसेवकांची परंपरा वर्षानुवर्षे महाराष्ट्र देशाचे जोपासन आणि संवर्धन करीत आली आहे. ती अनंत आहे, अखंड आहे; अतएव विलोभनीय आहे. या परंपरेत कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांना उच्च स्थान आहे. आपल्या बोला-कर्तृत्वाने कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महाराष्ट्राची थोर शिक्षणपरंपरा पुढे नेली आहे. म. जोतिबा फुले यांच्या ध्येयधोरणापासून आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्यविस्तारातून प्रेरणा घेऊन कर्मवीरांनी १९०९ साली शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. या मुहूर्तमेढीमागे समाजातील

खचलेल्या, पिचलेल्या आणि पिळवटलेल्या अवघ्या दलितांच्या उद्धाराचा मंत्र हुंकारत होता. या दलितांमध्ये कुणा अमुक एका जातिपातीचा माणूस आणि यासाठी धडपड असा अर्थ अभिप्रेत नव्हता. अवघ्या जातिधर्मपंथांतील दलित —मग तो ब्राह्मण, मराठा, नाभिक, माळी, कोळी, साळी, कासार किंवा अस्पृश्य कुणीही असो—त्या प्रयत्नात, धडपडीत, विचारधारेत समाविष्ट होता. शिक्षणाच्या प्रारंभीच कर्मवीरांनी ही कोंडी फोडल्यामुळे मुहूर्तमेढीच्या गेल्या साठ वर्षांच्या प्रदीर्घ काळात भाऊराव पाटील यांनी संस्थापिलेल्या रयत शिक्षण संस्थेने महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात एक नवे पर्व तर निर्माण केलेच पण त्याबरोबरच शैक्षणिक—सांस्कृतिक क्षेत्रात एक नवा इतिहासही घडविला. कर्मवीरांनी कालचक्राला कलाटणी दिली आणि महाराष्ट्राचा इतिहास शंभर वर्षांनी पुढे नेला ! कदाचित या भूमीच्या ‘ पुण्यगंध माती ’ला कर्मवीरांच्या ‘ पुण्यतीर्थ जीवना ’चा स्पर्श घडला नसता तर बहुजनसमाज—दलित समाज-शंभर वर्षांनी मागे राहिला असता, पिछाडीला पडला असता. कदाचित् मुरझून सुकूनही गेला असता. त्याची दाद जगाच्या अपूर्व व्यापातापात कुणाला लागलीही नसती. आदरणीय डेक्कन एज्युकेशन सोसायटीपासून चालत आलेल्या महाराष्ट्राच्या शिक्षण परंपरेतील कर्मवीरांचा हा उदात्तरमणीय कर्मयोग आहे.

कर्मवीरांचे पुण्यतीर्थ जीवन विद्रोह, करुणा आणि विवेक या त्रयीवर उभे होते. उभी हयात ते उभे राहिले लोकांच्या उद्धारासाठी. सबंध आयुष्य ते अनवाणी चालत राहिले जनसामान्यांच्या कल्याणासाठी ! शिक्षणशक्ती ही अणुशक्ती आहे हे कर्मवीरांनी पहिल्यांदा बहुजनसमाजाला सांगितले. त्याच्या कानीकपाळी ओरडून त्याला जागविले. त्यामुळे समाजातील साधारणातल्या साधारणेतर माणसाच्या जीवनातील मरगळ दूर झाली. मने सकस बनली. वृत्ती उदात्त झाल्या. जीवनाचा गतिरोध संपला आणि चैतन्याने प्रस्फुरित जीवन कर्तृत्वाची क्षितिजामागून क्षितिजे धुंडाळू लागले. कर्मवीरांनी परिस्थितीचा कातळ फोडला. वादळाहून ते वादळ बनले. त्यावर स्वार झाले आणि नोकदार प्रतिभेची, धारदार कर्तृत्वाची, कडक जिद्दीची आणि अपूर्व झुंज घेऊ पाहणाऱ्या बाण्याची माणसे निर्माण करण्याचा निर्धार ठेवला; ज्ञान आणि श्रम यांनी युक्त असा विवेकनिष्ठ मानव उभा करण्याचा प्रयास राखला; त्यासाठी कर्मवीरांनी

महाराष्ट्राच्या कडेकपारीत, दऱ्याखोऱ्यांत ज्ञानाचे पाट खेळविले आणि महाराष्ट्राच्या बुद्धिवादाचे–बुद्धिवंतांचे वाभाडे काढले. त्यामुळेच जिव्हाळ्याने केलेल्या जीवनाच्या चिंतनातून अंत:प्रेरणेने निर्माण झालेल्या 'भाऊरावीय शिक्षणशास्त्रा'-नुसार, कित्येक शतके अश्रूंनी दारे ठोठावणाऱ्या अवध्यांचा उद्धार कर्मवीरांनी साधला आणि महाराष्ट्राच्या दीप्तिसंपन्न इतिहासामध्ये स्वत:च्या प्रतिमेचे एक सुवर्णपान खोवून ठेविले.

मात्र या सुवर्णपानाचे मोठेपण कर्मवीरांनी किती विद्यालये–महाविद्यालये काढली आणि किती हजार विद्यार्थ्यांना शिक्षण दिले यावर मोजता येणार नाही. हे मोजमाप उचितही नाही. तर, पिढ्यानूपिढ्या शिक्षणाला वंचित झालेल्या आणि त्यामुळे अडाणी राहिलेल्या गोरगरीब जनतेमध्ये शिक्षण घेण्याची एक अभूतपूर्व लालसा त्यांनी कशी निर्माण केली, त्यामध्ये ते आहे. त्याहूनही अधिकतर शिक्षण घेतल्यानंतर कोणत्याही प्रकारची आणि पद्धतीची माणसे उपजली, त्यांनी जीवनाच्या विविध क्षेत्रांत कोणत्या रूपाची, कार्यकर्तृत्वाची भर घातली आणि एकंदर जीवनाकडे त्यांचा पाहण्याचा कोणता विधायक दृष्टिकोण राहिला इत्यादी प्रश्नांच्या उत्तम उत्तरामध्ये, ते सामावलेले आहे. शिक्षण देण्याच्या आणि घेण्याच्या प्रक्रियेत 'दान' असले तरी 'योगदान' नाही आणि म्हणूनच महत्त्वाचा प्रश्न 'शास्त्रीय, शास्त्रपूत आणि शास्त्रोक्त माणूस' निर्माण होतो आहे की नाही, केला जातो आहे की नाही, हा आहे. या योगदानाने कर्मवीरांचे इतिहासातील नाव सुवर्णाक्षरांनी मंडित होणार आहे. अधिक तेजोनिधी बनणार आहे. केवळ संख्यात्मक मोजमाप हा त्याचा निकष नव्हे.

कर्मवीरांचा काळच असा होता की, शिक्षण घेणे आपले काम नाही, ते आपल्याला झेपणार नाही असा मनोगंड जाम रीतीने तत्कालीन गोरगरिबांच्या मानगुटीवर बसला होता. म्हणून या दलित जनतेला केवळ शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन भागणार नव्हते, तर ते शिक्षण त्यांना परवडेल, महत्त्वाचे वाटेल आणि ते त्यांना पचेल एवढी शक्ती त्यांच्यात निर्माण करणे जरूर होते. इंग्रजी शिक्षण अतिशय महागडे असल्याने त्यास 'वाघिणीचे दूध' म्हटले जाई. तथापि कर्मवीरांनी हे 'वाघिणीचे दूध' शेळीच्या दुधाइतके स्वस्त व मुबलक करण्याची प्रतिज्ञा करून त्याची पूर्तताही केली. त्यासाठी 'स्वावलंबी शिक्षण

योजने 'चा धडा दिला. 'शिका, शिका आणि शिका' हा कर्मवीरांचा मंत्र होता. शिकायला पैसा नाही म्हणून गप्प न बसता 'काम करा आणि शिका' असा त्यांचा आदेश होता. मुळात शिक्षणाची दृष्टी नाही. असलीच तर अतिशय कमी, त्यातच आर्थिक अडचणींचे अडणे ठायीठायी आडवे पडलेले! त्यातून मार्ग काढण्याची दृष्टी कर्मवीरांनी दिली. महाराष्ट्र शासनाने १२०० रु. उत्पन्नाखालील पालकांच्या पाल्यांना मोफत शिक्षणाची सोय केल्यानंतरही या योजनेची निकड वाटत राहावी हे तिच्या मूलभूततेचे प्रत्यंतर होय.

कर्मवीरांना श्रम आणि ज्ञान यांनी युक्त असा शिस्तबद्ध नागरिक तयार करावयाचा होता. मोडेन पण वाकणार नाही, पिचेन पण पळणार नाही असा माणूस; श्रम, ज्ञान आणि शिस्त यातूनच निर्माण होतो. कर्मवीरांची तशी धारणा होती. अट्टाहास होता. मराठी मातीला अभिमान वाटावा आणि छाती अभिमानाने फुलून यावी अशी कर्मवीर ही एक विभूती होती. या विभूतीला विभूतीच निर्माण व्हाव्यात असे वाटणे स्वाभाविक आहे.

म. जोतिराव फुल्यांच्यापासून चालत आलेली 'उत्तिष्ठित जाग्रत 'ची कडोविकडीची कार्यशीलता, महर्षी शिंद्यांच्यापासून समाजातील खालच्या थरापर्यंत पोचण्याची किमया, सयाजीराव महाराजांच्यापासून पुरोगामी प्रवृत्तीचा पुरस्कार आणि राजर्षी शाहू महाराजांच्यापासून वसतिगृहांचे माहात्म्य घेऊन, स्वतःचे 'भाऊरावीय शिक्षणशास्त्र' बनवून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी समाजातील खचलेल्या नि पिचलेल्या माणसाच्या जीवनातील मरगळ दूर केली. प्रत्यक्ष जीवनातून आणि भोवतालच्या परिस्थितीतून टप्प्याटप्प्याने विकसित होत गेलेल्या भाऊरावप्रणीत शिक्षणशास्त्रात भूतकाळातील 'अनुभव' आहे, वर्तमानातील 'परिस्थिती' आहे नि भविष्यातील 'जीवन' आहे. भाऊरावीय शिक्षणशास्त्रद्वारा, कर्मवीरांनी भकास मुरमाडित द्रष्ट्यांची विरणारी स्वप्ने मंतरलेल्या आशेने साकार केली. 'न त्वहं कामये राज्यं न स्वर्गं ना पुनर्भवम्। कामये दुःखतप्तांना प्राणिनामार्तिनाशनम्।' या ब्रीदाचा स्वीकार करून हयातीचे अर्धशतक 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' मांडला. कर्मवीरांच्या संघर्षमय आणि कार्यव्याप्त जीवनाने, अज्ञानाशी महामूर युद्ध केले. पिढ्यान्‌पिढ्या शिक्षणाला वंचित झालेल्या, केलेल्या, तुकारामाची गाथा किंवा ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी' तोंडपाठ पण ज्ञानेश्वरातला 'ज्ञ' कोणता हे सांगता न येणाऱ्या

बहुजनांच्या उत्थानासाठी सर्वस्पर्शी, सर्वव्यापी आणि सर्वगामी विराट चळवळ उभारणारे कर्मवीर भाऊराव पाटील महाराष्ट्र शिक्षणतज्ज्ञांतील अव्वल दर्जाचे 'शिक्षण–मुनी' होत. अविरतपणे चाललेल्या ज्ञानयज्ञात स्वतःच्या जीवन-ज्योतीची आहुती टाकणाऱ्या कर्मवीरांनी महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांतून, शेता-रानांतून आणि दऱ्याखोऱ्यांतून ज्ञानगंगेचे असंख्य प्रवाह खेळविले. अन्याय करणारी शक्ती, मग ती स्वकीय असो वा परकीय असो, मदांध झाली असेल तर तिच्याशी प्राणपणाने झुंज देऊन स्वतःची अस्मिता टिकविण्यावर, ती वृद्धिंगत करणाऱ्यावर कर्मवीरांचा मोठा भर होता. कौटुंबिक, सामाजिक आणि राजकीय तिन्ही आघाड्यांवर जागृतीचा लढा लढविताना कर्मवीरांनी ह्या विशेषाचा प्रत्यय आणून दिला आहे. कर्मवीरांनी घडविलेला ज्ञानयुद्धाचा इतिहास म्हणजे महाराष्ट्राच्या बुद्धिवादी अहंतेला दिलेले दाहक आव्हान आहे.

कर्मवीरांचा जन्म कर्मठ जैन समाजात झाला. अशा समाजात जन्मूनही कर्मवीर वृत्तीने सुधारक निपजले हा त्यातील महत्त्वपूर्ण अंश होय. कर्मठ जैनांची बहुतांशी सगळी तत्त्वे कर्मवीरांनी धुडकावून लावली नि बंडखोरीला घरापासूनच प्रारंभ केला. कर्मवीरांच्या वैयक्तिक जीवनातील बंडखोरीला अनन्य-साधारण महत्त्व आहे.

कर्मवीरांनी, आत्मविश्वासाचा मानदंड हाती घेऊन 'जीवन ही शाळा, अनुभव हा गुरू' करून बहुजनांना ज्ञानाची संजीवनी देण्याचे कार्य अंगीकारले. कर्मवीरांनी झापडबंद शिक्षणशास्त्राची भूमी जीवही उगवावेत इतकी सुपीक केली. 'भाऊरावप्रणीत शिक्षणशास्त्र' असा उच्चार होताच भुवया थाडथाड उडण्याचे प्रयोजन अर्थातच नाही.

## समाजवादी प्रयोगाचे विशेष

कर्मवीरांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानातून हाती येणाऱ्या घटकांची उतरंड अशी मांडता येते :

१. आवड नसणाऱ्या किंबहुना घृणा व्यक्त करणाऱ्या बहुजनांत तीव्र ज्ञान-लालसा निर्माण करणे.

२. शिक्षणाविना लोळागोळयाच्या अवस्थेत खितपत असणाऱ्या बहुजनाला शिक्षित करून आत्मप्रयत्नशील बनविणे.

३. पैशासाठी अडून न बसता, कुणाचीही लाचारी न पत्करता, मनगटाच्या जोरावर काम करून स्वावलंबनातून शिक्षण घेणे.

४. तसे ते घेताना-देताना मातृभाव वृद्धिंगत करणाऱ्या जातिभेदातीत वसतिगृहाच्या माध्यमातून देणे.

५. याती, जातपात, गोतधर्मपंथातीत कार्याचे स्वरूप सर्वसमावेशक (कॉस्मॉपॉलिटन) ठेवणे.

याखेरीज कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्याचे आणखी चार विशेष दिसतात :

६. कर्मवीरांच्या परमकारुणिक, त्यागी, तपःपूत जीवनाने सरकारी मदतीची मुळीच अपेक्षा न करता महान शैक्षणिक प्रयोग सुरू केला आणि अखेर-पर्यंत चालविला.

७. शैक्षणिक कार्याला वाहून घेतल्यानंतर राजकारणात भाग घेण्याची ऊर्मी कर्मवीरांना वेळोवेळी आली असली किंवा फुगून जाण्याइतपत लोक-प्रियता त्यांना राजकारणात मिळाली असली तरी ऊठसूट भपकेबाज राजकारणाच्या भ्रामक मृगजळापाठीमागे न धावता आर्थिक क्रांतीच्या यात्रेमध्ये सहयात्रिक होऊन देशाचा अभ्युदय साधण्यासंबंधीचा त्यांना लागलेला ध्यास.

८. 'सर्वांसाठी मी' या तत्त्वाचा अंगीकार करून निष्काम सेवेतच देशाच्या प्रगतीची भव्य स्वप्ने पाहणारा कृतिशील सेवकवर्ग असावा, ही कर्मवीरांची धारणा.

९. जातिपातीच्या विचाराहून जगात अनेक मोलाच्या गोष्टी आहेत. त्यांच्या अभ्यास-मनन-चिंतनातच जीवनाचा आब नि उद्धार आहे, ही कर्म-वीरांची मनोभूमिका.

कर्मवीरांच्या 'मानवतावाद' आणि 'तीव्र ज्ञानलालसा' या दोन तत्त्वांत सामावणाऱ्या उपरिनिर्दिष्ट विशेषासह 'स्वाभिमान, स्वावलंबन, स्वाध्याय व स्वातंत्र्य' ही कर्मवीरांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाची चतुःसूत्री आहे. १९१९ पासून कर्मवीरांनी खडकाळ महाराष्ट्राच्या कडेकपारीत या चतुःसूत्रीयुक्त शिक्षणाचे बी टाकण्याचा प्रयत्न केला. जागा मिळालेल्या ठिकाणी कर्मवीरांनी ते टाकले, रोवले. कर्मवीरांसारखी 'बडी' असामी पाठीशी 'खडा पहारा' करीत असल्याने त्यांनी लावल्या ठायीच कोमेजून माना टाकल्या नाहीत. ते वाचले,

पणात आले. जीवनाच्या केलेल्या जिव्हाळ्याच्या चिंतनातून निर्माण झालेल्या विचारानुसार प्रारंभी आखणीची निश्चित कल्पना नसताही शिक्षणाचे एक मनोहर उद्यान उभे राहिले. धारदार प्रतिमेची आणि नोकदार विचारांची, जिद्दीची शेकडो फुले फुलायला सुरुवात झाली. ग्रामीण संस्कृतीने शहरी संस्कृतीचा दिमाख जिरविला. भाऊरावांसारख्या ' ग्रामीण स्मृतिकारा 'ने आगळी ' युगस्मृती ' लिहिली.

माणसाने माणसाची प्रतिष्ठा जपली पाहिजे, माणसाने माणसाला कलंक लावता कामा नये ही कर्मवीरांची मनोभावना होती. साहजिकच मानव्याच्या उच्च भूमिकेवरूनच त्यांनी माणसाचा, त्याच्यातील परस्पर संबंधांचा, त्याच्या विकास–गतिरीतीचा विचार केला. वाटेल ती किंमत मोजावी लागली तरी हरकत नाही, पण मानव्याचे मूल्य टाकायचे नाही, विसरायचे नाही अशी पक्की गाठ भाऊरावांनी, मनाशी बांधली होती. म्हणून प्रसंग आला, दिसला, भेटला की भाऊराव त्याच्यामागे लागत.

पुढे जाऊन भाऊरावांनी सहजीवन व सहभोजन यांचा वस्तुपाठच दिला. समाजजीवनास जे जे म्हणून घातक, जे जे म्हणून अनिष्ट ते ते सारे निपटून काढायचे ही भाऊरावांची प्रतिज्ञा. १९०९ मध्ये दुधगाव येथे स्थापन केलेल्या 'दुधगाव विद्यार्थी आश्रमा'साठी भाड्याने घेतलेला वाडा भुताटकीचा आहे असे लोक म्हणत होते. पण भाऊरावांनी तोच आश्रमासाठी घेतला. भुताटकी वगैरे-सारख्या भोळ्या समजुतींवर त्यांनी जरासुद्धा विश्वास ठेवला नाही. जे अविश्वासार्ह, भावना आणि बुद्धी यांस न पटणारे ते फेकून द्यायचे–मग त्या मार्गात कुणाचा आणि कितीही विरोध होवो–ही भाऊरावांची शैली होती. ज्या गावी पिढ्यान्-पिढ्या शिक्षण म्हणजे काय हे माहीत नव्हते अशा खडतर ठिकाणी भाऊरावांनी ज्ञानाची रोपे लाविली; ती वढविली, फुलविली; ती याच ' पाटील शैली 'ने; म्हणून महाराष्ट्राच्या सार्वजनिक शिक्षणाच्या इतिहासात कर्मवीरांचे नाव अमृताक्षरांनी नोंद झाले आहे.

### सार्वत्रिक शिक्षणाचे पैलू

या नोंदीला ' सार्वत्रिक शिक्षणा 'चाच केवळ पदर नाही; तर त्याच्या लहान-मोठ्या अनेक छटा आहेत. बाल गुन्हेगार व अनाथ विद्यार्थ्यांना मार्ग

दाखविण्याच्या विकास योजनांची कार्यवाही ही त्यांपैकीच एक छटा. नॅशनल काँग्रेसचे एके काळचे अध्यक्ष अब्बास तय्यबजी यांच्या भगिनी मिसेस हमीद ए. अली यांचे आव्हान स्वीकारून विद्यार्थिनींना ट्रेनिंगचे शिक्षण देण्यासाठी ' जिजामाता अध्यापिका विद्यालय ' काढले; ही त्यांची आणखी एक छटा. ' महात्मा गांधी विश्वविद्यालय ' स्थापन करण्याची भाऊरावांची मनिषा हा या सगळ्या व्यापक मोहिमेचा कळस म्हणता येईल. नाव तेच नसले तरी शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेने कर्मवीरांच्या इच्छेला दृश्याकार लाभला असे मानायला हरकत असण्याचे अर्थातच कारण नाही.

कर्मवीर पाटील यांनी जनतेच्या अज्ञानाचा रथ ज्ञानाच्या पालखीतून वाहून नेला, आणि सामान्यातल्या सामान्यालाही जीवनाचे सोने बनत असल्याचा साक्षात्कार घडविला; त्यामागे जनता शिक्षणाचे अपूर्व अभियान उभे होते. सतत सेवारत वृत्तीने, भाऊरावांनी गुणसंपन्न व सामर्थ्यवान माणसे तयार करण्याची अखंड तळमळ उराशी बाळगली. तिचा ध्यास घेतला. त्या द्वारा महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात नवे ' पायंडे ', नव्या ' मेथड्स ' निर्माण केल्या. ज्याची दखल घेतल्याखेरीज ' भाऊरावीय शिक्षणशास्त्रा 'च्या विवेचनाला पूर्णत्व मिळणे अशक्य बनते.

## समाजवादी शिक्षणशास्त्राचा व्यावहारिक प्रयोग

कर्मवीरांच्या या कार्याचे रहस्य काय आहे? कशात आहे ते नेमके? कर्मवीर पाटील यांना सांस्कृतिक क्रांती करावयाची होती. ती त्यांना शस्त्राने, अस्त्राने साधावयाची नव्हती. त्यांच्या समोर तसा मुळी विचारच नव्हता. बहुजन समाजाला शिक्षण देऊन, शिक्षणाने जागृत व शहाणे करून त्यांना ही क्रांती उफाळून द्यावयाची होती. भाऊरावांनी घरापासून दारापर्यंत, कुटुंबापासून समाजापर्यंत, ' बंडे ' केली; त्यामागे ' सांस्कृतिक क्रांती 'ची ही संकल्पना होती. समाजातील हीण जळून जायचे, समाज संपन्न बनायचा तर अशा क्रांत्या वारंवार व्हाव्या लागतात. पुढील काळात महाराष्ट्राने त्या अधूनमधून पाहिल्या. म्हणून तर अनेक सेवाभावी संस्था आणि निरपेक्ष व्यक्ती स्वयंस्फूर्तीने समाजाच्या कार्यास लागल्या. अन्यथा अशी दृश्ये दुर्मिळ होती. चिमण्या–कावळ्यासारख्या, स्वतःच्या मुलाबाळांचा संसार करू पाहणाऱ्यांना अशा चित्रांच्या रेघोट्याही

मारता येत नाहीत. त्यासाठी रयतेवर प्रेम करणाऱ्यांचीच जरुरी असते. कर्मवीरांनी रक्ताचे पाणी आणि हाडाची पूड केली ती केवळ रयतेसाठी ! लौकिक संसार त्यांनीही केला पण तो लौकिकापुरताच होता. बहुजनांच्या शैक्षणिक आणि नंतर सर्वांगीण उद्धाराच्या अभिनव मंत्राचे जागरण हाच भाऊरावांचा खराखुरा संसार होता. उदार, समतावादी, सर्वसंग्राहक धोरणामुळे भाऊरावांना हा विराट संसार चालविण्यासाठी पैशाची कमतरता कधीच पडली नाही. लोकांनी दो करांनी भरभरून त्यांची सोय केली. ' दुसऱ्या स्वातंत्र्या 'चे उद्‌गाते जयप्रकाश नारायण यांनी म्हटल्याप्रमाणे भाऊरावांनी समाजवादी सिद्धान्ताचा व्यावहारिक प्रयोग केला. त्यात जातपातधर्मपंथभेद वगैरे काहीच नव्हते. कर्मवीरांवर काही मंडळी जातीयवादाचा आरोप करीत. ( आजही करतात. ) त्यात त्यांचे जैन ज्ञातिबांधवही होते. ते विचारीत, ' भाऊरावांनी आमच्यासाठी काय केलं ? ' इथे आमच्यासाठी म्हणजे आमच्या जातीसाठी असा खोचक भाव असे. पहिल्या पहिल्यांदा भाऊरावांनी त्याकडे दुर्लक्ष केले. प्रश्न मुरू दिला. पण एकदा त्यांनी आपल्या ज्ञातिबांधवांना दणकावून सांगितले :

' अरे खुळ्यांनो, मी कुणासाठी काही करतो असं नाही आणि कुणासाठी काही करीत नाही असंही नाही. मी करतो ते सर्वांसाठी. शंका घेणाऱ्या सर्वांच्या जातीचे कल्याणच मी साधत आहे. बहुजनसमाज सागरासारखा अफाट पसरला आहे. त्याला डावलून तुमच्यापुरते मी पाहात बसलो तर त्यांच्या रागाला बळी पडून तुमचं अस्तित्वच पुढं नाहीसं होईल. स्वतःच संपल्यावर कुणासाठी काय म्हणून करण्यात हशिल ते कोणतं ? कुणीही वेगळं नाही. बहुजनसमाजातच सर्वांचा समावेश होतो हे ध्यानात ध्या. '

प्रश्नकर्त्यांचे समाधान झाले की नाही हे सांगता येणार नाही; गरजही नाही. मात्र देशाच्या प्रगतीस लागलेल्या अनिष्ट जातिनिविष्ट किडीच्या मुळावरच कर्मवीरांनी कुठाराघात केला हे त्यांच्या कार्याचे मर्म निश्चितपणे समाधान देणारे आहे.

भाऊरावांच्या कार्याचे समग्र रूप समताधिष्ठित राज्याची कृतिनगरी असे होते. त्यासाठी त्यांनी आयुष्य वाहिले; आणि महाराष्ट्राच्या ग्रामीण जनतेत लोकशाही संस्कृतीची बीजे पेरली. त्यातून सामाजिक समतेवर आधारलेला

समाज निर्माण करण्याची प्रेरणा लाभली. ' लोकशाही संस्कृतीची निर्मिती ' या लेखामध्ये प्राचार्य नरहर कुरुंदकर यांनी सांगितले आहे ते लक्षात घ्यावे लागते. ते लिहितात : ' मार्क्सने असे म्हटले आहे की ' आयडियालॉजी ' ही जोपर्यंत ' आयडियालॉजी ' असते तोपर्यंत तिचा एक विचार म्हणून विचार करावा लागतो. पण ' आयडियालॉजी ' ज्या वेळेला एखाद्या समाजाने पत्करलेली असते तेव्हा तिला ' मटेरियल फोर्स 'चे स्थान मिळते. ( Ideology when adopted and accepted by the masses, it becomes a material force. ) भाऊराव पाटलांनी ग्रामीण भागाला संपूर्ण सुशिक्षित केल्यामुळे त्यांच्या समतेच्या चळवळीला ' मटेरियल फोर्स 'चे स्थान मिळाले. ते तसे नसते तर हा, नुसता उच्च सुशिक्षितांमधील शहरी लोकांच्या वर्तमानपत्रातला वादविवादाचा विषय बनला असता. म्हणून भाऊरावांचे महत्त्व एखादा विचार मांडण्यात किंवा सांगण्यात नाही तर त्या विचाराच्या पाठीमागे ग्रामीण जनतेची लक्षावधीची चळवळ उभी करण्यामध्ये त्यांची थोरवी आहे.[3] कर्मवीर भाऊराव पाटील यांचा पिंड समाजवादी आणि राजकीय क्रांतिकारकाचा होता.

### राजकारणाच्या मोहापासून दूर

त्यामुळेच कर्मवीर पाटील यांना समाजातील सर्वांना समान संधी मिळावी असे वाटत होते. समाजातील आर्थिक व सामाजिक विषमता नष्ट व्हावी असा त्यांचा प्रयत्न होता. ' सत्यशोधक समाजा 'च्या चळवळीत पुढाकार घेऊन त्यांनी लोकजागृतीचे काम केले आणि त्या चळवळीला त्यांनी विधायक स्वरूप दिले, ते या दृष्टीमुळेच ! भाऊराव शिक्षणाकडे सुद्धा जे वळले ते एक विधायक कार्य म्हणूनच ! राजकीय माध्यमातून, समाजात आपणास हवा तो बदल घडवून आणता येईल असे कर्मवीरांना वाटले नसेल असे नाही. पण शेवटी राजकीय प्रयत्नांवर मर्यादा खूप असतात. दबाव आणि दडपणे विपुल येतात. त्यामुळे जे आणि जेवढ्या प्रमाणात साधावयाचे गणित मांडलेले असते, ते साधले जात नाही. साहजिकच शिक्षणाचा निर्विघ्न आणि निर्वैर मार्ग अधिक फलदायी. ब्रिटिशांनी या देशात सुरू केलेल्या शिक्षणपद्धतीमध्ये दोष आहेत आणि ते या देशाच्या सर्जनशक्तीला, क्रयशक्तीला क्षय लावणारे आहेत, याची जाणीव कर्मवीरांना जरूर होती. पण संभाव्य बदल प्रत्यक्षात आणावयाचे

तेच सुरक्षित आणि ईप्सित साध्य करू पाहणारे एक प्रभावी आयुध होते. त्या काळात तरी त्यासाठी दुसरा पर्याय नव्हता. भाऊरावांनी तो स्वीकारला. अर्थात भाऊरावांचा मूळ पिंड राजकीय क्रांतिकारकाचा असल्याने अशा रीतीची ' शैक्षणिक चळवळ ' करताना त्यांना राजकारणाचा मोह पडला नाही असे नाही. पण त्यांनी तो प्रयत्नपूर्वक आवरला. राजकीय व्यासपीठावरील दर्शन शैक्षणिक चळवळीची हानी करणारे ठरणार याची अटकळ भाऊरावांना होती. म्हणून त्यांनी मते बाळगली, ती तडफेने बोलूनही दाखविली; बोलून दाखविल्यामुळे जी किंमत मोजावी लागते तीही त्यांनी मोजली; पण आपल्या अंगीकृत कार्याच्या सिद्धीसाठी त्यांनी राजकारणातील सक्रिय सहभाग कटाक्षाने टाळला. ९ ऑगस्ट, १९४२ ला घडलेल्या ' ऑगस्ट क्रांती 'मधील भूमिगत चळवळ्यांना कर्मवीर मधूनमधून भेटत, प्रेरणा देत, साहाय्य करीत. विद्यार्थी चळवळीला तर भाऊरावांचे सहकार्य सदाचेच होते. त्यांनी उचललेल्या गांडीव धनुष्यासारख्या शैक्षणिक कार्यामध्ये तरुण-तरुणींचा उसळता वर्ग हा तर आत्मा होता. १९४६ मध्ये सातारा जिल्ह्यातील कोंढवे गावी आझाद हिंद फौजेचे जनरल जगन्नाथराव भोसले यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या विद्यार्थी परिषदेला कर्मवीरांनी मार्गदर्शन केले होते. भाऊरावांनी जागोजागी केलेले असे मार्गदर्शन महाराष्ट्राच्या अभ्युदयाची मुहूर्तमेढ ठरली.

### शैक्षणिक प्रयोगांमागील दृष्टी

कर्मवीरांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या निरनिराळ्या प्रयोगांमागे ' शिक्षण हे समाजसुधारणेचे एक जबरदस्त साधन आहे ' ही बळकट श्रद्धा होती. शिक्षणाच्या या प्रक्रियेतून शेवटी काय साधायचे असते ? माणसाचा व्यक्तित्व-विकास आणि त्याचे चारित्र्यसंवर्धन ह्या दोन गोष्टी. शेवटी मोलाच्या ह्याच गोष्टी असतात. त्यासाठी शिक्षण असते आणि ते घ्यायचे सुद्धा त्यासाठीच असते, कारण त्यावरच देशाचा अभ्युदय अवलंबून असतो. नोकरी वगैरे मिळणे हा शिक्षणाचा फार दुय्यम हेतू झाला आणि शिकूनही नोकरी मिळाली नाही की शिक्षण कुचकामी ही बोलून दाखविली जाणारी कल्पनाही तशी जुनाट मानायला हवी. शिक्षण हे समाजसुधारणेचेच केवळ नव्हे तर समाजाच्या बदलाचे, त्याच्या परिवर्तनाचे, त्यामधील अंतःप्रवाहांना विधायक वाटा करून

देणारे आयुध आहे; हे त्यातले खरे रहस्य आहे आणि अंतिमत: तेच तेवढे खरे आहे. म्हणून ह्याला किंवा त्याला शिक्षण दिले की झाले, ह्या गटासाठी किंवा त्या समूहासाठी शिक्षणाची मापे टाकली की संपले असे नाही. तेवढ्याने शिक्षणाच्या प्रक्रियेचे काम पुरे होत नाही. शिक्षणाच्या प्रक्रियेतच सर्वांना समान संधी मिळण्याची हमी आहे. ती कुणा एकट्यादुकट्याची मिरासदारी केली तरी तसा वारसाहक्क कुणालाच मिळत नाही. शिक्षणाचे क्षेत्र हे राजकीय सत्तेसारखे वारसाहक्काचे क्षेत्र नव्हे. करील, झटेल, खपेल त्यांचा तो कर्मयोग आहे. म्हणूनच कर्मवीरांनी गट, समूह, पंथ असे न पाहता, तसले कसलेही विभाजन न करता ' सार्वत्रिक शिक्षणाचा पुरस्कार ( universal education ) केला. शिक्षण हे समाजसुधारणेचे, समाज बदलण्याचे अग्रगण्य आयुध आहे असे भाऊरावांनी मानले, तसेच सर्वांना शिक्षणाची समान संधी ( equality of educational opportunity ) मिळाली पाहिजे असेही त्यांनी मानले. अमुक एक प्रकारचेच नव्हे तर सर्व प्रकारचे सगळे शिक्षण सर्वांना सारख्याच पद्धतीने व सारख्याच सोयीसवलतीने उपलब्ध झाले पाहिजे अशी कर्मवीरांची भूमिकाच होती. आयुष्यभर या धारणेनेच त्यांनी काम केले. वसतिगृहासाठी साधीसुधी पण स्वच्छ राहणी, स्वावलंबन आणि जातिभेदातीतच नव्हे तर श्रीमंत—गरीबभेदातीत समता या त्रि-सूत्रांचा आचार राबवून दाखविला, तर स्वातंत्र्य, स्वाभिमान, स्वावलंबन व स्वाध्याय या चतु:सूत्रीचा अवलंब त्यांनी एकूण शिक्षणव्यवहारात केला. त्याचे कारण शिक्षणाने माणूस घडविता येतो आणि हा माणूस आदर्श माणूस असू शकतो, त्यातून नव्या सर्जनशील समाजाची निर्मिती करता येते अशी कर्मवीरांची दृष्टी होती. त्यांच्या एकंदर शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाचे ते सारच होते असे म्हणायला बिलकुल हरकत नाही.

अर्थात शिक्षण सार्वत्रिक झाले पाहिजे, सर्वांना शिक्षणाची समान संधी मिळाली पाहिजे एवढीच भाऊरावांची मागणी नव्हती; तर सार्वत्रिक शिक्षण मोफतही असले पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. शिक्षण सार्वत्रिक पण महागडे असले तर उपयोग काय ? ते शेळीच्या दुधाइतके स्वस्त हवे ही आस बाळगून भाऊरावांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. कर्मवीरांनी आपल्या संस्थेतर्फे काढलेले पहिले हायस्कूल आणि त्यानंतरचे पहिले महाविद्यालय ही दोन्हीही मोफत होती हे लक्षात घेतले की, भाऊरावांच्या या आग्रहामागील तत्त्व लक्षात येते.

भाऊरावांनी हायस्कूल, कॉलेज मोफत केले ही गोष्ट ३५ ते ४० वर्षांपूर्वीची आहे. आजकाल शासन, त्या दिशेने थोडी थोडी प्रगती करीत असले तरी शिक्षण पूर्णत: ते मोफत करू शकलेले नाही हे पाहिले की भाऊरावांनी त्या काळात केलेल्या साहसाचे आणि त्यांच्या दूरदृष्टीचे कौतुक वाटते. त्यासाठी त्यांनी 'स्वावलंबी शिक्षणा'ची (Education through self-help) कल्पना मांडली, ती राबविली. त्यातून 'श्रमाला प्रतिष्ठा' (dignity of labour) मिळवून दिली. दुसऱ्या अर्थाने त्यांनी 'कार्यानुभवा'चे वस्तुपाठच दिले.

**काही लक्षणीय मते**

या दृष्टीने एकूणच शैक्षणिक चळवळीच्या संदर्भात भाऊराव पाटील यांची काही मते, आवर्जून लक्षात घेतली पाहिजेत ती सूत्ररूपाने अशी :

१. शिक्षण ही पूर्णत: समाजाची जबाबदारी (social responsibility) आहे. परतंत्र राष्ट्रात तर ह्या जबाबदारीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.
   म्हणून परतंत्र राष्ट्रात समाजातल्या कर्त्या-धर्त्या समाजधुरीणांनी समाजातल्या क्रियाशील मंडळांच्या मदतीने सर्वांच्या शिक्षणाची सोय केली पाहिजे.
   स्वतंत्र राष्ट्रात ही राष्ट्राची जबाबदारी (State responsibility) ठरते. पण त्यामुळे समाजाची जबाबदारी कमी होते असे नाही; तर स्वतंत्र राष्ट्राच्या सहकार्याने ती अधिक भरीव बनते. त्या दृष्टीने प्रयत्न होणे जरूर ठरते.

२. शासनाच्या पातळीवरील कुठलेही काम हे नियम–निर्बंधांच्या काटेकोर चौकटीत अडकून पडत असल्याने त्याची गती स्वाभाविकच मंद असते.
   शिक्षण ही बाब गतिशील जगाशी, वाढत्या पिढीशी व समाजाच्या घडणीशी निगडित असते. थांबण्यात किंवा आडकून पडण्यात नव्हे तर सतत पुढे सरण्यातातला रस असतो.
   त्यामुळे कुठल्याही शासनापेक्षा खाजगी पातळीवर, विधायक भूमिकेने

काम करणाऱ्या शिक्षण संस्था शिक्षणाचे कार्य फार चांगल्या रीतीने करू शकतात.

३. खोगीरभरती माणसे शिक्षक झाल्याने कार्यभाग साधत नाही. त्यांचे पोट भरते पण शिक्षण होत नाही.

म्हणून शिक्षक ध्येयवादी, निष्ठावान व प्रशिक्षित असले पाहिजेत.

भाऊरावांच्या संस्थेची पहिली शैक्षणिक शाखा ( academic ) एक ट्रेनिंग कॉलेज होते हे ध्यानात घेतले की, या मताचे महत्त्व मनावर साहजिकच बिंबते.

४. समाजातल्या वरच्या वर्गातील सज्जनांनी खालच्या वर्गाकडे नेहमी सहानुभूतीने पाहिले पाहिजे आणि त्यांच्या अडल्यानडल्या निकडींना सदैव मदतीचा हात दिला पाहिजे.

कर्मवीर आपल्या संस्थेच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांपैकी वरच्या वर्गातील हुषार विद्यार्थ्यांकडे खालच्या वर्गातील विद्यार्थ्यांना शिकविण्याचे, त्यांच्या अभ्यासावर वा अन्य गोष्टींवर देखरेख करण्याचे काम सोपवीत; त्यांचे 'रिझल्टस' तपासून घेत.[४]

याच भूमिकेतून कर्मवीरांनीं अभ्यासात मागासलेल्या मुलांची विशेष काळजी घेण्याचा कटाक्ष राखला.

**मिशन व मिशनरी जीवनाचा आदर्श**

कर्मशीर भाऊराव पाटील यांनी महाराष्ट्राच्या अभ्युदयाची मुहूर्तमेढ रोवली. त्यासाठी समाजाच्या सर्व थरांत काम करण्यासाठी, अहमहमिकेने पुढे येणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या पिढ्यामागून पिढ्या त्यांनी निर्माण केल्या. धडक देऊन खडक फोडावयाचा आणि तेथे केळीच्या बागा फुलवायच्या या जिद्दीच्या पूर्ततेसाठी व समाजाच्या कल्याणासाठी त्यांनी 'फकिरी'चे सतीचे वाण लामणदिव्यासारखे जपले, जोपासले. प्रथम घोषणा, आणि त्या घोषणेचे काटेकोर बंधन मानून नंतर कामाची पूर्ती ही भाऊरावांची अनमोल कार्यपद्धती होती. या पद्धतीत अद्भुत चमत्कार नसून द्रष्टेपण होते, समाजक्रांतीचे ते बोलके यशही होते.

कर्मवीरांना, संख्याबळाला विद्याबळाची जोड द्यायची होती. त्याद्वारा,

सार्वजनिक हितार्थ सर्वसामान्य जनतेचे राज्य आणावयाचे होते. रयतेचे नेतृत्व करणारे आणि प्रत्यक्ष स्वतःच्या उदाहरणाने ते सिद्ध करणारे भाऊराव पाटील संदेष्टे होते. वेगळ्या शब्दात मिशन व मिशनरी जीवनाचा कर्मवीर भाऊराव पाटील एक उत्तमातले उत्तम भारतीय आदर्श होते, आहेत.

कर्मवीरांचा सेवा-योग नव्या काळाच्या अनुषंगाने कसा चालविला जाणार हा यापुढचा प्रश्न आहे. केवळ कर्मवीरांच्याच नव्हे तर म. फुले ते भाऊराव पाटील आणि नंतरच्या बहुजननेत्यांनी बहुजनांत ज्ञानाचा दीप पेटविला. त्यांच्या ऋणात्मक सेवेचा दीप आपण कसा तेजाळत ठेवणार आहोत, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

**संदर्भ :**


१. Education Commission : Bombay : Vol. II : Calcutta, 1884, p. 140–154.

२. वि. स. खांडेकर : 'रेषा आणि रंग' : पृ. ११५–११६.

३. नरहर कुरुंदकर : दै. 'पुढारी' : दिवाळी विशेषांक, १९७९ : पृ. १२.

४. इथे 'वर्ग' हा शब्द, सामाजिक प्रतिष्ठा व वर्ग या अर्थाने वापरला आहे संदर्भानुसार तो घ्यावयाचा आहे.

# ६

# बहुजनहिताय कार्य

" परजातिद्वेष हे राजकीय अथवा सामाजिक कारण जितके अस्पृश्यतेच्या मुळाशी वा वाढीशी संबद्ध आहे, त्याहूनही जास्त स्वकीय वृत्तीचा लोभ आणि परकीयांचा मत्सर हे आर्थिक कारण भारतीय अस्पृश्यतेच्या मुळाशी विशेषत: दक्षिण भारतातील अस्पृश्यतेच्या वाढीशी व दृढतेशी गुंतलेले आहे असे दिसते. जेथे जेथे उपऱ्यांनी तद्देशीयांच्या जमिनी व राज्ये बळकावली आहेत, तेथे तेथे असल्या ग्रामसंस्था ऊर्फ मालकी व बलुत्याचे विपरीत संबंध निर्माण झाले आहेत. एकंदरीत, ह्या ग्रामसंस्थेमुळे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे त्रैवर्णिक आर्य आणि शूद्र हा मागाहून ह्या अवस्थेत आर्यांनी आपलासा करून घेतलेला भिन्न वंश, यातील सर्व ग्रामस्थांचा योगक्षेम नीट चालून ग्रामबाह्यांच्या मात्र उन्नतीच्या सर्व वाटा बंद झाल्या आहेत. "

प्रस्तुतचे चिंतनशील उद्‌गार अस्पृश्यतेचे सखोल अभ्यासक, माणुसकीचे मोल चढविलेल्या व्यापक अंत:करणाच्या मानवतावादी कर्मशील सुधारक, महर्षी विठ्ठल रामजी ऊर्फ अण्णासाहेब शिंदे यांच्या ' भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न 'मधील आहेत. सामग्र्याने विचार करता, या देशामध्ये अस्पृश्यतेचा पहिल्यांदा साकल्याने विचार झाला आणि समग्रपणे मांडला तो महर्षी अण्णासाहेब शिंदे यांनी होय. त्यासाठी साऱ्या जगाची संवेदना हृदयात राखून जीवनयुक्त लोक उभे करण्याचा महर्षींनी प्रयत्न केला.

सारी माणसे सारखीच. मानव ही जात, माणुसकी हा धर्म; कोण श्रेष्ठ नी कोण कनिष्ठ ? सारे मातीतून आले नी मातीतच जाणार. शेवटी निधान माती हेच ! साडेतीन हाताचा वावर हा तर त्यास लागणारा आवाका ! अधिकाची

आवश्यकताच नाही. “ तुका म्हणे नाही वर्ण अभिमान। अवघे जीवनमुक्त लोक॥ ” वर्णाचा अभिमान वाईटच. त्याने ‘ पवित्र ते कुळ, पावन तो देश ’ला बाध येतो. मोक्ष अडून राहतो. यातायाती धर्म कुचंबून पडतो. व्यक्तिशः माणसाचा आणि व्यापकशः समाजाचा ‘ आत्मा ’ खिरू लागतो. माणुसकीचे अधःपतन होते. माणसाची माणसाबाबतची भावना, “ अवघ्या अभाग्याचे अश्रू उभे आमुच्या डोळ्यात, दुःखितांच्या वेदनांच्या कळा उरात आमच्याही : संवेदना साऱ्या जगाची आहे भरभरून ” अशी हवी. पण ही झाली काव्यातील अभिव्यक्ती; प्रत्यक्ष जीवनात त्याचे आविष्करण हवे. हिंदू समाजाच्या हाडीमाशी खिळलेला, खिळविण्यात आलेला अस्पृश्यतेचा जुनाट रोग तळासुळा-पासून कापून काढणे जरूरच होते. मानवतेच्या शीतल उन्हात जीर्णशीर्ण अस्पृश्यतेच्या दुलया अंगणात आणून धोपटून काढणे गरजेचे होते. अण्णासाहेबांनी हे पाहिले. अस्पृश्यांवरील जुल्म-जबरदस्तीच्या, अत्याचार-अन्यायाच्या कहाण्या त्यांनी ऐकल्या, अनुभवल्या. दलितांना प्राप्त करून देण्यात आलेल्या असहाय्यतेच्या आणि भीषण दास्याच्या वेदनांनी त्यांचे अंतःकरण विदीर्ण झाले. मग शांत कसे बसायचे ? ज्यांचा झगडणे हाच मुळी पिंड, अन्यायाविरुद्ध सक्रिय आक्रोश हाच मुळी धर्म, त्याने का गप्प बसायचे ? ते शक्य नव्हते. अण्णासाहेबांनी मग, लुंग्यासुंग्यांनी उभारलेल्या ढोंगासोंगांच्या, जुल्मजबरदस्तीच्या, अन्याय-अत्याचारांच्या, दास्य-छळाच्या, जातिभेदक विषमतेच्या मस्तकात मेकसू ठोकला. अगदी शांतपणे, अगदी धीम्या वृत्तीने, बुद्धीने साधारण असूनही केवळ हृदयाच्या निर्मळ रसिकतेने महर्षींनी ही किमया केली.

अण्णासाहेब मूलतः बंडखोर पण एकंदरीने वृत्तीने थंड. अण्णासाहेबांचा जन्म झाला इ. स. १८७३ च्या एप्रिल ता. २३ रोजी. महर्षी धरून एकूण भावंडे पाच. जगली त्यांचा हा हिशोब. महर्षी त्यात वडील, चुणचुणीत, हुशार तितकेच खोडकर, पण मुळात थोडी वृत्ती धार्मिकच. १८७९ पासून १८८४ पर्यंतची पाच वर्षे प्राथमिक शिक्षणात गेली. अभ्यासात गती सर्वत्रच सारखी राहिली. महर्षी सच्च्या अंतःकरणाचे सात्त्विक सद्गृहस्थ होते. आपली हुशारी म्हणूनच त्यांनी दिलखुलास वृत्तीने मान्य केली. त्या अनुषंगाने जीवनातल्या यशस्वितेचे कोडेही उलगडून दाखविले आहे. ‘ माझ्या आठवणी व अनुभव ’

या आपल्या रसाळ आत्मवृत्तपर ग्रंथामध्ये महर्षी लिहितात, " गणित असो, वा शास्त्र असो, भाषा असो वा व्याकरण असो, परकीय इंग्रजी असो वा मृत संस्कृत असो की मातृभाषा मराठी असो, माझी गती सारखीच अकुंठितपणे चाले. सर्व हायस्कूलच्या अभ्यासक्रमात मला अभ्यासाचे श्रम म्हणून कधी भासलेच नाहीत. ह्याचे कारण माझ्या हृदयाची निर्मळ रसिकताच होय. ही रसिकता मला शाळेपेक्षा घरातच अधिक; गुरूपेक्षा माझ्या आईबापांकडूनच जास्त मिळाली हे खास." महर्षी पुढे लिहितात, " माझ्या घरी जातिभेद नव्हता, तसा माझ्या हृदयात संस्कृतिभेदाचा किंवा पक्षपाताचा कृत्रिमपणाही नव्हता. सौंदर्य जेथे भेटेल तेथे ऊर्ध्वहस्ताने स्वीकारण्यास मी लहानपणापासून एका पायावर तयार आहे. मग ते इंग्लंडातले असो की स्वदेशातले असो, शहरातले असो की खेड्यातले असो, संस्कृत असो की प्राकृत असो, ते सहज व स्वाभाविक असले की पुरे ! मी त्याला बिलगलोच म्हणून समजावे." सौंदर्याचे वेचक कण टिपू पाहणारे महर्षी ' मराठ्याचे पोर ' खरे पण बुद्धीने साधारण असूनही ग्रहणशक्तीत मी मी म्हणणाऱ्यावर ताण करीत असे. विष्णुपंत गाडगीळ, त्र्यंबकराव खांडेकरप्रभृती त्यांच्या शिक्षकांचाच तसा अभिप्राय आहे. दरम्यान १८९१ साली, सुमारे वयाच्या अठराव्या वर्षी महर्षी मॅट्रिक पास झाले. इंग्रजी पहिलीपासून ते मॅट्रिकपर्यंत सारा शैक्षणिक कोर्स त्यांनी जमखिंडी हायस्कूलमध्येच पुरा केला. पहिला नंबर कधी टाकला नाही. स्कॉलरशिप कधी सोडली नाही. या स्कॉलरशिपचा घरी उपयोग झाला. धडाधड डोक्यावरची छत्रे उडून गेल्यानंतर आणि रामजीबाबांच्या बैरागीवृत्तीने दारिद्र्य पाठीशी येऊन खडे झाल्यानंतर महर्षींच्या स्कॉलरशिपला महत्त्व आले तर नवल नव्हते. या स्कॉलरशिपच्या आनंदाबरोबर कौटुंबिक वेदनाही त्यांनी साहिल्या. या वेदना न्याहाळताना, अनुभवताना वडिलधाऱ्या मंडळींच्या विचारआचारांचा महर्षींच्या मनावर अतिशय परिणाम झाला. आई हे त्यांपैकी एक दैवत ! स्त्री क्षणकालाची पत्नी असली तरी अनंत काळची माता असते. घरी सुबत्ता नाही, हालअपेष्टांना सीमा नाही. पोटी वाढणाऱ्या मुलांच्या भाराला मर्यादा नाही. वेदनांची केवळ गणती ती काय करावी ? ' माझ्या आठवणी व अनुभव 'मध्ये अनुपम प्रांजळतेने महर्षी लिहितात, "आमच्या आईला एकंदर वीस मुले झाली, एक खंडीभर अशी म्हण

आहे. त्यांपैकी एकाच वेळी पाचाहून जास्त केव्हाच नव्हती, ह्यावरून निदान पंधरा तरी मुलांचा शोक आईला करावा लागला. तिच्या प्रेमाला सीमाच नव्हती. ''

वडिलधारी मंडळी सहन करीत असलेल्या वेदना अनुभवीत आणि त्यांच्यापासून जीवनसमृद्धीचे संस्कार घेत महर्षी वाढले. महर्षींचे लग्न वयाच्या नवव्या वर्षी झाले. नवराबायकोचे नाते किंबहुना पतिपत्नी म्हणजे काय याची तोंडओळख नसताना मंगल घडले. महर्षींच्या जीवनात जुन्याच पद्धतीने साऱ्या गोष्टी घडत होत्या, विचार मात्र पुरोगामित्वाने पुढे दौडत होते. महर्षी खेळकरपणे लिहितात, '' माझी वधू माझ्या आत्या अंबूबाई हिची सर्वांत धाकटी मुलगी. ही पुरी वर्षाची तरी होती का नव्हती ह्याची शंकाच आहे. आई तर म्हणत होती की, ती सहा महिन्यांची होती. लग्नाचेवेळी तिला नीट बसताही येत नव्हते. '' एकूण आतबाहेरील सगळीच परिस्थिती बिकट होती, दुर्घट होती. जुन्या रूढी जोसात होत्या. मरू लागल्या असल्या तरी पणात आणण्याचा प्रयास होता. नव्या ग्रंथांना मज्जाव होता. नवेपणाला अडथळा होता. मनी तर अनेक शल्ये बोचत होती. काहीतरी करणे जरूर होते. पण अपुऱ्या शिक्षणावर ते जमणारे नव्हते. कॉलेजसाठी महर्षी पुण्याला आले पण पैसा कुठून आणायचा? कुणी ह्याच्याकडे बोट दाखविले, कुणी त्याच्याकडे, कुठे आशा दिसली, कुठे निराशा झाली. कुठे अपमान झाला, कुठे सन्मान मिळाला, पण एक किस्सा औरच आढळला. महर्षींना, तटलेली फी भागविण्याचा उपाय म्हणून पुण्याच्या शुक्रवार पेठेत डॉ. शेळके नामक कुणी मराठा गृहस्थ राहतात त्यांच्याकडे ' जा ' असे सुचविण्यात आले. महर्षींच्या मनाला असे जाणे बरे वाटले नाही. पण गरज काहीशी शरणागतीची जननी असते. डॉ. शेळके यांच्याकडे महर्षी गेले. काहीशा भयाने, काहीशा आशंकेने, काहीशा कावऱ्याबावऱ्या वृत्तीने. महर्षींनी शेळक्यांच्यासमोर ओळखचिठ्ठी धरली. शेळक्यांनी चिठ्ठी हातात घेतली. वाचली. डोळे तांबारले गेले, केस पिंजारले गेले. रावबहादूर नवलकरांनी चिठ्ठीत लिहिलेला मजकूर वाचून शेळके महर्षींवर कडाडले, '' मराठ्याच्या बीजाला तू बट्टा लावलास. मराठ्याच्या कुळात जन्माला आलास आणि लाजिरवाणे भिक्षापात्र अवलंबिताना तुला शरम नाही वाटत? पैसा नाही तर शिकायला सांगितलंय कुणी? जा गुरे राख, मोलमजुरी कर. चल, चालता हो इथून. ''

इतरांचा आसरा नव्हता, स्वकीयांचे धुडकावणे होते. एका अर्थाने, सर्वत्र कहार होता.

पण असल्या या सर्वगामी कहाराने महर्षींची रसिकता नष्ट झाली नाही. तिची टवटवी ताजीच राहिली. त्यांना अवमूल्यन ठाऊकच नव्हते. महर्षींनी सर्वांगांनी सर्व बाजूंचे संशोधन केले आणि केलेल्या तृप्ततेत, रिप व्हॅन विंकल-प्रमाणे पाय तणावून खुशाल पडून राहिले असे झाले नाही. मनातला सात्त्विकतेचा रस न आटू देता आणि दुसऱ्याच्या कोणत्याही कृत्याबद्दल वैरभाव, द्वेषबुद्धी यांना अंत:करणात थारा न देता त्यांनी सभोवतालची परिस्थिती पालटविण्यासाठी अव्याहत श्रम घेतले. दगडाचे चूर्ण करण्याचा हव्यास बाळगला. संशोधकबुद्धीच्या महर्षींनी विचाराला कृतीची जोड दिली.

या कृतीत, अस्पृश्यांची त्यांनी केलेली महान सेवा हा त्यांच्या आयुष्यातील अत्यंत मौलिक कार्याचा ठेवा ठरला. ता. १८ ऑक्टोबर १९०६ रोजी त्यांनी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया' ही संस्था काढली. अस्पृश्योद्धाराने त्यांना जीवनाची उंची सापडली. जीवन उन्नत करू पाहणारी धार्मिक भावना, या अस्पृश्योद्धाराच्या कार्याचा पाया होता. या कार्यामागील धर्म मानवतेचे अधिष्ठान घेऊन उभा होता. अवघ्या अभाग्यांचे अश्रू नेत्रात साठवून बसला होता. धार्मिक भावनेतून उद्‌भूत अस्पृश्यतेचे कार्य हे त्यांचे जीवितकार्य होते. अस्पृश्योद्धाराचे काम हे एक मिशन, एक देवदत्त कार्य अशी महर्षींच्या मनाची धारणा असल्याने अस्पृश्यांना ब्राह्मधर्मात ओढण्याचा महर्षींचा प्रयत्न होता की काय; असला पुस्तकी आक्षेप मुळीच उभा राहू शकत नाही. महर्षी ब्राह्मसमाजी असले तरी 'मुळात जुना धर्म टाकाऊ' म्हणून त्यांनी हिंदुधर्माचा अव्हेर मांडलेला नाही. "जनसेवा करावयास किंवा विचाराला औदार्य प्राप्त करून घेण्याला आपल्याला जुन्या धर्माच्या पोटात पुरेसा वाव नाही." असे मानून त्यांनी निराळा आखाडा घातलेला नाही, मात्र आपली चळवळ पूर्वकालीन विचारवंतांच्या ऐपतीवर चालवावी, असे त्यांना वाटलेले नाही. त्यांचे मन तितके कर्मठ नव्हते, हेकट नव्हते. महर्षींच्या या कार्याच्या मुळाशीच मुळी हिंदू संस्कृतीने पोसलेली पुष्ट धर्मभावना उभी होती. अस्पृश्योद्धाराचे कार्य हा महर्षींच्या कार्याचा मेरुमणी होय. महाराष्ट्रातील अस्पृश्यता-निवारण चळवळीचे जनक म्हणून म. फुले यांच्या कार्याला महत्त्वाचे स्थान आहे. पण पुढिलांच्या

कार्याची बैठक महर्षींनी तयार करून ठेवली. या कार्याला अखिल भारतीय स्वरूप महर्षींनी दिले. महर्षींनी याहून ज्या महत्त्वाच्या दोन गोष्टी केल्या त्या अशा : अस्पृश्यांच्या वस्तीत राहावयास जाऊनच या कार्याला त्यांनी सुरुवात केली. ' भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळी 'ची धुरा अस्पृश्यांतूनच निर्माण झालेल्या पुढाऱ्यांच्या खांद्यावर सोपवली. १८९६–९७ पासून राष्ट्रीय चळवळीचा सामाजिक सुधारणेच्या प्रश्नांशी तुटलेला संबंध सांधण्यास महर्षींनीच हातभार लावला. अस्पृश्योद्धाराच्या प्रश्नात महर्षी शिंदे यांची विशिष्ट दृष्टी, पक्क्या श्रद्धा आणि मूलगामी पद्धती होती. स्पृश्य आणि अस्पृश्य यांच्यामध्ये पसरलेल्या प्रचंड दरीमुळे अस्पृश्य समाज स्पृश्य समाजाविरुद्ध बंड करून उठेल ही कल्पना अयथार्थ होती. अस्पृश्य समाजाला कुणीतरी उठवून बसविल्याखेरीज त्याच्यात उठण्याचे त्राण येणारे नाही ही महर्षींच्या मनात पक्की खूणगाठ होती. म्हणून अस्पृश्य समाजासाठी स्पृश्य समाजाने संघर्षाची सिद्धता केली पाहिजे असे त्यांचे प्रतिपादन होते. धर्म हा ईश्वरप्रणीत नाही. माणसाने तो आचार व नीती यांवर अधिष्ठित केला आहे. त्यामुळे परिस्थितीनुरूप तो बदलला पाहिजे; असे महर्षींचे सिद्धान्तन होते. साहजिकच मातीखालच्या मातीत गाडल्या गेलेल्या, खचल्या-पिचलेल्या, दबल्या-मोडलेल्या ' सर्वांच्या पुनरुत्थानासाठी ' महर्षींनी अस्पृश्योद्धाराचे काम जीवितकार्य म्हणून अंगीकारले होते. त्यासाठी त्यांनी अस्पृश्यतेच्या मुळाचा शोध घेतला. महर्षी सांगतात :

" अस्पृश्यता ही एक स्वतंत्र मानवी संस्था आहे. हिचा उदय मानवी जातीच्या अगदी प्राथमिक स्थितीतच झाला असला पाहिजे. भूत, प्रेत, पिशाच्च इत्यादी कल्पना मानवी जातीच्या प्राथमिक म्हणजे अगदी रानटी स्थितीत सर्वत्र पसरलेल्या होत्या. तौलनिक धर्मशास्त्रात ह्या कल्पना-समुच्चयाला भूतवाद असे नाव आहे. हा भूतवाद व ह्याप्रमाणेच इतर प्राथमिक धर्माच्या अडाणी कल्पना व त्यावरून बनलेल्या जादूटोणा, थातुरमातुर इत्यादिकांना मी पुढे ' अपधर्म ' असे नाव दिले आहे. धर्माचा पाया मानवी प्रज्ञा आहे. तो जरी निष्काळजीपणामुळे विकृत झाला तरी त्याला मी ' अपधर्म ' हे नाव देणार नाही. रागावलेल्या भुतांना संतुष्ट करणे किंवा एखाद्या भुताला लाच दाखवून किंवा एखाद्या

भुताला भेडसावून त्याच्याकडून आपल्याला इष्ट असा अर्थ किंवा अनर्थ घडवून आणणे शक्य आहे, अशी प्राथमिक मानवाची समजूत आहे. ह्या समजुतीप्रमाणे जादूटोणा, मंत्र-तंत्र, यंत्र वगैरे जे अपधर्माचे अनेक प्रकार असत त्याला 'अविचार' (Magic) असे एक सामान्य नागर नाव देता देईल. ह्याचे 'कृष्ण अविचार' (Black magic) आणि 'भेषज' अथवा 'शुक्ल अभिचार' (White magic) असे दोन मुख्य प्रकार सुधारलेल्या वैदिक काळातही होते. जन्म, मृत्यू, साथीचे रोग व इतर आकस्मिक आपत्ती ह्यांचा संबंध प्राथमिक जगात भुताखेतांकडे आणि क्रुद्ध देवतांकडे लावण्यात येत असे. त्याचे निवारण करण्यात निष्णात असे पंचाक्षरी अथवा वैदू (Medicine man) होते. तेच पूर्वकाळचे पुरोहित असत. त्यांच्या बऱ्यावाईट क्रियांना जादू किंवा अविचार म्हणता येईल. ह्या जादूचा प्राचीन धर्मात समावेश झाला, तो अद्यापि पुष्कळ ठिकाणी सामान्य जनतेत प्रचलित आहे. ह्या अपधर्मातच अस्पृश्यतेचा उगम आहे..."

"प्रथम प्रथम ही अस्पृश्यता वैयक्तिक व प्रासंगिक ऊर्फ नैमित्तिकही होती. बाळंतीण व तिची खोली, मृताची जागा व आप्त, विशिष्ट रोगी, झपाटलेली माणसे, विक्षिप्त झाडे, खुना-सारख्या अपघाताची ठिकाणे वगैरे बाबी अस्पृश्य आणि वर्जनीय ठरल्या. जादूगार आणि पुरोहित हे, म्हणजे एक प्रकारे अस्पृश्य असत. देवपूजा करणाऱ्या ब्राह्मणाला आणि यज्ञपरिषद चालू असे तोपर्यंत सर्व ऋत्विजांना आणि इतर याज्ञिकांना नेहमी सोवळ्यात म्हणजे अस्पृश्य अथवा अलग स्थितीतच राहावे लागे. अशा अपधर्माला उत्तरोत्तर जसजसे गूढ आणि दृढ स्वरूप प्राप्त होऊन पुरोहिताच्या द्वारे त्याची परंपरा आणि घटना बनत चालली, तसतशी या अस्पृश्यतेच्या वैयक्तिक आणि स्थानिक स्वरूपाची परिणती जातीय आणि सार्वत्रिक ऊर्फ नित्य स्वरूपात होऊ लागली आणि अस्पृश्यतेचे मूळ कारण हा जो अविचार-



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३२२२
दा. क्र. २५७७२
नोंद २५।१।८६

मूलक अपधर्म तो जरी पुढे लुप्त होऊन विस्मृत झाला तरी जातीय अस्पृश्यता शिल्लक उरलीच, " ... ( 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' : पृ. १२–१४ )

महर्षींच्या या सखोल विचार-कृतीमुळे भारतीय अस्पृश्यतेच्या उद्धारकाचे विरुद त्यांना आपसूक बहाल होते, पदवीदान समारंभ करून त्याचे प्रदान करण्याचे प्रयोजन उरत नाहीं.

कर्मवीर शिंदे यांनी 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' या ग्रंथात अस्पृश्यतेची पाच निरनिराळी कारणे दिली आहेत, ती अशी :

१. धंद्याच्या हीनपणामुळे
२. प्राचीन काळी स्वतंत्र, पण पुढे जिंकले गेल्यामुळे
३. बौद्ध व इतर पाखंड मानलेल्या धर्मांतून हिंदुधर्माच्या अमलाखाली विनाअट न आल्यामुळे
४. जंगली अवस्थेत राहिल्यामुळे
५. मनुस्मृतीत वर्णिलेल्या, व्यभिचारी अथवा गुन्हेगार इत्यादी प्रतिलोमामुळे.

या कारणांच्या संदर्भाने कर्मवीरांनी भारतीय अस्पृश्यतेसंबंधी केलेली मूलगामी चर्चा त्यांची व्यासंगी वृत्ती आणि सखोल दृष्टी यांचा ठोकताळा देते. मात्र महर्षी शिंदे यांनी केवळ चर्चाविनिमयच केलेला नाही तर मार्ग सांगून त्याप्रमाणे कृतीही केली आहे. असा विचार आणि आचार करणारे कर्मवीर शिंदे हे पहिले भारतीय हे ध्यानात घेतले की, त्यांनी अवलंबिलेल्या विचार-आचारपद्धतीचे अतुलनीय महत्त्व सहजीच ध्यानी येते.

अस्पृश्योद्धाराच्या मार्गासंबंधी विवेचन करताना, कर्मवीर शिंदे यांनी १९२५ साली सातारा येथे भरलेल्या प्रांतिक सामाजिक परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात म्हटले आहे, "हल्ली अस्पृश्योद्धाराबद्दल जरी पुष्कळ गाजावाजा केला जात असला तरी या कार्याची खरी कळ राष्ट्राच्या अंतःकरणास जाऊन झोंबलेली नाही, असे म्हणणे मला भाग आहे." पुढे 'सांप्रदायिक अस्पृश्यता' या मुद्द्यासंबंधी कर्मवीर सांगतात, "या विशिष्ट प्रकारच्या अन्यायाला जे बळी पडलेले आहेत त्यांच्यामध्ये याबद्दलची जी जाणीव व जागृती उत्पन्न व्हावयास पाहिजे, ती उत्पन्न करण्याचे प्राथमिक काम बहुतेक यापूर्वीच होऊन चुकले आहे.

आता आम्हास सोडवावयाचा बिकट प्रश्न विचारप्रांतातला नसून तो इच्छाप्रांतातला आहे. आता यापुढे या प्रश्नाचा आणखी ऊहापोह व्हावयास पाहिजे, अशातला प्रकार नाही. पण आमच्या विचारांचे प्रत्यक्ष कृतीत रूपांतर कसे व्हावे हाच काय तो प्रश्न आहे. यासंबंधीचे विचार कितीही पूर्णत्वास पोचले, तथापि त्यांच्या योगाने आमच्या हातून प्रत्यक्ष कृती घडण्यास जी इच्छाशक्ती अवश्य आहे, ती आमच्यात प्रादुर्भूत होईल असे म्हणता येत नाही—" ('शिंदे लेखसंग्रह' : मंगुडकर मा. प., (संपा.) पृ. २६९)

या विचारसूत्रानुसार कर्मवीर शिंदे यांनी विनम्रपणे आपल्या कामास प्रारंभ केला. अस्पृश्यांसाठी रात्रीची शाळा उघडली. 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन'ची स्थापना केली. निराश्रित स्त्रियांसाठी 'सेवासदन' उघडण्यात आले. रुपी फंडाची योजना आखली. मिशनतर्फे, विद्यार्थ्यांच्या हातांना व डोळ्यांना उद्योगाचे वळण लागावे म्हणून औद्योगिक शाळा काढल्या. 'अहिल्याश्रम' उघडला. हे सारे कर्मवीरांनी अनेक अडी-अडचणींवर मात करून अत्यंत विनम्र भावनेने केले. कर्मवीर शिंदे यांनी १९०६ साली मिशनच्या वतीने अस्पृश्यांसाठी पहिली शाळा उघडली, त्या वेळी अध्यक्ष सर न्या. चंदावरकर ह्यांनी जमलेल्या मुलांना पहिला धडा घालून दिला. त्या प्रसंगी न्या. चंदावरकर म्हणाले, "ह्या नीच मानलेल्या लोकांना वर आणण्याचा प्रयत्न करण्याने आम्ही स्वत:लाच वर आणीत आहोत. हे पवित्र कार्य करीत असता ह्या लोकांचा आम्ही उद्धार करणार हा घमेंडीचा विचार आमच्या अंत:करणात न शिरो आणि आम्हा सर्वांना ह्या घोर अन्यायामुळे जी अधोगती मिळाली आहे ती टळून सर्वांचा सारखाच उद्धार होणार आहे, असा साधा आणि सात्विक भाव आम्हामध्ये निरंतर जागृत राहो." न्या. चंदावरकरांच्या या उद्गारातून व्यक्त होणारी विनम्र दृष्टी हा कर्मवीरांचा अंगीकृत कार्याकडे पाहण्याचा नम्र दृष्टिकोणच आहे. तो फक्त शब्दांतूनच प्रकट होणारा नाही, तर महर्षींच्या कार्याचे स्वरूप आणि पद्धती यामधून व्यक्त होणारी ती विनम्रता आहे. आपल्या कार्याच्या प्रचारपद्धतीविषयी कर्मवीर सांगतात, "अस्पृश्यता निवारण हे मोठे जागतिक कार्य आहे, खंडवजा भारतासारख्या देशसमूहावर ह्या कार्याचा प्रयोग करणे हे काही लहानसान कृत्य नव्हे. कार्य मोठे पण कार्यवाह लहान; पण विभूतीची वाट पाहात बसण्याचा अवसर कोठून आणणार? विभूतीची वाट पाहण्यात बराच काळ

अगोदरच लोटून गेला होता. अलौकिक, लोकोत्तर विभूती आणि सामान्य माणसांची घटना ह्या दोहोंचे मी समाजदृष्ट्या विद्यार्थिदशेत थोडेबहुत आकलन केले होते म्हणून विभूतिवादावरील माझा विश्वास कमी होऊन, सामान्य माणसाच्या घटनात्मक प्रयत्नाकडे माझा कल विद्यार्थिदशेतच होऊ लागला होता. थॉमस कार्लाईलचा विभूतिवाद आणि हर्बर्ट स्पेन्सरचा सामान्य माणसाचा घटनात्मक प्रयत्नवाद ह्या दोहोंची तुलनात्मक मीमांसा मी तरुणपणीच केलेली होती. म्हणून अस्पृश्यता-निवारणाचे कामी आधुनिक काळात कोणी विभूती पुढे येत नाही आणि मी तर स्वतःस अत्यंत सामान्य माणूस मानतो, ही वस्तुस्थिती पाहून मी हताश झालो नाही. श्रद्धेने पर्वत हालतात ह्या खिस्तोक्तीची प्रचीती पाहण्याची वेळ आली होती. श्रद्धा मग ती एखाद्या विभूतीची असो वा सामान्य माणसाची असो, श्रद्धा ती श्रद्धाच ! तिने पर्वत हे हललेच पाहिजेत !'' आपल्या कार्यामागील महर्षींच्या या श्रद्धेत राजकारण–समाजकारणाला आध्यात्मिकतेची डूब देण्याची मनोमन इच्छा आहे, त्यात त्या कामाचे पावित्र्य आणि शुद्धता, उंची आणि खोली यांचा आढळ, महर्षींच्या अस्पृश्योद्धाराच्याच काय पण साऱ्याच कामात हे पावित्र्य भरून राहिले आहे.

महर्षींनी अवघ्या दलितांचा संसार मांडला होता. काम दगदगीचे होते, गुलाबी जीवनाचा त्यास वास नव्हता. त्यामुळे अनंत अडीअडचणी अपरिहार्य ठरल्या, पण समर्पणाच्या भावनेने अन्याय्य रूढीच्या निर्दालनासाठी अट्टाहास मांडला. हा अट्टाहास दिखाऊ, उपरा किंवा केवळ भावनात्मक नव्हता. समतेचा पुरस्कार करणाऱ्या महर्षींच्या सात्त्विक वृत्तीच्या सुधारकीपणाला अध्ययनाची, संशोधनाची भक्कम बैठक आहे; सांगायचे ते स्पष्ट सांगणे आहे, मांडायचे ते निर्भीड आहे. कुठेही लेचेपेचेपणा नाही. भागवतधर्माच्या विकासापासून तो कानडी-मराठी किंवा कोकणी–मराठीपर्यंत आणि अस्पृश्यांच्या राजकारणापासून तो ब्रह्मदेशातील बहिष्कृत वर्गापर्यंत सर्वत्र हे संशोधन-कार्य उभे आहे. ते प्रासंगिक असले तरी ' पर्मनंट ' ठरणारे आहे. त्यात समाजोद्धाराची तळमळ, विद्वत्तेची खोली व बुद्धीची चमक आहे. मूलग्राही विचार, व्यापकदृष्टी, सडेतोड परंतु संयमी टीकेचा आवाका आहे. सर्वच दृष्टींनी आजच्या हलक्याफुलक्या काळात, महर्षींच्या या संशोधनबुद्धीचे महत्त्व अधिकच जाणवते.

महर्षींचे सर्व आयुष्य परिश्रमाचे काम करण्यात गेल्यामुळे मोठमोठे ग्रंथ

तयार करण्यासाठी त्यांना वेळ मिळाला नाही. पण त्यातूनही त्यांनी जी प्रवास-वर्णने, धर्मोपदेश केले ते थोडेफार संग्रहित करून ठेवले आहे. त्यांपैकी कित्येक गोष्टी आज नेमक्या अचूक नी नेटक्या असल्याच्या आढळतात. महर्षींचा पिंड तत्त्वाचिंतकाचा आहे, संशोधकाचा आहे. त्याला समुद्राच्या तळाशी खोल बुडी मारून मोत्ये शोधण्याची अनिवार हौस आहे. इतिहास हा त्यांचा आवडता विषय. भारतीय आर्यभाषांप्रमाणेच द्राविड भाषांशीही त्यांचा चांगला परिचय; तुलनेने कोणतीही गोष्ट न्याहाळून घ्यावी ही मनाची वृत्ती. यामुळे लालित्यापेक्षा विचारसौंदर्याचे सामर्थ्यच अधिक भेटते. त्यांच्या व्यक्तित्वाप्रमाणेच त्यांची भाषा सहजमनोहर आहे. तिला सूक्ष्म निरीक्षणशक्तीची व जागृत सामाजिक मनाची जोड मिळते तेव्हा ती एकदम फुलून येते.

त्यासाठी, महर्षींनी ' माझ्या आठवणी व अनुभव ' हा हृद्य आठवणींचा लिहिलेला ग्रंथ वरवर चाळला तरी पुरेसा आहे. डॉ. कोलते यांनी म्हटल्याप्रमाणे, त्यातून ' एका सात्त्विक सत्पुरुषाचे विनम्र निवेदन ' आपण वाचीत असल्याचा प्रत्यय पदोपदी येतो. आत्मचरित्रकाराला तंतोतंत सत्यकथनाची, आढ्यताहीन शालीनतेची आणि गौरवापलीकडील निंदेची सवय असावी लागते. एकूणच त्याला मिळालेल्या, त्याने पेरलेल्या, स्वीकारलेल्या जीवनक्रमातून त्याच्या मनाची व जीवनाची घडण कशी झाली, त्याने त्याच्या अस्मितेस कसा आकार दिला; याचा संयत पण वेधक आढावा आत्मचरित्रकारापासून अपेक्षित असतो. कर्मवीर शिंदे यांनी लिहिलेल्या ' माझ्या आठवणी व अनुभव 'मध्ये याचा प्रत्यय मिळतो. या ' आठवणी व अनुभव ' कर्मवीरांनी लिहिल्या त्या, " स्वतःच्या करमणुकी-साठी, दुसऱ्यांच्या नव्हे, बोधासाठी तर नव्हेच नव्हे, " असे त्यांनी म्हटले आहे; ते सर्वार्थाने सत्य असून मूलतः या ' आठवणी ' विरंगुळा म्हणून सांगितल्या असल्यामुळे उभ्या आठवणी–अनुभवांच्या ठायी प्रांजळता आणि प्रसन्नता भरून राहिली आहे. आयुष्यात अनेक बरेवाईट अनुभव वाट्याला आले, टीका-टिप्पणी सहन कराव्या लागल्या; पण कर्मवीरांनी त्या संयमाने भोगल्या, पचवल्या. राग, द्वेष, मत्सर इत्यादी मार्गांनी त्याचे प्रदर्शन केले नाही, झाले नाही. ते स्वभावात नव्हते.

साहजिकच कर्मवीरांच्या इतर कार्याइतकेच त्यांच्या ' आठवणी व अनुभव '-मधील कौटुंबिक भावशीलता महत्त्वाची अतएव हृदयंगम आहे; जीवनाच्या

गुंतलेल्या व गुरफटलेल्या भावनांचे मर्मबंध उकलून दाखविणारी आहे. महर्षी अण्णासाहेब शिंदे यांनी रंगविलेला बालपणीचा वृत्तान्त त्याची साक्ष आहे. कर्मवीरांची आईसंबंधीची भावना, दृष्टी आणि आदर लक्षणीय आहे. त्यामधील समरसता व सहृदयता उल्लेखनीय आहे. आई-बाबांचे वैवाहिक जीवन, सासुरवास इत्यादी गोष्टींचे वस्तुस्थितिदर्शक वर्णन करून कर्मवीर लिहितात, " या सर्व करुण रसाने भरलेल्या नाटकात मुख्य नायिकेचे पात्र माझी आई—साध्वी यमुनाबाई—ही होय. " कर्मवीरांनी आईच्या जीवनातील कारुण्य अचूक टिपले आहे. आईच्या हालअपेष्टांचे वर्णन करताना ते लिहितात, " घरचे काम इतके पडे की, त्याचा एकदा हृदयद्रावक परिणाम घडला. मी पाचवा मुलगा. माझ्या अगोदरचा कृष्णा म्हणून एक मुलगा होता. तो रंगाने उजळ आणि पिंडाने गुटगुटीत होता. सुमारे सहा महिन्यांचा असताना आईच्या अंगाखाली चिरडून झोपेत कधी मेला ते तिला कळलेच नाही. त्याला पाजीत असताना आईला गाढ झोप लागून, मुलाचा दम कोंडून सकाळी तो मेलेला आढळला! मग तिच्या आकांताला व आईच्या हालाला कोण सीमा असणार!! हा प्रकार इ. स. १८७०—७१ मध्ये घडला असला पाहिजे. " (' माझ्या आठवणी व अनुभव : पृ. २२ ) कर्नाटकी पीळाचा, पहाडी व्यक्तिमत्त्वाचा हा विचारवंत कारुण्याने गलबलून येतो, मात्र त्याने तो भावविवश होत नाही. तटस्थतेने कर्मवीर त्याचे चित्रण करतात; या चित्रणाला उच्च नैतिक मूल्यांचे लागेबांधे चिकटलेले आहेत. आईच्या गोष्टी सांगताना कर्मवीरांनी हा पदर धरून वाटचाल केली आहे. महर्षी सांगतात, " दर दुसरे वर्षी आमच्या आईचे बाळंतपण हे ठरलेलेच असे आणि त्या वेळी मागले मूल काही जिवंत नसे. बाळंतपण, मुलांचे आजार किंवा मरण याखाली माझ्या आईची सर्व शक्ती खचली. तरी पण मुलांचा कंटाळा किंवा संसाराचा तिटकारा किंबहुना दुःखाचा किंवा निराशेचा एक उद्गारही कधी आईच्या तोंडातून आमच्या कानावर आला नाही. उलट दारिद्र्याच्या असह्य वेदना, नवऱ्याचा रागीट स्वभाव व मुलांचा जोजार सोसूनही आम्हा लहानग्यांना नेहमी आपल्या माहेरच्या सुखदुःखाच्या गोष्टी रसिकपणाने सांगून आई आमची गोड करमणूक करीत असे. आईच्या गोष्टी व गाणी हाच आमचा मोठा मेवा होता. तिची आनंदी आणि विनोदी वृत्ती हीच आमची विश्रांती होती. तिच्या गोष्टींची आम्हाला पुढे पुढे चटच लागली. इतकी की,

जर भूक लागली असली, स्वयंपाकाला अवकाश असला, किंबहुना भाकरीबरोबर खावयास चांगली भाजी नसली, तर आम्ही आईच्या काठवटीभोवती जमून तिला गोष्टी सांगण्यास लावीत असू. मग तिने आम्हास अशा प्रेमळ कहाणीत गुंतवावे की, स्वयंपाक केव्हा झाला, आम्ही काय खाल्ले की मुळीच काही खाल्ले नाही याचे आम्हास भान राहात नसे. बाबा एखादे वेळी रात्री उशिरा घरी आले की, आमच्या गोष्टीची मेजवानी लांबे. केव्हा केव्हा आम्ही वन्समोअरही म्हणत असू! एकंदर आईच आमची खेळगडी होती. आम्हाला बाहेरच्या खेळगड्यांची जरुरीच लागत नसे." ( कित्ता : पृ. २४ ) मातृहृदयाचे आणि मातृमाहात्म्याचे असे उदात्तरम्य काव्य महर्षींनंतर सानेगुरुजींच्याखेरीज अद्याप कुणी निर्माण केलेले नाही. आईची सहनशीलता अण्णासाहेबांनी आपल्या जीवनात परिपूर्णतेने अंगीकारली आहे. कर्मवीरांच्या जीवनात आईच्या स्थानाला—किंबहुना साऱ्याच वडिलधाऱ्या मंडळींच्या स्थळाला—व तिने मूकपणे दाखविलेल्या मार्गाला अपूर्व महत्त्व आहे. या स्वभावगुणामुळेच, कर्मवीरांच्या कामात, त्यांचे साथीदार व इतर त्यांना सोडून गेले, उघड विरोधही केला; पण त्याबद्दल त्यांच्या मनात राग नाही. गुणदोष समजावून घेऊन गुणदोषांसकट माणूस स्वीकारण्याची, पचविण्याची ताकद आहे. "माझ्या कामात यश मिळाले नाही. यशाची मला आकांक्षाच नव्हती. यशाची मला नीट व्याख्याच करता येत नाही, तर मी त्याची इच्छा तरी कशी करू?" असे त्यांनी म्हटले आहे ते याच निरागस, निर्भय भावनेनेच होय. कर्मवीरांचा हा अनासक्तियोग साऱ्या शिंदे घराण्याचाच विशेष आहे.

त्यामुळे कर्मवीर शिंदे यांच्या 'आठवणी व अनुभव' त्यांच्या अंतर्बाह्य व्यवहाराचे आरस्पानी चित्रण करणाऱ्या आहेत. संथ निळ्या डोहासारखे त्याचे स्वरूप आहे. एकाग्र व एकचित्त अशी कर्मवीरांची मूर्ती त्यातून साकार होताना आढळते. मानवी जीवनातल्या मधुर गुणांनी ती मंडित झालेली आहे. त्यामुळे तिच्यामध्ये कुठे अवडंबर नाही, आढ्यता नाही, आक्रोश नाही. सरळ सुतासारखी प्रांजळता आहे. अनेक जागी ती दृग्गोचर होते. "येथवर आठवणी लिहून कोणाचीच जन्माची किंवा मृत्यूची तिथी, महिना अगर निदान वर्ष तरी का लिहिले नाही याचे कारण मला माहीत नाही." असे कर्मवीरांनी 'माझी आई' या प्रकरणाच्या प्रारंभी म्हटले आहे. ( पृ. १९ ) तर एखाद्या घटनेचा

निश्चितार्थ अचूक आठवत नाहीसा पाहून "ही गोष्ट इ. स. १८८९ च्या डिसेंबरच्या महिन्यात घडली असावी." असे सांगितले आहे. कुठेही सत्याचा अपलाप होऊ नये याची दक्षता घेतली आहे. आजकालच्या 'मीच श्रेष्ठ' चा आव आणणाऱ्या 'कल्चर्ड स्टंट' मराठी आत्मचरित्रांशी ताडून पाहता जाणवणारे हे वेगळेपण एकूणच मराठी आत्मचरित्र साहित्याची खास उंची वाढविणारे आहे.

हे केवळ कर्मवीरांच्या आयुष्यातील, आगल्यामागल्या घटनांसंबंधीच खरे नाही तर स्वतःच्या स्तुति-निंदेसंबंधीही खरे आहे. चौदा रुपयांच्या अधिकच्या फीच्या मदतीसाठी कर्मवीर 'मराठा' शेळके यांच्याकडे जातात. डॉ. शेळके त्यांना खरपूस तासडतात; 'भिक्षापात्र' वगैरे काढतात. हा सगळा प्रसंग सांगून कर्मवीर त्यावर भाष्य करतात, "ती चिठ्ठीच नव्हे तर मजजवळचे १४ रुपयेही ह्या मराठा जमदग्नीपुढे ठेवून तेथून निसटावे असे मला झाले. माझ्या अंगाला घाम आला." (पृ. ९४) स्वतःच्या 'कंगालस्थिती' चे वर्णन करताना कर्मवीर पुढे लिहितात, "... अशात घरगुती संकटांनी एकदम उचल खाल्ली आणि माझ्या सत्त्वाची चहूकडून ह्या काळात पारख चालली. त्यातून मी कसा निभावलो ह्याचे मला अद्यापि नुसते आश्चर्य वाटते. पण नीट मीमांसा काही होत नाही." (पृ. ९६) किंवा महर्षी अण्णासाहेब कर्व्यांच्याकडे जातात. जनाक्काला हिंगण्याच्या अनाथ बालिकाश्रमात राहण्यास मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न करतात. महर्षी कर्व्यांना अण्णासाहेब शिंदे 'माझ्या बहिणीला आपल्या आश्रमात घेता का?' अशी विचारणा करतात. शिंदे लिहितात, "'ब्राह्मणेतरांच्या मुलींना घेण्याचा हा काळ नाही,' असे प्रोफेसर अण्णासाहेबांनी सांगितले व माझ्या बहिणीला आश्रमात घेण्याचे साफ नाकारले. त्यामुळे माझी फार निराशा झाली." (पृ. १०४–१०५) मात्र ही निराशा कडवटपणाने, विकृत रीतीने प्रकट झालेली नाही. काळाचे भान राखून सुसंस्कृतपणे ती आविष्कृत झाली आहे. कर्मवीर, या घटनेवर भाष्य करताना लिहितात, "तत्कालीन महाराष्ट्रात एक सुधारणा करताना दुसऱ्या सुधारणेला कसा अडथळा येई याचे हे उदाहरणच आहे." कर्मवीरांना पुरते विस्मृतीत गाडून केवळ एव्हढीच घटना, विकृत दृष्टीने उद्धृत करून घटनांचा अन्वयार्थ बदलण्याचा उपद्व्याप करणारी मंडळी 'आठवणी व अनुभव' मधील रसमधुरता गमावतात. रस डोळस-

वृत्ती पिचपिची बनवितात यात शंका नाही. वानगीदाखलच्या ह्या उदाहरणातून कर्मवीरांच्या संस्कारशील मनाचे उत्कट दर्शन घडते. कर्मवीरांच्या क्रियात्मक सेवेच्या आठवणीतून होणारे हे दर्शन समाजाच्या दुबळ्या अवस्थेला बळ मिळवून देईल; स्वतःसंबंधात यथार्थ जाणीव उत्पन्न करून द्यायला साहाय्य-भूत होईल. कारण समाजहितैषी विचारांनी विद्ध झालेल्या महर्षी अण्णासाहेब शिंदे यांच्यासारख्या विचारवंताच्या आत्म्याचा तो शास्त्रार्थ आहे; त्यात वाद नाहीत; तो वादातीत आहे.

या सर्वांतून होणारे तत्त्वचिंतक ऋजू मनाच्या महामनाचे दर्शन लोभसवाणे आहे.

महर्षींच्या काळातील महत्त्वाची चळवळ म्हणजे ब्राह्मणब्राह्मणेतर चळवळ; बहुजन नेत्यांत अण्णासाहेब या चळवळीपासून अलिप्त का राहिले ? त्यांची या चळवळीबद्दल मते तरी काय होती ? ब्राह्मणब्राह्मणेतर वाद हा इंग्रजांनी आपल्या भेदनीतीला पूरक म्हणून उपस्थित केला असल्याने तो सर्वस्वी त्याज्य आहे. हिंदु-मुस्लिमवादाप्रमाणे तो देशाच्या एकजुटीला बाधक आहे. जातिभेदावर आधारलेला पक्ष केव्हाही चिरस्थायी असू शकत नाही, असे त्यांचे ठाम मत होते. त्यामुळे त्यांनी स्वतःला ह्या वादापासून सुरुवातीपासूनच अलिप्त ठेवले होते. "सुशिक्षित व सुसंस्कृत वर्गीयांकडून काही घेण्यासारखे आहे ते अवश्य घ्यावे आणि आपला उद्धार करून घ्यावा, असे न करता केवळ रूढ कल्पना उराशी बाळगून त्यांच्याबद्दलचा मत्सरग्रस्त पूर्वग्रह मनात उगाळीत बसून काही आपला कार्यभाग होणार नाही." ही गोष्ट जशी मागासलेल्या वर्गीयांनी अंमलात आणावयाची आहे तशीच उच्चवर्गीयांनी देखील. आपला अहंभाव विसरून मागासलेल्या वर्गीयांकडे तुच्छतेने न पाहता त्यांना आपल्यातच सामावून घ्यावे, हे परिणामी हितकर होणारे आहे, असे महर्षींना वाटे. त्यामुळे मराठा व तत्सम समाजासाठी राखीव जागा मागण्याच्या तत्त्वाला कर्मवीरांनी विरोध केला आहे.

कर्मवीर शिंदे ब्राह्मणब्राह्मणेतर वादापासून अलिप्त राहिले याबद्दल ते टीकेस पात्र झाले, रोष ओढवून घेतला. समाजापासून बाजूला पडले. जे घडले ते इतिहासात आहे, पण त्याची कारणे कर्मवीरांच्या मनोवृत्तीत, विचारपद्धतीत आणि व्यापक दृष्टीतही आहेत. कर्मवीरांना हाती घेतलेले, कुठलेही काम, ते

लहान वा मोठे असो, ते अत्यंत महत्त्वाचे वाटे. त्याव्यतिरिक्त कामाकडे त्यांचे पूर्ण दुर्लक्ष असे. किंबहुना हाती घेतलेल्या कामाशी 'विसंवाद' निर्माण करणारे, त्यास बाधा आणणारे कुठलेही काम स्वीकारायचे नाही, अशी त्यांची दृष्टी होती. ब्राह्मणब्राह्मणेतर वाद संघटित होत असताना त्यांनी आपल्या अलिप्ततेच्या संदर्भात म्हटले आहे, "नवीन होऊ घातलेला ब्राह्मणब्राह्मणेतर वाद ऐक्याला फार घातक होईल. योग्य रीतीने तो चालविला नाही तर दोघांचे भांडण व तिसऱ्याचा लाभ असा प्रकार होईल." साहजिकच, ऐक्य साधण्याच्या दृष्टीने, कर्मवीरांनी 'मराठा राष्ट्रीय संघ' स्थापून प्रयत्नही केले. कर्मवीरांची ही दृष्टी, न्याय्य असलेले मिळवितानाही त्या कामात विधायक विशुद्धता राखणारी होती.

महर्षी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढून आपले कार्य आत्यंतिक निष्ठेने व तळमळीने करीत राहिले. जातिनिरपेक्ष व धर्मनिरपेक्ष बुद्धीने त्यांनी हे कार्य सतत केले. धार्मिक समतेच्या भावनेवर आधारित अस्पृश्योद्धाराचा केंद्रबिंदू त्यांनी कधीच ढळू दिला नाही. अन्यत्र कुठेच लुडबूड केली नाही. राजकारणापेक्षा त्यांचा पिंड अध्यात्मवादी अधिक होता. माणसामाणसातल्या अमंगल भेदाभेदावर त्यांचा विश्वास नाही. 'हे विश्वचि माझे घर' अशी त्यांची दृष्टी आहे. मानवतावाद विवेचक आहे. भावनेला त्यात फार कमी स्थान आहे; त्यामुळे त्यांना झाल्या कार्याला हवे तसे भरघोस फळ न आल्याची रुखरुख असली तरी मनात खंत साचून राहिलेली नाही. पैशाने केलेल्या अडचणीपेक्षा आत्मिक जाणिवेच्या उणिवेनेच त्यांना अधिक व्यथित केले आहे. एखाद्या कामात स्वतःला गाडून घेण्याची महर्षींची मनोधारणा निःसंशय वेधक आहे.

महर्षींनी लोकहितरत पुढाऱ्यांत पहिल्या प्रतीचे स्थान मिळविले ते मोठे कर्तृत्व, मनाची लांब झेप, दांडगा आत्मविश्वास या पाथेयावर; पण या पाथेयात बुद्धिवाद आहे नी त्याबरोबरच संतत्वाचा भलेपणाही आहे. संत आणि सामान्य ह्या दोन्ही भूमिका महर्षींमध्ये उभ्या आहेत. कोणत्याही पक्षाच्या लाटेवर वाहून न जाणे ही त्यांची वृत्ती आहे. या वृत्तीत आदेश असला तरी अतिरेकी अभिनिवेशाचा अभाव आहे. त्यामुळे भावनात्मक काही करण्यापेक्षा टिकाऊपणाकडे त्यांची नजर खिळून आहे. याच नजरेने 'भविष्यवाद' त्यांनी वर्तविलेला नाही. पण भविष्यात निर्माण होणारे अनेक प्रश्न त्यांनी मांडून ठेवले आहेत. आपल्या

जाज्वल्य कार्यनिष्ठेचा कर्मवीरांनी महाराष्ट्राच्या उत्कर्षाचा एकमेव मार्ग सांगताना "राजकारणापेक्षा अर्थकारणाकडे दृष्टी थोडी वळवली पाहिजे," असे म्हटले आहे. 'कालिकता हाच आत्मीय शिक्षणाचा पाया' मध्ये "पोट म्हणजे मनुष्य नव्हे. पोट भरले की सर्व संपले असे नसून, उलट पोट भरल्यावर मानवी जीवित सुरू होते. शाळा म्हणजे मुदतीचा कैदखाना नसून सुधारून वाढविलेले कुटुंब होय. ह्यामुळेच विद्यार्थी भावी जबाबदार वृत्तीला पात्र होतात. शिक्षण लौकिकच पाहिजे. एरवी शिक्षणाला हल्लीप्रमाणे गिरणीचे स्वरूप येते." अखिल भोर संस्थान प्रजापरिषदेच्या अध्यक्षपदावरून बोलताना महर्षींनी म्हटले, "लोककल्याण म्हणजे नुसतीच सनदेची अदलाबदल नव्हे, शीलाची व अंतःकरणाची पालट होय. नुसत्या सनदेची पालट करू नका तर शीलाची, नव्हे प्रत्यक्ष हृदयाची करा. ह्या शीलपरिवर्तनकार्याला विधायक कार्य म्हणतात." जीवन, राजकारण किंवा शासन ह्या सर्वांत नैतिक मूल्यांना किती महत्त्व आहे ह्याचे हे दर्शक चिन्हच नव्हे काय?

महर्षी अण्णासाहेब शिंदे यांचे सारे जीवनच तपःपूत होते. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' ही त्यामागील वृत्ती होती. "धर्मप्रसार, समाजसुधारणा व तत्त्वचिंतन या त्यांच्या कार्यामागील तीन प्रबळ प्रेरणा होत्या." कोणत्याही छोट्या समस्येचे निरीक्षण मोठ्या समस्यांच्या पृष्ठभूमीवर करणे आणि अल्पसंख्याकांच्या हिताहिताचा विचार बहुसंख्याकांच्या हिताहिताच्या संदर्भात करणे हे त्यांच्या जीवनसृष्टीचे व विचारसरणीचे एक ठळक वैशिष्ट्य होय. अशा ह्या सात्त्विक सत्पुरुषाच्या विनम्र निवेदनात निखळ राष्ट्रीय दृष्टी होती. मग ते कार्य हरिजनोद्धाराचे असो, ब्राह्मसमाजाच्या प्रचाराचे असो की ब्राह्मणब्राह्मणेतर चळवळीचे असो; अण्णासाहेबांनी आपल्या साऱ्या चळवळी राष्ट्रीय प्रवाहात नेऊन सोडल्या. तशा त्या सोडताना, 'तो सर्वांचा, सर्वांसाठी, सर्वांतील एक' ही त्यांची भूमिका होती. संकुचित मर्यादेत सामावणारा, आकुंचित बैठकीत अंग मुडपून बसणारा आणि डोळे झाकून ठरावीक रिंगणात चकरा मारणारा हा मनुष्य नव्हता. सर्वांगदर्शी दृष्टी आणि व्यापक संतुलित विचारसरणी यांनी अण्णासाहेबांचे जीवन भरून गेले होते. म्हणूनच 'शिंदे लेखसंग्रहा'मध्ये महाराष्ट्रीय तरुणास संदेश देताना त्यांनी म्हटले आहे, "तरुण पिढीने केवळ हिंदी आहोत एवढे ध्यानात ठेवावे, तरुणांनी आपला दिलदारपणा विश्वकुटुंबि-

यत्वाला शोभेल असाच ठेवला पाहिजे. भवितव्य जर एवढे विशाल आहे तर तरुणांनी मी ब्राह्मण, मी ब्राह्मणेतर असे सटरफटर भेद लक्षात का आणावे ? हा सटरफटरपणा टाकला पाहिजे. हिंदुस्थानने जगाला धडा घालून दिला आहे असे एका तोंडाने म्हणावयाचे आणि आपल्यातच सोवळेपणा ठेवायचा हा म्हाताऱ्यांचा दुटप्पीपणा आहे. त्यापासून तरुणांनी सावध राहावे. जुन्याचा सर्वच त्याग करावा असे कोणीही म्हणत नाही. पण ते नव्याच्या कसाला लावावे. ते म्हाताऱ्यांकडून होत नाही. या दिव्यातून तरुण पार पडले म्हणजे म्हातारे त्यांस आशीर्वाद देण्यास पुढे येतीलच. तेव्हा तरुणांनी विनय न टाकता शिस्तीने व श्रद्धेने सुधारणेच्या कामाला पुढे यावे हा माझा त्यास नम्रपणाचा संदेश आहे. '' यातील मर्म सदैव ध्यानात ठेवावे असेच आहे.

महर्षी शिंदे महाराष्ट्राचे एक उपेक्षित मानकरी आहेत असे नेहमी म्हटले जाते. अर्थात ते खोटे नाही, खरे आहे. पण ही उपेक्षितता नेमकी कोणत्या गोष्टींची याचा विचार, ' महाराष्ट्राचे एक उपेक्षित मानकरी ' असा महर्षींचा गौरव करताना विशेष सोडाच पण साध्या आग्रहानेही होतो असे दिसत नाही. महर्षी शिंदे या व्यक्तीच्या उपेक्षेने फारसे विघडणार नाही; त्यासाठी फार दु:खही करण्याचे कारण नाही. ' कोण कुणाला पुसतो ', किंवा ' कुणी कुणाला का पुसावे ? ' अशा कृतघ्नतेच्या दर्शनयुगात, जनरूढी ध्यानात देऊन खंतीचे प्रयोजन नाही. कर्मवीरांच्या बाबतीत व्यक्तिश: उपेक्षेचे दु:ख तर आहेच पण त्याहूनही त्यांच्या विचारांच्या अध्ययनाच्या, चिंतनमननाच्या आणि कार्यवाहीच्या संबंधात झालेली उपेक्षा कितीतरी बोचक आहे. ज्यांना अभ्यास करायचा नाही त्यांनी तो केला नसेल तर ठीकच आहे, पण वारसाहक्क सांगणाऱ्या मिरासदारांनी तरी दखल कुठे घेतली आहे ? तशी भरघोस चिन्हे कुठे दिसत आहेत ? पहिलीहून ही दुसरी उपेक्षा भेदक, बोचक आणि बोधक आहे. सामाजिक मनोभूमिकेची निदर्शक आहे.

या उपेक्षेची काही कारणे नमूद करता येणे अशक्य नाही. महर्षी शिंदे हे कर्ते सुधारक होते, या कर्तेपणाला संशोधकवृत्तीची जोड होती. म्हणजे माणूस पचायला अवघड अशी स्थिती होती. त्यातच महर्षींनी अस्पृश्योद्धारासारख्या नाठाळ सुधारणांना हात घातला होता. त्याची अपरिहार्य परिणती समाजापासून दूर फेकण्यात होणे स्वाभाविक होते. अंगाला चटके देणारे इंगुळ जवळ

वाळगणाऱ्याजवळ येण्याइतके समाजातील ' शहाणेसुरते ' ध्येयधुंद वेडे नसतात. महर्षी ब्राह्मणब्राह्मणेतरसारख्या वर्गीय चळवळीपासून एकदम अलिप्त होते. ते राष्ट्रीय प्रवाहाचे खास मऱ्हाटी भान विसरू शकले नाहीत. सर्वार्थाने आम्हा मराठ्यांची अस्मिता जोपासणाऱ्या महर्षींना, ' पायापुरते पाहणाऱ्या आणि लंगोटीपुरते सांभाळणाऱ्या बहुजन संकुचितांनी ' साहाय्य-आधार पोचविला नाही यात त्यांच्याकडून स्वभावविरोधी काही घडले, असे नाही. आजसुद्धा, अगदी आजही ' मराठी राज्या 'च्या ' मराठा यंत्रणे 'ला फुले-शिंदे-शाहूमहाराज यांची खास करून याद दिल्याखेरीज आपसूक आठवण होतेच असे नाही. यातून स्वीकारातील भीती प्रतीत होते की अन्य काही? तेव्हा कर्मवीरांच्या वाट्याची उपेक्षा भारतीय अस्पृश्यतेइतकीच चिवट, टणक आणि जिवट आहे; त्यांच्या १९३७ नंतरच्या जीवनक्रमाइतकीच यातना देणारी आहे.

महर्षी शिंदे यांच्या कार्याचे क्षेत्र निश्चित होते. सामाजिक सुधारणेच्या सार्वजनिक कार्याबद्दल त्यांना अनिवार ओढ होती. धर्मप्रचार व समाज-सुधारणा विशेषतः अस्पृश्योद्धार याच कार्याला प्राधान्येकरून महर्षींनी स्वतःला वाहून घेतले होते. त्यामुळे ते राजकारणात पडले नाहीत. १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी थोडाफार भाग घेतला पण प्रामुख्याने ' निदर्शनात्मक चळवळी ' महर्षींनी कटाक्षाने टाळल्या. कर्मवीरांच्या जन्मकाळी ' आधी राजकीय की आधी सामाजिक सुधारणा?' हा वाद महाराष्ट्रात संघर्ष माजवून होता. सर्वांगीण सामाजिक सुधारणेखेरीज केवळ राजकीय स्वातंत्र्याला अर्थ नाही अशा मताच्या विचारवंतांनी समाजसुधारणेचे असिधाराव्रत स्वीकारले होते. त्यामुळे त्यांना नाना वाटांनी सामाजिक छळ सोसावा लागत होता. त्या तुलनेने आधी राजकीयचा आग्रह धरणारी मंडळी लोकानुरंजनामुळे पटकन् लोकमान्य होऊन जात होती. कारण त्यात समाजाला त्यांच्या साऱ्या दोषांसह चुचकारणे असे. पण म. फुले, न्या. रानडे, गोपाळराव आगरकर, महर्षी अण्णासाहेब कर्वे, राजारामशास्त्री भागवत, राजर्षी शाहूमहाराज, महर्षी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारखी कमालीची निष्ठावंत, धैर्यवंत आणि चारित्र्यसंपन्न मंडळी समाजाच्या दोषांचे निवारण करण्यासाठी अहोरात्र झटत होती. त्या वेळच्या विशिष्ट सामाजिक परिस्थितीमुळे त्यांना खूप छळ सोसावा लागत होता. विचार-रूपाने व्यक्ती हयात असल्या तरी विचारांची होणारी ओढाताण छळाचाच भाग

आहे. प्रथम छळ आणि नंतर बळ हेच साऱ्या समाजसुधारकांच्या कार्याचे रूप आहे. विश्वमांगल्याची भावना असलेले कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे हेही त्याला अपवाद नाहीत.

महर्षी अण्णासाहेब शिंदे यांच्यासारख्या, उदारधर्माचा प्रचार आणि अस्पृश्यतेचे निवारण करण्यासाठी ब्रह्मदेशापासून लंकेपर्यंत प्राचीन भरतखंडाच्या सगळ्या भागात संचार आणि संशोधन केलेला कर्तृत्ववान सुधारक आणि धर्मपुरुष गेल्या अर्धशतकात दुसरा झालेला नाही. त्यासाठी महर्षींनी उभे आयुष्य आणि अखंड संसार सारे समर्पित केले आहे. पारतंत्र्याच्या सव्वाशे वर्षांच्या काळात महाराष्ट्रात अनेक लोकाग्रणी निरनिराळ्या क्षेत्रांत निर्माण झाले; व त्यांपैकी काहींनी या देशाच्या उद्धारासाठी आत्महवनही केले. कर्मवीर अण्णासाहेब शिंदे यांच्या चारित्र्याचा आणि कर्तृत्वाचा अद्वितीय विशेष जर कोणता असेल, तर तो हा आहे की, त्यांनी आपले स्वतःचे वैयक्तिक जीवन हे तर अस्पृश्यता-निवारणाच्या पवित्र धर्मकार्याला वाहिलेले होतेच; शिवाय आपल्या सर्व कुटुंबाचेही जीवन या कार्यासाठी त्यांनी सार्थकी लावले. त्यांचे वृद्ध आईवडील हे आपल्या या ध्येयवेड्या तरुण मुलाने हाक मारल्याबरोबर, स्वतःच्या घराण्याची खानदानीची परंपरा बाजूला सारून, जमखिंडीहून प्रथम मुंबईला आणि नंतर पुण्याला अस्पृश्यांच्या वस्तीत त्यांची सेवा करण्यासाठी राहावयाला आले. यांच्या भगिनी जनाक्का आणि पत्नी सौ. रुक्मिणीबाई या तर सावलीप्रमाणे जन्मभर त्यांच्याबरोबर अस्पृश्यता-निवारणाच्या कार्यात राहिल्या. पण, अण्णासाहेबांचे हे ध्येयवेड इतके काही लागट होते की, त्याने केवळ त्यांच्या कुटुंबालाच झपाटले नाही! तर त्याबरोबरच त्यांचे जमखिंडीतील वर्गबंधू श्री. सय्यद अब्दुल कादर आणि प्रार्थनासमाजातील मित्र श्री. वामनराव सोहनी हे दोघेही आपापल्या नोकऱ्या सोडून देऊन सहकुटुंब त्यांना येऊन मिळाले. आपल्या जीवनाने, व्यासंगाने आणि चिंतनाने, चारित्र्याचा, साधुत्वाचा आणि समाजसेवेचा उदात्त आदर्श महर्षींनी निर्माण केला. या आदर्शाचा संदेश, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी उलगडून दाखविताना म्हटले आहे, " भारतीय सामाजिक क्रांतीचा धार्मिक क्रांतीशी व राजकीय क्रांतीशी अविभाज्य संबंध आहे, याची प्रखर प्रतीती असलेली स्वातंत्र्यपूर्व काळातील एक प्रमुख व्यक्ती म्हणजे कर्मवीर वि. रा. शिंदे होत; व्यक्तींना व जातींना जन्मसिद्ध उच्चनीच भेदात जखडून टाकणारी

भारतातील समाजपद्धती ही हिंदुधर्मावर अधिष्ठित आहे. याकरिता हिंदुधर्म व त्याचे तत्त्वज्ञान यांच्या पलीकडे गेले पाहिजे. पलीकडे गेलेला विश्वधर्म व त्याचे तत्त्वज्ञान प्राप्त झाल्याशिवाय भारतात खरीखुरी सामाजिक क्रांती होणार नाही. हिंदू, मुसलमान, खिश्चन इत्यादी समाज धर्मग्रंथांच्या संकुचित श्रद्धेच्या विळख्यात सापडलेले समाज होत, नव्या विश्वव्यापी धार्मिक जाणिवेचे स्वरूपच या विळख्यामधून या परस्पर विभक्त राहिलेल्या समाजांना मुक्त करू शकेल, असा व्यापक विचार शिंदे करीत होते. तो करीत असतानाच, त्यांनी भावी विश्वमांगल्याकडे लक्ष देऊन आपले जीवन समाप्त केले. वैचारिक संघर्षाशिवाय व नव्या व्यापक विचारांच्या विजयाशिवाय ज्या ज्या कोणत्या चळवळी होतील त्या अपयशीच ठरतील, असा शिंदे यांच्या जीवनातून मिळणारा संदेश आहे. विचार बदलले पाहिजेत. जुन्या विचारांची बीजे जोपर्यंत कायम राहतात, तोपर्यंत समाजपरिवर्तनाचे केलेले प्रयत्न विफलच होतात, असा इतिहासाचा अनुभव आहे." महर्षी शिंदे सर्वांगीण परिवर्तनाचे उपासक आहेत. "विश्वधर्मापासून सुरुवात होऊन समाजसुधारणा, समाजसेवा व राष्ट्रोद्धार अशा टप्प्यांनी त्यांच्या सार्वजनिक आयुष्याचा परिपोष झाला. या परिपोषाने, आज उद्याच्या महाराष्ट्राला मार्गदर्शक ठरेल असे विचारधन दिले आहे. अनास्था व उपेक्षा यांच्या जाळ्याने आपण ते झाकून टाकले आहे, दडपून ठेवले आहे." म्हणून मनाची ताटी उघडून महर्षी अण्णासाहेब शिंदे यांनी प्रबोधनाच्या प्रेरणेने लिहिलेला 'सुंदर सामाजिक जाहीरनामा' वाचला पाहिजे, पचवला पाहिजे.

एका मनस्वी 'वैष्णवा'ने लिहिलेला हा जाहीरनामा नाहे. 'मुक्ति कौन पथे?' अशी आर्त हाक मारणारे, 'पीड पराई'चे दुःख जाणणारे महर्षी विचारवंत सामाजिक संत होते. या संतत्वामागे सूक्ष्म निरीक्षणशक्ती, सखोल अध्ययनशीलता, चिंतनशील संशोधन इत्यादी सद्‌गुणांची जोड होती. लोकांच्या सेवेसाठी वाहिलेले ते एक समर्पित जीवन होते. प्रत्येक कार्य त्यांना धर्मकार्य होते, आणि तो, अखेरपर्यंतचा ध्यास राहिला होता. या ध्यासात विचार होता, आकलन होते आणि व्यवहार होता. महर्षींनी केलेली शेतकऱ्याची व्याख्या पाहिली तरी त्याची प्रचीती मिळते. कर्मवीर शेतकऱ्याची व्याख्या सांगतात, "माझ्या मते शेतकरी म्हणजे तोच की, जो आपल्या कुटुंबाच्या व आश्रितांच्या पोषणाला, शिक्षणाला आणि योग्य त्या सुखसोयींना आवश्यक इतकीच, आणि

आपल्या आप्तांकडून व आश्रितांकडून वाहवेल इतकीच जमीन बाळगतो आणि ती आपण स्वत:, आपल्या आप्तांच्या व आश्रितांच्या श्रमाने योग्य रीतीने खरोखर वाहतो. असे न करता जे जमीन धारण करतात ते भांडवलदार होत. ते शेतकरी नसून शेतकऱ्यांचे दावेदार आणि प्रतिस्पर्धी समजावेत." यात तडजोडीची वृत्ती नाही हे स्पष्ट दिसते. कर्मवीर समाजकारणामध्ये जितके मृदू तितकेच राजकारणामध्ये जहाल आहेत. या दोन्ही कारणांत लोकांचे शील पालटण्याचे बिकट काम त्यांनी अंगावर घेतले होते. त्यामुळे ते म्हणावे तितके सोपे नव्हते. साहजिकच यशाचे मोजमापही कठीण आहे. हे मोजमाप अधिकच कठीण झाले आहे, ते त्यांनी सांगितलेल्या अखेरच्या वस्तुस्थितीमुळे हेही ध्यानात हवे. शेवटच्या दिवसांतील कर्मवीर शिंदे यांचे उद्गार असे आहेत, "माझ्या कामात माझ्या साथीदारांचा, इतरांचा, फार काय ज्यांच्यासाठी मी घरदारही कमी समजून ती ती कामे करीत होतो त्यांचाही माझ्यासंबंधी गैरसमज, दुराग्रह, नव्हे उघड विरोधही झाला. हाच माझ्या अनुभवाचा कठीणपणा किंवा दारुणपणा होय. ह्यामुळे माझ्या मनाची शांती ढासळली आणि अकाली बहुतेक स्वीकृत कामातून मी विराम पावलो." कर्मवीरांच्या ह्या उद्गारातील आर्तता, एकूणच समाजजीवनाच्या कृतघ्नतेवर झगझगीत प्रकाश टाकणारी आहे. यश, कीर्ती, लोकप्रियता इत्यादींचे यथोचित मोजमाप करणारी आहे.

कर्मवीर शिंदे यांच्या कार्याच्या यशापयशाचे मूल्यमापन करताना डॉ. वि. भि. कोलते यांनी 'कार्य अयशस्वी झाले असे मला वाटत नाही' असा निर्वाळा दिला आहे. 'माझ्या आठवणी व अनुभव'च्या प्रस्तावनेत डॉ. कोलते लिहितात :

> "वस्तुतः अण्णांचे कार्य अयशस्वी झाले असे मला वाटत नाही. यासंबंधी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. ती अशी की, अशा सुधारणांच्या कार्याकडे ऐतिहासिक दृष्टीने पाहावयास पाहिजे. सामाजिक किंवा धार्मिक सुधारणा ही अशी गोष्ट आहे की, जी पूर्णतेला कधीच पोचणे शक्य नाही. जग नेहमी बदलत असते आणि या बदलत्या जगात नवीन नवीन विचारांचे वारे सदैव खेळत असते. ज्या सुधारणा आज आपण मोठ्या हिरीरीने करू पाहतो त्यांना कालांतराने फारसा अर्थ राहात नाही. कारण त्या बाबतीतली समाजाची विचारसरणीच बदललेली असते. उदाहरण म्हणून हेच पाहा ना की, ज्या देवालय-प्रवेशाच्या

प्रश्नाच्या अभिनिवेशाने आपल्या कार्याचा नवीन मांड मांडणे माटे यांना आवश्यक वाटले त्या प्रश्नाकडे आजचे अस्पृश्य पुढारी ढुंकूनही पाहायला तयार नाहीत. पण म्हणून अस्पृश्यांना देवालयात प्रवेश मिळवून देण्यासाठी ज्या सुधारकांनी पूर्वी जीवापाड श्रम केले त्यांच्या कार्याचे महत्त्व कमी होत नाही. त्यांच्या प्रयत्नामुळेच समाजाचे किंचित हृदय-परिवर्तन झालेले असले तरी त्यांना पुष्कळच यश आले असेच समजले पाहिजे. या दृष्टीने पाहता अण्णासाहेबांचे कार्य सफल झाले असेच म्हणावे लागेल."

कर्मवीर अण्णासाहेब शिंदे तत्त्वचिंतक सुधारक होते. सुधारणा वरपांगी नव्हत्या, तसे तत्त्वचिंतनही उपरे नव्हते. किंबहुना वरवरच्या अंगाने काही करावे, व्हावे किंवा घडावे असा कर्मवीरांचा मुळी स्वभावच नव्हता. प्रश्न छोटा किंवा मोठा कसलाही आणि केवढाही असो, आतवर जाऊन त्याचा शोध घेण्याची, मुळातून तो तपासून पाहण्याची, त्यातून काही ना काही तरी विधायक निर्माण करण्याची कर्मवीरांची दृष्टी होती. 'सर्वांभूती परमेश्वर' याबरोबरच सर्वंकष विचारभावनाभूती निर्णयनिष्कर्ष व प्रयत्न अशी त्यांची धारणा होती. स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांच्या पोषणाचा त्यात प्रयत्न होता. या प्रयत्नामागे विवेकवंत होता, तसे उत्कट संवेदनाक्षम मन असलेला कलावंतही होता; त्यात सात्त्विक वृत्ती, सामाजिक दृष्टी व संताचे मन होते. आध्यात्मिकतेच्या कडा असलेल्या या मनाला कसलेही ऐहिक आकर्षण नव्हते की कोणतेही सामाजिक पुढारपण नको होते. 'कुणाही जीवचा न घडो मत्सर' अशा भूमिकेने माणसामाणसामधील सद्भाव, सद्गुण व सदभिरुची इत्यादी गुणांची वृद्धी व्हावी अशी महर्षी शिंदे यांची तळमळ होती; त्यासाठी धडपड होती. माणूस 'सत्त्वाधिक' गुणांनी युक्त असणे हे धर्माचे अधिष्ठान आहे अशी त्यांची श्रद्धा असून त्यांना माणसाची सुधारणा हवी होती ती आंतरिक बदलातून, बाह्य उपचार व सुधारणा त्यांना फारशा आवडणाऱ्या नव्हत्या. त्या दृष्टीचे समाजात रूढ असलेल्या, परंपरागत चालत आलेल्या पुराणकथांना, बदलत्या काळानुरूप नवीन अर्थ लावण्याची कर्मवीरांची कल्पकता लक्षणीय आहे. भागवत ग्रंथातील 'कालियामर्दन'सारखी एखादी कथाही, कर्मवीर लावीत असलेला कालोचित अर्थ समजावून घेण्याच्या दृष्टीने पुरेशी आहे. भागवतातील 'कालियामर्दन'ची कथा भाकडकथा म्हणून

बुद्धिवाद्यांकडून तिची होणारी संभावना वगैरे सर्वश्रुत आहे. त्या दृष्टीने कर्मवीर लिहितात, " श्रीकृष्ण हा आपल्या सोबत्यांबरोबर यमुनातीरी खेळत असता त्याने बळेच चेंडू यमुनेच्या तीरावरील कळंबाचे झाडावर उडविला. त्या झाडावरून तो चेंडू तो काढण्यासाठी त्याने आपल्या सोबत्यांना बोलाविले. तेव्हा काही मित्र त्याच्याबरोबर गेले व काही मागच्यामागे पळाले. पण कृष्णाशिवाय कोणाच्यानेही त्या झाडावर चढण्याचा धीर होईना. एवढेच नव्हे तर श्रीकृष्ण जेव्हा झाडावर चढू लागला तेव्हा त्या मित्रांपैकी बऱ्याच बुद्धीला जे पटले होते तेच करावयाचे होते. त्याने सर्वांचे ऐकून घेतले व कोणाच्याही म्हणण्याची पर्वा न करता तो झाडावर चढला; व त्याने तो चेंडू यमुनेच्या डोहात पाडला. मग चेंडू काढण्यासाठी त्याने यमुनेच्या डोहात उडी घेतली, तेव्हा सर्व हाहाकार उडाला. गोपांनी ही बातमी नगरात जाऊन सांगितली, बलरामाने कृष्ण मरणार नाही असे भाकीत केले. श्रीकृष्णाने लोकमत व अप्तेष्टांची ही रीत ओळखली होती. श्रीकृष्ण पाण्यातही गेला नव्हता व बाहेरही नव्हता. पण आडून कोण कसे रडतात याची गंमत पाहात होता. त्याने जाणले होते आईबाप, भाऊबंद तटाजवळ थांबत असतात. त्या तटाच्या पुढे येण्याचे धाडस कुणी करत नाही. जो तो स्व-बचावासाठी सावध असतो. श्रीकृष्णाचा जीव धोक्यात असूनही त्याला सोडविण्यास कुणी तयार नाही." कर्मवीर शिंदे या कथेचा अन्वयार्थ लावताना सांगतात, " जो मनुष्य काळाची पर्वा न करता सुधारणा करू इच्छितो, त्याने कृष्णाप्रमाणे कुणाची वाट न पाहता आपल्याच बळावर सुधारणा केली पाहिजे. प्रारंभी सुधारकांच्या कार्याला मदत करण्यास कुणी तयार नसतात पण उलट त्यांच्या कार्यात विघ्ने उत्पन्न करण्याची चढाओढ लागलेली असते. पण खरे सुधारक ' सत्यासत्यासी मन केले ग्वाही, नाही जुमानिले बहुमता ! ' या वचनाप्रमाणे आपल्या मनासारखेच वागून आपल्या बुद्धीचे समाधान करीत असतात..." पुराणकथांचा कालोचित अन्वय लावून त्यातील अलौकिकत्व लौकिक जनांना दाखवून देण्याची अण्णासाहेब शिंदे यांची ही पद्धती अनेक पुराणकथांच्या उल्लेखात—महाभारताच्या अनुशासन पर्वातील गौतमी व तिच्या मुलाची कथा, नाथांनी हरिजनाच्या मुलास पोटाशी घेण्याचा प्रसंग इत्यादी आढळते. या प्रयत्नात जुन्यातील विकृत किंवा विखार वगळून कालानुरूप अन्वयार्थ देण्याची कलावंत मनाची आच आणि सर्जनशील दृष्टी यांचा

प्रत्यय मिळतो.

असे हे विचारवंत मन, उत्कटरम्य वृत्ती आणि सर्जनशीलता इत्यादींच्या प्रत्ययानेच मुळी अण्णासाहेब शिंदे यांचे उभे आयुष्य घडले आहे. कर्मवीरांच्या प्रत्येक शब्दाशब्दांत आणि कृतीकृतीत हे उत्कट, सर्जनशील, विवेकी मन दृग्गोचर होते. १९०७ च्या सुमारास लो. टिळक यांनी सुरतेची काँग्रेस उधळून लावली. लोकमान्यांच्यावर खटला झाला, सहा वर्षांची कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. लो. टिळकांची कृती बरीवाईट कशीही असो, कर्मवीर शिंदे यांना ती आवडली असेल अगर नसेल पण लोकांचा हा पुढारी तुरुंगात जावा, ही खंत कर्मवीरांच्या मनाला बोचत राहिली. त्या वेळच्या प्रार्थनासमाजाच्या साप्ताहिक उपासनेच्या बैठकीत कर्मवीर शिंदे यांनी लो. टिळकांच्या ह्या शिक्षेचा उल्लेख केला आणि 'त्यांना उत्तम आयुरारोग्य लाभो' अशी ईश्वरचरणी प्रार्थना केली. पण प्रार्थनासमाजाच्या अधिकारीवर्गास ते आवडले नाही. सर्वस्वी विरोधी काळात, बलामती येण्याची शक्यता असूनही मैत्री राखण्यासाठी शत्रुपक्ष म्हणून उभा केला जात असलेल्यास स्नेही मानून मर्मबंध जोडण्यासाठी मनाजवळ विशेष जिगर असावी लागते. कर्मवीर ऐहिक आकर्षण किंवा सामाजिक लाभ यापासून चार पावले दूर असल्याने त्यांच्याजवळ ती होती. प्रार्थनासमाजाच्या अधिकाऱ्यांकडून मात्र, त्यांना या कृत्याबद्दल जाब विचारण्यात आला. कर्मवीरांनी दिलेले उत्तर विवेकी कलावंताचे आहे. त्यांनी म्हटले, "मला आपल्या विश्वासाने आचार्य आणि प्रचारक नेमले आहे. समाजात सर्व प्रकारची, सर्व मतांची आणि सर्व दर्जाची माणसे आहेत, हे मी पूर्ण जाणून आहे. ईश्वरापुढे उभा राहून प्रार्थना करीत असता भारताचे संकलित भवितव्य ओळखून प्रार्थना करणे माझे जरूर आणि पवित्र कर्तव्य आहे. ह्यात मी कच खाल्ली तर मी स्वत:शीच अपात्र ठरेन, आपला विश्वास असेल तर मला या जागेवर ठेवा. पण माझ्या कामात स्वत: मला आणि माझ्या ईश्वराला जबाबदार राहू द्या." यामधील विनम्र भावपूर्णता, अतूट निष्ठा सांभाळणारी होतीच पण खऱ्या संताच्या समाजाभिवृद्धीची द्योतकही होती. या दृष्टीचा प्रत्यय कर्मवीरांनी लिहिलेल्या त्यांच्या अल्प पण गुणपूर्ण साहित्यातून वारंवार मिळतो.

कर्मवीर अण्णासाहेब शिंदे हे साहित्यिक नव्हते. ते कृतिशील समाजसुधारक आहेत; विवेकी प्रबोधक आहेत. साहजिकच 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न'

काय किंवा 'माझ्या आठवणी व अनुभव' काय; इत्यादी त्यांचे सारे लेखन काहीतरी देण्यासाठी आहे. सन १९०१ ते १९०३ या काळात त्यांनी 'सुबोध-पत्रिके'त लिहिलेल्या प्रवासपत्रातून त्याचा आढळ तर अधिकच स्पष्टपणे होतो. पण समाजप्रबोधनाच्या या भूमिकेत, गावोगावच्या शेतकऱ्यांना तगाई वाटावी तशी प्रचारकाची दृष्टी नाही. अधूनमधून त्यात सर्वांगाने डोकावणारा कलावंत विलक्षण समाधान देणारा, अस्वस्थ करणारा आहे. त्यात उत्कट अनुभूती आहे, जिवंत अनुभव आहेत आणि भाषा ओबडधोबड वाटली जरी प्रासादिकतेने ती विनटलेली आहे. पण ती आपल्या अंगाने, रूपाने सौंदर्यशील आहे, लावण्य-वती आहे. अण्णासाहेबांच्या डायरीतील, ते तुरुंगात असतानाचा त्यांनी वर्णिलेला एक प्रसंगही त्यासाठी पुरेसा होईल. अण्णासाहेब लिहितात :

"तुरुंगात अर्थात बराच वेळ उदासीनतेत जातो. पण ह्यात मला हर्ष देण्यास कित्येक वेळा एक पक्षी येत असतो. तो साळुंखी हा होय. हिलाच मैनाही म्हणतात. हिची चोच व पाय पिवळे असतात आणि रंग मळकट, काळसर भुरा असतो. चोच लांबट आणि डोळ्याभोवतीही पिवळेपणा असतो. ह्या पक्ष्याकडे पाहिले की मला ज्यांच्याविषयी मनात अत्यंत आदरयुक्त प्रेम वाटते, त्या अहिल्याबाई शिंदे ह्यांची आठवण येते. ...

"सायंकाळी ५ वाजता खोलीत कोंडला गेलो म्हणजे पुष्कळ वेळा ह्या पक्ष्याचे जोडपे माझ्या खोलीत, उंच छपराच्या वाश्यावर येऊन बसत असते. मला वाटते, गणपतराव व अहिल्याबाई मला भेटायला आले! गणपतराव! अहो, तुरुंगात असे बिगरपरवाना यायचे नसते बरे!... गणपतराव, तुमचे मजवर किती प्रेम असले तरी तुम्ही असे तुरुंगाचे नियम मोडू नका हो! पण तुम्ही कसचे ऐकता? तुम्ही प्रेमांध कवी!... तुम्हा दोघांचा स्वभाव गोड... कितीतरी गोड नव्हे? त्या-मुळेच तर माझ्या उतारवयात मी इतरांची घरं व संगती वर्ज्य केली, तरी धावून तुमचे घरी येतो ना! आणि ती परतभेट तुम्ही मला ह्या उदास-वाण्या तुरुंगात अशा काव्यमय मार्गाने देता काय? धन्य तुमची! गणपतराव, तुम्ही कवी खरे! आजपासून मी तुमचे नाव शिंदे रद्द करून साळुंखे हे काव्यमय नवे नाव चालू करतो आणि अहिल्याबाई, तुम्हाला

आजपासून मैनाबाई म्हणून हाक मारीन. तुम्ही मला ' जी ' म्हणाल ना ? तुम्ही मैनाबाई साळुंखे ! असा नामकरणविधी आज झाला. "

यातून कर्मवीरांच्या बिसतंतूसारख्या मनाचे आणि जीवनधारणेचे ' सार ' प्रकट होते. तपशील पुढे येतो; त्यात गुंता नाही, क्लिष्टता नाही. कर्मवीरांच्या उभ्या हयातीत शुष्क वांझ असे काहीही नाही.

काही असले तरी म. विठ्ठल रामजी शिंदे यांची लोकजागृतीची, बुद्धिवादाची व समाजहिताची भूमिका व दृष्टी लक्षणीय आहे. गेल्या पंचवीस वर्षांच्या स्वातंत्र्यानंतरच्या भल्याबुऱ्या अनुभवानंतर या दृष्टिसृष्टीची नितांत गरज आहे, हे पुनः पुन्हा स्पष्ट झाले आहे, होत आहे. महाराष्ट्राचे थोर समाजवादी नेते एस.एम. जोशी यांनी ' महाजनो येन गतः स पंथः ' या आपल्या लेखात या-संबंधी, सुंदर विवेचन करताना भावपूर्णतेने लिहिले आहे :

" बहुजनहिताय कार्य करून समाजहितबुद्धीने जीवन जगण्यात पुरुषार्थ मानणे ही देखील एक महान प्रेरणा आहे. समाजातील बुद्धिमान, कर्तबगार आणि तेजस्वी माणसे असे जीवन जगण्यास तयार होतात ही गोष्ट स्वातंत्र्य लढ्याच्या वेळी सिद्ध होऊन चुकली आहे. नवसमाजाची उभारणी करण्यासाठी अशा त्यागी आणि सेवाभावी पुढाऱ्यांनी वाहून घ्यावे म्हणूनच स्वातंत्र्योत्तर काळी काँग्रेसचा लोकसेवक संघ बनवावा असे महात्माजींनी सांगितले. त्याआधी 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी' निघाली होतीच. महर्षी शिंद्यांनी समाजाच्या तळच्या लोकांमध्ये काम करण्यासाठी निराश्रित साह्यकारी मंडळी स्थापन केली. अस्पृश्यतेचा कलंक पुसून टाकायचा तर त्यासाठी माणसांच्या मनोवृत्तीमध्ये परिवर्तन घडून आले पाहिजे. भांडवलदारी समाजव्यवस्थेतील प्रेरणा त्याला पुरी पडत नाही. सामाजिक विषमतेच्या प्रश्नाला अजून स्पर्शदेखील खऱ्या अर्थाने झालेला नाही. त्यासाठी ' डिप्रेस्ड् क्लासेस मिशन 'सारखी संस्था हवी आणि यतिवृत्तीने काम करणारी माणसे हवीत हे महर्षींनी ओळखले होते. जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये समाजहितबुद्धीने कार्य करणारे नेतृत्व पुढे आले नाही तर लोकशाही समाजवादाच्या वल्गना फोल ठरणार आहेत, ही गोष्ट आजच्या घटकेला आपण ओळखली पाहिजे. समाजवादाच्या आवरणाखाली स्वार्थी आणि भ्रष्टाचारी प्रवृत्तीची वाढ

होऊन गोरगरिबांना तापदायक अशी अराजकाची परिस्थिती निर्माण होईल. अण्णासाहेबांचे जीवन कर्मयोग्याचे होते. त्यात कटुता नव्हती. त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन कार्य करण्याची नितांत आवश्यकता आहे. नाहीपेक्षा पददलित आणि शोषित बहुसंख्य श्रमजीवींचे भविष्य उज्ज्वल होऊ शकणार नाही. एकेकाळी महर्षींना लोक विसरले होते, परंतु आजच्या तरुण पिढीला त्यांना विसरून चालणार नाही.'' (कर्मवीर वि. रा. शिंदे जन्मशताब्दी स्मरणिका : पुणे विद्यापीठ : पृ. २६)

प्रश्न एवढाच आहे की, ही आठवण कोण आणि कशी ठेवणार? नुसती आठवण न ठेवता त्यांच्या कार्यामागील प्रेरणा, प्रवृत्ती आणि भूमिका स्वीकारून कालोचित कामाचे उद्‌गान कोण, कसे आणि केव्हा करणार? जाणवू न देता मागून कोण जाणार एवढाच प्रश्न आहे. कर्मवीर अण्णासाहेब शिंदे यांच्या बाबतीत काय राहिले त्याचा हा हिशेब आहे.

# ७

# श्रमिकांच्या राज्याचे स्वप्न

'धापाच वर्सं' प्रचंड जनसागरातून एक चुकार आवाज. हिशेबाचा ताळमेळ.

'अरं ताठ बोल रं. बिचकत बाचकत काय सांगतुस गड्या? आपुन मराठा गडी. नॅट लावून बोलायचं हये आपलं ठरलेलं. मग हितंच मागं का बरं? तर तब्बल धा वर्सं हे चाललेलं हाय. आत्ता दरडोई सत्तावीसानं सव्वा-कोटीचा हिसाब करा. मांडा पंचराशिक : एकाला एका वर्साला सत्तावीस तर सव्वाकोटीला धा वर्साला किती?' पंचराशिक मांडून होताच क्रांतिसिंह थोडे थबकतात, विशाल जनसमुदायाकडे पाहून निरागस हास्याची एक लकेर झेपावून देतात आणि काहीशा खोडकरपणे श्रोत्यांकडे झुबकेदार देहाची गेंदेदार तर्जनी रोखून विचारतात,

'सोडवितात काय रं पंचराशिक कुणी?'

आणि एकदम स्तब्धता. क्रांतिसिंहांच्या, सामान्य माणसांना समजावून देण्याच्या अजोड वाक्पाटवाने स्तंभित झालेल्या श्रोत्यांमध्ये या प्रश्नाने एकदम नीरव शांततेचे साम्राज्य गडद होत जाते. वर्गात कडक मास्तरांचा नेमका नको नको वाटणारा प्रश्न यावा आणि मुले भेदरून थंडगार पडावीत तसे वातावरण पसरून राहते. काही सेकंद जातात. क्रांतिसिंहही तशी ती जाऊ देतात. पण पंचराशिक स्थिरच असते, ते सुटत नाही. उत्तरासाठी ते खोळंबलेले असते. ते घेण्यासाठी व्यासपीठावर पहाडी शरीरपिंडाचे, सातारी रक्ताचे नाना पाटील श्रोत्यांकडे मिस्किलपणे पाहात खडे असतात. आणि थोड्याशा वेळानंतर नीरव शांततेचा भंग करीत गोबऱ्या गोबऱ्या आवाजाची, कारुण्याची मृदू लय असलेली क्रांतिसिंहांची डरकाळी वातावरणात उभारून येते. लोकांच्या, 'येत नाही'

म्हणून गप्प राहण्याच्या वृत्तीला उद्देशून क्रांतिसिंह विचारीत असतात :

‘ अरं, तुमचं सारंच कच्चं कसं रे ? ’ आणि खळखळून म्हणतात, ‘गड्यांनो, जाऊ द्या. इतकं गेलं त्याचं काय झालं ? नि एवढं येत नाही म्हणून काय व्हायचं आहे ? पन गणितात बच्चा पक्का हवा, शेतीत सच्चा हवा, नि शरीरानं धडधाकट पाह्यजे. मजा मग आहे. गड्यांनो, ह्ये इसरू नकासा. ’ एवढे सांगत सांगत क्रांतिसिंह श्रोत्यांना घातलेले पंचराशिक पुनः स्वतःच एकदा मोठ्याने मांडतात. आकड्यांची उलटापालट करतात. खालीवर आकडे घेतात; इकडचे तिकडे वळवतात. एकूण महसुलाचा पक्का मसुदा बांधतात आणि त्यातून गेली धाएक वर्षे काही कोटी हकनाक गेल्याचा चोख हिसाब मांडतात. क्रांतिसिंहांच्या या तलवारकट करामतीने श्रोतृवर्ग चकित झाल्यासारखा दिसतो. आपापसात चुळबूळवजा कौतुकमिश्रित हुंकार काढतात. नाना ते ध्यानात घेतात. गणित सोडविण्याच्या नादात अतःपर गुंतलेले क्रांतिसिंह श्रोत्यांमधील चुळबुळीचा नाद पकडून म्हणतात,

‘ अरं, नुस्त वळवळून उपेग काय ? गेल्या धा वर्सांत, समजा आपल्या हिसाबानं गेलं काही कोटी निघून. समजा हजारभर कोटी. तरीबी थोरल्या भावानं धाकट्या भावाला द्यायचं आहेत फकस्त ५०० शेहे कोटी रुपये. आत्ता ज्याला अगुदरच हजारभर कोटी रुपये पोचतं झाले आहेत, त्याला पुनः पाचशेहे कोटी द्यायचे म्हंजे अन्यायच नव्हं का ? खरं म्हंजे धाकट्यालाच थोरल्यानं त्याच्याकडं ज्यादा गेलेलं पैसं इतमामानं परत करायला पाह्यजेत. पण जाऊ द्या. ( एकदा खळखळून हसत ) राजकारणात असं नसतं. राजकारणात सेवा आणि सौदा दोनीबी असतं. कुनी काय करायचं हे ज्यानं त्यानं ठरवायचं असतं. तर आमची पैसा द्यायला ना नाही. आम्ही श्रीमंत नाही. आमाजवळ पैसा नाही पण आमचं मन श्रीमंत हाय. आम्ही मारवाडी थोडंच हाय ? पन आपलं सारं कसं न्यायानं व्हावं असं आम्हाला वाटतं. आम्हा मराठ्यांच्या कपाळी अन्यायच लिहिलेला असू नये; आणि झगडल्याबिगर काही लाभूच नये असं होऊ नये. आमचं म्हणनं एवढंच. लई मागणं नाही ! ( किंचित् थांबून, बिंदू चौकाच्या सीमेवर दूरपर्यंत नजर फेकत ) आता हेच बघा. पाचशेहे कोटी. म्हणजे थोडी का रक्कम झाली ? चिपटं-मापटं, शेर-पासरी भरून द्यायचं हे ठीक आहे. पन इथं असं थोडथोडसं द्यायचं नाहीय्. इथं द्यायचं आहे पाचशेहे कोटी. आहे

कल्पना तुम्हाला किती होतात हे?'

आणि क्रांतिसिंह पुन्हा खळखळून हसतात. पंचराशिक सोडवायला आले नाही, त्यांना ह्या एवढ्या मोठ्या रकमेचा अंदाज कसा येणार?—असं त्यांच्या मनासमोर चित्र तरळले असावे; म्हणून टप्प्याटप्प्याची खेळकर हास्याची आवर्तने चालू असतानाच श्रोत्यांना उद्देशून नाना विचारतात,

'आहे कल्पना तुम्हाला किती रक्कम होते याची?' आणि हे विचारता विचारता 'एवढे? एऽऽवऽऽढे?' असे हाताचा आकार वाढवत वाढवत क्रांतिसिंह श्रोत्यांकडून उत्तराची अपेक्षा करतात. धिप्पाड देहाचे गडगंज हात तितकेच बलदण्ड असतात आणि व्यासपीठावरील धगधगीत प्रकाशात त्याच्या पडणाऱ्या छाया, कूट गणिताची सोडवणूक करण्याइतपत शोभादायक वाटतात. श्रोते पाहातच राहतात. आणि मधेच कुठूनतरी कुणाचातरी दबका आवाज येतो.

'खूप! खूप मोठी!'

'खूप मोठी पन केव्हढी मोठी?' क्रांतिसिंहांचा प्रतिप्रश्न.

नानांचे यावर दिलखुलास हास्य. दऱ्याखोऱ्यांतून खळाळत वाहणाऱ्या निर्मळ ओढ्यासारखे स्वच्छ, निरागस, निळ्या डोहासारखे खोलवर तळ दाखविणारे हास्य!

आणि मग पुन्हा बोलणे सुरू त्याच लयदार ढ्याकीत.

'तर गड्यांनो, सांगतोच सारं. सांगायचंच ठरविलंय तर सांगतोच. माघार कशापायी? आणि लोकशाहीचं ह्येच सूत्र आहे की, ज्यांना जे समजत नाही त्यांना ते समजून द्यायचं. आपन नुस्त्या चळवळीच नाही करायच्या; तर त्यातून ताकद हुबी करायची आनि लोकराज्याचं शिक्षणवी करायचं. सगळं करायचं.' क्रांतिसिंहांची लय सीमेला गेलेली. अपूर्व वर्णनशक्तीच्या अजोड दर्शनाने श्रोते मंत्रमुग्ध झालेले; श्रोत्यांचे आता इतर कशातच लक्ष नाही. क्रांतिसिंहांच्या भाषणाच्या तोऱ्यात (आणि तेही मागे आचार्य अत्रे असताना!) त्यांचे भान हरवून गेलेले. नाना मग पाचशेहे कोटींचा हिसाब अस्सल मऱ्हाटी शैलीत जनता–जनार्दनाला सादर करतात. पोलादी शरीराला मंद गतीचे हलुवार झोले देत श्रोत्यांना क्रांतिसिंह सांगतात: 'गड्यांनो, आपल्या बैलगाड्या घ्यायच्या, त्याला बैलं जुपायची. हालमजोडीची बैलं. बैलगाड्या मिरवत ह्या क्रांतिवीर बिंदु-नारायण चौकात आणायच्या. आपल्या ढवळ्यापवळ्याची पहिली बैलगाडी जेलाच्या

भिंतीलगत उभी करायची. नंतर एकामागोमाग एक अशा गाड्या हुभ्या करायच्या. पाच, पंचवीस, पन्नास, शंभर, दीडशे... आपल्या लाल्यापाल्याची गाडी शेवटची. ह्या गाड्यांतनी राणीछाप सुरती रुपयं भरायचं. अगदी शिगोशीग, काटोकाट माप. जरावी कम नाही की ज्यास्त नाही. ह्या बिंदू चौकापासनं पार टेंबलाईच्या माळापर्यंत सलग, उभी रांग लावायची. सुरती रुपयांनी खच्चून भरलेली दीडशे गाड्यांची ही आख्खी रांग... ह्ये पाचशेहे कोटी रुपये... तेवढं आम्ही आमच्या धाकल्या भावाला द्यायचं आहेत. '

क्रांतिसिंहांनी पुढे बोलण्याची गरजच पडत नाही. बोलणे शक्यही नसते. कारण पुढे अर्धा-पाऊण मिनिट बिंदू चौक केवळ ऐकत होता. निखळ टाळ्यांचा गगनभेदी कडकडाट ! धरणी दुभंगून जावी असा गडगडाट ! ! आषाढघनाशी वादळवात झुंजावा तसा जणू प्रलयपात ! ! ! आणि व्यासपीठावर उभा असलेला धिप्पाड बांध्याचा, मर्दानी आवाजाचा कुसुमकोमल हृदयाचा रांगडा मऱ्हाटी माणूस ( म्हणजे तसा मानला गेलेला ) करीत होता दिलखुलास हास्याचा गडगडाट. पौरुषसंपन्न आविष्कार.

बिंदू चौकाने असला गडगडाट पुन्हा कधी ऐकला नाही. असा अनुभव पुन्हा त्याला कधी लाभेल असे वाटत नाही. सं. म. चळवळीचा ऐन काळ महामूर रणसंग्राम. बिंदू चौकातील विराट सभा. अत्रे, एसेम जोशी असे पल्लेदार वक्ते. क्रांतिसिंह नाना पाटील त्यांपैकी एक. सं. म. च्या चळवळीतील देण्या-घेण्याचा ' न भूतो ' असा चिरनूतन प्रसंग... नाना पाटील मी मी म्हणणाऱ्यांना कसे जिंकत, कसे हरवत गेले, सेवारत राहताना लोकशिक्षण करीत गेले त्याचे एक सर्वोत्तम प्रात्यक्षिक ...... प्रात्यक्षिकासाठी सुद्धा स्थळ आणि वेळ यांची एकजूट घडून यावी लागते.

## वारकरी संप्रदायाचा वारसा

वारकरी घराण्याचा वारसा घेऊन दिनांक ३ ऑगस्ट, १९०० रोजी सातारा जिल्ह्यातील येडेमच्छिंद्र गावच्या रामचंद्र नाथा पाटलांच्या गरीब शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेले नाना पाटील ' महाराष्ट्राचे मार्क्सवादी माळकरी ' झाले, बलाढ्य ब्रिटिश शासनाला ' दे माय, धरणी ठाय ' करणाऱ्या ' पत्री सरकार ' ची प्रति-संघटना स्थापून धारकऱ्याचा वारसा सांभाळला. नानांचे घराणे विठ्ठलभक्तीत

रमलेले; तो भक्तिरस त्यांचे आईवडील — रामचंद्र व गोजराबाई — यांच्यामध्ये पुरेपूर उतरला होता. वारकरी संप्रदायातील वासकर महाराजांच्या पंथाचे हे घराणे शिष्य होते. नाना हे त्यांचे पहिले अपत्य. साहजिकच वारकरी पंथाची माळ नानांच्या आजीने त्यांच्या गळ्यात घातली. अगदी बारशाच्या दिवशीच. नानांना दोन भाऊ व एक बहीण गंगूबाई. अशी ही चार भावंडे. येडेमच्छिंद्र गाव खेडे. जेमतेम मराठी तिसरी इयत्तेपर्यंत शाळा. तिथपर्यंतचे नानांचे शिक्षण तिथेच झाले, इतर वेळात किंवा शाळेच्या वेळातसुद्धा गुरे चारणे, शेतीखेतीत कामे करणे, नदी-नाल्यात पोहणे आणि उघड्यावाघड्या रानात तालीमबाजी करणे इत्यादी मर्दानी शिक्षण सुरू होतेच. नानांनी पहिल्यापासूनच शरीरसंपत्ती कमावण्याकडे लक्ष राखले. शरीराची तालीम आणि लोकांची सेवा यात नानांनी कधीही हयगय केली नाही. असिधाराव्रत म्हणून ते पाळले. नानांचे सगळे जीवन 'व्रती' होते. या शरीरसंपादनाच्या काळातच खेडेपुंदी गावच्या रामपुरीबुवांची नानांशी ओळखदेख झाली. रामपुरीबुवा कीर्तन छान करीत. तल्लख, चुणचुणीत आणि चलाख नानांनी बुवांच्या कीर्तनाचा 'ढंग' उचलला. त्यात ते रंगले. पुढे ते बुवांचे कीर्तनातील साथीदार बनले. पुढे आयुष्यभर रसाळ कीर्तनकारांच्या विचार प्रेरक ढंगाने नानांनी लोकांचे शिक्षण केले. त्यावरील आपले लक्ष जराही ढळू दिले नाही; त्याचे बीज नानांवर झालेल्या अशा अनेक थरांतून झालेल्या संस्कारांमध्ये प्रकर्षाने दिसते. याच वेळी नानांच्या शिक्षणासाठी 'त्रिस्थळी' सुरू होती : येडेमच्छिंद्र, नरसिंगपूर, इस्लामपूर, नागराळे येथील शाळांतून कित्येक धक्केचपेटे खात नाना व्ह. फा. झाले. साधारणपणे १९१८ साली. शिक्षण, कीर्तन, तालीम, कुस्ती सगळे चढते वाढते होते. आणि नानांचे सुवर्ण व्यक्तिमत्त्व घडत होते.

### कार्यामागील अधिष्ठान

नानांच्या काळी व्ह. फा. पास होणे म्हणजे आजच्या काळातील बी. ए., एम. ए. च्या तोलाची डिग्री होती. व्ह. फा. चे मानचिन्ह साधे नव्हते. व्ह. फा. च्या पूर्ततेनंतरचे पोटापाण्याचे उद्योग ठरलेले होते. शेतीची मशागत, आखाड्याची मळणी किंवा तलाठी गुरुजीची चाकारमानी! पहिले दोन्ही करता करता तलाठ्याची नोकरी धरावी असा नानांच्या वडिलांचा — रामचंद्ररावांचा आग्रह पडला. नाना वडिलधाऱ्यांना मानणारे. तलाठ्याच्या नोकरीसाठी त्यांनी

अर्ज दिला. येडेगावच्या तलाठ्याकडे उमेदवारी, नंतर १९२० मध्ये सुरळीसजा येथे त्यांची तलाठी म्हणून नेमणूक झाली. पण नानांना शासकीय तलाठीपण मानवले नाही. त्यांनी आयुष्यभर तलाठीपण केले ते सामान्य लोकांचे. लोकांचे हृदय, त्यांचे मन आणि त्यांचे हित नानांच्याजवळ सदैव राहिले. हे घडले त्यापाठी जशी नानांच्या घराण्याची हरिदासी परंपरा होती, तशीच सत्यशोधक चळवळीमधील विधायक संस्कारांचे बीजारोपणही होते. सातारा जिल्ह्यात १९११ पासून सत्यशोधक चळवळीच्या प्रचाराला व त्यानंतरच्या काही काळातच कार्याला सुरुवात झाली होती. नानांचे वय ११ वर्षांचे होते. वय संस्कारी, समाजाचे दैन्य विदारक, ब्रिटिश सरकारचा उदारमतवादाच्या नावाखाली जुलूम चालू असलेला – नाना हे सारे पाहात होते. त्यातूनच नानांच्या मनावर देशाच्या राजकीय स्वातंत्र्याबरोबर जनतेच्या सामाजिक स्वातंत्र्याचा प्रश्न ठसण्यास मदत झाली. पुढील आयुष्यात सहसा सामाजिक प्रश्नोपप्रश्नांबाबत उदासीन असलेल्या प्रकृतीच्या पक्षोपपक्षांत राहूनही नाना सामाजिक सुधारणांबाबत सतत आघाडीवर राहिले, त्यामागचे मर्म वेगळे नाही. राजकीय स्वातंत्र्यात सामाजिक स्वातंत्र्य असतेच असे नाही. पण सामाजिक स्वातंत्र्यामुळे राजकीय स्वातंत्र्याला निश्चितच बळकटी येते, हे क्रांतिसिंहासारख्या लोकार्थाने ‘ अनपढ ’ माणसाने उत्तम जाणले होते, आणि त्याचा आचारही त्यांनी हयातभर केला. सत्यशोधक चळवळ १९२० पासूनची. म. गांधीजींच्या सत्याग्रहाची चळवळ यांनी प्रारंभीच्या काळात नानांच्या मूळच्या बंडखोर प्रवृत्तीला खतपाणी घातले. मुद्दाम वहीम आणलेले तलाठीपण सोडून, पारतंत्र्याच्या साखळ्या तोडून नानांनी राजकीय स्वातंत्र्याची नांदी म्हटली तर दुधोंडीच्या पाटलांची मुलगी आकूबाई हिच्याशी, ‘ कमी खर्चात लग्न ’ या सत्यशोधकीय परंपरेने स्वतःचे लग्न पुरोहिताशिवाय कमी खर्चात लावून सामाजिक सुधारणेचा श्रीगणेशा म्हटला. इतकेच नव्हे तर पुढे म. फुले यांचा आदर्श राखून नानांनी आपल्या पत्नीला साक्षर केले. कित्येक दिवस साक्षरतेचे वर्ग चालविले. दारुबाजीसारख्या अनिष्ट रूढीविरुद्ध प्रचार आघाडी उघडली. या सगळ्या प्रयत्नांमागे जनजागृती आणि त्याद्वारा धनिकांच्या साम्राज्याला सुरुंग म्हणजे श्रमिकांच्या राज्याचे प्रस्थापन हे प्रमुख उद्दिष्ट होते. छ. शिवाजी महाराज व म. जोतिबा फुले हे त्यामागचे अधिष्ठान होते. नाना, त्या काळी बहुजनसमाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या काँग्रेस पक्षामध्ये

सामील झाले, राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीत विलीन झाले, खादीधारी बनले आणि हातात तिरंगी झेंडा घेऊन वाठारच्या चावडीवर सत्याग्रहही केला. जंगल लाकूडतोड बंदीविरुद्ध जंगल सत्याग्रहात सहभागी झाले. गांधी-आयर्विन करारानंतर त्यासाठी ६ महिने सक्तमजुरी व १०० रु. दंड अशी पहिली शिक्षा भोगली. आणि तुरुंगातून सुटून आल्यावर पाहतात तो घर उद्ध्वस्त झाल्याचे पाहिले. ते साहिले. पुढे गृहपाशातून मुक्त झाले; त्यामागे नानांची जिद्द, रगेलपणा, ऐस, चिवटपणा, अस्मितापूर्ण जीवनाची आच, गोरगरिबांसाठी वाटेल तो पराकोटीचा त्याग करण्याची दृष्टी इत्यादी गुण होते, तसेच अधिष्ठात्री देवतांचे प्रेरक वैभवही होते.

## श्रमिकांच्या राज्याचे स्वप्न

या प्रारंभकाळानंतरच्या पुढच्या चाळीस-पन्नास वर्षांमध्ये महाराष्ट्रातील (आणि भारतातीलही) अनेकविध चळवळींशी नानांचा निकटचा संबंध राहिला. १९४२ चा स्वातंत्र्याचा अभूतपूर्व लढा, त्या दरम्यानची 'पत्री' (प्रति) सरकारची—'पॅरलल गव्हर्नमेंट'ची—स्थापना, शेतकरी—कामकरी लढे, जमीन-मुक्तीचे, भू—आंदोलनाचे लढे, गोवा मुक्ति संग्राम, सीमा प्रश्न, बँक-राष्ट्रीयी-करण, दलित भूमी आंदोलन अशा अनेक लढ्यांत नाना अग्रभागी होते, सतत राहिले. लढ्यात भाग घेताना डोळे सत्तेवर नव्हते. पुढल्या पदाची कधी अभिलाषा नव्हती, होती ती निखळ सेवावृत्ती. आणि उराशी बाळगलेले श्रमिकांच्या महान राज्याचे स्वप्न! जातपातपंथभेदापलीकडचे हे स्वप्न होते. 'मराठा' नानांनी शिबीच्या निष्ठेने ते अंगीकारले, युधिष्ठिराच्या श्रद्धेने ते जोपासले.

क्रांतिसिंह नानांनी श्रमिकांच्या राज्याचे स्वप्न पाहिले. त्यासाठी त्यांनी भक्ती केली ती जनतेची. ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनात, त्यांच्या आयुष्यक्रमाचा भक्तिमार्ग हा मूलभूत भाग. क्रांतिसिंहांनी तो वैयक्तिक जीवनापुरताच मर्यादित न ठेवता लोकांच्या जीवनाशी निगडित केला. भक्तिमार्गाचा पाया विस्तृत व व्यापक बनविला. बालपणापासून शरीरसंपदा कमविण्याबरोबरच केलेल्या मनसोक्त भटकन्तीमधून त्यांनी हा व्यापक पायाही हस्तगत केला. सुदृढ शरीरसंपदेमुळे निकोप मन जोपासले जाते. नानांच्या ठायी ते होते. स्वातंत्र्यपूर्व कांग्रेसच्या चळवळीपासून तो तहत कम्युनिस्ट पक्षातील सहभागापर्यंत नानांनी हे निकोप

मन आणि सामाजिक चळवळीतील लोकशिक्षणाची अतट भूमिका धरून ठेवली. बहुजनसमाजाच्या जीवनाचे परिवर्तन साधणाऱ्या सत्यशोधक चळवळ व तिचे तत्त्वज्ञान यातून महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांत अस्ताव्यस्त पसरलेला खेडूत समाज हा धार्मिक कचाट्यात, आर्थिक ओढगस्तीत, जातीय पेचात आणि शैक्षणिक मागासपणात कसा रुतून पडला आहे त्याचे दर्शन नानांना घडले होते. म्हणूनच केवळ राजकीय स्वातंत्र्यावर समाधान नव्हते; कारण अगदी स्पष्ट आहे; ते हे की, नुसत्या राजकीय स्वातंत्र्याने प्रश्न सुटत नाहीत. राजकीय स्वातंत्र्याने देशा-वर आधिपत्य कुणाचे आणि त्याचे स्वामित्व कुणाकडे एवढेच प्रथमदर्शनी सिद्ध होते. पण त्यापुढे जाऊन जे आर्थिक-सामाजिक प्रश्न सोडवायचे असतात त्यासाठी राजकीय स्वातंत्र्याबरोबर सामाजिक स्वातंत्र्याची सप्तपदी चालावी लागते. त्यासाठी लोकशिक्षणाची अबाढव्य बैठक घालणे जरूर असते. राजकीय स्वातंत्र्याइतकेच सामाजिक स्वातंत्र्याचे युद्धही जबर असते. ह्या युद्धातले शत्रू प्राय: स्वकीयच असतात आणि ते हमेशा सारखे समोरासमोर उभे असतात. शिवाय सामाजिक स्वातंत्र्याचा लढा पुढे भव्य काही ठेवीत नाही : ना मानमरातब, ना प्रतिष्ठा, ना सिंहासन, ना कीर्ती. धनी व्हावे लागते ते प्रामुख्याने जहरी टीकेचेच. बरे, ज्यांच्यासाठी हे सामाजिक सुधारणेचे अभियान उभे केलेले असते तेच अज्ञानामुळे, शहाणपणाच्या अभावामुळे. त्यात सामील झाल्याची दृश्ये काही कमी दिसतात असे नाही. मग लढा खूपच कठीण बनतो. पण क्रांतिसिंहांनी हा खूप कठीण लढाच पहिल्यापासून हाती घेतला. स्वत:च्या हळूहळू होत जाणाऱ्या उत्क्रांतीबरोबर आणि त्या त्या वेळी सापडलेल्या आणि योग्य वाटलेल्या साधनांबरोबर हा लढा सामाजिक चळवळीकडून राजकीय चळवळीकडे उत्क्रांत झाला. मात्र राजकीय चळवळ हा सामाजिक सुधारणांना अधिक गती देणारा त्याचा एक अंगभूत भाग म्हणूनच क्रांतिसिंहांनी वारंवार हाती घेतला असे दिसते. त्यामुळे राजकारणातला संघर्ष नानांना मनापासून आवडला पण सत्तेसाठी जीवतोड मात्र त्यांना मानवली नाही. ते सदैव त्यापासून अलिप्तच राहिले. मुळात घराण्यात वारकरी पंथाच्या वैराग्याचे दान देणारा वारसा, सत्तेची हासिली हा मूलत:च नसलेला दृष्टिकोण वगैरेमुळे क्रांतिसिंहांनी अनेकांकरिता सिंहासनाचे राजमार्ग खुले करून दिले. साफसुफी आणि बांधबंदिस्ती वारंवार ते करीत राहिले; पण स्वत: सत्तेकडे वळलेच नाहीत. म. फुले—भालेकर—दिनकरराव

जवळकर–केशवराव जेधे–रावसाहेब पटवर्धन–एस. एम. जोशी या ‘ व्रतस्थ ’ परंपरेतील नाना पाटील हे अखेरचे सेनापती होते. कीर्तनरंगी रंगणारे नाना, कुस्त्यांचे फड गाजविणारे नाना, सरकारी पैशाच्या अपहरणाचे कुभांड लाथाडणारे नाना, उभ्या हयातीत एखाद्या पक्षाचे, संस्थेचे, किंवा तत्सम संघटनेचे, अपवाद करता महत्त्वाचे, लक्षणीय काळ ते पदाधिकारी तरी होते की नाही किंवा तसे एखादे पद स्वीकारावे म्हणून कुणी त्यांना केव्हा साधी (फार आग्रहाची नव्हे !) गळ तरी घातली होती की नाही हा संशोधनाचा विषय ठरेल ! पण कशीबशी ‘ सात बुकं शिक्षान् ’ झालेल्या क्रांतिसिंहांनी सामाजिक जीवनाच्या मुक्ततेचा वसा उचलला होता. त्यामुळे सिंहासनाधिष्ठित बंदिस्त विचारांपासून ते मुक्त होते आणि अखेरपर्यंत मुक्तच राहिले. म्हणून जीवनाच्या सगळ्या पातळ्यांवर क्रांतिसिंहांनी ‘ लोकशिक्षणाची ’, ‘ लोकजागृतीची ’ आणि अनिष्ट रूढी व पारतंत्र्ये यांनी भाजून निघणाऱ्या ‘ सामाजिक ’ जीवनाच्या सुधारणांची मशाल सतत पेटती ठेवली. अखेरपर्यंत त्यांनी ती खाली पडू दिली नाही.

याची सुरुवात क्रांतिसिंहांनी घरापासूनच केल्याचे दिसते : सत्यशोधक चळवळीत स्त्री-शिक्षण हा एक महत्त्वाचा कार्यक्रम होता. म. फुल्यांनी आपली पत्नी सावित्रीबाई यांना घरीच शिकवून तयार केले. सावित्रीबाई पुढे शिक्षिका होऊन ज्ञानदानाचे काम करू लागल्या. सनातन्यांनी त्यामुळे त्यांना जीव नकोसा केला, हे इतिहास सांगतोच. नानांची पत्नी आकुबाई. त्यांना शिकविण्याचा नानांनी प्रयत्न केला; थोडेफार यश आले; फार मोठे यश लाभले नाही. पण त्याला कारण सावित्रीबाई आणि आकुबाई यांच्या कौटुंबिक, सामाजिक, मानसिक, वगैरे परिस्थितीमध्ये आहे. पण क्रांतिसिंहांचे प्रयत्न चालूच राहिले. ते अथक चालूही होते.

### चौकटीविना चळवळीचा ध्यास

क्रांतिसिंहांच्या सामाजिक–राजकीय कार्यामागची प्रेरणा म. फुले, राजर्षी शाहूमहाराज, ना. भास्करराव जाधव, कर्मवीर भाऊराव पाटील, स्वामी रामानंद महाराज यांच्या कार्यातून उद्भूत झालेली होती. पण कार्य कुठलेही असो, चळवळ कोणतीही असो ती चौकटीविना करावयाची ही नानांची रीत होती. तत्त्वज्ञानाची ठक भक्कम, मार्गाची निश्चिती पक्की पण ती कशाला तरी बांधून घेऊन

करायची हे नानांना मान्य नव्हते. नानांची उसळती प्रवृत्ती ते करायला मुळी राजीच नव्हती. कार्याभोवती कुंपणे नकोत, कार्य चौकटीविना चालणारे असावे हे क्रांतिसिंहांचे गणित होते. निघायचे आणि पोचायचे स्टेशन ठरले की परिस्थितीनुरूप चालायचे; या भूमिकेमुळे क्रांतिसिंहांची अनेक स्टेशने चुकली, ज्या स्टेशनवर ते शेवटी स्थिरावले, त्या स्टेशनावरून मागे वळून पाहता हा धगधगता अंगार जेवढा फुलायला हवा होता तेवढा फुलू शकला नाही, हे जाणवते. गोरगरीब जनतेचे राज्य यावे म्हणून समाजातल्या खालच्यातल्या खालच्या थराशी जवळीक साधून 'शिवकार्य' करू पाहणारे क्रांतिसिंहांचे वर्णन त्या वेळचे पोलिस अधिकारी श्री. रोच यांनी केले आहे; ते असे आहे : 'नाना पाटील हा सह्याद्रीमध्ये उद्रेक पावलेल्या छत्रपती शिवाजीमहाराज, सातारचे प्रतापसिंहमहाराज, उमाजी नाईक, रंगो बापूजी, वासुदेव बळवंत फडके, नारायणराव जोगळेकर इत्यादींच्या परंपरेतील भयंकर घातकी निखारा आहे.' असा हा निखारा सर्वांगांनी फुलला नाही, त्याने स्वप्नी देखिलेले स्वप्न त्यांच्या हयातीत सिद्ध झाल्याचा प्रत्ययही मिळाला नाही.

म. गांधींचा आदेश प्रमाण मानून नानांनी काँग्रेसच्या चळवळीत भाग घेतला तो १९३० साली. त्या साली नानांनी वाठार येथील चावडीवर तिरंगा फडकावून सत्याग्रह केला. नानांचा हा पहिला राजकीय प्रवेश, पहिला सत्याग्रह आणि पहिली अटक. नंतर मिठाच्या सत्याग्रहाला पर्यायी जंगल सत्याग्रहात भाग, उपजीविकेच्या तीव्रतर बनलेल्या प्रश्नातून काढलेले मार्ग, कूपर–कंबळी व ना. बाळासाहेब खेर मंत्रिमंडळाचे अनुभव, १९४० मधील वैयक्तिक सत्याग्रह, ९ ऑगस्ट, १९४२ चा क्रांतीचा वणवा, तासगावचा प्रचंड मोर्चा, १०–९–१९४२ रोजीचे इस्लामपूर येथील अत्याचार, प्रति सरकारची स्थापना, स्वातंत्र्याचे दान, ३ ऑगस्ट, १९४६ च्या दरम्यान झालेली शे. का. पक्षाची स्थापना, पुढे कामगार किसान पक्षाची निर्मिती, नवजीवन संघटनेतील कार्य, १९५१ मध्ये कम्युनिस्ट पक्षात प्रवेश, गोवा मुक्ती, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, सीमा प्रश्नाचे भिजत घोंगडे अशा निरनिराळ्या अवस्थांमधून नाना पाटील गेले. जीवनभर आपला देश आणि त्या देशातली गरीब जनता यांचा क्षणभरही विसर पडू न देता क्रांतिसिंहांनी मार्क्सवादाच्या या उभ्या प्रवासाचे रेखाटन करताना 'श्रीराम इच्छेनं हे सारं झालं' असे नानांनी सांगितले आहे. मार्क्सवादी

परमेश्वर मानतो, ' श्रीरामाची इच्छा ' असे बोलतो हे वदतोव्याघात असे वाटेल, पण क्रांतिसिंहांच्या आयुष्यात ' श्रीरामच ' भरून राहिला आहे. त्याच्या स्मरणाखेरीज त्यांचा क्षणही मागे पडला नाही. नाना म्हणत :

" माणसाचं आयुष्य हे देवाच्या हातातलं खेळणं आहे. त्या प्रभू रामरायानं मला जन्म दिला. माझ्या आयुष्याची आखणी केली. त्यानेच खेड्यातल्या या पोराला शिकवलं, वाढवलं, पोसलं. त्याच्यामुळेच मला लहानपणापासून पददलित समाजाबद्दल कणव निर्माण झाली. त्यांच्याकरता जीवन घालवावं असा घोर लागला. माझं वैयक्तिक जीवन शुद्ध व मंगल व्हावं हेही त्यानंच पाहिलं...... गरिबांच्या उद्धाराच्या आंतरिक इच्छेनेच म. गांधीजींच्यामधला युगपुरुष मला दिसला. त्यासाठी मी त्यांचा पाईक झालो. मार्क्स, लेनिन, स्टालिन यांनी गरिबांसाठी केलेली धडपड जाणून मी कम्युनिस्ट बनलो, गरिबांना सुख लाभावं यासाठी अनादी काळापासून अनेकांनी आपली जीवन-पुष्पं वाहिली. त्याच बुद्धीनं मी वागलो. मला सहकारीही त्याच बुद्धीचे—श्रद्धेचे—लाभले. मी तसं मोठं असं काय केलं आहे ? मी जी क्रांती केली असं लोक समजतात ती समुद्रावरची एक छोटी लाट आहे. सागराच्या लाटांची संख्या मोजता येईल का ? आणि तशा त्या कुणी मोजल्या आहेत का ? नाना पाटील हीही तशीच एक बारीकशी लाट आहे. पण या लाटेनं काही श्रमजीवी लोकांच्या जीवनात सौख्य-सुभाग्य आलं असलं, त्यांच्या मुखात चार सुखाचे घास पडत असतील तर मी संतृप्त आहे. त्या प्रभुरायानं हे जे दिलं त्याहून मोठं काहीच नाही. त्यानं इतरांनाही तसंच द्यावं अशी माझी भाक आहे. "

आकाशात चमकणाऱ्या ताऱ्याइतके स्वच्छ, निर्मळ व स्पष्ट जीवन जगणाऱ्या क्रांतिसिंह नानांची अंतिम इच्छा, या देशातल्या कष्टकरी-कामकरी, मजूर—शेतकरी गरिबातल्या—गरिबाला भाकरी आणि भाकरीबरोबर तेलात कालवलेले तिखट व मीठ मिळावे, ' प्वाटभरून मिळावं ' ही होती. नानांनी अनेक स्टेशने बदलली, अनेक स्टेशनांवर ते उभे राहिले पण गरिबांचा उद्धार या मूळ तत्त्वापासून ते एवढेही ढळले नाहीत. दुनियेतल्या ह्या सनातन झगडण्यात क्रांतिसिंहांची जिनगीभरची ती जिद्द राहिली. नानांनी त्याबाबत कधीच तडजोड

केली नाही.

## 'पत्री सरकार' चे ऐतिहासिक कार्य

पत्री सरकारची निर्मिती आणि संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामधील अग्रेसरत्व ही नानांच्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील महान पर्वे होत. आयुष्याच्या या दोन पर्वांत नानांनी कार्यशक्ती, संघटकशक्ती याचे सारे तेज पणाला लावले. १९४२ च्या धामधुमीच्या काळात नानांनी 'सातारा ग्रामराज्याच्या'ची कल्पना मांडली. स्वातंत्र्याची धगधगती भावना आणि विषमतेची मनस्वी चीड या तेज-संपन्न जाणिवेतून 'वारकरी' क्रांतिसिंह 'धारकरी' बनले. एका हातात तुकारामाचा गाथा—ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी' आणि दुसऱ्या हातात शिवछत्रपतींची भवानी तलवार घेऊन त्यांनी ही प्रखर झुंज दिली. बेदरकारांना वठणीवर आणले. कडेकपारीतल्या निर्मळ मनाच्या बलदंड पहाडाला सुचले, आवडले, पटले ते त्याने, त्या त्या वेळी उपयोगी वाटतील ती साधने वापरून तडीला नेण्यासाठी प्रयत्न केला. प्रति सरकार ही क्रांतिसिंहांची निर्मिती होती. या निर्मितीत अनेकांचा महत्त्वाचा व जबाबदारीचा वाटा असला तरी नानांचा त्यामधील सहभाग सेनापतीचा होता, सच्च्या लढवय्याचा व देशभक्ताचा होता. 'नाना पाटलांचे पत्री सरकार', 'नाना पाटलांची फौज', 'नानापाटलांचे न्यायकोर्ट', 'नाना पाटलांची तुफानी सेना', 'नाना पाटलांचे फरारी' अशा निरनिराळ्या नावांनीच 'प्रति सरकार' त्या काळात ओळखले जाई. या देशभक्तिपर क्रांती-मधील, पळत्या वाऱ्यासारख्या वावरणाऱ्या नाना पाटलांसंबंधी कितीतरी पोवाडे आणि कवने त्या काळात वातावरणात भरून राहिली होती.

"नाना पाटील फरारी आला : ओवाळू ग त्याला।"

"अरे, कोण पकडील नाना पाटलाला।
कोण धरील पळत्या वाऱ्याला।"

ह्या त्यांपैकी काही शेष ओळी.

प्रति सरकारला जनतेचे पाठबळ होतेच. त्याची एवढीशीही कमतरता नव्हती. शेवटी चळवळी लोकबळावरच उभ्या राहतात, वाढतात. नाना पाटील, किसन वीर, जी. डी. लाड, नागनाथ नायकवडी प्रभृतींनी उभे केलेले 'प्रति सरकार'चे बंड हे 'लोकयुद्ध' होते. म्हणून तर शेकडो—हजारो तरुण मुली शेतारानात

हिंडून भूमिगत कार्यकर्त्यांना चटणी-भाकरी पोचवीत होत्या. आणि मातेच्या मायेने व पत्नीच्या धीराने त्या कार्यकर्त्यांचा सांभाळ करीत होत्या. खेडोपाडीच्या शाळा ही त्यांची निवारा केंद्रे होती.

प्रति सरकारची निर्मिती ही पूर्णतः सातारा जिल्ह्यातील बलदंड कार्यकर्त्यांची रगदार अनुभवातून आकाराला आलेली संघटना होती. प्रसंगपरत्वे इतर कुणा मानवंतांशी विचारविनिमय झाला तरी सरकार आणि कार्यक्रम हा खास त्यांचा होता, इतर कुणी त्यावर हक्क सांगेल अशी स्थिती नव्हती.

प्रति सरकारला, ब्रिटिश शासन कुचेष्टेने 'पत्री सरकार' असे म्हणे. यात हिणवण्याचाच भाग अधिक होता. ह्या चळवळीची बदनामी करण्यासाठी ब्रिटिशधार्जिण्या 'टाइम्स ऑफ इंडिया'ने बनावट अत्याचाराचे फोटोही छापले होते. (संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत महाराष्ट्राविरुद्धही अशी काही बदनामीकारक खोटी छायाचित्रे छापल्याची परंपरा ताजी आहे, लांबची नाही) प्रति सरकार म्हणजे समान्तर शासन. ते काय करीत असे? ते पत्री मारण्याची शिक्षा देई. पायाच्या तळव्यावर व पोटऱ्यांवर बेदम मार देऊन बेजार करणे याला पत्री मारणे म्हणत. फितूर, अन्यायी, दरोडेखोर, त्यांचे हस्तक, अन्याय करणारे ब्रिटिश अधिकारी वगैरेंना ह्या शिक्षेचा बेदम प्रसाद मिळे. गोरगरिबांना त्याचा कसला संपर्क नव्हता की त्रास नव्हता. म्हणून तर प्रति सरकारला बेचिराख करण्यासाठी ब्रिटिश सरकारने साताऱ्यास दोनदा लष्कराला पाचारण केले, पण चळवळीचा बिमोड काही झाला नाही. प्रश्न सुटतात ते लोकमताच्या पाठिंब्यावर, लष्करी बळावर नव्हे! हे अशक्य झाले तेव्हा फंदफितुरी होते का ते पाहण्यात आले; अट्टल दरोडेखोरांना हाताशी धरण्यात आले. पण दरोडेखोरांचा म्होरक्या मारुती शेणेकर याला, प्रति सरकारच्या बाबूजी पाटणकर, बर्डे मास्तर, शेख काका वगैरेंनी कासेगावी कडब्याच्या बुचाडात गोळी घालून ठार केले. आणि ब्रिटिशांचे सगळे प्रयत्नच विरून गेले. प्रति सरकारच्या अत्यंत शिस्तबद्ध अशा जवळ जवळ ५,००० कार्यकर्त्यांच्या बांधेसूद भूमिगत संघटनेमुळे ब्रिटिशांच्या सगळ्या प्रयत्नांवर पाणीच फिरले. १९४५ मधल्या ब्रिटिशांशी झालेल्या तडजोडीच्या राजकारणाने इतिहासाला अर्थातच वेगळी कलाटणी मिळाली.

'प्रति सरकार' मधील आपल्या सहभागासंबंधी काही जणांच्या कुत्सित खोडसाळ बोलण्याला क्रांतिसिंहांचे अर्थपूर्ण व वस्तुनिष्ठ उत्तर असे : "नाना

पाटलानं काहीच केलं नाही आणि नाना पाटलावाचून काहीच झालं नाही." नाना पाटलांच्या बोलण्याचा हा बाज वस्तुस्थिती सांगत राहिला, लोकांच्या हृदयाला भिडत गेला आणि कित्येक खडतर वर्षे त्याने जनसागरही हेलावत ठेवला.

ह्या साऱ्याचे मूल्यमापन—मग ते राजकीय असो अगर सामाजिक—कसे व्हावे ? कसे करावे ? हा इतिहासाचा प्रश्न आहे. इतिहासाला भोंगळपात रस नसेल, विश्वासार्हता टिकवून ठेवायची त्यांची रीत असेल तर त्याचे 'धडे' योग्य असतीलही. मात्र नानांच्या वैयक्तिक आणि सामूहिक प्रयत्नांनी सर्वंकष पारतंत्र्याच्या मुक्तीचा क्षण जवळ आणला हे कुणाला कसे नाकारता येईल ?

**देशात असे उदाहरण नाही !**

जनतामाऊली हीच क्रांतिसिंहांची विठाईमाऊली होती. तिची सेवा हीच त्यांची विठ्ठलसेवा होती. कबीर, फुले, गांधी यांना साक्षी ठेवून त्यांनी ती अखंडपणे केली, 'मी तीन गुरूंचा ऋणी आहे : म. कबीर, म. फुले व म. गांधी' असे क्रांतिसिंह नेहमी म्हणत. कबिराची समाजशील आध्यात्मिकता, फुल्यांची राजकारणधुरंधर परिवर्तनशीलता आणि गांधीजींची राजकीय संस्कृतिशीलता यांचा विलक्षण मनोहर संयोग क्रांतिसिंहांमध्ये होता. त्यामुळेच असेल कदाचित पण 'प्रत्यक्ष शेतकऱ्यांतून निर्माण झालेला कार्यकर्ता, राजकीय नेतृत्वाच्या इतक्या उच्च पातळीवर चढल्याचे दुसरे उदाहरण निदान या देशात तरी नाही.' म्हणून लोकसभेच्या अत्युच्च व्यासपीठावर—इंग्रज गेले तरी इंग्रजीचा अंमल प्रकर्षाने असलेल्या व्यासपीठावर—खासदार या नात्याने क्रांतिसिंह नाना पाटील मायबोली मराठीत बोलले. लोकवाङ्मयाच्या या सैनिकाचे हे अजोड कार्यही केवळ, 'म. जोतिबा फुल्यांच्यानंतर मराठी ग्रामीण जनतेच्या मनाची पकड घेणारा नाना पाटलांएवढा थोर पुढारी अन्य झाला नाही', असे ठासून सांगण्याइतके थोर आहे. तसे हे विधान क्रांतिसिंहांच्या एकूण कार्याच्याच बाबतीत चपखल लागू होणारे आहे.

६ डिसेंबर १९७६ ला क्रांतिसिंह नाना पाटील पंचत्वात विलीन झाले. क्रांतीची धगधगती ज्योत निमाली; जिंदगीभरची जिद्द रामचरणी विसावली. पण विसावता विसावता क्रांतिसिंहांची प्रभू रामचंद्रांच्या चरणी विनम्र प्रार्थना आहे :

" अवघडातल्या अवघड समस्यांना तोंड देण्यासाठी गरीबगुरीब जनतेला बेडरपणा लाभो. "

नाना पाटील, ही लोकशिक्षणाची आभाळस्पर्शी चळवळ होती. कितीही संशोधन केले तरी क्रांतिसिंहांच्या धगधगत्या जीवनाचे सार त्यांच्याहून दुसरा याहून समर्थ शब्दांत कोण सांगू शकेल ?

# ८

# जागृती आणि रचना

तसे पाहता मराठी वाङ्मयामध्ये अनेक गोष्टींना अद्याप मान्यता लाभायची आहे. लाभणे जरूर पण लाभणे मात्र घडलेले नाही. कारणे विपुल आहेत : जे जागृत असायला हवेत ते जागरूक नाहीत. हक्कांची व अधिकारांची त्यामुळे जाणीव नाही. किंवा जे जागरूक झाल्यासारखे वाटतात ते असे एकदेशीय जागृत आहेत, की अन्य ' देशां 'कडे त्यांचे लक्षच नाही. म्हणजे एखाद्याकडे पाहायचे ते राजकीय विचारांच्या दृष्टीतूनच. ही किंवा अन्य (सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक वगैरे) दृष्टीच मग इतकी बलशाली व्हावी की, अन्य बाजूंचा विचार आपाततः शून्य व्हावा ! त्यात ज्यांनी घटितांबद्दल काही लिहून ठेविले आहे ते इतके एकाक्ष, की त्यांनी मांडलेल्या इतिहासाव्यतिरिक्त त्यासकट वेगळा म्हणून काही इतिहास घडला असावा अशी चुकूनसुद्धा शंका येऊ नये ! असे हे सर्व अंगांनी बेमालूम सांधेजोडीचे काम राहिल्यावर मान्यतेसाठी काहींनी ताटकळत राहिल्यास नवल ते कोणते ? यात दोष ह्याचा की त्याचा हा चर्चेचा मुद्दा वादंगाचा स्फोटक विषय निश्चित होईल. पण महत्त्वाचे ते हे की, जे लाभणे जरूर पण घडलेले नाही, ते घडवून आणण्याचे प्रयत्न करणे. हे प्रयत्न भावनात्मक नव्हेत तर वैचारिक पातळीवरचे, निश्चित पुराव्यासकटचे. त्याला महत्त्व आहे. बाभळीच्या गाठीसारखा विचार आणि सजविलेल्या हजारो बखरींना झटकन मागे सारणारे अस्सल पुराव्याचे एखादे साधेही चिटोरे कुठल्याही गोष्टीला शाश्वत रूप मिळवू देतात, हे विसरून चालत नाही. म्हणून महत्त्वाला महत्त्व असते, येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ' बहिष्कृत भारत 'चे ' मूकनायक ' म्हणून सर्वदूर परिचित आहेत. देवाच्या अगदी खालच्या पायरीला स्पर्श करण्यातही

'अब्रह्मण्य' लपले होते, त्याच माणसाचे थोरल्या घरच्या धुरंधरात रूपांतर झाले, आणि त्यांच्या हातून भारतीय घटनेचे शिल्प घडले. म्हणून 'घटनेचे शिल्पकार' म्हणूनही ते ख्यातकीर्त आहेत. शेकडो वर्षे दलितांनी अश्रूंनी, हालअपेष्टांनी मानवी हक्कांच्या सनदेची दारे ठोठावली त्यांचे उद्धारकर्ते म्हणून आंबेडकर मान्यवर आहेत. दलितांना साहित्यामध्ये स्वतःचा हुंकार मिळवू देणाऱ्या 'आंबेडकरवादा'चे प्रणेते म्हणूनही ते सुप्रसिद्ध आहेत. असे बाबासाहेब आंबेडकर किती नि काय आहेत यापेक्षा किती नि काय काय नाहीत असा प्रश्न करावा. त्या प्रश्नाबरोबरच स्तंभित व्हावे एवढे आकाशाला गवसणी घालू पाहणारे डॉ. आंबेडकरांचे विविध क्षेत्रीय कर्तृत्व चहूअंगांनी विस्तारून राहिले आहे.

मात्र डॉ. आंबेडकरांची ही विविधक्षेत्रीय ओळख इतकी दाट, एवढी गहन, नजरेआड करतो म्हटले तरी सहजी न विसरता येणारी की यापुढे त्यांची कित्येक रूपे मातीच्या फुफाट्यात उमटलेल्या पावलांप्रमाणे बुजून गेली आहेत. मराठी मनही परिचित ओळखीत मुरांब्यासारखे इतके मुरलेले की, डॉ. आंबेडकरांनी मराठी निबंधाच्या घटनेत आणि शिक्षणकारणात प्राण ओतला, त्याचे रंगरूप पालटविण्यास साहाय्य केले; त्याचे भान त्यास जवळजवळ नगण्य राहिले आहे. अतिपरिचयाच्या गुंत्यात डॉ. आंबेडकरांचे निबंधकार शिक्षणतज्ज्ञाचे रूप पार झाकोळून गेले आहे. अहमहमिकेने पुढे पुढे सरसावणाऱ्या दलित साहित्याच्या प्रणेत्या मंडळींनाही डॉ. आंबेडकरांच्या निबंधकाराच्या रूपाचे भान नेमकेपणे आकळणे अद्यापपावेतो तरी अशक्य झाल्याचे दिसते. यापूर्वीच हे होणे आवश्यक होते. डॉ. आंबेडकरांसारख्या धुरंधराच्या अनेकस्वरूपी गुणदोषांचा शोध, आपली नित्याची थोडी चाल बदलून आणि दिशा वळवून मराठी साहित्याने घेणे हा त्या साहित्याच्या आणि वैचारिक वाङ्मयाच्या समृद्धीचीच गंगोत्री ठरेल.

डॉ. आंबेडकरांमध्ये अनेकविध गुण एकवटलेले होते. विद्वत्ता आणि रसिकता, क्रांतिकारकत्व आणि मानवतावादी दृष्टीचा प्रत्यक्ष आचार, कायदेपटुत्व आणि विविध कलांमधील रसमग्नता, मते आणि मैत्री भिन्नभिन्न ठेवून मानवी संबंध जपण्याकडे असलेला नितांत ओढा, वैयक्तिकतेला बाजूला सारून वैचारिक पातळीवर युद्ध लढण्याची सदैव असलेली तयारी, आकाश कोसळले तरी

राष्ट्रहितदक्ष मतांवर असलेली अपार निष्ठा अशा गुणसमुच्चयांबरोबर आंबेडकरांचे निबंधकाराचे रंगरूपही प्रेरक तितके स्फोटक आहे. आंबेडकरांचे लेख, ग्रंथ, व्याख्याने इत्यादी विचारप्रवर्तक अनेक स्तरीय लेखनातून निबंधकार आंबेडकर ठळकपणे नजरेत भरतात, एवढेच नव्हे तर मराठी वाङ्मयाच्या निबंधपरंपरेत ते आपले स्थाननिर्धारणही करून राहतात. मराठी वाङ्मयाच्या निबंध परंपरेने अर्थात याची दखल घेतलेली नाही. दखल नाही म्हणून कुणाला तरी पकडून त्याचा अगर त्यांचा बळी घेणे सोपे आहे, पण गदारोळाने प्रश्न सुटत नाहीत. म्हणून ती दिशा न पकडता पुढे जाणे आणि जे चुकले ते सुधारून घेणे केव्हाही उचित आहे. डॉ. आंबेडकर काय किंवा म. फुले काय, या सगळ्याच मंडळींनी आपले विशिष्ट असे जीवनकार्य मानले. जे त्यांनी मानले ते त्यांनी लोकांपर्यंत पोचविले, लोकांनीही ते शिरोधार्य केले. त्यासंबंधीच्या अचाट प्रयत्नांमध्ये तुलनेने काही कार्ये अस्पृश्य ठरली. मराठी साहित्याच्या इतिहासाची दिशा आणि ध्यास लक्षात ठेवूनही दोषाचे, उपेक्षेचे खापर सर्वस्वी कुणाच्या माथ्यावर फोडून मोकळे होता येईल असे नाही. म्हणून पुढचा शोध एवढेच कर्तव्यकर्म उरते; उरावे.

## मराठी निबंध : प्रकृती आणि स्वरूप

मराठी वाङ्मयातील निबंधाची परंपरा वैचारिकतेने परिपूर्ण आहे; पण ती पुरेशी वैचारिक नाही. भावनात्मकतेच्या आंदोलनावर प्रायः ही वैचारिकता हेलकावे खाताना दिसते. अगदी मिसेस फरारपासून तो डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांच्यापर्यंत म्हणजे आजकालअखेर मराठी निबंधाची परंपरा न्याहाळली तरी याचा प्रत्यय येतो. भावनेचे प्राबल्य, विचाराचे आधिक्य, माहितीचे वैपुल्य, रचनेचे लालित्य हे सारे त्यात आहे. पण त्यांच्या तुलनेने निव्वळ विचारांची उणीवही तेवढीच मोठी आहे. काही अपवाद करता हे विधान मांडून दाखविण्यात काही कसूर होते आहे असे मानण्याचे कारण नाही. म्हणून भावशील वैचारिकतेने मराठी निबंध तुडुंब भरून राहिलेला दिसतो. निखळ विचार प्रेरक, स्फोटक असतो. तो हमेशा स्फोट घडवून आणता आणता अंतर्मुख करतो. मनुष्य बहिर्मुखतेकडून अंतर्मुखतेकडे वळतो तेव्हा जुन्या मतांचा, निष्ठांचा, श्रद्धांचा कोन त्याने बदललेला असतो. हे कोन बदलणे हे मन–

बदलाचे प्रात्यक्षिक असते. मत म्हणजे मनाचे म्हणणे, असे संत विनोबांनी सांगितले आहे; ते, त्यांचे इतर काही पटणारे नसले तरी हे पटावे असे आहे. याचा अर्थ, मन बदलणे म्हणजेच पालट होणे. निखळ विचार हे हळूहळू पण निश्चित स्वरूपाने करीत असतो. याचा अर्थ विचारप्रकटीकरणात भावना, विकार यांचा अंश असू नये, येताच कामा नये असे मात्र नव्हे. भावना आणि विचार या मूठ आणि तलवार या नात्यागोत्याने निगडित आहेत. त्यांचे साहचर्य असणे अपरिहार्य आहे. पण विचारावर भावनेची मात ही बाब रागाने थरथरणाऱ्या माणसाचे बोलण्यासाठी नुसते ओठ थरथरावेत पण त्यातून शब्दच उमटू नयेत, तशी आहे. वैचारिकता हे कुठल्याही निबंध-वाङ्मयाचे सारभूत प्राणतत्त्व असते. मराठी निबंधाचा मंत्र यावेगळा नव्हे. या मंत्राचा मोहरा परिवर्तनशीलतेकडे राहावा हे नैसर्गिक ठरते. हवे ते पक्के करावयाचे, नको ते निपटून काढावयाचे, दुरुस्त करून घेणे शक्य त्याची फेरमांडणी करावयाची, आणि हे सारे परखडपणे, निर्भीड वृत्तीने कुणाचाही मुलाहिजा न राखता करावयाचे हे काम सोपे कसे म्हणता येईल? निबंधाची रचना ही शत्रूंची संख्या वाढविणारी असते. पण शत्रूंची संख्या कमी करणे आणि मित्रांची वाढविणे अशा धर्तीचे त्यांचे लेखन ही, गल्लीपासून दिल्लीपर्यंतच्या राजकारणावर अधिकारवाणीचा आव आणून बोलण्याइतकी निश्चितच सोपी गोष्ट नाही. म. फुले, लोकहितवादी, लो. टिळक, डॉ. आंबेडकर यासारख्या रोकड्या समाजसुधारकांनाही हे 'सोपे' काम जमणारे नसते. तेही तसे या फंदात फारसे पडत नाहीत. मन–मत–समाज यांचे परिवर्तन आणि अंतिमत: समाजव्यवस्थेमध्ये परिवर्तन हे निबंधरचनेचे अंगभूत तत्त्व आहे. रंजन करणाऱ्या ललितकृतीचे रूप त्यास असते. निर्माणकर्त्यांनी तसे ते रूप दिले तर फारच उत्तम, आक्षेप घेण्याचे काहीच कारण नाही. पण रंजकतेमध्ये प्रेरकता असते हे महत्त्वाचे. मराठी निबंधाने हे महत्त्वाचे, आपापल्यापरीने जपले, सांभाळले आणि राखले आहे. समृद्धतेचे जेवढे वैभव त्यात असावे तेवढे त्यात नाही हे खोटे नाही. पण म्हणून मूलतत्त्वांचे वजन कमी भरावे असेही त्यात काही नाही. मात्र वैचारिकतेचे कुंड परिवर्तनशीलतेच्या गंगेत मिसळतात ते समाजजीवनाच्या अध्ययनातून, तद्विषयक प्रश्नोपप्रश्नांच्या खोल चिंतनातून! जनतेच्या हृदयाच्या ठोक्याच्या वेणा सोसल्याखेरीज आणि मातीच्या कळा जाणल्याशिवाय अध्ययन,

चिंतन संभवत नाही. रंग–वेरंगाचे मॅचिंग करून मुरडण्याइतके ते फुलपाखरी नजाकतीचे प्रदर्शन मुळीच नाही. समाजाच्या तळागाळाची वस्ती उभी करताना सर्व सामर्थ्य निर्धाराने व निष्ठेने वापरावे लागते. एतद्विषयक कार्यातून समाजाची सदसद्विवेकबुद्धी ढवळून काढली जाते. तिचे नजाकतीचे प्रदर्शन व्यर्थ ठरते.

**आंबेडकरी निबंधाचे विशेष :**

त्या दृष्टीने आंबेडकर लेखनाची दिशा लावून आहेत. या दिशेचे लक्ष्य समाजव्यवस्थेमधील साऱ्या प्रतिगामी शक्तींविरुद्ध दंड थोपटून उभे राहणे; जे जे म्हणून कुणी बहिष्कृत असतील त्याचे धार्मिक कर्मकांडातून विमोचन करणे आणि ते करता करता त्यांच्या आर्थिक व शैक्षणिक, सामाजिक व राजकीय हक्कां-साठी अव्याहतपणे लढणे हे आहे.

काय करू आता धरूनिया भांड ।
नि:शंक हे तोंड वाजविले ।।
नव्हे जगी कोणी मुकियांचा जाण ।
सार्थक लाजून नव्हे हित ।।

असे मुळी ३१ जानेवारी, १९२० ला सुरू केलेल्या 'मूकनायक' या पाक्षिक वृत्तपत्राचे आंबेडकरांनी ब्रीदवाक्यच लिहिले होते. मुक्यांना वाचा देण्यासाठी आंबेडकरांची धडपड होती–कुणाची भीडभाड न ठेवता ! भीडेभीडे पोटी काहीच जन्माला येणे शक्य नव्हते. म्हणून ३ एप्रिल, १९२७ रोजी काढलेल्या 'बहिष्कृत भारता'च्या माथ्यावर आंबेडकरांनी

आता कोदंड घेऊनि हाती । आरूढ पां इथे रथी ।
देई आलिंगन वीरवृत्ती । समाधाने
जगी कीर्ती रूढवी । स्वधर्माच्या मानु वाढवी ।
इया भारापासोनी सोडवी । मेदिनी हे
आता पार्था नि:शंकु होई । या संग्राम चित्त देई ।
एथ हे वाचुनि काही । बोलो नये

असे 'कोदण्डाचा टणत्कार' खणखणविणारे विरुद कोरले आहे. समाज-व्यवस्थेच्या बदलाप्रीत्यर्थ आंबेडकरांनी अंगीकारलेले मानवी हक्कांच्या सनदेच्या

हासिलीचे कार्य, त्यांना नकळत मराठी निबंधाच्या क्षेत्रात स्वयंभू स्थान देण्यास साहाय्यभूत ठरले आहे, आंबेडकर 'मुक्ति कोन पथे ?', 'समतेसाठीच विषमता', 'खोती ऊर्फ शेतकरी वर्गाची गुलामगिरी', 'समाजसमतेचे विरोधक', 'बाप घरी वाटा बाप घरीही बाटा', 'अस्पृश्यता व सत्याग्रहाची सिद्धी' यासारखे वक्तृत्वपूर्ण अग्रलेखात्मक निबंध लिहितात तेव्हा आपण निबंध लिहीत आहोत याची जाणीव नसली तरी ते निबंधच असतात. आंबेडकरांच्या अनेकविध गुणसमुच्चयाची त्यातून प्रचीती मिळते. विशेष म्हणजे आंबेडकरांच्या निबंधातील विचार अत्यंत कठोर असले, मस्तक भेदणाऱ्या घणाघाती पद्धतीने ते सांगितलेले असले तरी त्यामधली सुबोधता, परिणामकारक रचना विशेष उल्लेखनीय आहे. विशेषतः डॉ. आंबेडकर लिहीत होते ते खचलेल्या, पिचलेल्या, खंगलेल्या, अडलेल्या बहिष्कृत लोकांसाठी. या बहिष्कृतांचे रूप तसे 'गावढळ' सुसंस्कृत जगाला न मानवणारे, पण आंबेडकरांच्या निबंधाची 'लेव्हल' उद्बोधकतेच्या पातळीवरून कधी खाली आली नाही की भाषेचे स्वरूप कधी डागळू दिले नाही. मनाच्या तळाशी चिवटपणाने घट्ट चिकटून बसलेल्या, जळूसारखे रक्त शोषण करणाऱ्या, मताच्या हेकटपणाला शह द्यायचा तो मन, मस्तक आणि मनगट काबूत ठेवून करायचा, सनसनाटी करून नव्हे. डॉ. आंबेडकरांचा तात्कालिकांवर मुळी भर नव्हताच. त्यांची नजर खिळली होती ती शाश्वत मूल्यधारणेवर ! अजाणता आंबेडकरांनी निबंधात्मक वाङ्मयाची कास धरली ती त्यामुळेच ! शक्यतो सर्व बाजूंनी विचार करून मने आणि मते बदलू पाहणाऱ्या सकस मनाची निबंधरचना ही निर्मिती असते. दुसऱ्या अर्थाने समाजाच्या बांधणीची ती संकल्पना असते. विशेष दर्जाचे वैचारिक जीवन जगू पाहणाऱ्या लोकशाहीवादी आंबेडकरांनी विविध लेखनाच्या रूपाने अशी निबंध-निर्मिती केली. 'मूकनायक'च्या प्रकाशनाच्या वेळी इंग्रजी भाषेत विचार करण्याची व लिहिण्याची सवय जडलेल्या डॉ. आंबेडकरांनी 'बहिष्कृत भारता'-च्या वेळी त्यांनी मराठीत लिहिण्याचा सराव केला आणि मराठीत लेखन करावयाचे, तेही 'बहिष्कृत भारता' साठी, म्हणून त्यांनी जवळजवळ पाचएक महिने मराठीमधील वृत्तपत्रीय लेखन / निबंधवाङ्मय वाचण्यात खर्ची घातले, असे आंबेडकर चरित्र खंड २ मध्ये चरित्रलेखक कै. चांगदेव भ. खैरमोडे यांनी लिहून ठेविले आहे. आंबेडकरांच्या निबंधवाङ्मयाचा शोध घेताना ही कर्तव्यबुद्धी

ध्यानी घेतली की, डॉ. आंबेडकरांनी मराठी निबंध-वाङ्मयाच्या घटनेत अंतर्मुख केलेल्या, उचित मूलस्रोतांचा मागोवा घेतलेला दिसतो.

**आंबेडकरी निबंध : मुक्तीचा मंत्र**

डॉ. आंबेडकरांनी, निबंधरचनेतील मूलस्रोत नि:संशयपणे राष्ट्ररचनेसाठी वापरले. आपल्या देशाला प्राप्त झालेले नवजात स्वातंत्र्य धोक्यात येऊ नये, पुन्हा पारतंत्र्याच्या भयाण दरीत ढकलले जाऊ नये या उदात्त हेतूने आंबेडकरांनी प्रसंगी ' बहिष्कृत भारता ' पेक्षा राष्ट्र मोठे मानले. अत्यंत थोर मनाने कटू निर्णयही घेतले. नेमक्या याच पद्धतीने आंबेडकरांनी आपल्या निबंध–लेखनात भावनेपेक्षा विचार श्रेष्ठ मानला आणि कलात्मक लेखनरीतीपेक्षा परिवर्तनाचे गुण पोटी वागवून बसलेले विचारांचे प्रक्षेपण मोलाचे मानले. अत्यंत मूलगामी विचारांचा जागर त्यातून सतत गर्जत राहिला. ' बहिष्कृत भारता ' च्या पहिल्या अंकाच्या माथ्यावर उभी अंडाकृती, त्यामध्ये रेखांकित केलेला भारताचा नकाशा, त्याच्या डाव्या–उजव्या बाजूला साखळदंडांनी करकचून जखडलेले दोन विक्राळ सिंह दाखविले होते. आंबेडकरांच्या निबंध-वाङ्मयाचे स्वरूप अशा विक्राळ सिंहासारखे होते. बहिष्कृताच्या मुक्तीचा तो मंत्र होता तसेच मराठी अस्मितेचे ते ज्वलज्जहाल रूपही होते, आजही आहे.

डॉ. आंबेडकरांच्या निबंधाला मरगळलेल्या मनांना जिवंत असूनही मेलेल्या मनांनाच जाग आणावयाची होती असे नव्हे, तर झोपेचे सोंग घेऊन काहीच समजत नाही, काय हवे होते हेही कळतच नाही अशा अवस्थेत खुळ्यागत पडून राहिलेल्या मनांना प्राणभूत उटी देणे आणि चैतन्याची आरती गाणे हेही जरूर होते. लोकांना हडबडून खडबडून जागे करणे हेच मुळी या निबंधांचे जन्मकार्य होते. हे जन्मकार्य ' जोहार ' घालण्याचे नव्हते, ' सांगावा ' पोचविण्याचे नव्हते तर समाजातील जीर्ण-शीर्ण रूढींना, वास्तवशून्य कल्पनांना, माणुसकीला काळिमा फासणाऱ्या वागणुकींना ' तडीपार ' करण्याचे होते. ' महार आणि त्यांचे वतन ', ' अस्पृश्योन्नतीचा आर्थिक पाया ', ' हिंदूंचे धर्मशास्त्र ', ' सरकारचे छत्र आणि अधिकारी ', ' हिंदुधर्माला नोटीस ', ' मुंबई इलाखा अखिल महार परिषदे 'च्या पदावरून दिलेले ' धर्मांतर का ? ' (३१ मे, १९३६) यासारख्या लेख–व्याख्यानांतून डॉ. आंबेडकर हल्ल्यामागून

हल्ले चढवितात तेव्हा ते अरेबियन नाइट्समधल्या सुरस व चमत्कारिक गोष्टी सांगत नाहीत तर प्रत्यक्ष जीवनातील दाहक वास्तवाचे भेदक दिग्दर्शन करतात. ते मानवी आत्म्याचे जळते दु:ख असते. आंबेडकरांच्या निबंधांतून असे दु:ख प्रकटते तेव्हा वादळात सापडलेल्या वेलीसारखे माणसाला ते मुळासकट गदगद हलवून सोडत असते. ' धर्मांतर का ? ' मध्ये डॉ. आंबेडकर दलित माणसांच्या— नागरिकांच्या (?) — दृष्टीने ' स्वातंत्र्य कुठे आहे ? ' असा सुसंस्कृत माणसाच्या अंगावर शहारा आणणारा प्रश्न करतात; प्रांतिक बहिष्कृत परिषदेच्या अधिवेशनाच्या (१९२५) अध्यक्षपदावरून ' सामाजिक सुधारणांसाठी तयार व्हा ! ' असा आदेश देताना; " आम्ही आपले मानवजातीस प्राप्त असलेले, समान हक्क मागत आहोत " असा हक्कांचा पुकारा करतात, तेव्हा मानवतेचे दरवाजे उघडण्यासाठी, माणुसकीच्या शोधासाठी मानवतेच्या वाटेने त्यांनी प्रचंड मोर्चेबंदी चालू ठेवली होती हे चटकन लक्षात येते. अशी मोर्चेबंदी कुठल्याही ललित वाङ्मयप्रकारापेक्षा निबंध या वाङ्मयप्रकारातूनच अधिक करता येते. डॉ. आंबेडकरांनी तशी ती, सहजगत्या केल्याचे आढळते. या सहज कृतीत मराठी मातीच्या काही चैतन्यपूर्ण खुणा दिसतात. मराठी माती, मराठी वृत्ति-प्रवृत्ती, मराठी मन, मराठी दृष्टी इत्यादींचा अस्मितेने भारून राहिलेला चैतन्यपूर्ण ठळक आविष्कार ज्या थोड्या मराठी निबंधकारांमध्ये दिसतो त्यामध्ये डॉ. आंबेडकर यांचा क्रम विशेषत्वाने लावणे आवश्यक ठरते. नाहीतरी इतर कुठल्याही वाङ्मय-प्रकारांपेक्षा मराठी निबंध हा मराठी माणसाचे प्रतिनिधित्व समग्रपणे करतो म्हणून तर आजवरच्या मराठी वाङ्मयाच्या इतिहासात चुकूनसुद्धा साधे उल्लेखही न आलेले ' फुल्यांचा निबंध ', ' आंबेडकरी निबंध ', ' महर्षी शिंदे यांचा निबंध ' हे मराठी निबंधाची बहुतांशी भावनात्मक, चिंतनशीलतेपासून दूर असलेला, निखळ विचारांना आचवलेली प्रकृती मुळापासून ढवळून काढतात. लो. टिळक, बापूसाहेब माटे, इरावती कर्वे, दुर्गा भागवत इत्यादी काही मंडळी त्यात अप-वादाने येतात. निबंधाच्या मूलभूत प्रकृति-प्रवृत्तीशी निगडित वेगळ्या वाटा चोखाळून मराठी निबंधाचा घर बलदंड करणारा असा या मंडळींचा निबंध आहे. आपल्या निबंधलेखनाने मराठी निबंधावरची अनेक अरिष्टे त्यांनी टाळली आहेत. डॉ. आंबेडकर थोरल्या घरचे धुरंधर राजकारणी होते, पंडित होते. पण विद्वज्जड शास्त्रीपंडित नव्हते. आपली ' स्कॉलरशिप ' किंवा पांडित्य हे अवघ्या

जनसामान्यांना समजावून सांगायच्या आड येता कामा नये ही त्यांची दृष्टी होती. त्यांनी ती प्रयत्नपूर्वक कटाक्षाने राखली होती. 'बुद्ध आणि त्याचा धर्म', 'अनिहिलेशन ऑफ कास्टस्', 'वेअर दि शूद्राज?' यासारखे जगन्मान्य ग्रंथ लिहिणारे, 'कॉंग्रेस, जीना अँड गांधी', 'रानडे, गांधी अँड जिन्हा', 'पाकिस्तान ऑर पार्टिशन', 'स्टेटस अँड मायनॉरिटीज'सारख्या पेच टाळणाऱ्या तोलदार ग्रंथांची निर्मिती करणारे आंबेडकर माणुसकीच्या हक्कांची सनद प्राप्त करून घेण्यासाठी हरिजन बांधवांना डिमेटर देवतेची गोष्ट ज्या धाटणीने सांगतात, परदेशी असताना रात्रंदिवस प्रपंचाची काळजी वाहिलेल्या, स्वदेशी परत आल्यानंतरही विपन्नावस्थेत शेणीचे भारे डोक्यावर वाहणाऱ्या सुशील पत्नीचे—रमाबाई यांचे— ज्या हळवेपणाने स्मरण करतात, (बहिष्कृत भारत : ३–२–१९२८) अशा काही जागी (आणि अशा जागा भरपूर सापडतात.) विचारप्राधान्याबरोबरच 'काळ'कर्त्या शिवरामपंत परांजपे यांच्या निबंधातील लालित्य आणि देव न मानणाऱ्या देवमाणूस आगरकरांच्या निबंधातील भावनाविलास यांचा अपूर्व संगम दिसतो. बाबासाहेब आंबेडकर विचारपंडित होते म्हणजे लक्ष लक्ष विचारांची शुष्क उतरंड रचणारे निबंधकार होते असे नव्हे तर विचाराच्या पोटी भावनेचाही सूक्ष्मसा पदर सळसळत होता, हे लक्षात घ्यायला हवे. आंबेडकरांचा विचाराधिष्ठित कृतीवर भर होता आणि या कृतीमधून जन्माला येणारे रूप मूल्याधिष्ठित असावे असा त्यांचा कटाक्ष राहिला. साहजिकच सामर्थ्यवान विचारांचे प्रक्षेपण प्रामुख्याने घडले. या विचारांच्या सामर्थ्याच्या पोटी असणारे सौंदर्य त्यापाठोपाठ आले. आंबेडकरांना त्यासाठी वेगळा विचार करावा लागलेला नाही, आवश्यक नव्हते, आणि वेळही नव्हता. लोकहितवादींचा परखडपणा, म. फुल्यांचा दुःखाच्या अभिव्यक्तीमधील राबसपणा, लो. टिळकांची वैचारिक झेप, इरावती कर्व्यांची मूलग्राही समाजाभिमुखता अशा, समकालीन— समीपकालीन विचारवंतांच्या लेखनामधील वैभव अप्रत्यक्ष डॉ. आंबेडकरांच्या निबंधलेखनामध्ये सुरेख रीतीने एकत्रित झाल्याचा प्रत्यय येतो. म्हणून मराठी निबंधाच्या घटनेत आंबेडकरांना 'अस्पृश्य' ठेवता येत नाही. 'राखीव' म्हणून स्थान देणे अन्यायाची पुनरावृत्ती करणारे ठरते. गुणानुक्रमेच ते यादीत समाविष्ट होतात, म्हणून डॉ. आंबेडकर, म. फुले वगैरे कित्येक महानुभवांसाठी मराठी निबंधाच्या घटनेत बदल करणे जरूर आहे; अन्यथा मराठी

निबंधाची घटनाच बाद होईल. या निबंधकारांत आंबेडकरांमधील एक शिक्षण-तज्ज्ञ आहे; हेही लक्षात घ्यायला हवे.

डॉ. आंबेडकरांची शैक्षणिक दृष्टी आणि कार्य त्यांनी स्थापन केलेल्या ' पीपल्स एज्युकेशन सोसायटी 'च्या निर्मितीमध्ये सम्यक्पणे आढळते. देश स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असताना २० जून, १९४६ रोजी डॉ. आंबेडकर यांनी ' पीपल्स एज्युकेशन सोसायटी 'तर्फे सिद्धार्थ कॉलेजची स्थापना केली. स्थापनेपासूनच डॉ. बाबासाहेबांनी आपल्या ध्येयदृष्टि-कल्पनेनुसार या संस्थेमध्ये-कॉलेजमध्ये–प्राण ओतण्याचा आटोकाट प्रयत्न केला, तिला तसा आकार मिळावा अशी सगळ्या प्रयत्नांची दिशाच ठेवली.

वस्तुतः संस्था काय किंवा कॉलेज काय, कुठल्याही संस्थेस अगर तिच्या घटकास बाबासाहेबांनी जी नावे दिली ती लक्षात घेतली की, त्यांची निष्ठा कुठे होती आणि कार्याचे उद्दिष्ट काय होते हे स्पष्ट होते. बाबासाहेबांनी मूळ संस्था ' जनते 'शी तर तिच्या घटक संस्था आदिम सत्याशी निगडित केल्या आहेत. " सिद्धार्थ कॉलेज काढावयाचं ठरलं तेव्हा त्याचं नामकरण कुणा शेटियाभाटियाच्या नावानं करणं अवघड मुळीच नव्हतं. तसे धनाचे साठे घेऊन, हात जोडून समोर काही कमी धनपती उभे नव्हते; पण मला ते शक्य नव्हतं. मी ते केलं नाही. मी गौतम बुद्धाचं ' सिद्धार्थ ' हे नावच कॉलेजसाठी निश्चित केलं ", अशा आशयाचे उद्‌गार या संदर्भात बाबासाहेबांनी काढले आहेत; त्यामागची भूमिका हीच आहे.

धनपतींच्या पैशाच्या उबेवर कुठलीही संस्था चालविणे ही गोष्ट तशी सोपी. मूलभूत स्वातंत्र्ये गमावली आणि वरवरची स्वातंत्र्ये हीच मूलभूत स्वातंत्र्ये आहेत असा धोशा लावून तीच निमूटपणे स्वीकारली की याबाबतीतले काम तर खूपच सोपे होते. पण त्यात सत्य मरते, स्वातंत्र्य दळभद्रे बनते आणि काही वाटचाल करीत राहिले तरी ते प्राणहीन राहते. जनतेच्या दृष्टीने म्हणूनच त्याचे उभे मूल्य शून्य ठरते. सत्याचा शोध ही बिकट वाट असते. आणि त्याचा ओझरता स्पर्शही जीवनाचे सोने करून टाकतो. आंबेडकरांनी अवघड वाट स्वीकारली. ही वाट चालायला बिकट तशी ईप्सित स्थळी पोचायलाही वेळ घेणारी होती. सोप्या वाटा सामान्य पायाखाली चालतच असतात. आंबेडकरांचे तसे नव्हते. भाजून काढून देवत्व देणाऱ्या डिमेटर देवीचा सिद्धान्त

पुन: पुन्हा आपल्या शिष्यांना सांगणाऱ्या बाबासाहेबांसारख्यास सोप्या वाटा आडवळणी टाकाव्या लागतात.

### शिक्षणकार्यामागील कळसूत्रे

डॉ. आंबेडकरांनी 'पीपल्स', 'सिद्धार्थ' किंवा 'मिलिंद' ही नावे स्वीकारली त्यामागे त्यांचे त्याविषयीचे अविरत चिंतन आणि त्यातून स्फुरलेला विचारविलास ही त्याची बैठक आहे. त्याची मूळ कळसूत्रे अशी :

१. सत्याचा शोध जारी राखणे.

२. मानव्याची जोपासना आणि संवर्धन करू पाहणाऱ्या धर्माचे धारण करणे.

या कळसूत्रांचा आढळ या नावांमध्ये आहे. या नावांना इतिहास आहे आणि त्यांच्यामागे मोठी परंपरा आहे. कुठल्याही काळ-परिस्थितीमध्ये त्यांचा मोहरा मानवाचे कल्याण या दीपस्तंभाकडेच लागून राहिलेला आहे. म्हणून व्यापक हिताचा विचार करणारे त्यामागल्या पायरीवर येऊन उभे राहू शकत नाहीत. डॉ. आंबेडकरांनी मराठवाड्यासारख्या मागासलेल्या भागात आणि त्या जोडीने मुंबईसारख्या अत्याधुनिक प्रगत शहरी विभागात पेरून रुजविलेली शिक्षण-बीजे या दृष्टीची प्रमाणे ठरतील. मागासलेपणाला अत्याधुनिकतेकडे खेचून, अत्याधुनिकतेला किती परीचे मागासलेपण शेजारी वावरते आहे, त्याची ओळख पटवून देणे– हे असे अद्वैत साधण्यात डॉ. आंबेडकरांचे प्रधान उद्दिष्ट दिसते. दर्शन आाणि प्रयत्न एकेरी न होता दुपदरी अंगाने घडले तर ते फायदेशीरच ठरतात. आंबेडकरांनी ती दृष्टी राखली, आणि समाजातल्या अस्पृश्यवर्गाला, पद्धतशीर शिक्षणदानाच्या प्रक्रियेतून निळी पहाट दाखविली, वेदनेचे विद्रोहात आणि विद्रोहाचे रचनेत परिवर्तन कसे करायचे याचे शास्त्र बाबासाहेबांनी आपल्या शैक्षणिक प्रयोगकार्यामधून समोर उभे केले. प्रयोगकार्य अस्पृश्यांपुरतेच मर्यादित नव्हते, तसे बंधन किंवा आडकाठी अशी कोणतीही नव्हती; पण निसर्गत:च, सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात तो गाभा राहिला. तसे राहणे अर्थातच गैर नव्हते.

चालू शिक्षणपद्धती ही चांगले नागरिक बनवायला इतकेच काय, चांगले–शिक्षक–अध्यापक तयार करायलाही असमर्थ आहे असे डॉ. आंबेडकर यांचे मत

होते. विश्वव्यापक वृत्तीचा निष्ठावन्त नागरिक तयार करणे हे सर्वसाधारण शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे, अभ्यासक्रमाच्या रचनेतील अंतःप्रवाह तसे प्रवाहित झाले पाहिजेत; त्याचबरोबर अध्यापन आणि संशोधन ही शिक्षक–अध्यापकाची शेवटची भूमिका असणे ही शिक्षणाच्या प्रक्रियेशी धरून असणारी बाब आहे, असे बाबासाहेबांचे मत होते; खेरीज शिक्षणविषयक जबाबदारी मुख्यतः आणि प्राधान्याने शासनकर्त्यांची आहे, असेही त्यांना वाटे. महाराष्ट्राच्या शैक्षणिक परंपरेत खाजगी शिक्षणसंस्थांनी फार मोलाचे कार्य केलेले असले तरी त्यामुळे शासनाची जबाबदारी संपते किंवा कमी होते असे नाही. शासनाची ती अंगभूत अशी जिम्मेदारीच आहे. चांगले शासन ती, कोणत्याही प्रकारची चिकचिक न करता, अळंटळं न करता पारही पाडीत असते. डॉ. आंबेडकरांची ही धारणा होती.

**शिक्षण कोणते व कसे असावे ?**

कुठलेही शिक्षण हे विश्लेषक सामर्थ्य वर्धिष्णू करणारे हवे. तसे ते पुरेशा प्रमाणात, संश्लेषक प्रवृत्तीचेही असले पाहिजे. नुसते विश्लेषण दोषांवर बोट ठेवते तर संश्लेषण दिसेल ते गोळा करण्यावर भर देते ! म्हणून त्याचे स्वरूप पुरेसे विधायक असणे केव्हाही इष्ट. शिवाय एकाच प्रकारच्या कामाचा मोबदला हा समान असणे, त्यामध्ये कमी–जास्ती नसणे हे नैसर्गिक न्यायाला धरून आहे. बाबासाहेब त्याचे पुरस्कर्ते होते. ‘ स्वतंत्र मजूर पक्षा ’च्या जाहीरनाम्यामध्ये डॉ. आंबेडकरांनी संपूर्ण आणि सक्तीच्या शिक्षणाचा अभिनिवेशाने पुरस्कार केला असून तांत्रिक शिक्षणावरही विशेषेकरून जोर दिला आहे. शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील, जाति-जमातींधील पात्र अभ्यासूंसाठी शिष्यवृत्त्यांची मागणीही त्यांनी केली आहे. राज्यांकडून ह्या शिष्यवृत्त्या पुरस्कृत व्हाव्यात अशी त्यामागील भूमिका असून एकूणच शिक्षणाची अशी पुनर्रचना व्हावी की, विद्यापीठे ही केवळ परीक्षा घेणारी केंद्रे न राहता ती शिकविणारी/शहाणी करून सोडणारी शिक्षणाची केंद्रे व्हावीत अशी बाबासाहेबांची मागणी होती. आजही ती जशीच्या तशी मान्य करावी अशी सर्वसाधारण स्थिती आहे.

डॉ. आंबेडकरांनी शिष्यवृत्त्या किंवा सोयीसवलती याबाबत मागणी करताना शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या पात्र अभ्यासूंसाठी ( deserving persons

from communities which were educationally backward ) दरखास्त केलेली आहे. व्यक्ती, गट, समूह किंवा जातपातधर्म आदींचे सोयर-संबंध यांचा त्यात विचार नाही; ही विशेष स्वरूपाची बाब आहे. राखीव हक्कांच्या मागणीतील बाबासाहेबांचा हा विस्तृत पायावर आधारित धर्मनिरपेक्ष मनसुबा खास स्पृहणीय आहे. त्याचबरोबर स्त्री-पुरुषांना एकाच प्रकारचे शिक्षण देण्यालाही आंबेडकर अनुकूल नव्हते. एस. एस. सी. ( पूर्वीची मॅट्रिक ) अखेर असे एकाच प्रकारचे शिक्षण स्त्री-पुरुषांना द्यायला हरकत नसली तरी त्यापुढे ते देणे म्हणजे वेळ, पैसा आणि शक्ती व्यर्थ दवडण्यासारखे आहे असे त्यांचे मत होते. मुलींना बर्क आणि शेक्सपीयर शिकवून उपयोग काय ? आणि हे शिकून व्हायचंय काय ? असा त्या संबंधात बाबासाहेबांनी मुळी प्रश्नच केला आहे. ' गृहशिक्षणात स्त्रिया प्रवीण झाल्या पाहिजेत ' अशी त्यांची दृष्टी होती. पुढे आंबेडकरांचे हे मत नरम झाल्याचे दिसते.

विद्यार्थिदशेचा काळ संपेपर्यंत विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष राजकारणात क्रियाशीलतेने भाग घेऊ नये, असे बाबासाहेबांनी विद्यार्थ्यांना उद्देशून पुनः पुन्हा सांगितले आहे. जगाकडे बारीक नजरेने पाहात, अवतीभोवतीचे व्यवहार न्याहाळत विद्यार्थिवर्गाने स्व-संस्कृती ( self-culture ) आकाराला आणली पाहिजे आणि स्वतःच्या पायावर उभे राहून जगात ताठरपणे वावरण्याची ( self-help ) क्षमता अंगी बाणविली पाहिजे, आदर्श निर्माण करण्यासाठी जीवनात झगडले पाहिजे असा डॉ. आंबेडकरांचा संदेश आहे. विद्यापीठे केवळ कारकून तयार करणारी प्रशिक्षण केंद्रे बनली तर त्याचा उपयोग काय ? आधुनिक जगाच्या गरजा भागविणाऱ्या क्षमतासंपन्न माणसांची निर्मिती हे विद्यापीठापुढील उद्दिष्ट असले पाहिजे असे आंबेडकरांनी आवर्जून सांगितले आहे.

### स्वतंत्र मजूर पक्षाचा शैक्षणिक जाहीरनामा

ज्ञान आणि ज्ञानदान याइतकी पवित्र वस्तू दुसरी नाही; किंबहुना ज्ञानाला अन्य पर्यायच नाही; अशी आत्यंतिक उत्कट भावना ज्ञान-शिक्षण या संबंधात डॉ. आंबेडकर यांची आहे. उच्च ध्येये आणि उच्च दर्जाचे समाजजीवन यासाठी ( high aims and high sense of public life ) खडतर तपश्चर्येची गरज असते असे आंबेडकरांचे आवाहन आहे. त्या संदर्भात त्यांनी रानडे,

टिळक आणि गोखले या त्रयीचा उल्लेख केला आहे. शिक्षणाच्या उच्च उद्दिष्टांशी ते निगडित आहे. शिक्षणाने माणुसकीचे मूल्य जोपासले पाहिजे. त्यासाठी नि:पक्षपाती, समबुद्धी आणि उदार शिक्षण दिले पाहिजे. आणि ज्या वर्गासाठी हा सारा आटापिटा करावयाचा त्याहून वरिष्ठ मानल्या गेलेल्या वर्गातील सधन आणि सहानुभूती बाळगणाऱ्या व्यक्तींचे सहकार्य सतत घेतले पाहिजे अशी बाबासाहेबांची विचारधारा होती. शिक्षण हे समाजसुधारणेचे मूळ आहेच. खेरीज आंबेडकरांच्यासाठी ते ' उपास्य दैवत ' ही आहे. मुंबई इलाखा शिक्षण खात्याने प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात चर्चाविनिमय करण्यासाठी ६ मे, १९२९ रोजी बोलाविलेल्या शिक्षणतज्ज्ञांत डॉ. आंबेडकर एक होते. त्या वेळच्या चर्चेत, प्राथमिक शिक्षण हे राष्ट्रीयदृष्ट्या कसे महत्त्वाचे आहे, खेरीज हे शिक्षण सक्तीचे का हवे या मुद्द्यावर आंबेडकरांनी खूप भर दिला आहे. " शिक्षण एक पवित्र बाब आहे. ती थातुरमातुर करून वाटेला लावण्याची गोष्ट नव्हे किंवा रस्ते बांधणे, गटारे साफ करणे, खडी माती टाकून कच्चा रस्ता पक्का करणे असा काही तो कार्यक्रम नव्हे. याहून ती सर्वस्वीच निराळी बाब आहे. म्हणून कुठल्याही शिक्षणाला दिशा हवी. त्यात एकसूत्रीपणा हवा. आणि शिस्तीची तर नितान्तच गरज आहे. शिस्तीविना शिक्षण अशक्यच असते. आणि तसे दिले तरी असफल ठरते. " अशा आशयाचे विचार मांडताना सार्वत्रिक शिक्षणाशिवाय पर्याय नाही याची जाणीव बाबासाहेबांनी शासनाला आग्रहपूर्वक करून दिली आहे. आंबेडकरांनी दलितांच्या शिक्षणाचा विचार तर केलाच पण एकूणच शिक्षण-पद्धतीचा आणि शिक्षणव्यवस्थेचाही विचार केला. ऑगस्ट १९३६ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यात एतद्विषयक जी तत्त्वे ग्रथित झालेली आहेत. ती लक्षात घेतली की या सर्वंकष विचाराचा मागोवा घेता येतो.

या जाहीरनाम्यात ग्रथित झालेली सूत्रे अशी :

१. स्वतंत्र मजूर पक्ष सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण अंमलात आणील.

२. हरेक प्रौढास साक्षर करण्याच्या दृष्टीतून ' प्रौढ साक्षरता प्रसार मोहीम ' आखील.

३. मागासवर्गीय समाजातील लायक विद्यार्थ्यांना भारतात व परदेशात उच्च शिक्षण शासनाच्या खर्चाने देण्याचा प्रयत्न करील."

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३२२२
२५७६२
निबंध २५।८।८६

४. तांत्रिक शिक्षणावर पक्षाचा अधिक भर राहील.

५. प्रांतिक विद्यापीठांची पुनर्घटना करणे, प्रादेशिक शिक्षण देण्याची विद्यापीठे स्थापन करणे व याद्वारा शिक्षणविषयक योग्य मार्ग चोखाळण्याचा प्रयत्न चालू राहील.

पैकी ३ रे उद्दिष्ट – मागासवर्गीय समाजातील लायक विद्यार्थ्यांना भारतातील उच्च शिक्षण शासकीय खर्चाने देण्याचे – स्वातंत्र्यानंतर मोठ्या प्रमाणात फलीभूत झाले. त्यातून आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या सर्वांनाच तसे ते मिळावे असा प्रगत विचार आज पुढे आला आहे. १९४६ मध्ये भारतातील १४ दलित विद्यार्थ्यांना निरनिराळ्या शास्त्रांच्या अभ्यासासाठी इंग्लंडला पाठविण्याचे श्रेय डॉ. आंबेडकरांचेच होते. संस्कारकेंद्रे म्हणून शिक्षणसंस्था पुढे आल्या पाहिजेत, अशी आंबेडकरांची दृष्टी होती. त्याचबरोबर सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे शिक्षण हे एक महत्त्वाचे अंग आहे, असेही त्यांचे विचार होते. प्रांतिक विद्यापीठाच्या पुनर्घटनेसंबंधी ( उद्दिष्ट क्रमांक ५ ) आंबेडकरांनी सुस्पष्टपणे कल्पना मांडल्या नाहीत. मात्र आंबेडकर आणि तद्विषयक कार्य करणारे कार्यकर्ते यांच्या सगळ्या धडपडीचा परिणाम दलित समाजात शिक्षणविषयक जागृती आणि उच्च शिक्षणाच्या जाणिवेचा भाग निर्माण होण्यात झाला हे महत्त्वाचे आहे.

त्यामुळे महाराष्ट्रात महार व नंतर क्रमाने चांभार, मातंग व ढोर, उत्तरेकडील प्रांतात भंगी व चांभार, दक्षिणेत परिहा, पूर्वेस नामशूद्र अशा दलितांमधल्या निरनिराळ्या जाती शिक्षणाच्या क्षेत्रात आघाडीवर आहेत. दलितांमधल्या जिज्ञासेचे निर्धाराचे ते द्योतक ठरेल. अर्थात त्यामुळे त्यांचे प्रश्न संपलेले नाहीत, की पूर्णत: सुटलेले नाहीत, पण प्रगती आशादायक नाही असे म्हणता येणार नाही. तो इतिहासाचा विपर्यास होईल. जागृत जाणिवा, सवलतींचा यथोचित वापर, सुशिक्षित पिढीच्या कर्तृत्वाचे अंकुर, सामाजिक सामंजस्य इत्यादी घटकांद्वारा न सुटलेल्या, अपुऱ्या राहिलेल्या प्रश्नांना मार्ग सापडू शकेल, नाही असे मुळीच नाही.

### पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे कार्य

डॉ. आंबेडकरांच्या ' पीपल्स एज्युकेशन सोसायटी 'च्या कार्यावर धावता दृष्टिक्षेप टाकूनही याचा पडताळा घेणे अशक्य नाही.

आंबेडकर यांनी १९४५ मध्ये मुंबई येथे पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. या संस्थेच्या विद्यमाने १९४६ मुंबई येथे सिद्धार्थ कला व शास्त्र महाविद्यालय स्थापन झाले. पुढे पाच वर्षांनी – १९५० मध्ये – पीपल्स एज्युकेशन सोसायटीने आपले दुसरे महाविद्यालय हैदराबाद राज्यांतर्गत औरंगाबाद येथे उघडले. मुंबई राज्यातील शैक्षणिक संस्थेने त्या वेळीच्या परप्रांतात महाविद्यालय स्थापण्याचा हा पहिला उपक्रम होता. औरंगाबादेत त्या वेळी उस्मानिया विद्यापीठाचे इंटर कला व शास्त्र या अभ्यासक्रमाचे शिक्षण देणारे एक महाविद्यालय सुमारे दोन दशके चालत होते. त्या वेळी असलेल्या ५५ लाख लोकसंख्येच्या मराठवाड्यातील हे एकमेव महाविद्यालय होते. १९५० मार्चअखेर त्याची एकूण विद्यार्थिसंख्या १५० होती व त्यात फक्त दोनच दलित विद्यार्थी होते. पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयाच्या पहिल्या वर्षी एकूण १२५ विद्यार्थ्यांपैकी १२ दलित विद्यार्थी होते. १९७७–७८ मध्ये दलित जातिजमातींच्या विद्यार्थ्यांची संख्या ११,८९० पर्यंत गेली. यामध्ये ११ वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांचा अंतर्भाव नाही. ही संख्या मराठवाडा विद्यापीठाच्या ३७,६९७ ह्या एकूण संख्येच्या ३१ टक्के इतकी आहे. विद्यापीठ व त्याच्याशी संलग्न असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थिनींची संख्या ४१४१ असून त्यांपैकी ४३९ म्हणजे १०.६ विद्यार्थिनी ह्या दलित जमातीपैकी होत्या.

पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या मराठवाड्यातल्या शैक्षणिक उपक्रमामुळे दलितांच्या महाविद्यालयीन शिक्षणाला किती उल्लेखनीय चालना मिळाली याची कल्पना महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांमधील दलित विद्यार्थ्यांच्या संख्येशी तुलना केली असता स्पष्ट होईल. पाच विद्यापीठांपैकी मुंबई, पुणे आणि मराठवाड हीच विद्यापीठे पटावरील विद्यार्थ्यांची दलित व दलितेतर विद्यार्थ्यांची संख्या वेगळी दाखवितात. शिवाजी व नागपूर ही विद्यापीठे मात्र शासकीय शिष्यवृत्तिधारक अशीच फक्त नोंद करतात. हे सर्व शासकीय शिष्यवृत्तिधारक दलित जातिजमातींचे आहेत असे गृहीत धरून पुढील आकड्यांचा विचार केला आहे : मुंबई विद्यापीठात दलित विद्यार्थी ३·८, पुणे ९·२८, शिवाजी विद्यापीठात ८·५, नागपूर विद्यापीठात २३·९ आणि मराठवाडा विद्यापीठात ३१ टक्के.

पीपल्स एज्युकेशन सोसायटीची १९४६ पासून झालेली वाढही उल्लेखनीय

असून आज या संस्थेची औरंगाबाद येथे ४, मुंबईत ५ व महाड येथे एक अशी वसतिगृहांनी सुसज्ज १० महाविद्यालये आहेत. त्यात १९७९-८० साली २१,८६८ विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यांपैकी ९,४७२ हे दलित जातिजमातीं-पैकी होते. ह्याशिवाय ह्या संस्थेमार्फत औरंगाबाद येथे दोन हायस्कूल्स, मुंबई येथे एक नाईट स्कूल, पंढरपूर येथे १ हायस्कूल आणि शाळेतील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे चालविली जातात.

मुंबईसारख्या नागरी विभागात दलित व दलितेतर यांचे पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयातील प्रमाण २३ ला ७७ असे आहे, परंतु औरंगाबादेत मात्र ते ८५ ला १५ असे आढळते. १९४६ मध्ये डॉ. आंबेडकरांनी दलितांना आपली गावकीची कामे सोडून शिक्षणसन्मुख होण्याचा आदेश दिला. त्यांनी काढलेल्या शिक्षण संस्थेचे उद्दिष्ट सामान्यतः गरीब मध्यमवर्गीय व विशेषतः दलित विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणाची सोय करून देणे हे होते. पुढे १९५९ मध्ये स्थापन झालेल्या मिलिंद महाविद्यालयाच्या वसतिगृहात दलित व उच्चवर्णीय समजलेल्या वर्गातील विद्यार्थी एकत्र राहू-शिकू लागले. प्राध्यापकवर्गातही दलित जातीय प्राध्यापकांचा अंतर्भाव ही समाज-परिवर्तनाच्या दृष्टीने मराठवाड्यात अपूर्व घटना होती. खऱ्याखुऱ्या समाज-परिवर्तनात व्यवसाय-परिवर्तन हे एक महत्त्वाचे साधन असते आणि व्यवसाय-परिवर्तनाचे साधन म्हणजे आधुनिक शिक्षणाने सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला झालेला प्रारंभ होय. ही संधी डॉ. आंबेडकरांनी लावलेल्या त्या ज्ञानज्योतीने मिळवून दिली आहे. मागास मराठवाड्यात इतर अनेक मान्यवर संस्था निष्ठेने कार्य करीत आहेत; ज्याचे श्रेय त्यांना निश्चितच आहे. इथे डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा, त्यातून साधलेल्या कार्याचा विचार प्रमुख असल्याने तसा तो अग्रक्रमाने केला आहे.

### कामाचे दुहेरी श्रेय

डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक कार्याचे स्वरूप पाहिले की ते निबंधकार, शिक्षणतज्ज्ञ होते, हे स्पष्ट दिसते. जागृती आणि रचना दोन्ही कामे त्यांनी केली. आंबेडकरांनी विविध स्वभावाने—त्यात लेखन, भाषण, प्रत्यक्ष चळवळी वगैरे सगळ्या गोष्टी सामावतात—जे जनजागरण केले, त्याची अपरिहार्य परिणती

शिक्षण संस्थेच्या निर्मितीत आहे. माध्यमे एकमेकांवर उभी असतात : खालच्याचे भान वरच्याला, वरच्याचे कार्य त्यावरच्या उंचावरच्याला पाहून–देखून घ्यावे हे लागतेच. ती ऊर्ध्वगामी उतरंड असते. निबंध आणि शिक्षण ही रचनाकार्याची अंगे आहेत. आंबेडकरांनी ती कळत न–कळत जोपासली. निबंधकार शिक्षणतज्ज्ञ असा त्याचा समास केला अगर केला नाही म्हणून बिघडत काहीच नाही. वस्तुस्थिती तीच राहते. एकूण आंबेडकरांनी दलितोद्धारक राजकारणी या कार्याबरोबर अन्यही काही कामे केली आहेत. पैकी इतिहासाने काही स्वीकारली आहेत, काहींना अद्याप मान्यता मिळायची आहे. पण रचनेचे कार्य कुणाच्या मान्यतेची वाट बघत नसते; हे समजून घ्यायला मुळीच हरकत नसावी.

# ९

# समाजवादाचे धर्मचक्र

> ...जातिभेद व पंक्तिभेद यामुळेच आपल्या लाखो बांधवांना परधर्मात जावे लागले आहे. आपण सर्व एकाच ईश्वराची लेकरे आहोत. आज आपण साध्या माणुसकीला पारखे झालो आहोत, मायबापांनो ! आता तरी हे जातिभेद करा दूर !...
>
> ...देवासाठी संसार सोडून जाण्याची जरुरी नाही. देव संसारात राहूनसुद्धा मिळतो. पण त्याला परिश्रम, सेवा, त्याग, भूतदया व खऱ्या भक्तीची जरुरी आहे...

अशी अनंत वचने, महाराष्ट्र देशात समाजवादाचे धर्मचक्र फिरविणाऱ्या गाडगे महाराजांनी सांगितली. ही वचने एका ' निरक्षर ' माणसाच्या मुखातून सहजस्फूर्तपणे उद्गारित झालेली आचारसूत्रे आहेत : सर्वसामान्य अर्थाने गाडगेबाबा ' अडाण्यात ' जमा होणारे; पण या ' अडाण्याने ' मी मी म्हणणाऱ्या ' शहाण्यां 'नासुद्धा जे फटकारले आहे, तडकावले आणि ठणकावले आहे; ते पाहिले की, त्याच्या ' अडाणीपणा 'संबंधी अडाणीपणाची समजूत करून घेण्याची कुणाची शहामत बाकी राहील ?

गाडगेबाबा रूढ अर्थाने शाळेच्या बंदिस्त ( त्या काळच्या, अंगावर धुळीचे लोट उठविणाऱ्या कोंदट आणि अंधाऱ्या ) चार भिंतींमध्ये कधी गेले नाहीत, बुकं शिकायची–वाचायची असतात, धुळाक्षरे गिरवायची वगैरे असतात; ते काही कधी घडू शकले नाही. पण त्यामुळे काही बिघडलेही नाही; ( अर्थात गाडगेबाबांसारखाच त्याला एखादा अपवाद असतो. कुणीही उठावे आणि शिकले–सवरले नाही तरी चालते, त्याचे काही बिघडत नाही असे नाही. ) शाळेच्या चार भिंतींपेक्षा त्याबाहेरच गाडगे महाराज अधिक शिकले, किंबहुना

बांधलेल्या चार भिंतींची मर्यादाच त्यांनी आपल्या निष्काम कर्मयोगाने दाखवून दिली. जगाचे मुक्तांगण आणि अंत:स्फूर्तीची सहजप्रेरणा यातून गाडगेबाबा यांनी स्वत:ला माणूस म्हणवून घ्यायला जो जो म्हणून कुणी पात्र आहे, त्याला स्वराज्याचा–शिक्षणाचा–धर्म समजावून दिला. स्वखुषीने अगदी राजीखुषीने अंगीकारायला लावला. साहजिकच गाडगेबाबा नुसतेच समाजवादी संत राहिले नाहीत, तर उभ्या महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक इतिहासातील अलौकिक युग ठरले ! अर्थात हे अलौकिकत्व चमत्कृतिपूर्ण भाकडकथांनी मंडित झालेले अद्‌भुत नसून शास्त्रपूत जीवनदृष्टीची ती देणगी आहे.

## शास्त्रपूत साधुत्वात लोककार्याचे बीज

म्हणून तर गाडगेबाबांचे स्मरण आठवणीतून दूर होत नाही. महाराष्ट्र रत्नांची खाण आहे. हिमालयाच्या उंचीची माणसे महाराष्ट्रात जन्माला येतात, हे खरेच आहे. त्यामधले गाडगेबाबांचे निर्माण हे नेहमीसाठीचे एक पुण्यस्मरण आहे. हे महाराष्ट्रभूमीला केव्हाही गौरवाचे ठरावे, ही अतीव अभिमानाची बाब आहे. पण तेवढ्यासाठीच ती अपूर्व अभिमानाची गोष्ट नाही. ती आहे त्याच्या रूढ परंपरेहून सर्वस्वी वेगळ्या लोककार्याच्या संदर्भात ! लोकांना जागृत करण्याच्या दृष्टीत–गाडगेबाबांच्या जन्मात – या लोककार्याचे बीज आहे; म्हणून जन्म आणि कार्य दोन्हीही पुण्यप्रद आहेत. प्रेरक आणि प्रबोधक आहेत. म्हणूनच आधुनिक काळात, महाराष्ट्र ‘ आधुनिक ’ करण्यासाठी बुद्धिवादी दृष्टीने गाडगेबाबांइतका शास्त्रीय साधुत्वाचा आणि प्रखर सामाजिकतेचा प्रखर प्रचार आणि प्रसार अन्य कुणी केल्याचे उदाहरण शोधावे लागेल.

## दगडाचे टाळ व फुटक्या डब्यांचे मृदंग

गाडगेबाबांचा जन्म तिकडे वऱ्हाडातल्या ( जेव्हा अखंड महाराष्ट्र अस्तित्वात नव्हता आणि वऱ्हाडचा सुपीक प्रदेश हिंदी भाषी मध्यभारतात समाविष्ट होता.) अमरावती जिल्ह्यातला. शेणगाव हे त्यांचे जन्मगाव. २३ फेब्रुवारी, १८७६ ही त्यांची जन्मनोंद: जन्मतारखेदिवशीचा योग होता महाशिवरात्रीचा. वडील झिंगराजी, आई सखूबाई, जात परीट.

गाडगेबाबांचे बारशाच्या वेळी ठेवलेले नाव डेबूजी. ‘ गाडगेबाबा ’, ‘ गाडगे महाराज ’ किंवा ‘ वट्ठी साधु ’ ही त्यांची नावे नंतरची. गाडगेबाबा हे सगळ्यात

गोड, लाडके व बहुजनसमाजाच्या मुखात घोळत असलेले लोकप्रिय नाव. तर ज्या गाडगेबाबांनी अनिष्ट रूढिव्यवहारांचा, दारू आदी व्यसनांचा सतत निषेध केला. त्यारुविद्ध प्रचाराची प्रचंड मोहीमच उघडली. त्या बाबांच्या वडिलांना–झिंगराजी यांना–दारूचे भयंकर व्यसन होते. दारूमध्येच त्यांच्या संसाराची होरपळ झाली आणि तशा अवस्थेत प्राण सोडताना झिंगराजींच्या मुखातून अखेरचे शब्द बाहेर पडले :

...दारूपायी घरदार, वावर, जमीनमान सोकल्यात आपल्या संसाराचे कोयसे ( कोळसे ) झाले...

या वेळी बाबांचे वय होते फक्त आठ वर्षांचे. कोवळे वय, संस्कारशील मन आणि भावनाशील वृत्ती. आता डेबूजीचे काय करायचे ? सखूबाईपुढे मोठा प्रश्न होता.

आणि सखूबाईने नेहमीच्याच मार्गाने हा प्रश्न सोडविला. मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे हे गाव सखूबाईंचे माहेर. घर खाऊनपिऊन सुखी. शेतीही पुरेशी. सखूबाईंचा भाऊ व डेबूजीचे मामा चंद्रभान कर्तबगार. या कर्तृत्ववान मामाच्या सावलीखाली गाडगेबाबा आले आणि गुराढोरांच्या रमण्यात रमून गेले. सकाळी उठावे, गुरांचा गोठा स्वच्छ करावा, शिळ्यापाक्या अन्नाची न्याहारी करावी, दुपारची कांदा-भाकरीची शिदोरी बांधून घ्यावी, चरणीला जावे, निंब–पिंपळ–वड आदी झाडांच्या शीतल सावलीत पहुडता पहुडता, ‘ रामकृष्ण हरी जय जय रामकृष्ण हारी ’ या भजनाच्या सहजसुखाच्या गाण्यात, सुरांनी जवळच्याच कुणाच्या तरी शेतात मुंसडी मारावी, शेतमालकाने तावातावाने यावे नि डेबूजीच्या मुस्काटात द्यावी, तरीही मनाची स्थितप्रज्ञता ढळू नये असा गाडगेबाबांचा नित्याचा कार्यक्रम होता. या ‘ कार्या ’मुळे शिक्षण नव्हते. पण या कार्यक्रमातच नियतीने गाडगेबाबांचे शिक्षण लिहून ठेवले नव्हते काय ? अन्यथा गाडगेबाबांच्या रूपाने पुढे सामाजिक जीवनात लोककार्याचा एवढा ‘ न भूतो ’ आविष्कार कसा शक्य होता ? मामी कौतिकाबाई पहाटे दळताना गाडगेबाबा त्यांना मदत करीत. दळणाच्या मऊसूद पोताबरोबर मामीच्या मुखातून स्रवणारी गीते, अभंग, ओव्या यांचे ग्रहण चाले. डेबूजी थोडे मोठे झाल्यावर भजनी बालमेळ्यांचे कार्यक्रम सजले ते त्यातूनच. आसपासची पोरे जमवावीत, दगडाचे टाळ आणि फुटक्या डब्यांचे मृदंग करावेत आणि भजनरंगात

दंग होऊन जावे; विश्वाचे भानच उरू नये असे चाले! जिथे विश्वाचेच भान हरपले जायचे तिथे पोराबाळांच्या जातिपातीधर्माचा विचार कुणाच्या मनात कुठला येणार? कसा येणार? या खऱ्याखुऱ्या धर्मनिरपेक्ष भेदातीत उत्कट भावनेतून नामसप्ताह व सहभोजने उभी राहिली. एकदा असे घडले : पोरे पोरे वनभोजनाला गेली. कुणी काय आणले, कुणी काय आणले; असे करून गेली आणि अटीतटीने कामे उरकली. पंगती बसल्या. आणि डेबूजींच्या लक्षात आले की काही पंगती वेगळ्या मांडल्या गेल्या आहेत. इतरांपासून दूर. वनभोजनासाठी आलेल्या अस्पृश्य मुलांच्या त्या पंगती होत्या. डेबूजी अस्वस्थ, त्याच्या मनाला ते आवडले नाही. रुचले नाही. भोजनाला सुरुवात होणार इतक्यात डेबूजी आपले पान घेऊन उठला आणि सरळ अस्पृश्य मुलांच्या पंगतीत जाऊन बसला. हे अघटित होते. मुले भांबावली. चुळबूळ करू लागली. त्यांना, गाडगेबाबांच्या नैसर्गिक समतेच्या विचारांनी घडलेल्या समृद्ध मनाची कल्पना कशी असणार? येणार?

गाडगेबाबा हे ह्या अलौकिक सृष्टीतले देणे होते. महामानव होते. इतर पोरे सामान्य लोकांचे जग होते. डेबूजीचे करणे त्यांना कळणे शक्य नव्हते. कळलेही नाही. म्हणून तर पोराथोरांत डेबूजीच्या या कृत्याने हलकल्लोळ माजला. मामा चंद्रभान यांच्यामार्फत डेबूजीला वठणीवर आणण्याचा प्रयत्नही झाला; पण गाडगेबाबांमधला 'माणूस' हटला नाही. तो अधिकच तेजस्वी झाला. गाडगेबाबांच्या मधला 'माणूस' सांगू लागला :

> "...अरे, या भूमीवर राहणारी सारी देवाची लेकरे. कोण
> श्रेष्ठ नि कोण कनिष्ठ? सारे मातीतून आले नि मातीतच जाणार.
> शेवटी अवघे जण अवघे साडेतीन हात जागेचे धनी..."

गाडगेबाबांची माणुसकीची ही भावना—समतेची ही दृष्टी—खूप मोठ्या व्यापक परिसरावर पसरलेली होती : त्यात अस्पृश्य होते. खेरीज आंधळे—पांगळे, लंगडे—लुळे, व्यसनाधीन जीवजंतू असे सारे होते. अनिष्ट प्रथा आणि जीर्णशीर्ण रूढी यांनी ज्यांची मने नासून गेलेली आहेत आणि मस्तके बधिर बनलेली आहेत असेही त्यात होते. अशा कुणाचीही, मग तो लहान-मोठा कुणीही असो, त्याबाबत कसलाही आपपरभाव न ठेवता गाडगेबाबा जाम धुलाई करीत असत. बऱ्याच दिवसांच्या गाद्यागिरद्या-कापूस साकळून गाठी बनलेल्या आणि

कोंदटपणाने मातकटलेल्या—उन्हाळ्याच्या कडक उन्हात टाकून बदडतात ना तसे ! विशीर्ण परंपरांच्या जंजाळात रुतून बसलेल्या समाजाची गाडगेबाबांनी खसखसून धुलाई करण्याचे व्रतच अंगीकारले होते. ते त्यांनी पूर्ण इरेसरीने स्वीकारले आणि उपयोगात आणले. दापूरे गावच्या पूर्णा नदीच्या पात्रात, मुळीसुद्धा पोहायला येत नसता डेबूजीने उडी टाकली. गटांगळ्या खाल्ल्या; मामाने श्रीमुखात भडकावली ती मुकाटपणाने सहन केली. पण जिद्द न टाकता पुढे पोहण्यात अपूर्व प्रावीण्य संपादन केले. त्यामागची उत्कट तितकीच प्रखर प्रेरणा हा गाडगेबाबांच्या आख्ख्या कार्यामागचा दर्शनबिंदू आहे. बाबांनी ‘ खराट्याचा धर्म ’ ज्या अखंड परिश्रमाने समजावून दिला, त्यामध्ये ह्या दर्शनबिंदूचे सारसर्वस्व आहे. गाडगेबाबा सांगतात :

> “ आपल्यापूर्त सर्वेच पाह्यतात. पन उरलं हुए आयुष्य अळस्या नळस्या गरजी लोकांईची सेवा कऱ्याले खरसलं तर तेच खरी देवाची सेवा हाय. देवळातल्या दगड-गोट्याच्या देवाचे हातपाय दाबून काही होत नाही. भोवताली पसरलेली ही माणसांची दुनिया हेच खरं देवाचं रूप हाय. त्या हजारो लाखो देवाची करता येईल त्या मार्गानं सेवा करनं देवाच्या घरी रुजू होईल. वासाचं फूल वेल आणून देवाच्या गोट्याच्या मूर्तीवर वाह्यलापेक्षा भवतालच्या चालत्या बोलत्या लोकाच्या सेवेत आयुष्य खरसलं, भुकेल्या ह्या लोकांच्या तोंडात भाकरीचा घास घातला, तरच जलमाचं सार्थीक होईल. त्या फूलपत्रापक्षे माझा खराटा अन् झाळनंच मुद्याचं आहे. ”

## कार्यामागचा दर्शनबिंदू

हा खराट्याचा धर्म आकार घेत गेला तो डेबूजीला लाभत गेलेल्या नैसर्गिक शिक्षणातून; हरघडीच्या जीवनाला सामोऱ्या येणाऱ्या अनुभवातून. मामाच्या शेतीत डेबूजी श्रम वेचत होता. शेती फुलत—फळत होती. करता करता डेबूजी १४—१५ वर्षांचा झाला. म्हणजे त्या काळच्या दृष्टीने लग्नाचे वय. ‘ आपलं ज्याचं घोंगडं त्याच्या गळ्यात बांधलेलं बरं ’ अशा दृढ समजुतीचा काळ. मामाने तयारी केली. १८९२ साली डेबूजीचे लग्न झाले. कमळापूरचे धनाजी

पाटील यांची मुलगी कुंताबाई हिच्याशी. कालांतराने डेबूजीला पहिली मुलगी झाली. जातिरिवाजाप्रमाणे मटण व दारूचा सोहळा होणार आणि पहिल्या अपत्याच्या जन्माचा सण साजरा होणार असे गावकऱ्यांना वाटले; पण त्यांची निराशा झाली. ' कर्ज काढून तर सोडाच, पण सुस्थितीतही हे घडणार नाही ' असा डेबूजींचा निर्धार होता; डेबूजींच्या पाठीशी आई होती. दारू, मटणा-ऐवजी बुंदीच्या लाडवांचा बेत करण्यात आला; डेबूजींच्या करारीपणापुढे मान तुकवून जातगंगेने तो गोड मानून घेतला.

### मानवी जीवनाच्या साफल्यासाठी

आणि डेबूजींचे घर धनधान्याने भरलेले असले, घरात ते सुखी असले तरी, संसारातून त्यांचे मन हळूहळू विरत चालले होते. एका मार्गशीर्ष महिन्यात शेतात डोलणाऱ्या भरगच्च पिकात डेबूजी माचावर उभे राहून पाखरे राखीत असताना, डोक्यावर जटाभार असलेल्या, तेजस्वी अंगकांती असलेल्या अज्ञात विभूतीने त्यांना ' दर्शन ' दिले, प्रसादही दिला आणि बुधवार १ फेब्रुवारी, १९०५ रोजी डेबूजींनी गृहत्याग केला. माता सखूबाईचा आशीर्वाद घेऊन लोकसंसाराच्या मानवी जीवनाच्या खऱ्याखुऱ्या साफल्यासाठी ते तयारीस लागले. १२ वर्षे पायी भ्रमण केले. षड्रिपूंचे दमन करण्यास प्रयास केले. कडक वैराग्य अंगी बाणविले. साधक बनले. पण सतत भ्रमंतीच करीत राहिले. एका जागी म्हणून स्थिरावले नाहीत. राहात ते सुद्धा झोपडीत आणि निर्वाह करीत तो गाडग्यावर मिळालेल्या भिक्षेवर. हातात एक खापरे घेतलेले, चिंध्या पांघरलेले, फाटक्यातुटक्या गोधडी-वर देहाचे मुटकुळे टाकणारे—जवळ काहीच न बाळगणारे गाडगेबाबा हे एकादश व्रतातील अपरिग्रहाचे एक आदर्श रूप होते. त्यामध्ये म. गांधींनी सांगितलेले जिभेवरचे स्वामित्व फक्त नव्हते तर स्वाभिमानाचे तत्त्वही होते. गाडगेबाबांनी ते आवर्जून अंगीकारले. गाडगेबाबांना जिभेपेक्षाही लाचारीवर औषधोपचार हवा होता. स्वाभिमानाचे तत्त्व स्वीकारून, लाचारीच्या नष्टाशांचा आणि स्वच्छतेच्या आग्रहाचा विचार त्यांनी आग्रहपूर्वक रुजविला. ' देवकीनंदन गोपाला 'चा गजर त्यांनी जागविला तोही एका विशिष्ट हेतूने : देवकी पुत्रवती. पण त्यांना वंचित झालेली. पण तिला पुत्राचा विसर नाही आणि श्रीकृष्णाला देवकीची याद नाही असा क्षण नाही. देवकी—कृष्णाचा दैवयोग गाडगेबाबांना जमवून

आणायचा होता आणि देवकीचे स्मरण क्षणासाठीसुद्धा न विसरणारा श्रीकृष्ण हा गाडगेबाबांना 'गोपाल' स्वरूपात हवा होता. गोरक्षण करणारा 'गोपाल' आणि राष्ट्राची श्रीमंती, सद्भावना, कारुण्य व पौरुष सामावलेले धन 'गाय' यातून उत्कटतेने साधला जाणारा परंपरेचा धागा गाडगेबाबांना जुळवून द्यायचा होता. त्यांनी ते केले आणि म्हणूनच जनावरांचा जीव घेणे—अगदी धार्मिक कारणासाठी सुद्धा—हे अधार्मिक आहे, याचा त्यांनी धोशा लावला. त्यासाठी संघर्षही केला. रजतम गुणांनी युक्त हिंसेकडून सत्त्वगुणी अहिंसेकडे वळविण्याचा हा रास्त मार्ग होता. उपनिषत्काळापासून चालत आलेला सद्धर्म गाडगेबाबांनी 'स्वदेशी' रूपात जागविला : राहणे, वागणे इतकेच काय अगदी भाषेतही स्वदेशी अस्तेय व्रत होते. 'महाराष्ट्राचे समाजवादी संत गाडगेमहाराज' या लेखामध्ये आचार्य प्र. के. अत्रे यांनी कीर्तनरंगी रंगलेल्या गाडगेबाबांच्या भाषेतील अस्तेय व्रताचे सुरेख उदाहरण दिले आहे, ते असे.

एका कीर्तनामध्ये देवापुढे होणाऱ्या पशुहत्येबद्दल बाबा बोलत होते. त्यांनी विचारले :

'श्रीखंड चांगले की बकरे चांगले ?' ( श्रोते : श्रीखंड )

'बासुंदी चांगली की बकरे चांगले !' ( श्रोते : बासुंदी )

'दूध चांगले की बकरे चांगले ?' ( श्रोते : दूध )

'इथे असे बोलता अन् घरी जाऊन बकऱ्याचे मांस खाता, काय म्हणावं तुम्हाला ?' ( हशा ) गुजराथी अन् मारवाडी देवाला जातात. ते कधी त्याला बकरे देतात का ? ( श्रोते : नाही ) मग त्यांना देव कसा पावतो अन् तुम्हाला का पावत नाही ? एकेका गुजराथ्याच्या दहा—दहा मजली इमारती इथे मुंबईत आहेत ! अन् तुम्ही फुटपाथवर झोपताहात. ( हशा ). तुमचे धंदे म्हणजे ( नक्कल करीत ) मीठ ! कल्हई, कांऽदेबटाटे ! नाहीतर ( दांडा हलविण्याचा अभिनय करीत ) उसाचा चरक ( हशाच हशा ). देवाला बकरे द्यायचे, तर ते त्याच्या देवळात सोडून द्या. त्याच्या पोटात सुरी कशाला खुपसता ? अन् ( अभिनय करीत ) मसाला कशाला वाटता ? ( हशा ) तुम्ही इकडे त्याचा मसाला वाटता आणि यम तिकडे तुमचा मसाला वाटतो ! ( प्रचंड हशा ) बोला, "गोपाला ! गोपाला ! देवकीनंदन गोपाला !"

लोकांसाठी लोकभाषेचा इतका उत्तम निखळ उपयोग क्रांतिसिंह नाना पाटील यांच्याखेरीज, तदनंतर क्वचितच कुणी केला असेल ! ‘ शिक्षणाशिवाय माणूस धोंडा ’ असे सतत कानीकपाळी ठसविणाऱ्या गाडगेबाबांनी समाजाच्या धारणेची अवघड अवघड व्रते समाजाला सांगितली आणि त्यानेही ती तत्परतेने स्वीकारून टाकली असे थोडेच घडले आहे ? त्यासाठी पुजाऱ्यापासून पाटलापर्यंत गाडगेबाबांना अव्याहत झुंज द्यावी लागली. आरोग्यवर्धक संदेश देणाऱ्या, मानवी मूल्यांच्या या बुद्धिवादी उपासकाने तळागाळातून आलेल्या लोकांसाठी ती वाढत्या उत्साहाने दिली.

## समाजवादाचे धर्मचक्र

गाडगे महाराज हे समाजवादाचे कृतिनिष्ठ व्यासपीठ होते. गरीब, दु:खी, दलित यांच्या उद्धाराची दिशा दाखविणारा तो मंत्र आहे : काल होता, आज आहे आणि उद्याही असेल. स्थितप्रज्ञ गाडगेबाबांनी स्वत: दारिद्र्यात राहून लोकांसाठी धन गोळा केले आणि अत्यंत नेकीने त्यांनी ते त्यांच्यासाठी वेचले : गाडगेबाबांनी राहुरी, ओतूर, भिवाळी—वज्रेश्वरी, चालतवाड, भातसई—वासिंद, नागरवाडी, मरी, सितारवंडी येथे ८ आश्रमशाळा, गोंदवले बुद्रुक, ब्रह्मपुरी येथे विमोचित जाती व भटक्या मुलांमुलींसाठी २ आश्रमशाळा, राहुरी, गोंदवले बुद्रुक, भुसावळ, चौसाळा, सातारा, कुर्ला, ओतूर, राजुरी, जुन्नर, मिरज, या गावी मुलींची वसतिगृहे, पंढरपूर, ओतूर, वज्रेश्वरी या ३ ठिकाणी माध्यमिक शाळा, वलगाव येथे वृद्धाश्रम, शहादा, ओतूर, राजुरी या ३ ठिकाणी संस्कार केंद्रे आणि ऋणभोजन, मूर्तिजापूर, पंढरपूर ( ३ ), नाशिक, आळंदी ( २ ), देहू, त्र्यंबकेश्वर ( २ ), पुणे अशा १२ जागी गोरगरिबांसाठी धर्मशाळा असे प्रचंड शैक्षणिक सामाजिक कार्य गाडगेबाबांनी उभे केले. स्वाभिमानाचे जिणे गोरगरिबांना मिळावे म्हणून कार्याचा सागरच बाबांनी निर्माण केला. आणि महाराष्ट्र हे संतांचेच नव्हे तर महंतांचेही राष्ट्र आहे हे त्यांनी कृतीनेच सिद्ध केले. ‘ बुडती हे जन । देखवे न डोळा ’ या जाणिवेतून हे सारे स्फुरण मिळाले. ‘ तुटो हे मस्तक फुटो हे शरीर ’ या ईर्षेतूनच हे घडले. घडविण्यात आले. गुरु-शिष्याची परंपरा निर्माण न करता किंवा तशा ‘ बुवाबाजी ’स वाव न ठेवता गाडगेबाबांनी हे घडवून आणले, हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.

**पुढची वाटचाल कोणती?**

गाडगे महाराजांच्या अनेक विक्षिप्त कथा सांगितल्या जातात; पण त्या कहाण्यांत गाडगेबाबा नाहीत, ते आहेत त्यांच्या लोककार्यात आणि त्याद्वारा झालेल्या समाजधारणेत व त्याच्या उरणाऱ्या प्रभाव व परिणामात! गाडगे महाराजांचे सेवाधर्माचे अनुयायित्व सच्चेपणाने कोण स्वीकारतो आणि त्यांची शिकवण डोळसपणे कोण अंमलात आणतो, हा गाडगेबाबांच्या संदर्भात यापुढचा महत्त्वाचा प्रश्न आहे. आणि अशा रीतीच्या प्रश्नांची उत्तरे आपल्या समाजात जेवढ्या तत्परतेने आणि त्वरेने मिळायला हवीत तेवढी ती मिळत नाहीत, हीच मुळी चिंतेची बाब आहे. म्हणून चिंता आणि व्यथा यांना टाळा लावणे हे शेवटी समाजाचेच कर्तव्य ठरते.

# १०

# कूट प्रश्नांची गणिते

१८१८ मध्ये शनिवारवाड्यावर युनियन जॅक फडकला. बाळाजीपंत नातू-सारख्या स्वदेशी फितूर माणसाच्या हातून फडकला आणि मराठेशाहीची इतिश्री घडली, ब्रिटिश साम्राज्याची द्वाही फिरली. आंग्लाई आली नि थंड गोळा होऊन पडलेल्या या देशाची अस्मिता झिरपू लागली.

सामान्य जनता मोहनिद्रेत असली तरी काळाचा वेध साधणारे 'कालपुरुष' रिपव्हॅन विंकलप्रमाणे अगदीच तुस्तावून पडले नव्हते : त्यांनी परिस्थिती पाहिली, न्याहाळली, अनुभविली, अभ्यासिली, तिचे मूल्यमापन करून काही गणितें मांडली. नागरी आणि नांगरी दोन्ही वर्गातील विचारवंतांनी मांडलेल्या विचारपरंपरांनी आपापल्या परीने मूल्यमापनाचे माप घातले, शक्य तेवढे जोखून घेतले. गोपाळराव आगरकर, लो. टिळक, महर्षी अण्णासाहेब कर्वे, न्या. तेलंग, न्या. रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, भांडारकर हे पहिल्याचे तर म. फुले, राजर्षी शाहूमहाराज, महर्षी अण्णासाहेब शिंदे, सद्गुरू गाडगेबाबा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील हे दुसऱ्या विचारपरंपरेचे प्रतिनिधी होत. या दोन्ही विचारपरंपरांनी स्वकीय जीवितकार्य निवडून त्याचा यथाशक्ति पाठपुरावा केला. या प्रयत्नात या दोन्ही परंपरांत द्वैत उभे राहिले नाही असे नाही. पण झाल्या गोष्टी इतिहासजमा आहेत. विसाव्या शतकात वावरणाऱ्याला या मृतांच्या शवविच्छेदनाची गरज नाही. या दोन्ही परंपरांनी, परस्परांच्या केवळ कुरापतीपेक्षा, उचापतीपेक्षा महाराष्ट्राला कोणते प्रगल्भ विचारधन दिले, त्याद्वारा सौहार्दाच्या भावनेने महाराष्ट्राचे धारण आणि पोषण कसे पुष्ट केले हे अधिक महत्त्वाचे आहे.

नागरी समाजधुरीणांनी स्वीकारलेल्या कार्यामागील दृष्टीतून नांगरी नेते उभे

राहिले. नागरी नेत्यांची दृष्टी आणि दृष्टिकोण, त्याद्वारा स्वीकृत केलेली कार्यकक्षा ग्रामीण–समाजापर्यंत–बहुजनबहुहितवादापर्यंत–पोचू शकली नाही, ग्रामीण–समाजाच्या वेदना–व्यथांची ' आच ' त्यांना लागली नाही, ' तेच पतित की जे आखडिती प्रदेश साकल्याचा ' हा तत्त्वभाग नागरनेत्यांच्या मनःप्रवृत्तीला आणि विचारजीवनाला जिंकून घेता तर नांगरनेत्यांचा उद्‌भव घडला नसता, घडलेल्या ' अपरिमित ' विनाशापासून महाराष्ट्र वाचू शकला असता, सांप्रतच्या भारतीय राजकारणातील, महाराष्ट्राच्या पीछेहाटीला इतका वेग आला नसता, अव्वल इंग्रजीतील समतेसाठी चाललेल्या, झगड्याचा महाराष्ट्राचा इतिहास वेगळ्या संदर्भात मांडावा लागला असता. पण हे घडू शकले नाही. महाराष्ट्राच्या गेल्या दीडशे वर्षांच्या प्रचंड खळबळीच्या, अपूर्व जागृतीच्या, आणि न ' भूतो ' उत्साहाच्या कालखंडातील महाराष्ट्राची ही पहिली शोकान्तिका होय. नांगर–नेत्यांनी अश्रू ढाळीत न बसता, महाराष्ट्राच्या जीवनाची पुढची शोकान्तिका टाळण्याचा आटोकाट प्रयत्न केला, अन्यथा महाराष्ट्र शेकडो मरणे मेला असता, भौगोलिकदृष्टीने जिवंत राहता तरी खऱ्या अर्थाने नामशेष होता ! प्रामुख्याने, ग्रामीण समाजाच्या उद्धारासाठी अव्वल इंग्रजीत झालेल्या चळवळीत नांगरनेत्यांचे ऋण ग्रामीण समाजावर अधिक आहे, केवळ शे–सव्वाशे वर्षांच्या अविरत प्रयत्नांनी नांगरनेत्यांनी महाराष्ट्राचा एक हजार वर्षांचा इतिहास पुढे नेला.

॥ १ ॥

या इतिहासबांधणीतील अव्वल मानकरी म. जोतिराव फुले होत. सामाजिक गुलामगिरीच्या विरुद्ध बंड पुकारणारे, तत्कालीन हिंदुस्थानातील हे पहिले पुरुष. जोतिराव फुल्यांचा काळ हा हिंदुस्थानात ब्रिटिश स्थिरपद पावल्याचा काळ आहे. ब्राह्मण्याच्या धार्मिक आणि सामाजिक गुलामगिरीत ब्राह्मणेतर खितपत असल्याचा फुल्यांचा अनुभव होता, मत होते. या आंतरबाह्य गुलामगिरीची लोकांना इतकी लोचट संवय झाली होती की, तिच्याविरुद्ध हातपाय हालवायचा विचार ( बोलण्याचा दूरच राहो ) तिच्या मनात येत नव्हता. मुडदूस झालेल्या मुला-सारखी निर्मळ, पोलिओ झालेल्या बालकासारखी तिरपागडी, दुर्बळ नि क्षयाने खिरणाऱ्या माणसासारखी निःसत्त्व लुकडी अवस्था या समाजाची होती. न्याय द्यायचा तो दलिताला, सोय पाहायची ती पीडितांची, श्रीमंतांची नव्हे. दलित–

पीडितांना अविलंबे न्याय देण्यानेच भावी क्रांतीची भाषणता रोखली जाते, हे 'समाजवादा'तील मूलगामी तत्त्व जाणणाऱ्या फुल्यांनी दलितांचा उद्धार हे जीवितकार्य मानले. अनेकविध 'सत्यशोधकी' चळवळी करताना लोकहित-वादींप्रमाणे फुल्यांची सारी भिस्त होती शिक्षणावर! बहुजनाच्या शिक्षणाची स्थिती या वेळी काय होती? "प्रजेच्या नैतिक आणि भौतिक प्रगतीची जबाब-दारी सर्वस्वी सरकारवरच आहे अशा तऱ्हेच्या उच्च व आकर्षक तत्त्वांना त्या वेळच्या सरकारी ठरावांतून जरी साळसूदपणे मान्यता दिलेली होती, तरी देखील तत्कालीन अधिकाऱ्यांनी बहुजनसमाजाच्या शिक्षणाकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले होते. समाजातील बुद्धिमान व वजनदार वर्गास सरकारी नोकरीच्या रुपेरी बेडीने जखडून टाकून त्याच्या मदतीने या देशात आपले आसन स्थिर करण्याचा त्यांचा मनसुबा होता आणि याच दृष्टीने त्यांनी आपल्या शिक्षणकार्याची रूपरेषा आखली होती."[१]

सामाजिक क्रांतीच्या अत्युच्च ध्येयाने प्रेरित होऊन ही कोंडी फोडण्याचे काम म. फुले यांनी केले. बीज पेरून उद्यान कसे उभे करायचे, कसे फुलवायचे हे फुल्यांना चांगले माहीत होते. शिक्षणाखेरीज माणसाचे आयुष्य दिशाशून्य आहे, ते माणसाच्या आयुष्याची दिशा ठरविते, शिक्षण मिळाले की, बहुजन जागा होईल, त्याची दृष्टी फाकेल, ती व्यापक होईल, 'असंच चालायचं' ही त्याची आत्मविनाशी संतुष्ट वृत्ती नाहीशी होईल, तो खेळता होईल, चिकित्सक बनेल, आपल्या आचारातील वैगुण्ये स्वतःच हुडकून काढील, हवा तो बदल करील, घडवून आणील, पण त्यासाठी शिक्षण हवे. शिक्षणाच्या अनिवार लालसेने झपाटलेल्या फुल्यांच्या या दृष्टीमागे बहुजनसमाजात आत्मप्रत्यय व आत्मा-वलोकन उत्पन्न करण्याचा दृष्टिकोण होता. आपण कोण आहोत, समाजात आपले स्थान काय आहे, आपल्या स्वतःभोवती पसरलेल्या परिस्थितीचा अर्थ काय आहे, याची जाणीव नसणारे लोक स्वतंत्र होऊ शकत नाहीत, आत्मोन्नती करू शकत नाहीत, त्यांच्यात गुणांचा आणि कर्तृत्वाचा विकास होत नाही; ते दासच राहतात. समाजशास्त्राचा हा सिद्धान्त 'माळी' फुल्यांना चांगलाच अवगत होता. नुसताच अवगत होता असे नव्हे तर पिंडामध्ये तो जिरवून टाकला होता, बऱ्याच दिवसाच्या लोणच्याप्रमाणे मुरून गेला होता.

त्यामुळेच "I think primary education of the masses should be made compulsory upto certain age, say at least twelve years." अशी हंटर कमिशनपुढे फुल्यांनी (१८८२) आग्रहाने मागणी केली व ब्रिटिशांच्या 'फिल्टर डाऊन' सिद्धान्ताला कडाडून विरोध केला. सरकारने उच्चवर्गाला इंग्रजीतून शिक्षण द्यायचे आणि त्यांनी ते मातृभाषेतून खाली पोचवावे अशी सदिच्छा बाळगायची असे हे 'फिल्टर डाऊन' होते. फुल्यांना हे मान्य नव्हते. आधुनिक भाषेत लिहायचे तर दिल्लीपासून गल्लीपर्यंत नाही, 'गल्लीपासून दिल्ली'पर्यंत हा 'झेड्. पी.' फुल्यांनी दणकावून आणि ठणकावून सांगितला, त्या वेळी हे घडले नाही; हंटर कमिशनने सक्तीच्या शिक्षणाविरुद्ध आपले मत नोंदवून या प्रश्नाची वासलात लावली. पण निराश न होता केवळ शिक्षणाच्या दृष्टीनेच नव्हे तर सर्वांगीण सुधारणेच्या दृष्टीने कणखर फुले सातत्याने कार्यशील राहिले.

॥ २ ॥

"कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन" या वृत्तीने काम करणाऱ्या महर्षी वि. रा. उर्फ अण्णासाहेब शिंदे यांनी बहुजनांच्या त्याहून अधिक अस्पृश्योद्धाराच्या बाबतीत ही कार्यशीनता जोमाने रेटली. महर्षी सामाजिक समता, राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि धर्मकार्य या ध्येयासाठी आमरण झगडले. अस्पृश्यतानिवारण हा महर्षींच्या कार्याचा मेरुमणी होय. भारतीय अस्पृश्यतेच्या प्रश्नाचा मूलगामी विचार त्या काळी महर्षींइतका फारच थोड्यांनी केला असेल! महर्षींनी अस्पृश्यतेसंबंधी केवळ मीमांसा केली असे नव्हे तर त्याला कृतीची जोड दिली. दलितांची हजारो वर्षांची कहाणी अभ्यासून हळुवार बनलेले कर्मवीरांचे मन नगरहून चार मैलांवरील भिंगार गावी भरलेल्या सोमवंशी हितचिंतक समाजाच्या सभेत उत्कटतेने जागे झाले, "इतर सर्व कामे टाकून घडीचाही वेळ न लावता ह्या कार्यास लागावे" असा मनाचा निश्चय झाला नि "जिवंत व्यक्तिगत पुढाकार असलेल्या मिशनने, ख्रिस्ती मिशनऱ्याप्रमाणे 'ह्या' लोकांच्या जीवितामध्ये क्रांती व विकास घडवून आणला पाहिजे," असा विचार ठरला. १८ आक्टोबर १९०६ रोजी निरभिमानतेचा आणि निरहंकारितेचा सात्त्विकभाव मनाशी ठेवून 'आत्मोद्धारासाठी' भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीची

स्थापना करण्यात आली.

भारतासारख्या खंडवजा देशावर अस्पृश्यतेच्या कार्याचा प्रयोग करणे ही साधी गोष्ट नव्हे, त्यासाठी विभूतींचीच आवश्यकता होती, पण वाट न पाहता, श्रद्धेने पर्वत हे हललेच पाहिजेत या निष्ठेने भारलेल्या नि सामान्य माणसाच्या घटनात्मक प्रयत्नाकडे कल असलेल्या कर्मवीरांनी कार्याला सुरुवात केली. अस्पृश्योद्धार हा कर्मवीरांना वाटत असलेल्या धर्माच्या प्रचाराच्या अस्सल कामाचा प्रमुख घटक होता. त्यात अस्पृश्योद्धारच नव्हता, जनोद्धार होता, आत्मोद्धारही होता. अस्पृश्योद्धाराचे काम महर्षींनी भारतभर पसरविले. पुढे अनेकांकडून घडलेल्या यासंबंधीच्या कार्याची भक्कम पार्श्वभूमी महर्षींनी यापूर्वीच करून ठेवली होती असे म्हणता येईल.

महर्षी शिंदे यांच्या काळात ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादासारख्या किमान तीन तरी महत्त्वाच्या चळवळी झाल्या होत्या. प्राय: त्या बाबतीत गुणाचे वर्धन करणारी तात्त्विक बैठक सांगून महर्षी पुढे गेले आहेत. अस्पृश्योद्धार, जातिभेद, देवदासी, मुरळी, स्त्रियांची विटंबना, क्षुद्रदैवतांची उपासना, होळीतील बीभत्स प्रकार इत्यादी समाजातील अनिष्ट गोष्टींवर त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले. उच्चवर्ग (ब्राह्मण), मध्यमवर्ग (ब्राह्मणेतर) आणि कनिष्ठवर्ग (अस्पृश्य) यांपैकी कनिष्ठवर्गावर महर्षींनी आपली ताकद अधिक वेचली. म. फुल्यांच्या बहुजन-समाजाच्या नि:स्पृह सेवेतील दलित समाजाच्या उन्नतीचा एक घटक महर्षींनी प्रकर्षाने हाती घेतला. भारतीय समाजपुरुषाच्या निरोगी प्रकृतीसाठी शिक्षणाचा केवढा विस्तृत आलोक स्वीकारला पाहिजे याचा हा एक वस्तुपाठ म्हणायला हरकत नाही.

चेचवट चौकटीतील ‘कडक’ बुद्धिवादापेक्षा व्यापक करुणाशील बैठक घेऊन आपल्या सांस्कृतिक परंपरेतील ‘सदसद्भावा’चा वोसंग ठेवून आपण आपल्या समस्या हाताळल्या पाहिजेत, हा आपल्या सर्व चळवळी विशाल राष्ट्रीय प्रवाहात नेऊन सोडणाऱ्या, कर्मवीरांच्या सर्व विचारांचा गाभा आहे. नांगर-नेत्यांतून महर्षी थोडे वेगळे पडल्यासारखे वाटतात. त्यामागे ही वैचारिक पृथगात्मता आणि सर्वस्वी ठळकपणे अस्पृश्योद्धारासारख्या कामात गाडून घेण्याची वृत्ती अनुस्यूत आहे. प्रयत्न कोणत्याही दिशेने असले तरी तळामुळातील सामान्याला जागृत करून शहाणे करावे, ही प्रमुख शैक्षणिक दृष्टी आहे.

शेवटी ‘ सामान्य गुणधर्मां ’नी एकत्र येऊन मिळणाऱ्या, वैयक्तिक समाज-शिक्षणविषयक प्रस्तुत चर्चेत सयाजीराव महाराज व राजर्षी शाहू महाराज यांचे, शिक्षणाच्याद्वारा लोकसमाज जागा करून त्यामधून समतेची प्रस्थापना करणे याबाबतचे तत्त्वज्ञान बरेचसे ‘ पॅरलल ’ आहे असे दाखविता येते.

सयाजीराव महाराजांनी पूर्णत: अजातीय दृष्टिकोण स्वीकारून, लोकांचा राजा, नव्हे पालनकर्ता या नात्याने समाजसुधारणांची – शिक्षणाची पाणपोई घातली. “ राष्ट्राची थोरवी कशात आहे ? ” असा प्रश्न उपस्थित करून सयाजीराव शिक्षण आणि अस्पृश्य यांच्यासंबंधी अनेक ठिकाणी म्हणतात : “ राष्ट्राची थोरवी निव्वळ शारीरिक बळ किंवा तसलाच शारीरिक पराक्रम यात नव्हे, तर मानसिक संस्कृती व आर्थिक उन्नती यात ती आहे. स्वत:च्या कामी लावून घेता येणार नाही अशी जगात एकही वस्तू नाही....ज्ञानोपासना हेच विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. परंतु विद्या आली की, सर्व काही आले असे नाही. शील ही राष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची बाब आहे. प्रत्येक व्यक्ती ही एक राष्ट्रघटक आहे. एका राष्ट्रघटकाचे जे शील ते सबंध राष्ट्राचे शील होय. पौरुषयुक्त असलेले शीलसंवर्धन आज देशाला हवे. विद्यार्जनाने प्राप्त होणारी आत्मोन्नती करून घेण्याची संधी हजारो लोकांना देव मुळीच देत नाही. ज्या अज्ञानापासून दु:खाची हटकून उत्पत्ती होतेच होते, त्या गाढ अज्ञानात रुतलेले हजारो गणती लोक सापडतील. अशा सुखसोयी जगात कधी पाहिल्याही नाहीत त्या दुर्दैवी लोकांच्या उपयोगी तुम्ही पडाल अशी तुमच्याविषयी साहजिकच अपेक्षा असते...हिंदुस्थानात शास्त्रीय शिक्षणाची भलतीच हेळसांड झाली आहे...किमान श्रमात कमाल फलनिष्पत्ती करून दाखवावयाची, हा अर्थशास्त्राचा मोठा सिद्धान्त खरा करून दाखविण्यासाठी शास्त्रीय शिक्षणाची जरुरी आहे...मानवजातीमध्ये अर्धा भरणा स्त्रियांचाच आहे. स्त्रियांचे हे संख्याबळ विचारात घेता, त्यांना शिक्षण देण्याची व्यवस्था करणे हे पुरुषवर्गाला आवश्यकच आहे...आपल्या स्त्रीवर्गाला आपल्या इतकेच लायक करून सोडणे हे सर्वांचेच कर्तव्य आहे. ”

राजेपणाचा मोठासा अभिमान न बाळगता बुद्धीवर विश्वासून लोकाराधने-

साठी हवे ते करणारे सयाजीराव अस्पृश्यांसंबंधी लिहितात : "जातिभेदानेच जातिजातीतील वैमनस्य वाढविले व आपल्या राष्ट्रीय एकोप्यात विघ्न आणले. वस्तुतः असल्या जातिभेदाच्या कल्पना धर्मविरोधी आहेत. कारण धर्म हा सदाचरण व सद्‌गुण यांना महत्त्व देणारा आहे. जातीला महत्त्व देणारा नाही. जात जात म्हणजे असते तरी काय? एक मूठभर लोकांचा समूह. धर्म काही मूठभर लोकांकरता नसतो. धर्माचे ध्येय थोडयाशा लोकांची समुन्नती साधणे हे नसून अखिल मानवजातीची स्थिती श्रेयस्कर करण्याचे आहे...अस्पृष्टतेचा प्रश्न हा सबंध राष्ट्राचा प्रश्न आहे... राष्ट्र म्हणून जर तुम्हाला मान उंच करावयाची असेल तर ह्या लोकांचा सामाजिक व राजकीय दर्जा आधी उंच केला पाहिजे...तुम्हाला (अस्पृश्यांना उद्देशून) जितके म्हणून शिकता येईल तितके शिकण्यासाठी तुम्ही झटलेच पाहिजे...पण तुम्हाला खरोखर असे दलित अवस्थेतच राहावयाचे आहे की काही वर डोके करावयाचे आहे, हे सर्वस्वी तुमच्या स्वतःच्या प्रयत्नांवर अवलंबून आहे...माझी तुम्हाला एवढीच सल्ला आहे की, आपल्यापेक्षा वरिष्ठ जातींतल्या लोकांनी आपल्याला जसे ममतेने व सदयतेने वागवावे असे तुम्हाला वाटते, तसेच ममतेने व सदयतेने तुम्ही तुमच्यापेक्षा कनिष्ठ असलेल्या जातींतल्या लोकांना वागवीत चला. यानेच तुमचा आब राहणार आहे...समाजाच्या घटकांना परस्परांविषयी प्रेम व सहानुभूती वाटते तेव्हा 'संहतिः कार्यसाधिका' घडते. देशाच्या उत्थानासाठी ती आवश्यक आहे..."[२] सयाजीराव महाराजांचे हे सांगणे इतके नम्र आणि संथ आहे की, अधिक भाष्याची गरज पडू नये.

॥ ४ ॥

शाहू महाराजांनीही याच दृष्टीचा स्वीकार करून पुरोगामी प्रवृत्तीचा सक्रिय पुरस्कार केला. शाहू महाराजांच्यामध्ये काही दोष असतील, आपण ते मोकळ्या मनाने मान्य करावेत, पण जातिभेदांचे आणि विषमतेचे विषवृक्ष समूळ नाहीसे करण्याकरिता अंध, रूढिप्रिय आणि प्रवाहपतित अशा अनेक सामाजिक मनोवृत्तींशी शाहू महाराजांना विलक्षण झगडा करावा लागला. वीरत्व आणि व्यावहारिकत्व यांच्या विलक्षण मिश्रणातून निर्माण झालेली जीवनमूल्ये आणि त्यांच्या वीरमनाला भूतदयेचा ओलावा, समतेची आसक्ती, न्यायाची चाड आणि

अन्यायाची चीड यांची जोड मिळाल्यामुळे शाहू महाराज स्वभावतः सुधारक बनले. विधायक सामाजिक कल्पनांचे दिलदारवृत्तीने स्वागत करू शकले. फुल्यांपासून चालत आलेले शिक्षण-सूत्रही त्यामागे होते. बहुजनसमाजाची दुःखे, व्यथा आणि वेदनांशी एकरूप समरसतेचे नाते जोडणारे राजर्षी शाहू महाराज राजेमहाराजांत एक विरळा राजे होते.

राजर्षी शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर चळवळ हे आपले प्रमुख उद्दिष्ट मानले आणि त्या चळवळीत प्राण ओतला. इतकेच नव्हे तर त्या चळवळीसाठी वेळवखत आला तर राजपद सोडण्याचीही तयारी केली. शिक्षणावर गाढा विश्वास राखून ब्राह्मणेतरांना पुढे आणण्यासाठी घरोघरी शिक्षणाचे दूधसागर पोचविण्याचा अट्टाहास बाळगला. म. फुल्यांनी बहुजनसमाजाला त्याच्या मानसिक गुलामगिरीतून मुक्त करण्याचे कार्य सुरू केले, राजर्षींनी त्या कार्याची पताका डौलाने फडकत ठेवली. १९०१ पासून, सर्व जातिजमातींच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करण्याच्या इराद्याने कोल्हापुरात अनेक विद्यार्थि-वसतिगृहे स्थापन केली. सत्ता, पैका वेचला, नेतृत्व मिळवून दिले. ते स्वतःकडे घेतले नाही. " पशूला कधी कोणी पक्ष्यांचा पुढारी करीत नाही किंवा पक्षी कधी पशूंचा पुढारी होऊ शकत नाही. गाई, बैल व मेंढरे यांचे पुढारीपण मेंढपालाकडे आल्यामुळेच त्यांना अखेरी कसाबखान्याकडे पाठविले जाते. " जातवार वसतिगृहे काढण्यामागे राजर्षींचे हे ' जीवशास्त्र ' होते. माजलेल्या घोड्याचा सिद्धान्तही त्यासाठी तयार होता. मात्र राजकारणात आणि धर्मक्षेत्रात साऱ्या ब्राह्मणेतरांना एकत्र आणताना महाराजांनी या सिद्धान्ताचा अवलंब केला नाही.

शाहू महाराजांनी ब्राह्मणेतरांच्या उत्थानाबरोबरच हरिजनोद्धाराची मनस्वी कळकळ बाळगली, कृतीत उतरवले. महाराज खाजगीकडे नोकर, शिपाई, ड्रायव्हर मुद्दाम महार समाजातील घेत एवढे नमूद केले की, अधिकाची गरज नाही. सत्यशोधक समाजाचे कार्य केवळ संस्थानातच नव्हे, तर खानापूरपासून हुबळी कोल्हापूरपर्यंत पसरविण्याचे काम पार पाडता पाडता राजर्षींनी कोल्हापूर शैक्षणिक केंद्र बनवून सोडले, कोल्हापूरला एक ' लिटल ऑक्सफोर्ड ' निर्माण करण्याची तळमळ बाळगली.

॥ ५ ॥

मनात विलक्षण ईर्षा बाळगून प्रखर विरोधाशी दोन हात करणाऱ्या शाहू महाराजांच्या चरणी बसून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सामाजिक सुधारणेचे धडे घेतले. म. जोतिराव फुल्यांच्या पासून चालत आलेली 'उत्तिष्ठत जाग्रत'ची कडोविकडीची कार्यशीलता, महर्षी शिंद्यांच्यापासून समाजातील खालच्या थरापर्यंत पोचण्याची किमया, सयाजीराव महाराजांच्यापासून पुरोगामी प्रवृत्तींचा पुरस्कार आणि राजर्षी शाहू महाराजांच्यापासून वसतिगृहांचे माहात्म्य घेऊन स्वतःचे 'भाऊरावीय शिक्षणशास्त्र' बनवून कर्मवीरांनी समाजातील सर्वसाधारण माणसाच्या जीवनातील मरगळ दूर केली.

कर्मवीर भाऊराव पाटील महाराष्ट्रातील अव्वल दर्जाचे 'शिक्षणतज्ज्ञ' होत. कर्मवीरांनी महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांतून, शेता-रानांतून आणि दऱ्याखोऱ्यांतून ज्ञानगंगेचे असंख्य प्रवाह खेळविताना अप्रत्यक्ष रीत्या महाराष्ट्राच्या बुद्धिवादाचे—बुद्धिवंताचे वाभाडे काढले. अखंड चाललेल्या ज्ञानयज्ञात स्वतःच्या जीवन-ज्योतीची आहुती टाकणारे कर्मवीर रूढ अर्थाने 'विद्वान' नव्हते, पढिक पंडित नव्हते. जन्माने मोठेपण प्राप्त होणाऱ्या समाजात जन्मले नव्हते. विद्यार्थि-दशेतच हूड होते असे नव्हे तर आजन्म हूड होते, बंडखोर होते; पण या बंडखोरपणामागे समाजासाठी व्रतस्थ राहून, विधायक कार्य हाती घेऊन ते तडीला पोचविण्याची अपूर्व निष्ठा होती. अन्याय करणारी शक्ती मग ती स्वकीय असो वा परकीय असो, तिच्यामागे धार्मिक-सामाजिक परंपरेचा वा राजकीय सत्तादी पाशवी शक्तींचा तुफान पाठिंबा असो, तिच्याशी दोन हात करून स्वतःची अस्मिता टिकविणे हा कर्मवीरांचा विशेष होता. कौटुंबिक आणि सामाजिक दोन्ही आघाड्यांवर जागृतीचा लढा लढविताना कर्मवीरांनी ह्या विशेषाचा प्रत्यय आणून दिला आहे.

कर्मवीरांना शिक्षण घेणे जमले नाही. सदा 'वर घातला' हा शेरा राहिला, पास म्हणून कधी झाले नाहीत. पण स्वतःला जमले नाही ते आपल्याला करायला नि ज्यांच्यासाठी करू त्यांना ते घ्यायला जमणार नाही असे त्यांनी मानले नाही. आपल्याला वाकले नाही ते इतरांच्यासाठी वाकवायचे अशा आत्मविश्वासाने चंग बांधून 'जीवन ही शाळा, अनुभव हा गुरू' करून

बहुजनसमाजाला ज्ञानाची संजीवनी देण्याचे कार्य कर्मवीरांनी अंगीकारले. ते अंगीकारण्यापूर्वी सत्यशोधकाची ढोलकी घेऊन महाराष्ट्रभर घुमले होते. सामान्य जनतेचे अज्ञान, दैन्य आणि दारिद्र्य पाहिले होते. कारखान्यातून नोकर झाले होते. कारखानदारीतून होणारा फायदा नोकरांच्या मुलांच्या शिक्षणासाठी खर्च व्हावा असे बोलले होते, बिनसले होते, हे सारे होत असतानाच समाजाच्या अवनतीच्या कारणाचा शोध सुरू होता. अंतर्मुख होऊन स्वतःचे दोष समजावून घेण्याची सिद्धता चालू होती. समाजसुधारणेच्या दृष्टीने सत्यान्वेषण केले होते, सुरू होते. या सगळ्या धगीतून बाहेर पडता पडता शालिवाहनाच्या शक्तीने कर्मवीरांनी एक प्रतिज्ञा केली होती : "दाढीत जितके केस नाहीत तितकी पोरं शिकवीन." भाऊरावांचे सारे शैक्षणिक तत्त्वज्ञान यातून फुटून आले.

अन्याय मग तो कोणत्याही स्वरूपाचा असो, त्याची चीड आणि त्याविरुद्ध बंड करण्यासाठी जीवनाच्या आक्रांताने दंड थोपटून उभे राहण्याचे विलक्षण धैर्य कर्मवीरांच्या हाडीमांसी खिळलेले होते. आपले लोक अडाणी आहेत. मानसिक गुलाम आहेत. ही गुलामगिरी टिकविण्यासाठी मूठभर हितसंबंधी कंबर कसून सज्ज आहेत, ज्ञानाची नाकेबंदी करून बहुजनसमाजाची कोंडी करताहेत, हे पाहिल्यानंतर कर्मवीर उसळून उठले, बंडखोर जागा झाला. सभोवार पाहिले. 'त्यांच्या'साठी काही करण्याची मूठभरांची इच्छा नाही नि 'त्यांच्या'तील कोणी उठून काही करील तर तसे काही दिग्दर्शन नाही, हे पाहिले. मग कर्मवीरच उभे राहिले, भाऊराव कर्मवीर होते. बोलणे फोल झाले, डोलणे वाया गेले, असे त्यांच्या बाबतीत कधी घडले नाही. सत्यशोधक चळवळीच्या निमित्ताने केलेल्या भ्रमंतीतून शिक्षणाच्या प्रसाराविना समाजातील अनिष्ट रूढी, अज्ञान व विषमता नष्ट होणार नाही, नवसमाज निर्माण करता येणार नाही अशी कर्मवीरांची खात्री झाली होती.

या दृष्टीने कर्मवीरांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान साकार होत गेले. त्यातून काही गोष्टी हाती लागतात. किंबहुना या घटकातूनच क्रमाक्रमाने कर्मवीरांचे तत्त्वज्ञान आकार धरीत गेले असे दिसते. प्रस्तुत घटकांची उतरंड अशी मांडता येईल :

१. अनासक्ती व्यक्त करणाऱ्या बहुजनसमाजात तीव्र ज्ञानलालसेची आवड निर्माण करणे.

२. शिक्षणाविना लोळ्यागोळ्याच्या अवस्थेत खितपणाऱ्या बहुजनसमाजाला

शिक्षित करून आत्मप्रत्ययशील बनविणे.

३. पैशाविना अडत असेल तर लाचारी न पत्करता, कुणाचे मिंधेपण न स्वीकारता, मनगटाच्या जोरावर काम करून स्वावलंबनातून स्वतःच्या कष्टातून शिक्षण घेणे.

४. तसे ते देताना–घेताना भ्रातृभाव वाढविणाऱ्या, स्नेह वृद्धिंगत करणाऱ्या, जातिभेदाच्या भावनेला मूठमाती देणाऱ्या जातिभेदातीत एकत्रित वसतिगृहाच्या माध्यमातून देणे.

५. त्यात जातपातगोतधर्म आणि पंथ याबाबत कोणताही भेदभाव न पाळता सर्व समाजघटकांकडे समतेच्या आणि ममतेच्या दृष्टीने पाहून आपल्या कार्याचे स्वरूप सर्वसमावेशक ( कॉस्मॉपॉलिटन ) ठेवणे.

याखेरीज कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्याचे आणखी चार विशेष दिसतात.

६. कर्मवीरांच्या, स्वयंसिद्ध प्रेरणा व प्रज्ञा यांनी परम कारुणिक बनलेल्या त्यागी तपःपूत जीवनाने सरकारी मदतीची मुळीच अपेक्षा न करता महान शैक्षणिक प्रयोग सुरू केला आणि अखेरपर्यंत चालू ठेवला.

७. शैक्षणिक कार्याला वाहून घेतल्यानंतर राजकारणात भाग घेण्याची ऊर्मी कर्मवीरांना वेळोवेळी आली असली किंवा फुगून जाण्याइतपत लोकप्रियता त्यांना राजकारणात मिळाली असली तरी ऊठ–सूट भपकेबाज राजकारणाच्या भ्रामक मृगजळापाठीमागे न धावता आर्थिक क्रांतीच्या यात्रेमध्ये सहयात्रिक होऊन देशाचा अभ्युदय साधण्यासंबंधीचा त्यांचा ध्यास.

८. सर्वांसाठी 'मी' या तत्त्वाचा अंगीकार करून 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' समान निष्काम सेवेतच देशाच्या प्रगतीची भव्य स्वप्ने पाहणारा कृतिशील सेवकवर्ग असावा, ही कर्मवीरांची धारणा.

९. जातिपातीच्या घाणीत लडबडून शिळेवर नसती माथेफोड करून घेणाऱ्या समाजातील 'आजकालच्या तरुणा'ला कर्मवीरांनी जात विसरायला लावून त्याहून जगात अनेक मोलाच्या गोष्टी आहेत, त्यांच्या अभ्यास–मनन–चिंतनातच जीवनाचा आब नि उद्धार आहे हे पटवून दिले.

कर्मवीरांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानातील अनेकविध विशेषांची चर्चा या ना त्या स्वरूपात आतापावेतो येऊन गेली, त्यांच्या शिक्षणयोजनेतील 'आत्मा' स्वावलंबी शिक्षणयोजना–हिची थोडी विस्तृत माहिती घेणे उचित होईल.

विविध नात्यांनीं समाजाकडे पाहताना, फिरताना, वावरताना शिक्षणाविना बहुजनसमाज खचलेला आहे आणि दारिद्र्याने पिचलेला आहे, असे कर्मवीरांना आढळून आले. त्यातून त्या समाजाच्या उन्नतीसाठी अपार ज्ञानलालसेच्या प्रयोगाने कर्मवीर झपाटले गेले. आपला समाज डोळे असून अंधळा, कान असून बहिरा व तोंड असून मुका राहता कामा नये असे त्यांच्या मनाने घेतले. ब्राह्मणाने वेदाध्ययन, क्षत्रियाने शस्त्राध्ययन, वैश्याने वाणिज्याध्ययन आणि शूद्राने सेवाध्ययन केले म्हणजे राष्ट्राची उन्नती होते हा विचार बाजूला सारला. ‘ शेती हा या देशाचा मुख्य व्यवसाय आहे ’, हे लक्ष्य कधीही नजरेआड होऊ दिले नाही. आपल्या देशाची शेतीप्रधान स्थिती ही स्वावलंबी योजनेतील महत्त्वाची मेख होय.

आपल्या देशातील कित्येक कोटी लोकांचा उदरनिर्वाह शेतीवर चालतो. तीही लहरी पावसावर अवलंबून असणारी, पुरेसे धान्य न देणारी, नेहमी चिंतेत ठेवणारी. अशा शेतकऱ्यांच्या—सर्वसाधारण माणसांच्या पाल्यांचे शिक्षण होत नसे, आवड नाही; शिक्षणाचे महत्त्व कळत नव्हते, नाही, म्हणून हे धडे; त्यातूनही अर्धेकच्चे होणारे प्राथमिक शिक्षण होऊन न झाल्यासारखेच असे. ( केव्हा केव्हा तेही होत नसे ) प्राय: इथेच शिक्षणाला परममोक्ष लाभे. त्यातूनही पुढे सरकायचे मनात आणले तर शेतीत निघणारे उत्पन्न हे शेतकऱ्यास प्राय: त्या वर्षापुरतेच निघत असल्याने उच्च शिक्षणाची कवाडे आपोआपच बंद होत. ( तशी इच्छा कमीच पण ) असूनही उच्च शिक्षणास लागणारा पैसा नाही, अंग मोडून कष्ट करावेत नि शिक्षण घ्यावे म्हटले तर तशी कुठे सोय नाही. अगोदरच शिक्षणाची दृष्टी कमी, त्यामुळे नव्या जीवनाची जाणीव अपुरी, त्यातच आर्थिक दुरवस्थेचे हे तिरपगडे; शिक्षणाला खीळ हा त्याचा अपरिहार्य परिणाम होता.

कर्मवीरांना हा परिणाम नष्ट करायचा होता. कुठल्याही गोष्टीसाठी अडून बसता नये, हातपाय गाळून रडता नये, मर्दासारखे उठले पाहिजे आणि पोलादाची कांब वाकवावी तसे परिस्थितीला वाकवून तिच्यावर स्वार झाले पाहिजे हा तर कर्मवीरांचा जीवनधर्म होता. यातूनच त्यांनी मार्ग शोधला.

कर्मवीरप्रणीत रयत-स्वावलंबी-योजनेचा प्रयोग स्वकष्टाने मिळविलेल्या खऱ्या पैशाचा लाभ कसा घ्यायचा, स्वकष्टार्जित पैशातून शिक्षण कसे मिळवायचे, तोंडपाटीलकी करण्याची जडू पाहात असलेली संवय नष्ट कशी करायची किंवा

श्रमजीवी लोकांना श्रम करीत बुद्धीचाही विकास कसा साधायचा इत्यादी बाबींपुरताच मर्यादित नव्हता, नाही, त्यामागे दीर्घ सूत्र उभे होते, आहे.

गेल्या काही काळापासून आपल्या देशात मानवी श्रमशक्तीला फारसा वाव आणि महत्त्व दिसत नाही. स्वतः कष्ट करण्याची लोकांची भावना मरगळली आहे. (म्हणूनच श्रमदानाच्या मोहिमा काढाव्या लागल्या आहेत.) कमी प्रतीचे–श्रमशक्तीचे काम करणारा खालच्या प्रतीचा मानला जाऊ लागला आहे. हाताने काम करतो तो कमी प्रतीचा, डोक्याने काम करतो तो त्याहून उच्च प्रतीचा आणि जो काहीच काम करीत नाही (पण ज्याला कधी काही कमी पडत नाही.) त्याचा दर्जा या सर्वांहून उच्च अशी समाजाने प्रतवारीच लावून टाकली आहे. श्रमिकांच्या घामातून विश्व उभे राहिले आहे, (उद्याचा समाजवादही या श्रमिकांचा घाम आणि रक्त यातूनच यायचा आहे) त्याचा क्रम पहिला हवा. पण घडले आहे उलटे, घडते आहे उलटे; देशाची प्रगती आणि विकास साधायचा तर अशिक्षित काय किंवा सुशिक्षित काय दोघांनीही हाताचा उपयोग केला पाहिजे. पण पांढरपेशावर्ग देशाच्या विकासापेक्षा स्वतःच्या पँटची 'स्क्रिझ्' मोडू नये म्हणूनच अधिक जपतो. कमी प्रतीच्या कामाचे मोल त्याला वाटत नाही. कमीत कमी श्रम करणारा माणूस जसा उच्च दर्जाचा मानला जातो तसाच तो अधिक बुद्धिमानही मानला जातो. माती पुण्यगंधा आहे. 'पुण्यो गंधः पृथिव्यां च' असे गीतेत म्हटले आहे. पण माती आपल्या अंगाला लागणे म्हणजे आम्ही काहीतरी अपवित्र गोष्ट समजतो. कमीत कमी परिश्रम करून उरलेल्या वेळात जास्तीत जास्त बेगडी मौज करण्यात जीवनाची इतिकर्तव्यता मानतो. शिक्षणाने होणाऱ्या मनोवृद्धीचा आणि परिश्रमाने होणाऱ्या शरीरवृद्धीचा निकटचा संबंध आहे हे आम्ही पार विसरून गेलो आहोत.

रयत-स्वावलंबी योजनेमागे ग्रामीण भागातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांची सोय करावी किंवा महाविद्यालयीन शिक्षण मोफत द्यावे एवढाच उद्देश नाही, नव्हता. भारतीय जीवनात शारीरिक श्रमाच्या बाबतीत चालत आलेल्या दोषांचा निरास करून जुनी श्रमनिष्ठ परंपरा जागविण्याचा आणि देशकालपरिस्थितीनुसार नवी परंपरा रुजविण्याचा स्पष्ट प्रयास होता, आहे. शरीरकष्ट उपसल्यामुळे घामाने डबडबलेले शरीर हीच खरी देवपूजा आहे. देव वाटेल त्याला पावत नाही, वाटेल त्याच्याशी सख्य जोडीत नाही. तसे भासविणारे एक लबाड तरी

असतात किंवा ढोंगी तरी असतात. परमेश्वराला ते बुवा बनवितात नि लोकांना 'मेंढरे' करतात : त्यांच्या ते पथ्यावर पडणारे असते. पण प्राचीन ऋषींनी व दार्शनिकांनी ऋग्वेदात सांगून ठेवले आहे : 'न ऋते श्रान्तस्य सख्याय देवाः ।' "Give us waste-land and we will turn it into the best land" या कर्मवीरांच्या ध्यासामागे घाम गाळल्याखेरीज आणि त्या घामात आपल्या रक्ताचे बिंदू एकवटल्याखेरीज शिक्षणाची ज्वलंत साधना होत नाही, शिक्षणाचे संस्कार दृढ बनत नाहीत, शिक्षण पचत नाही नि संस्कृती रुजत नाही ही गाढ श्रद्धा होती.

गरीब, होतकरू व कष्टाळू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सर्व सोयी उपलब्ध करून देणे, त्यांच्या शिक्षणाच्या आड गरिबी येणार नाही हे पाहणे, विद्यार्थ्यांमध्ये श्रमाची प्रतिष्ठा दृढमूल करणे, शिक्षण घेताना श्रमाबद्दल आदर निर्माण झाल्यामुळे समाजास भारभूत होणार नाहीत; परंतु सामाजिक कार्य आपुलकीने आणि निष्ठेने करतील असे नागरिक समाजामध्ये निर्माण करणे, श्रमाच्या प्रतिष्ठेबरोबरच जीवन, श्रम आणि शिक्षण यांच्या अन्योन्य संबंधाने समानता प्रस्थापित करणे या ध्येयदृष्टीने १९४९ ते १९५२ अखेर ( रयत शिक्षण संस्थेत आजही तो चालू आहे. ) कर्मवीरांनी हा प्रयोग साताऱ्यात केला. साताऱ्याने पाहिला. करणाऱ्यांनी कौतुक केले, देणाऱ्यांनी पाठिंबा दिला. ज्यांना काहीच शक्य नव्हते त्यांनी निंदा केली, उपहास केला, परिहास मांडला. कर्मवीरांनी काम टाकले नाही. काळा फत्तर फोडला, मुरमाड भाग उसकटून फेकला, नारळी व केळींचा फुलबाग फुलविला, शिक्षणाने सगळा समाज व्यापून टाकायचा या जिद्दीने पेटलेले कर्मवीर, अपूर्व आत्मविश्वास आणि भविष्यावरची जबरदस्त पकड घेऊन, उन्हाच्या तीव्र झळीतून आपला एकाकी नांगर चालवीत राहिले. मोठे काम केले. ते करताना द्वेष पसरविला नाही, रुजू दिला नाही. श्रम आणि ज्ञान यांनी युक्त असा विज्ञाननिष्ठ माणूस बनविण्याचा प्रयत्न केला. सहजीवन, सहभोजन आणि सहशिक्षण यांचा एक अपूर्व प्रयोग केला.

कर्मवीरांचा प्रयोगकाळ आज उरलेला नाही. सरड्याच्या रंगाप्रमाणे काळाने आपले रंग पालटले आहेत, पालटतो आहे. नवा काळ, नवी परिस्थिती, नव्या दिशा, नव्या समस्या आज उपस्थित झाल्या आहेत. महाराष्ट्र सरकारच्या १२०० रु. उत्पन्नाच्या योजनेमुळे समाजाच्या विविध थरांतील अनेक गरीब-

गुरीब विद्यार्थ्यांचा ' फायदा ' झाला आहे. पण या योजनेत सामावू न शकणारा असा मोठा समाज अद्यापही समाजजीवनात आहे. महाराष्ट्र सरकारच्या योजनेची व्याप्ती रुंदावेल तेव्हा या वर्गातील विद्यार्थ्यांची व्यवस्था होईलच (पण व्याप्ती रुंदावूनही काही भाग योजनेबाहेर राहीलच) पण तोपर्यंत उठून उभे राहण्यासाठी या स्वावलंबी योजना एक आधार होऊ शकेल. आपल्यापुढे आव्हानात्मक पवित्र्यात उभ्या ठाकलेल्या नव्या संकटाच्या संदर्भात पुस्तकी शिक्षणाच्या जोडीला यासम एखाद्या योजनेचा अभ्यासक्रमातच अंतर्भाव झाला तर विद्यार्थिजीवनातून एक नवा नाद निघू शकेल. त्या दृष्टीने, ज्यांना खडतर परिस्थितीने शिक्षण घेता येत नाही त्यांनीच फक्त स्वावलंबी तत्त्वाधारे शिक्षणाची लालसा पुरी करावी काय, हा प्रश्नही अप्रस्तुत ठरणारा आहे, किंबहुना सर्व काळच तो अप्रस्तुत आहे.

भाऊराव पाटील यांना जनतेने ' कर्मवीर ' पदवी दिली. भारत सरकारने ' पद्मभूषण ' किताब बहाल केला. पुणे विद्यापीठासारख्या मान्यवर विश्वविद्यालयाने ' डी. लिट् ' विरुद अत्यंत आदराच्या भावनेने समर्पित केले. जनता, सरकार आणि थोर विद्वज्जन यांना कर्मवीर मान्य झाले. कर्मवीरांच्या कार्याचा याहून उचित गौरव तो कोणता, असा प्रश्न उपस्थित होईल. खरे आहे. यासारखा उचित गौरव नाही हे खरेच आहे; पण त्याहून आणखी एक गोष्ट खरी आहे. उचित गौरवाच्या गदारोळात नेमक्या त्याच गोष्टीकडे काणाडोळा होतो ही त्यातील वाईट गोष्ट आहे. एखादे कार्य—मग ते कोणतेही असो, ही जीवननिष्ठा मानून त्यासाठी साऱ्या सुखाचा रोष पत्करून, नव्या काळाच्या अनुषंगाने समाजासाठी उभे जीवन वेचण्याचा कर्मवीरांचा सेवायोग कोण नि कसा चालविणार ? कर्मवीरांनी बहुजनसमाजात ज्ञानाचा दीप पेटवला, त्यांच्या ऋणात्मक सेवेचा दीप आपण तेजाळत ठेवणार आहोत ? माझ्या दृष्टीने हाच प्रश्न चिंतेचा आहे, चर्चेचा आहे.

॥ ६ ॥

त्या दृष्टीने, म. फुले ते कर्मवीर भाऊराव पाटील या दीर्घ कालखंडाच्या संदर्भात काही धावती निरीक्षणे समोर ठेवीत आहे; त्यांचे स्वरूप त्रुटित असले तरी चिकित्सक अभ्यासूंना ते पुरेसे होईल असे वाटते; बहुजनसमाजही या

चर्चेच्या टप्प्यात प्रवेश करण्याच्या मनोभूमिकेत आहे अशी धारणा बजावते.

फुल्यांच्यापासून कर्मवीर भाऊराव पाटलांच्यापर्यंत बहुजननेत्यांनी, बहुजनांच्या उद्धारार्थ काही चळवळी केल्या : बहुजनोद्धार, अस्पृश्योद्धार, स्त्रियोद्धार, शेतकरी –कामकरी सुधारणा, सत्यशोधक या आणि अशा या चळवळी होत्या. केवळ नावावरून स्वत:चे व्यापकत्व स्पष्ट करणाऱ्या या चळवळींमागे मानव्यावरील अपार निष्ठा आणि शिक्षणासंबंधीची तीव्र आसक्ती ही दोन ' व्रते ' प्रमुख होती. समता, स्वातंत्र्य आणि श्रमिकांचे राज्य ही त्यातील अंतिम सूत्रे होती. बहुजन म्हणजे ब्राह्मणेतर नव्हे, तर महाराष्ट्रातील बहुसंख्य, असा या चळवळीचा गाभा होता. केवळ ब्राह्मणेतरांचे हित असे नसून ' बहुजनबहुहितवाद ' हा त्याचा अर्थ होता. महाराष्ट्रात बहुजनसमाज आधिक्याने होता, आहे. त्या दृष्टीने या चळवळीची दृष्टी खूपच व्यापक होती. व्यापक असणे साहजिक होते, तिथे संकुचित वृत्तीला थारा नव्हता. जातीविषयीच्या भागाला वाव नव्हता, पण चळवळीच्या गदारोळात, थोडेफार नेहमी घडते तसे उलट घडले नि ब्राह्मणेतर चळवळीला उलटीसुलटी अग्राह्य विरुदे जोडण्यात आली. तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भाने हे घडले तरी पांढरपेशावर्ग आपल्या मनातून त्यासंबंधीचा चिखल आजही काढून टाकू शकत नाही हे इष्ट नाही.

ब्राह्मणेतर चळवळीमागे देशाचे पारतंत्र्य घालवून देण्याच्या दृष्टीने एक दीर्घसूत्री राजकारण होते असे मला वाटते. किंबहुना या चळवळीच्या बुरख्याखाली तेच साधावयाचे होते असे दिसते. फुल्यांच्यापासून भाऊराव पाटलांपर्यंतचा–प्रत्यक्ष कार्याचा–काळ पारतंत्र्याचा आहे. हे पारतंत्र्य बहुजन-नेत्यांना निखालसपणे नावडणारे होते. बहुजनसमाजाची, मानसिक गुलामगिरी-तून मुक्तता करू पाहणारे, म्हणजेच त्यांना स्वातंत्र्य देऊ इच्छिणारे बहुजननेते ब्रिटिश पारतंत्र्य स्वीकार्य मानीत होते असे मानणे किंवा भासविणे हे त्यांच्या भूमिकेचा समग्र अभ्यास न केल्याचे द्योतक ठरेल, अज्ञानाचे होईल.

ब्रिटिशांनी राजकीय, आर्थिक आणि औद्योगिक सर्वच दृष्टींनी हिंदुस्थान जखडून टाकला होता. जागृतीच्या दृष्टीने वातावरण शून्यवत् होते. सुशिक्षित ब्राह्मणवर्ग सोडला तर स्वातंत्र्य–पारतंत्र्य याबाबतच्या पूर्ण कल्पनांचे आकलन होऊ शकेल असा ' जागा ' समाज नव्हता. ब्राह्मणवर्गाखेरीज अन्य वर्ग जवळ जवळ मृतवत् होते. शिक्षणच नसल्याने त्याने जीवनाला चढणाऱ्या तेजाची

जाणीव त्यांना नव्हती. आत्मप्रतीतिशून्य माणसांची ही स्थिती पुरोहितवर्गाच्या पुंडाव्याने आणि ब्रिटिश सरकारच्या त्याबाबतच्या अनास्थेमुळे तशीच टिकून होती म्हणजे ब्रिटिशांची राजकीय आणि पुरोहितवर्गाची मानसिक अशा दोन गुलामगिऱ्या बहुजनांच्या माथ्यावर होत्या. या गुलामगिरीतून मुक्त झाल्याखेरीज श्रमिकांच्या राज्याची कल्पना केवळ मृतवत् ही खूणगाठ होती. ब्रिटिशप्रणीत पारतंत्र्य सहजासहजी हटणारे नव्हते, त्याला काही वर्षांचा कालावधी हवा होता; त्यासाठी प्रचंड जागृती आणि अमूप उत्साह यांची गरज होती. बहुसंख्य समाज या दृष्टीने अंधारात होता, त्या दृष्टीने ब्रिटिश पारतंत्र्य फेकून देणाऱ्या दृष्टीने उताविळीने फत्तरावर निष्कारण माथेफोड करून घेण्यात अर्थ नव्हता. त्यामुळे त्यांच्या सान्निध्याचा लाभ उठवून तोपावेतो भक्कम प्रारंभिक बैठक तयार करणे हा हेतू राहिला. हे सर्व न जाणण्याइतके—समजण्याइतके बहुजननेते दुधखुळे होते असे मानण्याचे कारण नाही.

या अनुषंगाने नांगरनेत्यांनी मग काही पायऱ्या ठरविल्या. बहुजनांची मानसिक गुलामगिरी नष्ट करणे नि त्यातून झालेल्या जागृतीचा पारतंत्र्य हटविण्याच्या अंतिम साध्याच्या दृष्टीने उपयोग करून घेणे. त्यासाठी ' शिक्षण ' देऊन सर्वांना शहाणे करण्याचा मार्ग चोखाळण्याचा प्रयत्न करण्यात आला. इतर अनेक ' व्यापांत ' मश्गूल असलेला पुरोहितवर्ग त्या दृष्टीने झोपीच गेला होता. प्रचंड अज्ञांना पाठीशी घेऊन बलाढ्य ब्रिटिश सत्तेशी झुंजणे म्हणजे पतंगाप्रमाणे स्वतःचा स्वाहाकार करून घेण्यासारखे होते. हा मार्ग इष्ट नव्हता. त्यामुळे शिक्षणाच्या द्वारा स्वकीयांच्या गुलामगिरीतून मुक्त होता होता परकीयांच्या गुलामगिरीचे थडगे खणायचा असा हा निश्चय होता. स्वदेशी वसाहतवादाच्या उच्चाटनाकडून परदेशी वसाहतवादाच्या उच्चाटनाकडे जाणारा हा मार्ग होता. या मार्गावरील चळवळीत पुरोहितवर्ग आला तो एक घटक म्हणून ! तत्कालीन महाराष्ट्राची समाजरचनाही या वर्गाचे महत्त्व राखणारी होती. त्या दृष्टीने तत्कालीन कुलकर्णी, तलाठी किंवा ब्राह्मण अधिकारी असावेत हा एक प्रकारे समाज-रचनापद्धतीतील ' योगायोग 'च होता. परंतु प्रमुख लक्ष्य ते नव्हते. चळवळीच्या विविधरंगी भानगडीत या ' लक्ष्यावर ' जोर दिला गेला असला तरी प्रासंगिक लक्ष्याखेरीज त्यास अधिक मूल्य नव्हते, टिकाऊ लक्ष्य होते ते देशाचे स्वातंत्र्य ! कदाचित् पुरोहितवर्गाने अधिक लवकर समंजसपणा स्वीकारला

असता किंवा त्या दृष्टीने स्वतःच पावले टाकायला सुरुवात केली असती तर हे अंतिम लक्ष्य अधिक लवकरही पदरात पडले असते !

या देशात–विशेषतः महाराष्ट्रात–स्वातंत्र्यासाठी झालेल्या विविध चळवळींना समाजाच्या अगदी खालच्या तळामुळापासून मिळत गेलेला अपूर्व पाठिंबा हा आकाशातून पडलेला नव्हता. त्यामागे ब्राह्मणेतर चळवळींच्या संदर्भाने निश्चित अन्वय-अर्थाचे संसूचन आहे.

बहुजनांच्या चळवळीमागे बहुजनसमाजाच्या उद्धाराच्या तळमळीबरोबर स्वातंत्र्याच्या प्राप्तीची भावना होती हे खरे पण तेवढे झाले की संपले, अशी आत्मसंतुष्टतेची भावना नव्हती. खासकरून बहुजनसमाजाच्या दृष्टीने, त्यापलीकडे जाऊन उभी राहणारी एक उत्कटभावना होती. बहुजनसमाजाला शिक्षण मिळाले, तो वर्ग शहाणा झाला, पांढरपेशासारख्या त्याला चार चांगल्या नोकऱ्या मिळाल्या, त्याला फर्डे लिहिता नि बोलता येऊ लागले, किंवा पांढर-पेशांना शक्य त्या सर्व गोष्टी त्याला करता येऊ लागल्या की संपले, गंगेत घोडे न्हाले; अशा अतीव समाधानात राहणारा कुठलाच बहुजननेता नव्हता. ब्रिटिश या देशातून गेल्यानंतर यावयाचे राज्य, महाराष्ट्रात ब्राह्मणेतर बहुसंख्य असल्याने त्यांचेच असेल ? तेच मंत्री नि तेच राज्यकर्ते असतील हे ओळखण्याची कुवत बहुजननेत्यांत निश्चित होती. न्यूटनने गुरुत्वाकर्षणाचा शोध लावला तसा त्यात शोध लावण्याचे काही कारण नाही. किंबहुना बहुजननेत्यांचा त्यासाठीच अट्टाहास होता. शेतकऱ्याचा पोर मंत्री व्हावा हे गांधींचे फक्त स्वप्न होते, बहुजननेत्यांचा त्यासाठी प्रयत्न होता.

या प्रयत्नाला फळे आली आहेत. पण त्यापलीकडच्या मनीषा अद्याप धूसरच आहेत. महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासाने केलेल्या नोंदी तपासल्या की, समस्त भारताचे डोळे स्तिमित करून सोडील असा तेजस्वी पुढारी बहुजनसमाज निर्माण करू शकला नाही, हे ठळकपणे ध्यानी येते. लो. टिळक, डॉ. आंबेड-कर, महात्मा गांधी ही किंवा अशी नावे उच्चारली की ( ती सर्वांची नि सर्व देशाची माणसे असली तरी ) काही विशिष्ट घटक डोळ्यांसमोर येतात. त्या विशिष्ट घटकांचे ही माणसे ठसठशीतपणे प्रतिनिधित्व करतात नि त्या घटकाची शान एकदम उंचावून सोडतात, असा नेता बहुजनसमाजाजवळ नाही.

म. फुल्यांपासून कर्मवीर भाऊराव पाटलांपर्यंत खचलेल्या आणि पिचलेल्या

समाजाचे अनेक नेते त्यागमय जीवनाच्या आदर्शात उभे आहेत. या थोर ऋत्विजांमध्ये भारताचे डोळे दिपविण्याचे सामर्थ्य होते पण खडतर प्रतिकूल गोष्टींचा लवाजमा पाठीशी घेऊन परिस्थितीच्या प्रवाहाविरुद्ध हयातभर पोहत राहणे भाग पडल्यामुळे त्यांच्या नेतृत्वाच्या विशालपणाला आपोआपच मर्यादा पडल्या. त्यामुळे कर्तृत्व थोरावले, विचार जोरावले पण नेतृत्वाचे व्यापकपण स्थिरावले. ' रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग ' अशा अनिवार जिद्दीने अहोरात्र लढा मांडून राहिलेल्या या थोरांच्या प्रयत्नातून नोकदार प्रतिभेची आणि धारधार कर्तृत्वाची, मोडेन पण वाकणार नाही—पिंजेन पण पळणार नाही, या कडक जिद्दीची विज्ञाननिष्ठ डोळे दिपवणारी माणसे होण्याची आस स्पष्टपणे प्रगट होते.

या दृष्टीने अवतीभोवती नजर टाकली तर बव्हंशी निराशाच पदरी पडण्याजोगी आहे : फुल्यांच्यापासून कर्मवीर पाटलांच्यापर्यंत अनेक ब्राह्मणेतर तरुण शिकून तयार झाले; मोठमोठ्या पदव्या घेते झाले. पण पदव्या घेताच पोटापाठीमागे लागले, आपापल्या व्यापात दंगून गेले. पाश्चात्त्य स्त्री भारतात येऊन सत्यशोधक चळवळीवर प्रबंध तयार करून राहिली. आमचे डोके हालले नाही. फुले, अण्णासाहेब शिंदे, शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांची आपण नुसती नावे घेतो. अधूनमधून जयंत्यामयंत्या साजऱ्या करतो, तेच ते पुनः घोकत राहतो. लेखनबद्ध काही करीत नाही, करण्याची गरज वाटत नाही. नक्राश्रू मात्र उगीच ढाळीत बसतो; अलीकडे तेही आपण महाग करून ठेवले आहेत. त्यांचा अभ्यास करण्याची प्रवृत्तीच कमी झाल्यामुळे हे घडल्यास नवल नाही हे उघड आहे. आपली प्रतीतिशीलता आणि प्रबोधनाची शक्तीच आपण हरवून बसत आहोत. फुले-शिंदे-भाऊराव यांच्या अभ्यासाला आपण महाग मग टिळक-आगरकर-कर्वे-रानडे यांच्याबाबतची वास्तपुस्त कसली करावी? त्यांच्याबद्दल अधूनमधून इकडेतिकडे काहीतरी ऐकू येते, कानावर पडते म्हणूनच आम्हाला ते माहीत. राष्ट्रे कच्च्या पायावर उभी राहात नाहीत. वैचारिकतेचा आत्माच आम्ही गमावून उभे राहू पाहात आहोत.

' गत ' ब्राह्मणेतर चळवळींच्या दृष्टीने विचार करता, बहुजनसमाजाचे आज नेतृत्व आहे. ब्राह्मणी धर्माचे आणि ब्राह्मण समाजाचे नेतृत्व बहुजनसमाजावर नाही. राजकारण, शिक्षण आणि समाजकारण इत्यादी क्षेत्रांमधून तो ' निवृत्त ' होत असून नव्या परिस्थितीशी ब्राह्मण समाज झपाट्याने जुळवून घेत आहे.

अभ्यासू वृत्ती, निश्चित ध्येयदृष्टी, मनात काही असले तरी न बोलता कार्य साधून घेण्याची प्रवृत्ती इत्यादी अनेकविध गुणांनी आर्थिक क्रांतीच्या आणि उद्योगीकरणाच्या यात्रेत तो सहभागी होत आहे. नव्या काळाची पावले ओळखून नवी स्थाने पकडून ठेवीत आहे. आमच्यातल्या बहुसंख्य वर्गाचे याकडे दुर्लक्ष आहे. मंत्रिमंडळातील आपल्या मंत्र्यांच्या संख्येवर आपण खूष आहोत. अनभ्यासी वृत्ती आणि मार्गदर्शनाचा अभाव इत्यादीमुळे भरघोस वाढून ठेवलेल्या पंचपक्वान्नापैकी नेमके कोणते उचलावे याचा ब्राह्मणेतर तरुणाला संभ्रम आहे. पदवीवर तो खूष आहे, मास्तरकीच्या ऑर्डरवर त्याची निहायत मर्जी आहे. महाविद्यालयात शिकणाऱ्या बहुजनविद्यार्थ्यांच्या बुद्धीची चाचणी, आवडी-निवडीची पाहणी आणि पुढील आयुष्याच्या कल्पनेची आखणी, परदेशी जाणाऱ्या, वरिष्ठ नोकऱ्यांत प्रवेश करणाऱ्या, उच्च पदव्यांची प्राप्ती करून घेणाऱ्या विद्यार्थ्यांची नुसती संख्या न्याहाळली तरी याची प्रचीती येते. बहुजन-समाजातील तरुण, पोशाखाने झाला असला तरी बुद्धीने आधुनिक काळाशी साजेसा तयार झालेला नाही. " कांऽही नाही बघा. मंत्री आमचे पण नेमणुका त्यांच्या " ( म्हणजे ब्राह्मणांच्या ) या त्याच्या उद्गारातील मेख इथे आहे. इंग्रजीने तर त्याची अगदीच ससेहोलपट केली आहे. ब्राह्मण तरुणांपेक्षा त्याची ही शोकान्तिका दारुण आहे. भवितव्याच्या आशंकेने घाबरून गेलेल्या या तरुणाला " आपण आपल्या जीवनाचे शिल्पकार असतो, " ह्या आत्मप्रत्ययाची खूपच गरज आहे.

एकेका क्षेत्रातून ब्राह्मण तरुण सावकाशीने बाहेर पडून पुढील पंचवीस-पन्नास वर्षांत महत्त्व प्राप्त होणाऱ्या आणि पुढे पन्नास पाऊणशे ( कदाचित् अधिक कालही ) टिकून राहणाऱ्या क्षेत्रात प्रवेश करीत असताना ब्राह्मणेतर तरुण राजकारणाकडे झपाट्याने ओढ घेत आहे; त्यातही मंत्री होणे एवढेच हेतुसाध्य आहे. मंत्री होण्याला आक्षेप नाही पण सगळेच मंत्री होऊ शकणार नाहीत. शेवटी आपल्या समाजाच्या उद्धाराच्या दृष्टीने कुणी काय व्हायचे ह्याबद्दल काही विवेक करणे जरूर आहे. त्या दृष्टीने सहकारी संस्थादी विविध संस्थांत राजकारण खेळणाऱ्यांनीही असा विवेक आचाराने दाखविणे जरुरीची बाब ठरते. सांप्रत त्या दृष्टीने भयावह परिस्थिती आहे. जुनी शिदोरी, तुटपुंजा अभ्यास, लटपटादी खटपटी इत्यादीमुळे महाराष्ट्राचे भवितव्य निराशाजनक बनू

नये अशी ब्राह्मणेतर चळवळीची हाक आहे. ब्राह्मणेतर चळवळींचा ' गती ' हा प्राण आहे, ' पुढे जाणे ' हा ध्यास आहे. थोड्या यशावर अवलंबून राहिल्याने थिटे बनून राहू, गतिशील समाज पुढे जाईल नि पुन: एकदा फुले–भाऊराव पाटलांची वाट पाहावी लागेल, असा तिचा इषारा आहे.

ब्राह्मणेतर चळवळीतील एक घटक ब्राह्मण समाज सध्या समाजसुधारणा किंवा धर्मसुधारणा या दृष्टीने आघाडीवर आहे; व्यवहारात पक्का मुरलेला हा वर्ग स्वत:ची फसवणूक तर होऊ देत नाहीच. खेरीज स्वत:च्या हितसंबंधावर जागरूक पहारा करतो. बहुजनसमाजावर अद्यापही देव, दैव आणि दैववाद यांचा विलक्षण पगडा आहे. " – शूद्र आणि अतिशूद्र यांमध्ये ब्राह्मणाचे नेतृत्व नसता पूर्वी-सारख्या रूढी आणि धर्मसमजुती चालू आहेत. ब्राह्मण जातीचे ब्राह्मण गेले व ब्राह्मणेतर जातीचे भट उत्पन्न झाले आहेत. भटांच्या पायाचे तीर्थ घेणे बंद झाले असेल, पण ब्राह्मण जातीच्या नसलेल्या इतर कोणातरी भटाच्या पायाचे तीर्थ शूद्र आणि अतिशूद्र यांना अजून लागते. ब्राह्मणधर्माविरुद्ध जे जे सांगितले ते ते ब्राह्मण जातीतून कमी होत असता शूद्र आणि अतिशूद्रात ते वाढतच आहे असे म्हणावयास हरकत नाही. ब्राह्मण सावकार गेला पण ब्राह्मणापेक्षाही दुष्ट वृत्तीचे दुसरे सावकार शूद्र आणि अतिशूद्रांतूनच पुढे आले आणि येत आहेत. ब्राह्मणांची सावकारी बरी पण शूद्रांची सावकारी पठाणापेक्षाही अधिक घातक असून ती खेडोपाडी सरसहा फाल्गुन नदीप्रमाणे वाहात आहे. ब्राह्मणवर्गाचे नेतृत्व गेले पण त्या जागी जे नेतृत्व आले त्या नेतृत्वाने शूद्र समाज दिवसेंदिवस भयचकित होत आहे. पंढरीच्या वारीपासून तो कोणत्याही देवदेवतेच्या जत्रेपर्यंत, खंडोबापासून म्हसोबाच्या पालख्या मिरवणुकीपर्यंत पाहा, ब्राह्मणवर्ग पूर्ण उदासीन असून शूद्र आणि अतिशूद्रांची मात्र गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे ! "[3] या उताऱ्यातील अधिकाऱ्यांचा ' तिरकस 'पणा सोडला तर गाभा स्वीकारणीय आहे. त्या दृष्टीने बहुजनसमाज अद्यापिही ' मागासलेला ' आहे. यात्राजत्रांच्या वेडापासून तो ग्रॅज्युएट नववधूला बाहेर जात असता घरात कोंडून, बाहेरून कडी लावून जाणाऱ्या डबल ग्रॅज्युएट पतीच्या अश्लाघ्य प्रयत्नापर्यंत, " साळत जाऊन काय पोट भरतंया. त्यापरिस खुरपं घेऊन जा शेतावर; तेवढाच एक रुपया रोजगार व्हईल. " म्हणून शिक्षणाला आडकाठी करणाऱ्या बापापासून तो डोईवरचा पदर थोडा घरंगळताच

" आम्ही काही कसविणीच्या अवलादीचं नव्हं " असा मुली सुनेला हितोपदेश पाजणाऱ्या वडिलधाऱ्या मंडळीपर्यंत, " येस–येस–सी झाली. बस्स झाली. पोटापुरतं झालं शिक्षाण " असे सांगणाऱ्या मंडळीपासून आपल्या ग्रॅज्युएट मुलाला, " इथेच कुठे तरी बघ आता नोकरी. लांब नको जाऊस. मी नाही जगायची तू लांब गेलास तर " असे लाडिकपणे सांगणाऱ्या आईपासून तो " हं त्या स्वतंत्र धंद्याबिंद्याच्या भानगडीत पडू नकोस. आहे ते ठीक आहे, चालवू या त्यातच. " अशा खीळ घालणाऱ्या बापापर्यंत, उच्च शिक्षण होऊनही (संस्कार होऊन नव्हे) चारचार पाचपाच हजार रुपये हुंड्याची मागणी करणाऱ्या वरमंडळीपासून तो लग्न झाल्यानंतर " हेच नाही, तेच नाही, हेच द्यायला हवं होतं, तेच आणायला हवं होतं " असे पत्नीला बोचकारे काढून संसार उजाड करून घेणाऱ्या पदवीधर तरुणापर्यंत असे अनेक प्रकार आणि अनेक परी त्यात येतात. शिक्षणाच्याद्वारा या सर्वांचे उच्चाटन हा तर गत विविध चळवळींचा उद्देश होता. पण अद्याप तो साधलेला आहे असे म्हणता येणार नाही. इतरांचे चांगले गुण घेऊन पुढे जाण्याची बुद्धी अद्यापही ' या ' समाजाच्या अंगी पुरेपूर बाणलेली नाही. केवळ ब्राह्मणाच्या नावाने हातबोटे मोडून आपल्याला पुढे जाता येणार नाही हे ध्यानी आलेले नाही. राजकारण किंवा समाजकारण यामधील बहुजननेतृत्व ' तसे ' ठीक असले तरी अनेकविध दोषांनी डागाळलेले आहे. पन्नास वर्षांपूर्वी ब्राह्मण समाजात ' ब्राह्मण आगरकर ' झाले, आज बहुजनसमाजासाठी ' मराठा आगरकरां 'ची आवश्यकता आहे. एकशेसोळा वर्षांपूर्वी लोकहितवादींनी घणाघाती ' शतपत्रे ' लिहिली. बहुजनसमाजासाठी अशाच ' शतपत्रां 'ची आज गरज आहे. मात्र ब्राह्मण आगरकर किंवा ब्राह्मण लोकहितवादी यांच्याकडून हे होणार नाही. तसे त्यांच्या मनात असले तरी होणार नाही, ते करणार नाहीत. आगरकर किंवा फुले यांच्यातील असामान्य धैर्याचा गुण, लोकशाही असूनही उरलेला नाही. नेतृत्वाच्या तंत्रात असणारा, फारसे जुने न टाकणारा नि नवे न स्वीकारणारा, दोषाची उजळणी नको असणारा ' जागा ' बहुजनसमाज या दृष्टीने ' त्यांना ' भीतिप्रद वाटण्याची शक्यता असल्याने विसाव्या शतकातील लोकहितवादींच्या शतपत्रासाठी ' मराठा आगरकरांची 'च नितान्त गरज आहे.

ब्राह्मणेतर नेत्यांनी इतके मोठे ऋण करून ठेवले आहे की, त्याच्या भाराने

आपण अक्षरशः चेपून जातो. पण या ऋणातून मिळणाऱ्या शिदोरीवर आज विसंबून चालायचे नाही. काळ मागे पडला आहे. चळवळी 'गत' झाल्या आहेत. प्रश्नांनी—समस्यांनी वेगवेगळ्या कलाटण्या घेतल्या आहेत. श्रमिकांच्या राज्याची—शेतकरी—कामकरी—राज्याची—बहुजननेत्यांची कल्पना अद्याप साकार व्हायची आहे. ती साकार होणार की केवळ स्वप्नच ठरणार आहे? त्या दृष्टीने काय करणे जरूर आहे नि काय केले पाहिजे, नव्या संदर्भात, निमालेली सत्य-शोधक चळवळ जागी करणे जरूर आहे काय, करणे आवश्यक असेल तर ती कशी करता येईल की एखाद्या राजकीय पक्षाची विचारसरणीच तशी बांधून हे करता येईल, खऱ्या अर्थाने बहुजनसमाज उरला आहे काय, तसे मानणे आज इष्ट ठरेल काय इत्यादी अनेक प्रश्न त्यातून निर्माण होतात. प्रश्नांच्या सूचनांची जबाबदारी माझी असली तरी त्यांच्या निर्णायक उत्तराचा अधिकार निदान तो मी माझ्याकडे आहे असे मानीत नाही. मान्यवरांनी कूट प्रश्नांची गणिते मांडावीत नि सोडावीत.

**संदर्भ**


१. 'महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी' : प्रा. गं. बा. सरदार : पृ. ११३

२. श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची भाषणे : द्वितीय खंड : १९३७, पृ. ९८

३. 'जोतीराव फुले : समग्र ग्रंथ' : संपा. गो. गो. अधिकारी : 'म. फुले यांचे कार्य' : पृ. ४३-४४



REFBK-0025402

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३२२२
२५९८३
२५४८८

पूर्वप्रसिद्धी

नवभारत
लोकवाङ्मय
दै. पुढारी
साधना
दै. समाज
समाज प्रबोधन पत्रिका
महर्षी शिंदे गौरव अंक
युगकर्ता
राजर्षी शाहू गौरव ग्रंथ

## सुरेश एजन्सीची नवी प्रकाशने

डॉ. भीमराव कुलकर्णी यांचा वाङ्मयीन जगतात घडलेल्या घटनांवर आधारित खुसखुशीत शैलीतील ललित लेखांचा संग्रह

### खेकडे आणि खेकटी

**भीमराव कुलकर्णी** — **किंमत ५० रुपये**

'मी कोण'? या शोधात निघालेल्या एका मनस्वी, कलासक्त स्त्रीच्या जीवनावरील कादंबरी

### साक्षी

**मानसी कणेकर** — **किंमत ३० रुपये**

'बोरकरांची प्रेमकविता' या संग्रहानंतर कविवर्य बोरकरांच्या संकलित भक्तिकवितांचा आगळावेगळा संग्रह

### कैवल्याचे झाड

**बा. भ. बोरकर** — **किंमत ३० रुपये**

तमाने टाकली प्रकाशाची कात
झाली काळजात यक्षरात्र ।

कवयित्री अरुणा ढेरे यांच्या कवितांचा उत्कृष्ट संग्रह

### यक्षरात्र

**अरुणा ढेरे** — **किंमत २५ रुपये**

जोतीबा फुले, शाहू महाराज, कर्मवीर शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी कर्वे, क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा वेध घेणारा रोखठोक वैचारिक लेखांचा संग्रह

### नांगरी परंपरेचे लोकाविष्कार

**डॉ. एस्. एस्. भोसले** — **किंमत ६० रुपये**

**सुरेश एजन्सी, पुणे**